



अध्यात्मिक दर्जा दाखवणारा आलेख

क्रमा क्रमाने अवस्था कशी बदलते ते दाखवले आहे.

# व्याध गीता

अनुवादक - अशोक कोठारे

महाभारतातील वनपर्वाच्या मार्कंडेय समस्या पर्वामधील

व्याध - कौशिक ब्राह्मण, ह्यांच्यातील संवाद

ई साहित्य प्रतिष्ठान

# व्याध गीता

## मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : २५ ऑगस्ट २०१८**

## भाषांतरकाराचे  दोन  शब्द -

महाभारतात ज्ञान देणार्या कांहीं गीता आहेत. त्यातील भग्वद्गीता ख्यातनाम आहे. त्या भग्वद्गीतेत जे ज्ञान दिले आहे ते सामान्य जनांना सहजपणे उमगेल असे नाही. ते मोठ्या विद्वानांना सुद्धा समजणे अवघड आहे. म्हणूनच त्यावर कित्येकांनी भाष्य, टीका केल्या आहेत. तरीसुद्धा ती समजत नाही. विशेष म्हणजे त्यात दिलेले ज्ञान जीवनात कसे आचरणात आणावे ते सामान्याना समजत नाही. त्या दृष्टीने व्याध गीता महत्वाची ठरते. त्यात ते सगळे दिले आहे जे भग्वद्गीतेत दिले आहे. फक्त महत्वाचा फरक असा आहे कीं, व्याध गीता सामान्याना समजण्यास अतिशय सुलभ आहे. ती समजण्यासाठी कोण्या भाष्याची किंवा टीकेची आवश्यकता नाही. म्हणून महाभारतातून जशी भग्वद्गीता वेगळी काढून स्वतंत्रपणे उपलब्ध झाली आहे तशी व्याध गीतासुद्धा मिळाली पाहिजे असे मला वाटले म्हणून ती मी देत आहे. अध्यात्म साधना करण्यासाठी गुरू करावा लागतो परंतु, ज्याने व्याध गीतेचा अभ्यास केला आहे, त्याला, जर तो प्रामाणिकपणे प्रयत्न करणारा असेल तर, अध्यात्म साधना गुरूशिवाय करता येऊ शकते, हे ह्या गीतेचे विशेष आहे. महाभारताच्या निरनिराळ्या प्रतींमध्ये हा भाग कमी जास्त तपशिलात आढळतो. मी ते सगळे घेऊन सर्वात जास्त तपशिल काढून ह्यात दिले आहेत, म्हणजे कांहीं राहून जाऊ नये. व्याध म्हणजे खाटीक म्हणून, मराठीत त्याचे खाटीक गीता होते पण मी तो बदल केला नाही.

ज्या लोकांना आत्मशोधाची आस लागली आहे अशांसाठी व्याध गीता फार उपयोगाची आहे. हे माझ्या लक्षात आल्यावर व्याध गीता महाभारतातून वेगळी काढून साधकांना उपलब्ध करण्याचे ठरवले. तिच्यात साधना कशी करावी त्यात कोणते नियम पाळावयाचे, कसे पाळावयाचे त्याची माहिती दिली असल्याने ही गीता त्यांच्यासाठी जास्त महत्वाची झालेली आहे. नियमितपणे ती वाचनात ठेवल्याने साधकाला त्याच्या कर्तव्याची आठवण राहिल व तो बिनचूक त्याची साधना करू शकेल अशी माझी अपेक्षा आहे. गृहस्थाश्रमात राहून कशी स्वताची अध्यात्मिक उन्नती साध्य करावयाची ह्याबद्दल चांगले विवेचन त्यात आहे. प्रपंचात असणार्या माणसांस फार उपयोगाचे आहे. सत्त्व, रजो, तमो गुणांची रचना कशी आहे, विश्वाशी त्यांचा कसा संबंध आहे व त्यातून आपली प्रगती कशी करावी, ह्याचे

उत्तम मार्गदर्शन व्याध गीतेत आपल्याला शिकावयास मिळते. चार युगात कर्मकांडाची उपयुक्तता कशी बदलत जाते ते सांगितले आहे. कर्मकांड, पुजा, व्रतवैकल्ये म्हणजे सगळा धर्म असा प्रचार पुरोहित वर्ग करत असतो, वस्तुतः ते खोटे आहे हे व्याध गीतेचा अभ्यास केल्याने समजते. कर्मकांड, पुजापाठ हे ऐच्छिक आहेत. ते हिंदू धर्माचा मुख्य भाग नाहीत. त्या दृष्टीने गृहस्थाचे व्रत सांगितले आहे ते पाळणे म्हणजेच खरा धर्म हे व्याध गीता सांगत आहे ते लक्षात येते. व्याध गीते प्रमाणे आपल्या धर्माचे तीन भागात अध्ययन करावे लागेल. त्यात पहिला येते निती शास्त्र, त्यानंतर येते अध्यात्म विद्या आणि शेवटी आहे कर्मकांड म्हणजे पुजापाठ, व्रतवैकल्ये वगैरे विधी व त्याच्या चालीरीती. हा तिसरा भाग संस्कृती म्हणून विशेष समजला जातो कारण, ते निरनिराळ्या प्रदेशांत, लोकांत, जाती जमातीत भिन्न असतात. पहिले दोन सगळ्यांना एकच असतात म्हणून हिंदू धर्माचा अभ्यास म्हणजे प्रामुख्याने नितीशास्त्र व अध्यात्म विद्या आहेत. व्याध गीतेत फक्त पहिल्या दोनांचा विचार झाला आहे.

भग्वद्गीतेतील मजकूराचे अनेक अर्थ काढता येतात त्यामुळें नेमका कोणता अर्थ घ्यावयाचा असा संभ्रम सामान्य साधकाला होत असतो, तो व्याध गीता वाचतांना होत नाही. कारण, त्यात एकच अर्थ निघतो. कोणाच्याही मदतीशिवाय सामान्य बुद्धी असलेला कोणीही ही गीता वाचू शकतो. मी माझ्या नेहमीच्या पद्धतीनुसार व्याध गीतेचे भाषांतर मराठीत गद्यात केले आहे. त्यामुळें ते वाचणे जास्त सोपे झाले आहे.

पाप, पुण्य, हित, अहित, सत्य, असत्य, हिंसा, अहिंसा अशा बर्याच गोष्टी ह्यात सोप्या शब्दात समजावून दिल्या आहेत. तपस्या, संयमन, व्रतस्थता, मर्यादा, सत्त्वशिलता (चांगुलपणा), भोगांबद्दलची उदासिनता आणि मातापित्याबद्दलची (साधकांवर विसंबून असणार्यां सर्वांबद्दलची) कर्तव्यदक्षता हे **गृहस्थी व्रत** सांगितले आहे. त्याशिवाय अनिवार्य पापांपासून मुक्ती मिळण्यासाठी **पापक्षालनाचे वर्त** सांगितले आहे ते सुद्धा चांगले आहे. त्यातील संज्ञांचे अर्थ शेवटी दिलेल्या परिशिष्टात समजावून दिले आहेत त्यामुळें गृहस्थाने, गृहीणीने त्याची अध्यात्म साधना कशी करावी त्याचे मार्गदर्शन होईल.



अखेरीस दोन परिशिष्ठ जोडली आहेत त्यात इतर उपयुक्त महत्वाची माहिती दिलेली आहे, ती साधकांना उपयोगी येणारी आहे. मला आशा आहे कीं, व्याध गीता सच्च्या आत्मशोधकाला मोठी उपयोगाची होईल.

अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

१० सप्टेंबर २०१८

# व्याध गीता

## प्रकरण पहिले

वैशंपायन पुढे सांगतात, अरे जनमेजया, त्यानंतर राजा युधिष्ठीर मार्कंडेयांना एक वेगळाच प्रश्न विचारतो. तो बोलतो कीं, जर ते त्याच्या प्रश्नाचे खरे उत्तर देणार असतील तर त्याला ऐकावयाला आवडेल. मार्कंडेय त्याला प्रश्न विचारण्याची मुभा देतात. तो विचारतो, आता पहा, आपण ज्या कांही गोष्टी पहातो जसें सूर्य, चंद्र, वायू, पृथ्वी, अग्नी, पिता, माता, आकाश, द्युत ते सगळे विविध देवतांच्या रुपांने आपण त्यांना मानत असतो. त्या सगळ्यांचा आपण त्या प्रकारे आदर करत असतो आणि कांहीं वेळा त्यांची पुजासुद्धा करत असतो. पतिव्रता पत्नी तिच्या पतिची जी सेवा करते त्यात मात्र मला कांहीं खोट असते असें वाटते. म्हणून ऋषीवर मला सांगा, पवित्र पतिव्रता पत्नी तिचे सगळे भोग इंद्रिय संयमित करून आपल्या पतीची सेवा करत असते कारण ती त्याला तिचा परमेश्वर मानत असते. परंतु, हे सगळे मला त्या स्त्रीसाठी फार मुष्कीलीचे असावे असे वाटते. अहो ब्राह्मणा, मुलांनी पित्याची आणि आईची सेवा करणे व बायकोने नवर्याची सेवा करणे हे दोनही मला फार अवघड असले पाहिजेत असें वाटते. पवित्र पत्नीचे जगणे जितके मुष्कील असते तितके कांहींच मुष्कील नसते असे मला वाटते. पवित्र जीवन जगणे आणि त्यात गरोदरपणी त्या वेदना सहन करणे असें सगळे त्यांना करावे लागते. मुलांना जन्म देणे किती जोखमीचे असते ते तुम्ही जाणता अहात. त्यानंतर त्यांना वाढवणे, तेसुद्धा मोठ्या प्रेमाने, ते करत असतांना त्यांना त्याच पतीचे, सासरचे आणि मुलांचे द्वेषाने भरलेले वागणे सहन करावे लागत असते रोजच्या रोज हे किती तापदायक असेल ते तुम्ही पहात असाल. ते सगळे सहन करत त्या बायका ते काम करत असतात. त्यात त्याना काय सुख मिळत असेल ते मला समजत नाही. पण तरीसुद्धा त्या ते करत असतात न चुकता. मला हे सगळे फार मुष्कीलीचे काम आहे असे वाटते.

अहो द्विज, मला सांगा, क्षत्रियाच्या कर्तव्याची माहीती. मी समजतो कीं, क्षत्रियाला त्याच्या कामात अनेक कटु निर्णय घ्यावे लागतात ज्यात पाप कर्म होण्याची धास्ती असते. म्हणून ते कार्य मी मुष्कील समजतो. वरकरणी पापसदृश्य कृत्य करतांना त्याला मनात शंका येत

असतील तर तशा परिस्थितीत त्यांने कसे काम करावे. तशी कामं करत असतांना त्याला पुण्य कसे मिळते. मला खात्री आहे आपण पूर्ण ज्ञानी असल्याने माझे त्याबद्दल प्रबोधन करू शकाल. माझी इच्छा आहे कीं, आपण त्यावर विवरण करून माझ्या शंकांचे निरसन करावे. युधिष्ठीर त्याप्रकारची विनंती पुन्हा पुन्हा मार्कंडेयांकडे करत असतो तेव्हां तो महाऋषी त्याला सांगतो, मी तुझ्या सगळ्या शंकांचे समाधान करणार आहे. प्रश्न कितीही अवघड असला तरी त्याला उत्तर असतेच व ते मी तुला देणार आहे. त्यासाठी नीट लक्ष देऊन मी जे सांगत आहे ते ऐक, कांहीं मातेला उच्च मानतात व कांहीं पित्याला. तरीसुद्धा आपण एक गोष्ट लक्षात घ्यावयाला पाहिजे कीं मुलाला जन्म देणे व वाढवणे हे अवघड कार्य माता करत असते. त्याऐवजी पिता मुलं मोठी झाल्यावर त्याच्या तपस्येने त्यांना योग्य संस्कार देत असतो (*हे विवेचन द्वापार युगातील आहे हे लक्षात घेऊन वाचावे.*) त्याशिवाय पोषणाची तजवीज करत असतो. ते दोघे त्या मुलांनी मोठे व्हावे व कांहीं बनावे असें समजत असतात. दोनही कामं त्या त्या प्रकारची पण मुष्कील असतात हे मान्य करावे लागेल. दोघेही आपली मुलं काय करतात ते पहाण्यासाठी उत्सुक असतात. त्यासाठी जी संतान आपल्या जन्मदात्यांची ती इच्छा पूर्ण करतात ते उत्तम संतान समजले जाते. जी संतान आपल्या जन्मदात्याची ती कामना पूर्ण करतात ते उच्च गतीला जातात. आता बायकांबद्दल सांगतो. त्यांनी उपवास करणे, व्रतवैकल्ये करणे ह्यात कांही अर्थ नसतो. त्या ऐवजी आपल्या संसारात पूर्णपणे रमणे व आपल्या पतीची काळजी घेणे हेंच त्यांच्यासाठी खरे व्रतवैकल्य असे समजले पाहिजे. जी स्त्री त्यात यशस्वी झाली ती वरच्या गतीला जात असते. तो तीचा कर्मयोग असतो व तो इतर कोणत्याही साधनेहून श्रेष्ठ समजला जातो कारण अरे युधिष्ठीरा, ते कार्य साक्षात ब्रह्माचे कार्य समजले जाते. संसार चालवणे हे सृष्टी चालवण्या इतकेच श्रेष्ठ समजले जाते म्हणून जी स्त्री आणि जो पुरूष त्यात मग्न असतात ते एकाद्या तपस्व्या सारखेच समजावेत. खर्या गृहीणीला एकाद्या कर्मयोग्यापेक्षा कमी समजू नकोस.

**- प्रकरण पहिले समाप्त -**

# व्याध गीता
## प्रकरण दुसरे

मार्कंडेय सांगत असतात, फार पूर्वी, त्रेता युगात एक महान वैरागी होता त्याचे नांव होते कौशिक. त्याचा वेदाचा अभ्यास चांगला होता. त्याचा वेदाच्या अभ्यासा बरोबर वेदांग आणि उपनिषदांचासुद्धा अभ्यास होता. तो एके दिवशी सकाळच्या प्रहरी एका झाडा खाली बसून वेदाचे पठण करत होता. त्यावेळी त्या झाडाच्या एका फांदीवर एक मादी बगळीण बसलेली होती. ती बगळीण त्या कौशिकावर शिटते. ते झाल्यामुळे कौशिक त्या बगळीणीवर फार रागावला. रागावून तो त्या बगळीणीकडे पहातो तोंच ती झाडावरून मरून खाली पडते. ते पाहून त्या ब्राह्मणाला वाईट वाटते कीं, त्याच्या क्रोधामुळे ती निष्पाप पक्षीण मेली. त्याला त्या मृत पक्षाबद्दल फार वाईट वाटते व त्यामुळे तो दुःख करू लागला. तो स्वतःला सांगतो, "मी आज फार मोठे दुष्कृत्य केले कीं, त्यामुळें एक निरपराध प्राणी मेला आहे". असें स्वताशीच बडबडत तो नंतर भिक मांगण्यासाठी गांवात गेला. तरीसुद्धा, त्याला त्याच्या ह्या सिद्धीचा (दूर)अभिमानसुद्धा वाटू लागतो. भिक मांगण्यासाठी तो त्या गांवातील प्रतिष्ठीत वस्तीत फिरत होता. त्याला माहीत असलेल्या एका घराकडे तो जातो. तेथे तो भिक मांगण्यासाठी बाहेर उभा रहातो व "भिक्षांदेही", असा आवाज देतो. त्यावर आतून ती गृहीणी त्याला थांबावयाला सांगते. आत मध्ये घरात ती गृहीणी त्याला भिक्षा देण्यासाठी पात्र स्वच्छ करत असते. त्या गोष्टीला वेळ लागतो. त्याच वेळी तिचा पति पिण्यासाठी पाणी मागतो व कांहीं खाण्यासाठी सुद्धा दे असे त्या गृहीणीला आग्रहाने सांगतो. म्हणून ती त्याला खावयाला देऊ लागते. त्याला खाणे दिल्यानंतर ती त्याच्या बाजूला आणखीन काय त्याला पाहिजे ते विचारत उभी असते हे सगळे कौशिक पहात असतो. ती पतिव्रता त्याप्रमाणे तिचे कर्तव्य करत होती. एका पतिव्रतेला शोभेल असे तिचे सगळे वागणे होते. ते करत असतांना तिचे कौशिककडे संपूर्ण दुर्लक्ष झालेले असते परंतु, जसे तिच्या लक्षात येते कीं, एक ब्राह्मण भिक्षा घेण्यासाठी बाहेर उभा आहे तेव्हां तिला फार शरम वाटते व ती लगबगीने त्याच्या साठी भिक्षा भरून आणते. त्यावेळी तो ब्राह्मण तिला थोड्या घुश्श्यातच बोलतो, "अहो गृहीणी, मला तुझ्या ह्या वर्तणूकीचे आश्चर्य वाटते.

मला थांबण्यास सांगण्याऐवजी जाण्यास सांगितले असते तर चांगले झाले असते". तो रागावला आहे ते तिला समजते व ती त्याच्या कडे दिलगीरी मागते. मला क्षमा करा, माझ्या कडून चूक झाली आहे. पुढे ती सांगते, "हे पहा एका पतिव्रता स्त्रीला तिचा पति परमेश्वर असतो हे तुम्ही जाणता अहात. त्याच्याकडे प्रथम मला लक्ष द्यावे लागते हे तुम्ही समजू शकता". कौशिक तिला विचारतो, "तुझ्या दृष्टीने ब्राह्मण त्याच्या पेक्षा कमी आहे कां? एक गृहीणी झालीस म्हणून तू एका ब्राह्मणाला विसरलीस? इंद्रसुद्धा आम्हा ब्राह्मणापुढे झुकतात, माणसांचे काय? तू कदाचित ऐकले नसशिल कीं ब्राह्मण अग्नी असतो व जर तो रागावला तर सगळी पृथ्वी जाळून टाकू शकतो". त्याचे ते ऐकल्यावर ती काळेभोर डोळे असलेली देखणी पतिव्रता त्याला बोलते कीं, "मी बगळीण नाही कीं, तुझ्या नजरेने मरून पडेन. मला माहीत आहे तुमचा वेदांचा अभ्यास आहे तरी असे नाहक रागावणे तुम्हाला शोभत नाही. तुझ्या त्या रागीट नजरेने माझे कांहींच बिघडणार नाही". पुढे ती त्याला बोलते, "मी खर्या संयमी ब्राह्मणांचा कधीच अनादर करत नाही. मला कल्पना आहे ब्राह्मणांच्या सामर्थ्याची परंतु, खरा ब्राह्मण क्षमाशिल असतो तो त्याचा क्रोध असा व्यर्थ वापरत नाही. ब्राह्मणांच्या अनाहूत क्रोधामुळेंच समुद्राचे पाणी खारट झाले आहे हे तुम्हाला ज्ञात असेलच. मी बर्याच मुनींना ओळखते ज्यांचे चित्त शांत असते तरी जेव्हां त्यांचा क्रोध सकारण असतो तेव्हां तो दंडक अरण्यसुद्धा भस्म करत असतो. वातपीने अगस्त्यांचा उपमर्द केला तेव्हां त्याचे काय झाले सगळ्यांना ज्ञात आहे. महान ब्राह्मण जसे रागीट असतात तसेंच क्षमाशिलसुद्धा असतात. म्हणून तू मला माफ केले पाहिजेस. मी माझ्या पतिची सेवा सर्व प्रथम करते कारण, तो माझ्यासाठी परमेश्वर आहे. बायकांसाठी त्यानी त्यांच्या लायक पतीची सेवा करणे ह्यासारखे पुण्य कर्म नसते. मी तेंच करत होते मग त्यात दोष कसा तुम्ही पहाता? मला माहीत आहे किं, तू रागाच्या भरात एका निरपराध पक्षाला तुझ्या क्रोधाने मारले आहे, असा अकारण वापरलेला क्रोध माणसाचा दुष्मन असतो हे तुझ्या लक्षात कसे येत नाही? ब्राह्मण त्याच्या संयम, मर्यादा, विवेक, क्षमाशिलता अशा गुणांसाठी ओळखला जातो ते गुण तुझ्यात मला दिसत नाहीत. तुझ्यातील अहंकार अमर्याद झाला आहे अशा परिस्थितीत तू स्वतःला खरा ब्राह्मण समजतोसच कसा? मी काय करत होते ते पाहिल्यानंतर तू मला समजून घेणे आवश्यक

होते त्या ऐवजी तू मला एक पक्षीण समजलास त्यात तुझ्या अज्ञानाची कल्पना येते. ब्राह्मणाचा राग अन्याया विरुद्ध वापरण्यासाठी असतो स्वतःचा अहंकार पोसण्यासाठी नाही. जो ब्राह्मण त्याच्या ह्या सिद्धीचा दुरुपयोग करतो तो भ्रष्ट होतो त्याला गती नाही कारण, त्यांने त्याची विद्या वापरुन अन्याय केलेला असतो. स्वतःचा अहंकार अशारितीने पोसणे हे मोठे पाप कर्म असते ते मी तुला सांगावयाला पाहिजे कां? हे प्राथमिक ज्ञान तुला नसेल तर तुम्ही वेदांचा काय अभ्यास केला, हे मला समजत नाही. क्रोध ही एक वासना आहे त्याचे नियमन करावयाचे असते किं, ते असे व्यर्थ दुरुपयोगात आणावयाचे ते तुझ्या लक्षात कसे येत नाही. ब्राह्मण दुसर्याला शिकवतो तोंच जर असा बेशिस्त असेल तर कसे चालेल. एका सच्च्या ब्रह्मणाकडून काय अपेक्षा असतात ते मी तुला सांगितले. आता तुला सांगते, सच्च्या ब्राह्मणाची लक्षणं काय असतात. वेदाचा अभ्यास, साधी रहाणी, सर्व भोग आणि कर्म इंद्रियांचे संपूर्ण संयमन, सत्यावरील (परमेश्वर) श्रद्धा, त्यात प्रामाणिकपणा हा मोठा गुण ब्राह्मणात असावा लागतो. पुण्याचे ज्ञान होणे सोपे नसते. पण एक गोष्ट निश्चित कीं, पुण्याचा संबंध थेट सत्याशी असतो. जाणकार सांगतात कीं, श्रृतीमध्ये पुण्याचा सविस्तर विचार केला आहे परंतु, पुण्य ही एक फार प्रगल्भ बाब आहे त्याची चर्चा करणे येथे मला उचीत वाटत नाही. तुम्ही वेदाचा अभ्यास केलेले अहात तरी तुम्ही असें कसे वागता. तुमचे वर्तन पुण्याच्या विरुद्ध आहे हे लक्षात कसे येत नाही. मला असें वाटते तुम्हाला पुण्याचा अभ्यास करण्यासाठी एका ज्ञानी माणसाला भेटावे लागेल. तो तुम्हाला चांगल्या प्रकारे हा विषय समजावून सांगेल. तो माणूस जनक राजाच्या मिथिला नगरीत असतो. त्याचा व्यवसाय मांस विकण्याचा आहे. तरी जर तुला खरोखर शहाणे व्हावयाचे असेल तर तू त्याला जाऊन जरूर भेट, त्याला शरण जा". असे सांगून ती पतिव्रता त्या कौशिक ब्राह्मणाला आणलेला शिधा दान करून त्याच्या पाया पडते. त्याला विनंती करते कीं, चांगले लोक स्त्रीवर कधी रागवत नाहीत म्हणून तुम्ही माझ्या तुम्हाकडे दुर्लक्ष करण्याच्या प्रमादासाठी माफ करावे. त्या पतिव्रतेच्या सांगण्यामुळें कौशिक सावध झालेला असतो व तो तिला म्हणतो, मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे. तुझ्यामुळें माझे डोळे उघडले आहेत व मला माझी चूक समजली आहे. त्यामुळें मला तुझ्यावर कोणताही क्रोध नाही. नंतर तो तिला सांगतो, तिच्या सांगण्याप्रमाणे तो मिथिला नगरीत जाऊन त्या मांस

विकणार्याला भेटणार आहे व त्याच्या कडून ज्ञान घेणार आहे. ते ऐकल्यावर ती पतिव्रता सुद्धा प्रसन्न होते व त्याला, तुझे कल्याण हो, अशा शुभेच्छा देते. कौशिक तिला निरोप देतांना आश्वासन देतो कीं, तो तुरंत मिथिला नगरीत जाऊन त्या खाटकाची भेट घेऊन ज्ञान प्राप्त करणार आहे.

त्यानंतर तो आपल्या घरी जात असतांना त्याला सतत एका गोष्टीचे आश्चर्य वाटत असते कीं, ह्या गृहीणीला त्याने क्रोधाने एका पक्षिणीला मारले हे कसें कळले? त्याच्याच विचारात तो आपल्या घरी जातो.

**- प्रकरण दुसरे समाप्त -**

# व्याध गीता
## प्रकरण तिसरे

मार्कंडेय पुढे सांगतात, कौशिक त्या बाईने जे सांगितले त्यावर सतत विचार करत रहातो. तिने जे कांहीं सांगितले ते सगळे योग्य होते हे त्याच्या लक्षात आले होते. नैतिकतेच्या सुक्ष्म बाबींकडे त्यांने लक्ष द्यावयाला सुरूवात केली. तो अखेरीस ठरवतो, कीं, त्याने मिथिला नगरीत जावे. त्या जाणकार खाटकांस भेटावे व त्याच्या कडून ज्ञान घ्यावे.

त्या पतिव्रतेने जसे ओळखले कीं, त्याच्या क्रोधामुळें ती पक्षीण मेली त्यामुळें त्याला समजते कीं, ती बाई मामुली नाही कारण, एरवी ते समजणे त्या बाईला केवळ अशक्य होते. अशा कारणाने कौशिक तिच्या सांगण्यानुसार करण्याचे ठरवतो. तो पायीच निघतो मिथिला नगरीकडे. अनेक जंगले व शेतीवाड्या, गांव आणि नगरं असें चालत अखेरीस तो मिथिला नगरीला पोहोचतो. ते शहर अतिसुंदर होते. त्या ठिकाणी जागोजागी पताका फडकत होत्या. ठिकठिकाणी कमानी होत्या. तेथे अनेक चौसोपी वाडे दिसत होते. रस्ते रुंद होते. त्या रस्त्यांच्या दुतर्फा उंच भिंती होत्या. लोकांची वर्दळ कमालीची होती. सगळीकडे सण असल्यासारखे वातावरण होते. रस्त्यावर सुशोभित रथ फिरतांना दिसत होते. रस्त्याच्या दुतर्फा दुकानं सजलेली होती त्यात विविध वस्तु विकण्यासाठी मांडलेल्या होत्या. लोकं आनंदाने इकडे तिकडे फिरत होती. लहान मुलं मुलीं वाड्याच्या अंगणात खेळतांना दिसत होती. रथांबरोबर उत्तम प्रकारची वाहनं, घोडे आणि हत्ती सुद्धा वावरतांना दिसत होती. तेथे कौशिक जागोजागी जेथे जमेल तेथे त्या ज्ञानी खाटकाची चौकशी करत फिरत असतो. एका जागी त्याला समजते कीं, तो खाटीक कोणत्या मंडईत बसतो. त्या मंडईत कौशिक ब्राह्मण जातो व पहातो कीं, तेथे एका मांस विकणार्या दुकानात खूप गर्दी असते. तो चौकशी करतो तेव्हां त्याला समजते कीं, हांच तो ज्ञानी खाटीक. बराच वेळ कौशिक त्या तिथे वाट पहात तात्कळत उभा असतो. त्यानंतर त्या खाटकाची नजर जशी ग्राहकांची गर्दी कमी होते, त्या ब्राह्मणांवर पडते. सगळी ग्राहक संपल्यावर तो खाटीक आपले काम आटोपत कौशिकची चौकशी करतो. त्यावेळी कौशिकला दुसरा धक्का बसतो कारण तो खाटीक त्याला विचारतो कीं काय त्याला त्या गांवातील पतिव्रतेने

पाठवले आहे कां? कौशिकला तो आदरपूर्वक त्याच्या घरात आणून बसवतो त्याला पिण्यासाठी पाणी देतो व पाय धुण्यासाठी सुद्धा पाणी देतो. खाटकाचे घर आटोपशीर व सुंदर ठेवलेले होते. स्वतः त्याचे दुकान आवरण्यासाठी निघून जातो. कौशिक तेथे बसल्या बसल्या आश्चर्य करत असतो कीं ह्या दोघांना कसे समजते कीं माझ्या बाबत काय झाले. त्यामुळें त्याचा विश्वास बसतो कीं, त्या दोघात कांही विशेष सामर्थ्य निश्चितपणे आहे.

मार्कंडेय पुढे सांगतात, खाटीक त्याचे दुकान आटोपून घरी आल्यावर स्नान करतो व त्याची देवाची पुजा केल्यावर ब्राह्मणाकडे येऊन बसतो. त्यांचे संभाषण सुरू होते. कौशिक त्याला विचारतो "अहो ज्ञानी, आपल्या ज्ञानाची योग्यता पहाता हा व्यवसाय जो तुम्ही करत अहात तो अयोग्य नाहीं कां वाटत आपल्याला"? खाटीक सांगतो, "अहो ब्राह्मणा, हा व्यवसाय आमचा पिढीजात आहे. ब्राह्मण बोलतो, "मला वाटते हा व्यवसाय क्रौर्यावर आधारित आहे म्हणून ज्ञानी माणसास शोभत नाही". ते ऐकल्यावर तो ज्ञानी खाटीक त्याला सांगतो, "क्रौर्य कर्मात नसते ते करणार्याच्या विचारात असते. कोठलेही कर्म क्रूर किंवा दयाळू असें नसते. हे त्याकडे पहाण्याचे दृष्टीत आणि करणार्याच्या उद्देशात असते. त्याशिवाय हा माझा पिढीजात असल्यामुळें तो करणे मला क्रमप्राप्त आहे. प्रत्येक माणसाला विधात्याने कांहीं कर्तव्ये दिली आहेत व ती प्रामाणिकपणे करण्यात कांहींच दोष लागत नाही. विधाता जे कर्म आपल्यावर आपल्या जन्माने सोपवतो ते करणे आपले कर्तव्य असते. असें न करणे म्हणजे विधात्याची प्रतारणा करण्या सारखे असते. सृष्टी चालण्यासाठी विविध प्रकारची कामं होणे आवश्यक असते, त्यात जास्त चांगले कार्य आणि कमी चांगले कार्य असें कांहीं नसते, तसेंच ते कार्य जे विधात्याने आपल्याला दिले आहे ते जास्तीत जास्त उत्तमरित्या करणे हांच त्या माणसाचा एक धर्म असतो. हे सत्य तू प्रथम समजून घे". खाटीक हे बोलल्यावर ब्राह्मण त्याला विचारतो, "एकादा प्राणी मारणे हे कसे काय एक कार्य असू शकते ते मला समजत नाही". खाटीक सांगतो, "खाण्यासाठी प्रत्येक प्राणी कोणातरी जीवाची हत्या करत असतो कारण, "जीवो जीवस्य जीवनं", हा निसर्गाचा अबाधित नियम आहे तो कोणीही बदलू शकत नाही. माणसें शाक भाजी खातात, त्यातसुद्धा जीव असतो म्हणून ते खाणे अप्रसुत ठरत नाही". कौशिक त्याला विचारतात त्याच्या स्वताच्या कर्माबद्दल. तो सांगतो, "मी देव, अतिथी आणि जे माझ्यावर

विसंबून आहेत त्यांचे खाणे झाल्यावर माझे त्यात जे उरले आहे ते एकदा संध्याकाळी खाऊन गुजराण करतो. मी कधी कोणाला अपशब्द वापरून बोलत नाही. मला माहीत आहे कीं, आपले हे जीवन आपल्या ह्या आधीच्या जीवनाशी जोडलेले असते. तसेंच आपले पुढचे जन्म सुद्धा ह्या सध्याच्या जीवनाशी निगडीत असतील. त्याप्रमाणे सगळे होणार असते ते आपण बदलू शकत नाही. मग त्यात आपले व्यवसाय, नातेवाईक, सगळे आधीच ठरवून ठेवल्यासारखेच असतात. विशेष म्हणजे ते सगळे आपल्याच कर्मधर्मानुसार होत असते".

कौशिक त्याला विचारतो, "तो ज्या राज्यात रहात आहे तेथे कशी व्यवस्था अमलात आणली जाते. तेव्हां खाटीक त्याला सांगू लागतो, कृतयुगापासून तीन व्यवसाय माणसाच्या समाजाच्या उद्धारासाठी सांगितली आहेत. त्यांत कृषी, पशुपालन आणि व्यापार हे प्रमुख समजले जातात. त्यांत नंतर कांहीं उप व्यवसाय समाजाच्या गरजेनुसार उत्पन्न होत असतात. त्याशिवाय अध्ययन (वेदांचे प्रामुख्याने), नितीशास्त्र, पौरोहित्य असें ब्राह्मणांना दिले आहेत. द्विजांची मदत करणे शुद्रांना सांगितले आहे. वैश्य जरी प्रामुख्याने कृषी करण्याचे अपेक्षित असले तरी ते व्यापारसुद्धा करू शकतात. शुद्रसुद्धा व्यापार करत असतात. अन्याया विरुद्ध लढणे हे क्षत्रियांचे काम सांगितले आहे. ब्राह्मणांना इंद्रिय संयमन, मंत्र पठण अशी आणखीन कांही कर्तव्ये सांगितली आहेत. असें जर सगळे आपापली कामं व्यवस्थितपणे करत असतील तर राजा त्याचा राज्य कारभार चांगला चालवू शकतो. जे लोक त्यांने दिलेली कामं नीटपणे करत नाहीत त्यांना वळणावर आणणे, जसे गुराखी भरकटणार्या गुरांना लाठी मारून वळणावर आणतो, राजाचे कर्तव्य असते. राजाबद्दल प्रजेत आदरयुक्त भय असले पाहिजे जसे पित्याबद्दल मुलांच्या मनात असावे लागते जर कुटूंब व्यवस्थित चालावयाचे असेल. एकादे राज्य कुटूंबासारखे समजून जो राजा काम करतो तो त्याच्या प्रजेत प्रिय होतो". पुढे तो खाटीक सांगतो कौशिकाला किं, जनक राजाच्या राज्यात असा एकही इसम मिळणार नाही जो त्याचे विहीत कार्य करत नाही, म्हणून येथे सुराज्य नांदत आहे. जो त्याचे कर्तव्य करत नाही त्याला राजा शासन करतो. त्याच्या मुलांनी जरी कांहीं अयोग्य काम केले तर त्यालासुद्धा क्षमा होत नाही. त्या

बद्दलचे निर्णय ब्राह्मण घेतात व क्षत्रिय त्याची अमलबजावणी करतात. जे गुणी आहेत त्यांना कोणताही त्रास ह्या राज्यात होत नाही.

त्यानंतर तो स्वताच्या व्यवसायाबद्दल सांगू लागतो. आमचे कुटूंब मांस विक्रीचे काम करत आहे. त्यांत गोमांस, डुकराचे मांस व म्हशीचे मांस प्रामुख्याने असते. त्यांची हत्या दुसरे करतात ज्यांना विनावेदना वध कसा करावा ह्याचे प्रशिक्षण असते. कारण खाण्यासाठी प्राणी मारणे वैध असले तरी त्याला मृत्यू विनावेदना (अहिंसक) देणे हे पवित्र कार्य सगळ्यांना जमत नाही ते त्या प्रशिक्षित व्याधांना येत असते. त्यांना व्याध असें म्हणतात कारण तो वध करत असतो. व्याध म्हणजे शिकारी अथवा ठार मारण्याचे काम करणारा. "पशुंना ते विनावेदना कसे मारतात"? कौशिक त्याला विचारतो. खाटीक सांगतो, "आता मी तुला **व्याधांची (खाटकांची ) सिद्ध पद्धत** काय आहे ते सविस्तरपणे सांगतो. प्रथम प्राणी बेहोष केला जातो व तो बेहोष असतांना त्याच्या मेंदूकडे जाणार्या नसा तो प्रथम कापतो व त्यामुळें तो प्राणी शांतपणे बेहोष असतांनाच मृत होत असतो". कौशिक विचारतो, "अरें व्याधा, प्राणी प्रथम बेहोष कसा करतात"? खाटीक सांगतो, "त्यासाठी कांही जडीबुट्टी वापरली जाते, ती त्यांना खाण्यात दिली जाते, त्यांमुळें तो पशु शांतपणे झोपून जातो, त्याला एका पिठावर (चौथरा) निजवले जाते. अतिशय धारदार सुरे कापण्यासाठी वापरले जातात ते घिसाडी आमच्यासाठी तयार करत असतात. एक प्राणी मारला जात असतांना इतर प्राणी तेथे नसतात त्यामुळें, त्यांना आत काय होत आहे ते समजत नाही. कारण अरे ब्राह्मणा, जर त्या इतर प्राण्यानी ते पाहिले तर व्याधाला पाप लागते असे सांगतात. वधक्रिया नेहमी गुप्तपणेच करावयाची असते. वध झाल्यावर त्याचे कातडे त्याच्या शरीरापासून काढले जाते. नंतर त्या शरीराचे मोठे तुकडे केले जातात त्याच वेळी कोथळा वेगळा काढून शुद्राना दानात दिला जातो. ते मोठे मांसाचे तुकडे माझ्याकडे येतात ते मी माझ्या ग्राहकांना आणखीन लहान करून त्यांच्या गरजेनुसार कापून विकत असतो". कौशिक विचारतो, "हे व्याध कार्य कोण करतात"? "व्याध कार्य मुख्यत्वेकरून ब्राह्मणांनेच करावयाचे असते, असा मिथिलात नियम आहे. वेदांत सुद्धा तेंच सांगितलेले आहे. मी मात्र, अरे ब्राह्मणा, वैश्य आहे परंतु, शुद्रसुद्धा हा व्यवसाय करतात". खाटीक सांगतो. "ते वध करण्याचे काम करणारा ब्राह्मण यमाची प्रथम पुजा करतो व

त्याची परवानगी घेऊन मगच त्याचे वध कार्य त्या दिवशी प्रारंभ करत असतो. यज्ञातील बळी व हा वध समानच समजले जातात. असें समजले जाते कीं, ते मारलेले प्राणी त्या दिवशी मरणार होते म्हणून मेले, यमाला ते अर्पिले जातात. त्यांचे मांस खारट पाण्याने (मिठाच्या पाण्याने) धुतले जाते त्यामुळें ते शुद्ध होते असे समजले जाते मगच विक्रीसाठी घेतले जाते". पुढे तो व्याध कौशिकाला सांगतो कीं, तो सहसा मांस खात नाही. दिवसातून एकदाच रात्री जेवतो. त्याच्या पत्नीकडे तिच्या परवानगीनेच जातो. तो खोटे बोलत नाही. कोणाचा द्वेष करत नाही. दिवसभर पापी विचारांचे अनशन करतो. तो कोणाशी स्वताची तुलना करत नाही त्यामुळे तो मद व मत्सर विरहीत जीवन जगत असतो. मी जी साधना करतो ती सगळ्या युगांत सिद्ध होणारी नित्य साधना आहे. इतर साधना ज्यात कर्मकांड, यज्ञयाग इत्यादि पुजाविधी आणि व्रतवैकल्ये असतात त्या साधना फक्त जोवर त्या संबंधीत पुण्यशक्ती जागृत आहेत तोवरच काम करू शकतात. कारण अरे ब्राह्मणा, यज्ञयागादि कर्मकांड यशस्वी होण्यासाठी त्या यज्ञाची देवता जागृत असणे आवश्यक असते. त्या देवतां कृत, त्रेता व कांहीं प्रमाणात द्वापार युगात जागृत असतात परंतु, शेवटच्या कलीयुगात त्या हजर नसतात त्यामुळें ती कर्मकांड कलीयुगात व्यर्थ जातात.

तो खाटीक कौशिकाला सांगतो, "जर राजाची नियत बिघडली तर राज्य बरबाद होते. त्यामुळें अशा राज्यात शरीराने विकलांग असलेले जन्मतात. त्यात कुबड आलेले, आंधळे, मुके, बहिरे, अपंग, राक्षसा सारखे दिसणारे अशी बालक तेथे जन्म घेतात. त्याप्रमाणे लोकांची प्रजनन क्षमता कमी होते. परंतु आमचा राजा निर्दोष असल्याने येथे असें विकलांग कोणी जन्मत नाही. यथा राजा तथा प्रजा, ह्या न्यायाने मिथिलेत सगळे सुव्यवस्थित आहे. राजा गुणी असेल तर प्रजासुद्धा तशीच गुणी रहाते. त्या कारणांने राज्यात पाप कमी होते व पुण्याचा प्रभाव वाढतो. त्यानंतर कौशिक त्याला विचारतो, "मला सांगा ज्ञानी, हत्या व हिंसा ह्यात काय भेद असतो. हत्येमुळें पाप होते कां"? खाटीक सांगतो, "हत्या करण्याने तेव्हांच पाप लागते जेव्हां त्या मागील उद्देश दुःख देण्याचा असतो. तसेंच उद्देश नसला तरी जर अशा हत्येने दुःख दिले गेले तरीसुद्धा ते कांहीं प्रमाणात पापकारक समजले जाते. दुःख हे पापाचे कारक समजले जाते. जर दुःख न होता हत्या केली तर त्यात पाप होत नाही. हिंसा म्हणजे असें कृत्य ज्यामुळें दुःख उत्पन्न

होते. त्यात जरी हत्या झाली नाही तरी दुःख उत्पन्न झाले म्हणून ते पापकारक ठरते. पाप कारक कृत्य विचाराने प्रथम होत असते. अशा सगळ्या पापकारक कृत्यामुळे जी मनाने अथवा प्रत्यक्ष कृतीने (शरीराने) केली गेली आहेत त्या कर्त्याचे अध्यात्मिक स्थान नीच स्थानी जाते. पुण्यामुळें ते स्थान उंच जागी जात असते. म्हणून माणसांने नेहमी पुण्य करावे असे समजतात. तरीसुद्धा पापशक्ती माणसाला विविध प्रलोभने दाखवून पाप करण्यास उद्युक्त करत असतात. म्हणून दुःखहीन जीवन जगणे व जगण्यास मदत करणे ह्यासारखे पुण्य कार्य नाही. माणसं वाचेने सर्वात जास्त पाप करतात कारण अपशब्दाने (अपमान कारक, टोमणे मारणे, हसें करणे, दुर्लक्षणे, चेष्टा मस्करी वगैरे प्रकार ह्यात येतात.) इतरांना दुःख दिले जाऊ शकते ते बोलणार्याचे अध्यात्मिक स्थान खाली आणत असते म्हणून मधूर वाचा असावी. क्रोध हे आणखीन एक कारण आहे ज्यामुळें माणूस इतरांत दुःख उत्पन्न करत असतो. त्यासाठी ज्याला पुण्यप्रद जीवन जगावयाचे आहे त्यानी क्रोध व अपशब्द टाळावेत. त्यासाठी चित्तवृत्ती शांत राखणे आवश्यक असते. दुसर्यांच्या गोष्टीत अनावश्यक लक्ष घालू नये. अशारितीने जो सावधगिरी बाळगून वागतो त्याच्या भोवती पुण्य शक्ती जमा होतात व त्या त्याला मदत करत असतात. त्या उलट पाप करणार्याच्या भोवती पापशक्ती जमा होतात व त्या आणखीन पाप वाढवण्याचा प्रयत्न करत असतात. वासनांच्या आहारी जाणारे अशा मध्ये अडकत असतात. माणसाच्या जीवनात सुखाचे व दुःखाचे प्रसंग येत असतात त्यामुळें तो अति सुखी वा अतिदुःखी होत असेल तर ते त्याच्यासाठी चांगले नसते. माणसाने चांगले झाले म्हणून फार खूष होणे व वाईट झाले म्हणून फार दुःखी होणे टाळावे. परिस्थिती चांगली असो अथवा वाईट असों त्याच्या चित्तवृत्ती स्थीर असल्या पाहिजेत. वाईट काळात त्यातून सुटण्यासाठी चुकीच्या मार्गाचा अवलंब करणे टाळावे. चुकून कांहीं वाईट कृत्य अनवधानाने घडले तर त्याची पुनरावृत्ती करू नये. आपल्यावर ब्रह्माची नजर आहे व आपले प्रत्येक विचार आणि कृत्य तो पहात आहे हे लक्षात घेऊन जर माणूस जगू लागला तर तो निष्पाप जीवन जगू शकेल. नेहमी न्यायाने वागावे. पाप करणारा ब्रह्माच्या नजरेत खोटा ठरतो व प्रायः त्याचा यथावकाश अधःपात होत असतो. पाप, पुण्य असे कांही मी मानत नाही, असें म्हणणारे बहुधः पापाच्या विळख्यात अडकून बरबाद होतात. अहंकाराच्या आहारी जाऊन जे कृत्य

अथवा भाषण होते ते पापकारक असते त्यामुळें त्याचा अध्यात्मिक दर्जा कमी होतो. स्वताची स्तुती करणे अथवा दुसर्याला करावयाला लावणे हे पापकारक असते. चुकून कांही गैरकृत्य घडले तर त्याची भरपाई चांगले काम करून करावी. प्रामाणिक पश्चात्ताप बहुतेक पापांचे निराकरण करत असतो. चुका करत व त्या सुधारत माणूस प्रगती करू शकतो. सगळे मोक्षाला गेलेले ह्याच मार्गाने गेले आहेत. अरे ब्राह्मणा, श्रृतीमध्ये हे सगळे दिले आहे. अज्ञानामुळें झालेल्या पापाला चूक म्हणतात ते प्रायश्चित्त करून धुता येते. जाणून बुजून जे केले जाते त्याला पाप म्हणतात व ते धुतले जात नाही, त्याची शिक्षा भोगावीच लागते. कांहीं चुका अनिवार्य व अपरिहार्य असतात त्यांच्या निराकरणासाठी दानं करावीत, दुसर्याला मदत करावी, समाजात चांगुलपणा वाढवावा. असें केल्याने त्या चुकांचे निवारण होत असते". कौशिक विचारतो, "अहो ज्ञानी, मला सांगा, पापकृत्य किती प्रकारे होत असते"? व्याध सांगतो, "अनवधानाने, हलगर्जीपणाने, बेपर्वाईने, जाणूनबुजून, अपघाताने, दुसर्याच्या सांगण्यामुळें, अज्ञानाने अशा सात कारणांने ते होऊ शकते. त्यातील बेपर्वाई, जाणून बुजून, दुसर्याने सांगितले म्हणून, हलगर्जीपणाने जे होते त्याचे पाप शिक्षेस पात्र समजले जाते. बाकीचे चुका (अनवधानाने, अज्ञानाने, अपघाताने) समजून क्षम्य समजले जातात. गुणीजनांच्या अशा क्षम्य चुकांना जो माफ करतो तो स्वर्गात जाण्यास योग्य समजला जातो. खरा पश्चाताप माणसाला त्याच्या अक्षम्य पापां पासूनसुद्धा वाचवू शकतो. कारण ते सगळे ब्राह्माचे असंख्य नेत्र पहात असतात. त्या नजरेतून कांहींही सुटत नाही. आपण सगळे ब्रह्माच्या परीक्षेस बसलो आहोत, जर उत्तीर्ण झालो तर स्वर्गात व नापास झालो तर परत पृथ्वीवर अथवा त्याखाली नरकात जाणार असतो. ही विधात्याची रचना समजून जे जगतात ते उद्धरतात. पापाचे एक प्रमुख कारण मोह व दुसरे लोभ आहे. योगक्षेमा पुरत्या आपल्या अभिलाषा ठेवणे व त्यापेक्षा जास्त त्यात न रमणे हांच त्यावर उपाय असतो. योगक्षेम म्हणजे शरीराच्या नित्य गरजा, त्या पुरवण्यासाठी हि सृष्टी व त्यातील विविध गोष्टी असतात. तेवढेच जर केले तर पापापासून माणूस मुक्त राहू शकतो. त्यालाच दुसर्या शब्दात मिताहार, मितनिद्रा, मितभोग, मौन किंवा मितभाषा असें सांगितले आहेत. येथे मित म्हणजे जेवढ्यांस तेवढे असे मर्यादीत, न जास्त न कमी. पापी माणसें कधी स्वताला पुण्याच्या बुरख्यात लपवण्याचा प्रयत्न करतात परंतु

ते हे विसरतात कीं, ब्राह्माच्या नजरेतून ते पाप कृत्य निसटू शकत नाही. अशी माणसं इतर जनांना फसवत असतात व त्याबरोबर स्वतःलाही फसवत असतात, ब्रह्माची कधीही फसवणूक करता येत नाही हे ते विसरतात".

एवढे सांगितल्यावर कौशिक त्याला पुनः विचारतात, "पुण्यकर्म कसे ओळखावे ते समजावून सांगा. मला ते ऐकावयाचे आहे".

मार्कंडेय पुढे ते सांगत रहातात, तो पुढे त्याला बोलतो आपण पुण्यकर्मी अहात म्हणून मी तुम्हाला हे विचारत आहे. ज्ञानी खाटीक सांगू लागतो, "यज्ञ करणे, भेटी देणे, वैराग्य, वेदाचा अभ्यास, सत्याची चाड राखणे अशा पांच गोष्टी त्याच्यात प्रामुख्याने आढळतात. त्याला पुण्यवान समजले जाते. त्याशिवाय, वासनांत न रमणे, घमेंड न करणे, लोभीपणा न करणे, वाईट न वागणे, त्या बरोबर चांगल्या गोष्टीत रमणे, मधूर वाणी असणे, सत्याला स्मरून (परमेश्वराला स्मरून) सगळ्या गोष्टी करणे, आपल्यापेक्षा श्रेष्ठींना मान देणे, क्रोध नसणे, आपल्यावर अवलंबून असणार्यांचा अपमान न करणे ह्या आणखीन कांहीं गोष्टी त्याच्यात असाव्या लागतात. [परिशिष्ठ दोन वाचावे] अशारितीने जगणारा ब्रह्माला प्रिय असतो. वेदाचा सारांश सत्यात आहे. सत्याचा सारांश आहे संयमित जीवनात, संयमित जीवनाचा सारांश आहे जगातील भोग्य गोष्टींबद्दल औदासिन्य बाळगण्यात. पुण्यवंतात हे सगळे तुला आढळेल. पुण्याच्या मार्गाने जाणे ह्यालाच धर्म (कर्तव्य) म्हणतात. त्यासाठी सगळ्या अवांतर इच्छां बद्दल औदासिन्य बाळगणे हींच अध्यात्म साधना आहे. तुला तुझ्या बुद्धीचा सुयोग्य वापर करून हे साध्य करावयाचे असते. आपल्या वासनात रमणारे, सत्यापेक्षा इतर गोष्टी ज्यात असत्यमय भोग (व्यसनं) आहेत त्यांना मानणारे त्यांना अश्रद्ध लोक म्हणून ओळखले जाते ते पुण्ण्यापासून दूर जात असतात. माणसाच्या जीवनगंगेत तो पोहोत असतांना, वासना (ज्या योगक्षेमाच्या गरजेबाहेर आहेत) एकाद्या विषारी सापासारख्या असतात व त्यांच्या दंशामुळें माणसाचे जीवन भ्रष्ट होत असते व तो त्यात बुडून जाण्याचा धोका असतो. वासनांच्या आहारी जाऊन दुसर्याला दुःख देणे हे एक मोठे पाप समजले जाते. प्रत्येक वासनामय विचारांचा तीव्र तिरस्कार करण्याची सवय लावावी लागते व ते शक्य असते कारण, अशा सगळ्या गोष्टी सवयप्रधान असतात. एकदा तशी सवय झाली कीं, वासनांचे उद्रेक आवरणे सोपे असते. परंतु, त्या तिरस्कारात क्रोधाची व

द्वेषाची भावना नसावी, तो तिरस्कार धोरणात्मक असावा. अशा सवयीमुळें व्यर्थच्या वासना ज्या योगक्षेमाच्या नाहीत त्या येणे बंद होते. माणसाचे मन त्या प्रकारे तयार करावे लागते. मनाचा सवयप्रधान गुण ह्या ठिकाणी उपयोगाचा असतो. योगक्षेमाच्या वासना (इच्छा) कोणत्या व वाह्यात वासना कोणत्या हे ओळखण्यासाठी आपल्या सुबुद्धीचा उपयोग करावा लागतो. माणसाच्या मनात विविध प्रकारचे विचार येत असतात त्यातील बिनकामाचे विचार न वाढवण्याचे धोरण असले पहिजे. योगक्षेमाचे विचार जे आवश्यक असतात त्यांची दखल घ्यावी. जर तुझ्या बुद्धीने तुला फसवले तर तू भ्रष्ट होशिल. जे लोक सत्याला (परमेश्वराला) मानतात त्यांना त्याचा आधार मिळत असतो. परंतु, जे देव, पितर ह्यांना मानत नाहीत त्यांना त्यांचा आधार न मिळाल्यामुळें ते वासनांत अडकून पडतात. परमेश्वरा वरील श्रद्धा त्याला अनेक अडचणींतून बाहेर येण्यात मदत करू शकतात. कारण पापशक्ती अशा माणसाला त्रास देत नाहीत. त्यात पितर, देव हे सगळे येतात. आपले आयुष्य त्यांना पाहून जे जगतात, ते वाह्यात (नको असलेल्या) वासनांत रमत नाहीत पण हे त्याच्या प्रामाणिकपणावर अवलंबून असते. त्यासाठी सतत अभ्यास करणे, आपल्या ज्ञानाचे क्षितीज वाढवणे, पुजापाठ करणे, यात्रा करणे त्यावेळी लोकांचे निरीक्षण करणे, पवित्र लोकांच्या सानिध्यात रहाणे अशा प्रकारे तो स्वताचे कल्याण करत असतो. पुण्यवान माणसे सगळ्यांशी प्रेमाने वागतात. हितकारक वागतात. ज्यामुळें समाजातील चांगल्या शक्तींचे बळ वाढेल असें त्याचे वागणे, बोलणे असते. त्याचा सगळ्यांना आधार वाटतो. त्याचा सल्ला सगळे मानतात. लहान मुलं, बायाबापड्या, म्हातारे कोतारे असे सगळे कमजोर लोक त्याला आधार मानतात. म्हणून राजा तसा पुण्यवान असावा लागतो. भूतदया हा पुण्यवान माणसाचा गुण असतो. सगळे प्राणीमात्र त्याच्या सानिध्यात स्वताला सुरक्षित समजतात. असा पुण्यवान देवांना फार आवडतो. तो मृत्यूनंतर स्वर्गात जातो. परंतु, जर त्याला त्याच्या चांगल्या वर्तणूकीचा अभिमान झाला तर मात्र तो पापकारक असतो म्हणून, कितीही गुणवान असला तरी त्याची गुणवत्ता त्यांने ब्रह्माला दान करून जगावयाचे असते. आपल्या चांगुलपणाचा कोणी गैरफायदा घेत नाही नां, ते त्याने पहावयाचे असते कारण प्रायः दुर्जन अशा चांगल्या लोकांच्या मागून आपल्या कारवाया करत असतात. त्यांच्या पत प्रतिष्ठेचा ते फायदा उठवत असतात. जर तसे होत

असेल व त्याकडे तो दुर्लक्ष करत असेल, तर त्याचे चांगले गुण व्यर्थ समजावेत. त्याचे पुण्यकर्म पापासमान समजावे. त्या दुर्जनांबरोबर तो सुद्धा नरकात जातो. म्हणून अशा पुण्यवंताने दुर्जनांपासून दूर रहावयाचे असते. पापाचे आणखीन एक मुख्य कारण असते माणसाची भावना विवशता. जो फार भावना विवश असतो तो नकळत पापाचरण करून बसत असतो. पुण्यवान तो, जो त्याचे सगळे निर्णय विवेकांने (योग्य, अयोग्य, हित, अहित अशा गोष्टींचा सारासार विचार) घेतो. भावना माणसाला पाप करावयाला भाग पाडत असतात म्हणून माणसाने त्याच्या भावना नियंत्रित करावयाच्या असतात. भावनांचे समर्थन करणारे प्रायः चुका करत असतात कारण भावनांच्या आहारी जाऊन जेव्हां निर्णय घेतले जातात तेव्हां ते प्रायः अयोग्यच असतात. तशा चुकीच्या निर्णयांमुळें तो व त्याच्यावर विसंबून असणारे असें सगळे पापात अडकण्याची शक्यता असते. अरे ब्राह्मणा, माझ्या ज्ञानाप्रमाणे जे उचीत असते ते तुला सांगितले आहे. त्याचा तुला किती उपयोग होईल ते तू पहा". कौशिक त्याला विचारतो, "अहो ज्ञानी, आपण पाप शक्ती व पुण्यशक्ती असें सांगितले त्याबद्दल जास्त सांगाल तर बरे होईल". व्याध त्याला सांगतो, "ह्या सृष्टीचे दोन भाग असतात त्यातील एका भागात जो दृष्य आहे (व्यक्त) आपण असतो दुसरा भाग अदृष्य (अव्यक्त) असतो. त्यात ह्या सगळ्या शक्ती जसे देव, दानव, पितर, पिशाच्च आणखीन बरेच कांहीं असतात. त्यातील पुण्य शक्ती ज्यांना आपण देव, पितर, देवता अशा नांवाने ओळखतो. पापशक्ती दानव, राक्षस, पिशाच्च वगैरे नांवाने ओळखल्या जातात. श्रृतीत ते दिले आहे. आज आपण त्रेता युगात आहोत म्हणून पुण्यशक्ती विशेष प्रबळ आहेत. कृत युगात त्या सर्वात जास्त शक्तीमान होत्या. जस जसें युग बदलते त्याप्रमाणे त्याची शक्ती व क्षमता सुद्धा बदलत असते. पुढे कलीयुग येणार आहे. तेव्हां पाप शक्ती सर्वात जास्त प्रबळ असतील व पुण्यशक्ती कमजोर असतील. त्या काळात शाप दिले तर ते खरे होतील पण आशिर्वाद खरे होणार नाहीत कारण, आशिर्वाद सिद्ध होण्यासाठी पुण्य शक्ती शक्तिमान असाव्या लागतात. त्याकाळात पाप वाढते. पुण्यशक्ती कमी जोरात असतील त्यामुळें पापमयता कलीयुगात जास्त असेल. त्या युगात पुण्यकर्माचा उपयोग करून पाप वाढवण्या इतपत पापशक्तींची मजल जाणार आहे. कलीयुगात पाप पुण्याचे सोंग घेऊन वावरतांना दिसेल. कृतयुगात त्रेता युगात जसे यज्ञ फलदाई होतात तसें

कलीयुगात होणार नाहीत कारण, यज्ञ फलदाई होण्यासाठी पुण्यशक्ती प्रभावी असाव्या लागतात. जी कर्मकांड यज्ञयाग कृत, त्रेता आणि द्वापार मध्ये यशस्वी होत, तसें कलीयुगात यशस्वी होणार नाहीत. इतका पापशक्तींचा प्रभाव वाढलेला असेल. कलीयुगात पापशक्तींच्या जागण मारण विद्या काम करतील. पुण्य करणे व पाप टाळणे ह्याची शिकवण जे शास्त्र देते त्यालाच नितीशास्त्र असें वेदात सांगितले आहे.

*टीपः परिशिष्ट दोन मध्ये ह्या बद्दल विशेष माहीती दिली आहे, त्यात लक्षण चिकीत्सा सांगितल्या आहेत त्या पहाव्यात.*

**- प्रकरण तिसरे समाप्त -**

# व्याध गीता

## प्रकरण चौथे

मार्कंडेय पुढे सांगत असतात, अरे युधिष्ठीरा, तो खाटीक पुढे ब्राह्मणाला सांगतो. "अहो ब्राह्मणा, हा माझा पेशा माझ्या गतकर्मानुसार मला मिळालेला आहे. त्यात कांहीं कमी पहाण्याचे कारण नाही. कारण, जन्म आणि मरण दोनही सृष्टीच्या कर्माचे भाग आहेत. जन्माचे आपण कौतुक करतो व त्याचे स्वागत करतो परंतु, मृत्यूला टाळण्याचा प्रयास करत असतो. एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे कीं, जन्म व मृत्यू एकाच नाण्याच्या दोन बाजू असें असतात. जन्म झाला कीं मृत्यू क्रमप्राप्त आहे. मग जन्माचे स्वागत व मृत्यूची भिती, तिरस्कार असे वाटण्याचे कारण आपले सृष्टीच्या नियमांचे अज्ञान आहे. खरे ज्ञानी जन्म व मृत्यू समसमान मानतात कारण ते जाणतात कीं, ते एकाच गोष्टीची दोन रुप असतात. मृत्यू मग तो कोणाचाही असो तो स्वागतार्ह असला पाहिजे. कारण त्यामुळे पुढचा जन्म होणार असतो. जर मृत्यू झाले नाहीत तर जन्म होणे थांबणार असते. अरे ब्राह्मणा, येथे प्रश्न मरण्याचा अथवा मारण्याचा नसतो. प्रश्न असतो त्या बरोबर होणार्या दुःखाचा. ते दुःख नको असते म्हणून मृत्यूला विरोध असतो पण जन्मसुद्धा विना वेदना होत नाही त्याची कां दखल घेत नाहीत, ह्या प्रश्नाकडे कां दुर्लक्ष होते ते सांग. मुलतः अरे ब्राह्मणा, तुला माझ्या पेशाबद्दल जो आक्षेप आहे तो तुझ्या अज्ञानामुळें आहे. कोणताही पेशा कांही ना काही कमी घेऊन येत असतो. पूर्णतः निर्दोष असा पेशा नाही. म्हणून माझ्या पेशामध्ये कमी पहाण्याचे सोडून दे. हि सृष्टी व तिचा कर्ता महाबली आहेत. त्यांना कोणी अक्कल शिकवण्याचा प्रयत्न करू नये पण मनुष्य हा असा प्राणी आहे कीं, तो विधात्याच्या चुका दाखवण्याचा मूर्खपणा मोठ्या हुशारीने करत असतो. खरा ज्ञानी जन्म, मृत्यू, सुख, दुःख, आनंद, निराशा अशा विविध एकमेका विरुद्ध गोष्टीत खोट काढत नाहीत कारण, ते सगळे निसर्गाच्या कामात होणारे परिणाम असतात व ते साधारणपणे अपरिहार्य आणि बर्याच वेळा अनिवार्य असतात हे तो जाणत असतो. जसें जर अग्नी असेल तर तेथे धूर असणार तसे ते समजतात. माणसाने कोणताही पेशा करतांना ते कार्य ब्रह्माला वाहून करावयाचे असते. ते ब्रह्माची सेवा ह्या विचाराने करावयाचे असते. त्यात खोट काढत

बसणे अज्ञानमुलक असते. जेव्हां माणूस त्याचा पेशा ब्रह्माला वाहून करतो तेव्हां तो ते कार्य निर्दोष करत असतो कारण ते तो ब्रह्मासाठी करत असतो. म्हणून प्राण्याला मृत्यू देण्याचे कार्य करतांना त्या प्राण्याला किमान दुःख होईल अशी दक्षता बाळगणे हे त्या ब्रह्माच्या सेवेचा एक भाग आहे असे समजून काम करावयाचे असते. ते जर झाले तर तो मृत्यू विनावेदना होतो व ते कार्य नियमानुसार झाले असे होते. युद्धात क्षत्रिय शत्रूला मारतांना त्याला कमीत कमी वेदना होतील अशारितीने मारावयाचे असते. जो तशा रितीने शत्रूची हत्या करतो तोच वीरगतीला जात असतो जर तोसुद्धा त्यात मेला. खाटकाच्या कामात आम्ही असें मानतो कीं, तो प्राणी यमदेवता मारत असते व आम्ही फक्त साधन स्वरुप आहोत. म्हणून जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे ते काम करावयाचा प्रयास होत असतो. जर यमदेवाची इच्छा नसेल तर तो प्राणी मरणार नाही असें आम्ही सगळे समजतो हे तुला सुद्धा माहीत आहे. मारल्यानंतर त्याचे मांस शुद्ध करून (मिठाच्या पाण्याने) आम्ही यमदेवाला अर्पण करत असतो. त्यानंतरच ते विकण्यासाठी दिले जाते. त्यामुळें त्यात कोठलेही पाप घडत नाही हे समजून घे. जर कोणी व्याध स्वताच्या सुखासाठी प्राणी मारत असेल तर ते मात्र पाप ठरते. मांस हे यज्ञाच्या अग्नीला (हुताशनीला), अतिप्रिय असते. विशेष करून त्याचे मेद त्याला फार आवडते असें वेदांत सांगितले आहे, हे तुला माहीत असेलच. त्याशिवाय इतर सगळ्या देवतांना सुद्धा मांस त्याच्या रुचीमुळें प्रिय असते. सर्वच देवतांना प्राण्याचे मांस प्रसाद म्हणून द्यावयाचे असते. आपण जाणता कीं पहिला मान ब्राह्मणाचाच असतो ते खाण्यात. सर्व प्रसादांत गोमांस हे उत्तम प्रसादाचे म्हणून सांगितले आहे हे तुम्ही जाणता अहात. मग ते तुम्हाला कसे मिळणार जर कोणी ते मारण्याचे काम केले नाही. वेदात सांगितले आहे कीं, वनस्पतीसुद्धा श्वास घेतात, त्यांच्यात प्रजनन होत असते व म्हणून ते सुद्धा सजीव असतात. त्यांचे खाण्यानेसुद्धा दुःख त्याना होत असते मग त्याबद्दल काय आक्षेप असतो ते सांगा. सगळे देव, देवता, यक्ष, गंधर्व, पितर मांसाचाच प्रसाद मांगतात, त्यांना शाक प्रसाद देण्याने त्यांचा उपमर्द होतो हे तुला माहीत नाही कां"? पुढे तो व्याध कौशिकाला बोलतो, "माणूस मांस खाओ अथवा शाक वनस्पती खाओ त्याला त्या जीवाला दुःख दिल्याने पाप लागणारच त्या पापाला अनिवार्य पाप असें वेदात दिले आहे. त्यासाठी पश्चात्ताप करावयाचे सांगितले आहे. कारण आपण

जगतो तेंच मुळी पापामुळे जे आपण आधीच्या अनेक जन्मांत केले आहे. म्हणून खाण्यामुळें पाप होणे अपरिहार्य म्हणून अनिवार्य असते हे तू जाणतोस. त्याबद्दल एवढा गहजब तू कां करतोस, त्याचे कारण तुझे ह्या सृष्टीचे ज्ञान अपुरे आहे. काय तुम्ही खाता हे महत्वाचे नसते, दुःख निर्माण करता कां नाही, ते महत्वाचे असते. दुःखहीन खाद्य खाणे हा प्रधान उद्देश असला पाहिजे. दुःखहीनता हा धर्माचा भाग आहे. खाण्यात परोक्ष अथवा अपरोक्ष दुःख उत्पन्न होत असेल तर ते खाणे पाप कारक समजले जाते. राजा सिवीने स्वताचे मांस देवाला अर्पण केले होते. त्यामुळें तो स्वर्गात गेला हे तू जाणतोस. अतिप्राचीन काळी राजा रतिदेवांने दररोज यज्ञात हजारो गाई कापल्याचे सांगितले जाते ते इंद्राकडून कृपा प्राप्त व्हावी म्हणून हेसुद्धा तू जाणत असशिल. ते सगळे मांस तो ब्राह्मणांना प्रसाद म्हणून देत असें. जर कोणी तरी ते मारण्याचे कार्य केले नाही तर ब्राह्मणांचा प्रधान आहार, जो गोमांस आहे तो त्यांना कसा मिळणार ते सांगा. अहो ब्राह्मण, आमचा पेशा तुम्हा ब्राह्मणांची सेवा करण्यासाठीच आहे हे प्रथम लक्षात घ्या. अहो ब्राह्मणा, तुम्ही शाकाहार करा अथवा मांसाहार करा पाप माथी लागणारच कारण दोनही आहारात जीवाला (प्राणी अथवा वनस्पती) दुःख दिले जात असते. तरी आपल्या बेहोष करून नंतर मारण्याच्या सिद्ध पद्धतीमुळें कमीतकमी दुःख त्या प्राण्याला होत असते. शाकाहारात वनस्पती बेहोष न करतांच शिजवली जाते त्यामुळे खूप जास्त पाप होत असते म्हणूनच सांगितले आहे किं गृहस्थाच्या स्वयंपाक घरात पांच खाटीकखाने असतात. [मनुस्मृतीत त्याबद्दल जास्त माहिती आहे ती पहावी, भाग तिसरा व पांचवा] त्याकरतां, प्रायश्चित्तं दिली आहेत ती करावी लागतात. असें वेदात सांगितले आहे कीं, यमाला बळी दिल्यामुळें त्या प्राण्याला उच्च गती प्राप्त होते व त्याचे कल्याण होत असते, त्याला मनुष्य जन्म मिळतो. यज्ञात बळी देण्याचे काम तुमच्या सारखे ब्राह्मणच करत असतात. कारण त्या नंतर जे प्रायश्चित्त करावयाचे ते फक्त ब्राह्मणच करू शकतो म्हणून खाटीकांचे कार्य वेद काळापासून ब्राह्मणांचीच जबाबदारी समजली जाते हे तुम्ही जाणताच मग माझ्या पेशाबद्दल आक्षेप करण्याचे काय कारण"? असे सांगतात देवांच्या प्रमाणे पिशाच्च देवसुद्धा मांस प्रसाद मांगतात. त्यामुळें ब्राह्मणांप्रमाणे शुद्रसुद्धा माझ्याकडून मांस घेत असतात. ह्या ना त्या कारणांनी सगळेच लोक मांस खात असतात. ते पुरवणे आमचे काम असते". अहो ब्राह्मणा,

"जर प्राचीन पवित्र अग्नीला मांस इतके आवडत नसते तर कदाचित मांस इतके प्रचारात आले नसते. त्यासाठी प्राचीन मुनींनी कांहीं नियम घालून दिले आहेत ते पहा. त्याप्रमाणें जो प्रथम देवांना व पितरांना अग्नीच्या मुखातून मांसाची आहुती देतो त्याला कांहीं दोष लागत नाही. आणि अशा माणसांने जरी मांस प्रसाद म्हणून खाल्ले तर त्याने ते खाल्ले असें समजले जात नाही. तो फक्त एक साधन स्वरुप आहे असें समजावे. हे तसे असते जसें, ब्राह्मणांने त्याच्या पत्नीसह संभोग जर तिच्या ऋतुच्या काळात तिच्या सम्मतीने घेतला तर तो संभोग मानला जात नाही [अशा संभोगाला प्रजनना प्रित्यर्थ केलेला संभोग असें समजले जाते. त्याला योगक्षेमाचा भाग असें समजले जाते] व तो ब्राह्मण ब्रह्मचारीच समजला जातो, तसे आहे. त्याचप्रमाणे पत्नीच्या इच्छेने जो तिला सुख देतो तोसुद्धा ब्रह्मचारीच समजला जातो हे मुनींचे वचन आहे. पुरुषाने कदापिही स्वेच्छेने तिच्याकडे अथवा इतर कोणाही स्त्रीकडे पहाणे पाप कारक समजले जाते, तसें हे निती नियम आहेत. पुरूषाने नेहमीच संयमित राहावे असे संकेत आहेत. सर्वांच्या हिताचा विचार लक्षात घेऊन हे नियम बनवलेले आहेत". असें व्याध कौशिकाला सांगतो. व्याध विचारतो, "अरे ब्राह्मणा, राजा सुदास जेव्हां शापाच्या प्रभावाखाली होता तेव्हां लोकांवर हल्ला करून त्यांना खात असें. त्या त्याच्या कृत्यामुळें त्याला पाप लागत होते कां? त्यावर तुझे मत काय आहे"? कौशिक ब्राह्मण त्यावर उत्तर देतो, "शापाच्या प्रभावाखाली तो तसे करत असल्यामुळें त्याला पाप लागत नाही परंतु, जे पाप त्याच्या शरीराला लागले ते अनिवार्य असते म्हणून क्षम्य असते". पुढे कौशिक त्याला त्याने विचारलेल्या आधीच्या प्रश्नाचे उत्तर देतो, "जन्म देणार्या मातेसच आणि जन्मणार्या अर्भकास फक्त ते जन्माचे दुःख भोगावे लागते म्हणून त्या दुःखाकडे दुर्लक्ष होत असते, परंतु, मृत्यूमुळें इतर बर्याच लोकांना दुःख होत असते म्हणून ते विशेष लक्षात घेतले जाते. त्या दुःखाला विरहाचे दुःख समजतात". त्या उत्तराने व्याध प्रसन्न होतो.

त्यानंतर व्याध कौशिकाला सांगतो, "माझा जन्म ह्या घरात झाला जेथे हा व्यवसाय पिढीजात चालू आहे व तुम्हाला माहीत आहे कीं, माणसाने त्याचा पिढीजात व्यवसाय न करणे हे चुकीचे समजले जाते. पिढीजात व्यवसाय करत रहाणे नेहमीच श्रेयस्कर मानले गेले आहे सर्व वर्णांसाठी. त्यामुळेंच ब्राह्मणांची मुलं त्यांच्या पित्याचा व्यवसाय करत

असतात जसे तुम्ही करत अहात, मग आम्ही केले तर त्यात गैर काय? किंबहुना, त्यामुळेंच जन्मनिहाय वर्णव्यवस्था पुढे प्रचलित झाली आहे. आपल्या गत जन्माची कर्मं आपल्याला सोडत नाहीत. हा नियम सगळ्या प्राणिमात्रांना सारखाच लागू होतो. प्राण्याच्या कर्म भोगांचा विचार करतांना विधात्याने हा नियम ग्राह्य मानलेला आहे. जर एकाद्याला समजले कीं तो त्याच्या गतजन्माच्या पापामुळें पापमुलक कृत्य करणास प्रवृत्त होत आहे तर अशावेळी त्यांने त्याच्या विवेकाचा आधार घेऊन त्या पासून निवृत्त व्हावयाचे असते. **माझ्या कर्माचे फळ सुधारण्यासाठी मी वेदाचा अभ्यास करत असतो, दानं करत असतो, चांगुलपणाने सगळ्यांशी वागत असतो. अडलेल्या नडलेल्यांना मदत करत असतो. सर्व प्राण्यांशी भूतदयेने वागत असतो. माझे वागणे निरहंकारी, दयाघन, ब्राह्मणांबद्दल (गुणीजनांबद्दल ) आदरपूर्वक, तसेंच मी मिताहारी, मितभाषी, मितनिद्रा अशारितीने माझ्या कडून जी अनिवार्य म्हणून अपरिहार्य असलेली नित्य पापकर्म घडत असतात त्यापासून माझे संरक्षण करत असतो,** ह्यालाच **पाप क्षालनाचे व्रत** समजले जाते. तोच मार्ग वेदांनी सांगितला आहे व ऋषींनी दाखवलेला आहे. शेती कार्य चांगले सांगितले जाते पण त्या मातीत अनेक जीव नांगरणी करतांना व इतर नित्य कर्मं करतांना मारले जातात, त्यामुळें केव्हढी हिंसा होते कारण ते सगळे संवेदनशिल असतात. तरी त्याला विरोध नसतो कारण त्या सगळ्या आपल्या ऋषींनी अनिवार्य हिंसा म्हणून सांगितलेल्या आहेत. अरे ब्राह्मणा, माणूस दुसर्या जीवाचा नाश केल्याशिवाय जगूच शकत नाही. म्हणून त्याबद्दल पाखंड करून कांहीं साध्य होणारे नसते. म्हणून माझ्या व्यवसायाबद्दल रोष बाळगून तू कांहींच साध्य करू शकणार नाहीस. कंदमुळं मातीतून काढतांना, धान्याची कणसं कांडापासून छाटतांना, फळं झाडावरून तोडतांना, शेतात वखारणी, निंदणी करतांना, धान्य कांडतांना, डाळींचे दल करतांना, भाज्या शिजवतांना, उकडतांना, भाजतांना, तळतांना किती मोठ्या प्रमाणात हिंसा होते आणि ती सगळी पाप केल्याशिवाय शाकाहार करता येत नाही. प्राण्यांप्रमाणे वनस्पतीलासुद्धा संवेदना असतात त्यामुळें ह्या गोष्टी करतांना त्यांना वेदना होत असतात म्हणून त्या सगळ्या कृती हिंसा करणार्या ठरतात. (श्री जगदीशचंद्र बोस ह्यानी ते प्रयोगांनी १९०१ साली सिद्ध सुद्धा केले आहे, परंतु, विशेष म्हणजे हे ज्ञान व्याधाला त्रेतायुगात उपलब्ध होते. परिशिष्ट तीन पहा)

फक्त फरक एवढाच असतो कीं, त्या वनस्पतींचे आक्रोश आपण ऐकू शकत नाही. म्हणून ते आपल्याला झालेच नाही असें वाटते, ते माणसाच्या अज्ञानामुळें असते. आंधळ्याला सूर्य दिसत नाही म्हणून जर तो म्हणाला सूर्य नाही, तर ते जसें अग्राह्य ठरते तसेंच हे आहे. त्या सर्व पापांकडे डोळेझाक कां करावी ते सांगा. त्यापेक्षा सिद्ध पद्धतीने यमाच्या नांवाने केलेली हत्या निश्चितच कमी पापकारक असते. वेदांत सांगितले आहे किं माणसाने कांहीही खाण्या आधी ते प्रथम देवाला अर्पण (मनाने) करावयाचे असते व ते त्याचा प्रसाद म्हणून खावयाचे असते. तसे केल्याने कोणतेही पाप लागत नाही त्याशिवाय नित्यनेमानें, **पाप क्षालनाचे व्रत**, ज्याबद्दल आधी सांगितले आहे ते नित्य करत रहावे. माणसाने कोणताही आहार केला तरी पाप लागणारच म्हणून आपल्या प्राचीन ऋषींनी **पाप क्षालनाचे व्रत** सांगितले आहे ते करावयाचे असते मुद्दा कमी पाप करावयाचा आहे. शाकाहारामुळें जास्त पाप होते व विनावेदना वध केलेल्या प्राण्याचे सेवन केल्याने कमी पाप लागते म्हणूनच प्राचीन काळापासून ब्राह्मण फक्त मांसाहार करणे योग्य समजत होते". अरे ब्राह्मणा, "वृही आणि इतर सगळ्या भाताच्या प्रजाती सजीव आणि संवेदनशिल असतात हे सगळे जाणतात. ते शेतात भरडून त्यातून दाणा काढतांना त्या जीवाचा छळ होतो, म्हणजे मोठ्या प्रमाणात हिंसा होत असते. गव्हाचे, साळीचे बी वेगळे करण्यासाठी त्याची साल कांडण करून काढावी लागते त्यामुळें त्या बियांना ज्या वेदना होतात त्याचा कां विचार होत नाही?. मोठ्या प्रेमांने वाढवलेले पीक आल्यावर उरलेली कांड उपटून काढतांना त्यांना ज्या वेदना होतात त्याची कां दखल शेतकर्यांनी घ्यावयाची नाही, शेताला आग लावली जाते त्यात ते वनस्पतीचे असंख्य जीव हूरपळून जातात त्यांना जळतांना किती वेदना होतात त्याकडे कां दुर्लक्ष केले जाते? त्यात पाखंड होतो त्याचे कसे समर्थन होते ते सांगा. अशारितीने जी पाप शेतकरी करतो त्याचा भागीदार तो शाकाहार करणारा असतो. शाकाहारा मागे मिथ्याचार असतो त्याचे समर्थन कसे होते ते सांगा? त्याबद्दल तू काय आक्षेप घेतोस ते सांग? शेतकरी कापणी करतो, निंदणी करतो, नांगरणी करतो, वखारणी करतो, झाडे छाटतो, कंदमुळं उपटून काढतो, ह्या आणि अशा प्रकारच्या सगळ्या कर्मानें पाप सतत होत असते त्याबद्दल तुला कां आक्षेप नाही"? वरकरणी दिसले नाही म्हणजे ते पाप झालेच नाही, ती हिंसा झालीच नाही असें समजणे केवळ अज्ञानाचे लक्षण आहे व ते

तुमच्या सारख्या विद्वानाला शोभत नाही. साधा श्वासोंच्छ्वास घ्या, त्यामुळें हवेतील कित्येक जीव आपण मारत असतो, ते तुम्ही थांबवू शकत नाही कारण श्वासोंच्छ्वास करणे अपरिहार्य म्हणून अनिवार्य सुद्धा असते. असे असल्याने आपल्या प्राचीन ऋषींनी **पाप क्षालनाचे व्रत** सांगितले आहे. मासे माशाला खातात, सगळेंच, "जीवो जीवस्य जीवनम्", चे पालन करत असतात. आपण साधे बोलू लागलो, चालू लागलो, अनेक जीव मारत असतो. अरे ब्राह्मणा, मोठे ज्ञानी सुद्धा तसे पाप करत असतात. ती सगळी पापं क्षम्य मानलेली आहेत म्हणून त्यांना पाप न समजता चुका असें समजले जाते. रोगी बरा करतांना त्या रोगाचे कारण असलेल्या लक्षावधी सुक्ष्म जीवांना आपण औषधं वापरून मारून टाकतो व म्हणून आपण बरे होतो. जर ते केले नाही तर आपण मरणार असतो. इतका जीवांचा एकमेकांवर अवलंबून रहाण्याचा योग आहे. आपले राज्य वाचवण्यासाठी शत्रूचा नाश करतो ते सगळे क्षम्य समजलेले आहे. कारण ह्या सगळ्या हिंसेच्या घटना अनिवार्य आणि अपरिहार्य अशा असतात. तेथे जगण्याचा प्रश्न असतो. अशा गोष्टींचे अवडंबर माजवणे हे मिथ्याचाराचे लक्षण समजले जाते. प्राचीन काळापासून अनेक ऋषींनी जीवांची हिंसा टाळण्यासाठी अनेक प्रयोग केले परंतु व्यर्थ गेले ते सगळे प्रयास. म्हणून शेवटी कांहीं नियम करण्यात आले ते तुला सांगतो. सिद्ध पद्धतीनेच खाण्यासाठी प्राण्याची हत्या करावयाची, त्यात मोठे प्राणी मारावयाचे कारण लहान प्राणी मारला तर जास्त मारावे लागतात व त्यामुळें जास्त हत्या व त्या अनुषंगाने जास्त हिंसा होण्याची शक्यता असते. मोठा प्राणी अनेक जण खातात त्यामुळें प्रती खाणारा एकंदर पापाचा वाटा कमी येतो. त्यासाठी गाय, बैल, म्हशी, रेडे, डुक्कर असें मोठे प्राणीच मारावयाचे असा दंडक जनक राजाने जारी केला आहे. त्याशिवाय ज्या प्राण्याचे आयुष्य पूर्णपणे तो जगला आहे असें प्रौढ अथवा वृद्ध प्राणीच खाण्यासाठी मारावयाचे असतात. तरुण, लहान, गाभण असें मारावयाचे नसतात. त्यामुळें किमान दुःख निर्माण होते. राजांनी सुद्धा शिकार करतांना मोठेच प्राणी मृगयेसाठी निवडावयाचे असतात अशी प्रथा आहे हे तुला माहीत असेलच.

त्या चर्चेनंतर कौशिक दुसरा विषय घेतो. तो विचारतो त्या व्याधाला त्याचे मत कीं, "उच्च कुलिन प्रतिष्ठीत समजले जाणारे लोक स्वताच्या सोयीसाठी दुसर्यांना त्रास देण्यात धन्यता मानतात त्यात हिंसा नसते. मग ते करणे श्रेयस्कर समजावे कां? तसे वागणार्यांचे

दोस्त त्यांचे कौतुक करतात. पढतमूर्ख विद्वान त्यांच्या व कधी कधी विधात्याच्या चुका दाखवण्याचे धाडस करत असतात. असे वागणे योग्य समजावयाचे कां? चांगल्या लोकांचे चांगले कार्यसुद्धा कधी कधी इतर चांगली माणसें कौतुकांने पहात नाहीत ते बरोबर आहे कां? चुकीच्या रीतीने वागणार्यांचे मात्र कौतुक वाईट माणसें करत असतात ते ग्राह्य समजावयाचे कां? ह्यात सगळ्या उदाहरणांतून आपण विरोधाभास पहात असतो. अशा परिस्थितीचा अध्यात्मिक दृष्ट्या आपण काय अर्थ काढाल"? आपले मत मला ऐकावयाला आवडेल.

**- प्रकरण चौथे समाप्त -**

# व्याध गीता

## प्रकरण पांचवे

मार्कंडेय पुढे सांगत असतात, अरे युधिष्ठीरा, तो पवित्र आणि दयाघन असा व्याध मोठ्या चतुराईने त्याला उत्तर देतो. "एक प्राचीन म्हण आहे कीं, चांगुलपणाच्या तर्हा विलक्षण, सुक्ष्म आणि विविध असतात. आपण खरे बोलण्याबद्दलचे पाहूया. उदाहरणार्थ, जीवन जेव्हां अवघड परिस्थितीत असते किंवा लग्न जुळवण्याच्या प्रसंगी माणसे बर्याच वेळा खोटे बोलतात. ते योग्य समजले जाते कारण, त्या प्रसंगी हित व अहित ह्यांचा विचार करावयाचा असतो. खरे आणि खोटे ह्यांचा संबंध हित व अहिताशी होत असतो. कारण कधी कधी खोटे सांगण्याने सत्याचा विजय होणार असतो. जर अशावेळी खरे सांगितले तर असत्याचा विजय होण्याची जास्त शक्यता उत्पन्न होत असते. ह्या ठिकाणी जे सर्व प्राणिमात्रांसाठी हिताचे आहे ते सत्याला मंजूर असते असे गृहीत धरून गोष्टी ठरवल्या जातात. खरे बोलणे अथवा त्यानुसार काम करणे असत्याला मदत करणारे असू शकते. ह्यात त्याचा विलक्षणपणा दिसून येतो. माणसाचे कर्म चांगले असेल अथवा वाईट असेल त्या प्रमाणे त्याचे फळ त्याला मिळत असते. अज्ञानी व्यक्ती, जी दुर्दैवी परिस्थितीत गेलेली आहे, देव, परमेश्वर अशांची प्रार्थना करते परंतु, ती लक्षात घेत नाही कीं, तिच्या त्या परिस्थितीला तिचे चुकीचे अथवा पाप कर्म कारण असते. असे असले तरी तो त्या देवांना दोष देत असतो. तशामुळें त्याचे नुकसान होण्याची शक्यता असते. त्यामुळे तो आणखीन दुःखात जाण्याची जास्त शक्यता असते. अशा प्रसंगांतील सुक्ष्मता लक्षात न घेता अशी व्यक्ती बहुधा आपले निर्णय घेत असते. अशा परिस्थितीत त्याचे पुस्तकी ज्ञान आणि चांगले वागणे सुद्धा त्याला मदत करू शकत नाही. जर सगळे ह्याच जन्मापुरते मर्यादित असते तर ह्या जन्मात केलेल्या चांगल्या वाईट कृत्याची प्रतिक्रिया ह्याच जन्मात मिळाली असती परंतु, तसे होतांना दिसत नाही. असें जसे एकाद्या बुद्धीमान माणसाला आढळून येते तेव्हां त्याचा गोंधळ होतो व तो असें कां होते ते समजू शकत नाही. तो पहातो कीं कांही जण वाईट कर्मात व्यस्त असूनही मजेत रहात आहेत व चांगले काम करणारा दुःखी कष्टी जीवन जगत आहे. कांहींही केले तरी तो ती परिस्थिती बदलू शकत नाही. असें कां

होते ते त्याला समजत नाही व असा गोंधळलेला माणूस प्रायः देवांना दोष देऊन मोकळा होतो. वस्तुतः त्याच्या त्या दुःखमय भोगांचा देवांशी कांहींही संबंध नसतो. परंतु, तसे विनाकारण देवांना दोष देण्यामुळें उलटे पाप त्याच्या पदरात पडत असते (त्याची अध्यात्मिक पातळी उतरत असते) पण ते त्याच्या अज्ञानामुळे त्याच्या लक्षात येत नाही. म्हणून माणसांने ह्या सृष्टीचा हा जो खेळ विधात्याच्या इच्छेने चालू आहे त्याचे नियम समजून घेतले तर तो ह्या खेळात निश्चितपणे यशस्वी होत असतो. ह्या सृष्टीच्या खेळातील आपण निव्वळ प्यादे आहोत हे त्यासाठी प्रथम आपल्याला मान्य करावे लागेल. आणि आपल्याला हा खेळ खेळणे बंधनकारक आहे मग तो त्याला आवडो अगर न आवडो, हे समजून जगणे हेंच आवश्यक असते. बरेचजण चुकीच्या काल्पनिक विचाराने प्रेरीत होऊन त्यापेक्षा वेगळे कांहीं करत रहातात व त्यांनी ह्या खेळाचे नियम न पाळल्यांमुळें ते जीवनात अयशस्वी ठरतात. जो ह्या खेळात जिंकला तो मोक्ष प्राप्त करत असतो म्हणजे त्याला खेळात पुनः यावे लागत नाही म्हणजे त्याला पुनः जन्म घ्यावा लागत नाही. जोपर्यंत ती व्यक्ती ह्या विधात्याने मांडलेल्या खेळात जिंकत नाही तोवर त्याला पुन्हा पुनः जन्म घेऊन यावे लागत असते. एकदा ह्या खेळातील जन्म जन्मातरीची रचना तू समजलास कीं, ह्या जन्मात जे घडत आहे त्याचा संबंध तुझ्याच मागील जन्मांशी निगडीत आहे ते लक्षात येते व आपलेच कर्म आपल्या पाठी लागले आहे हे समजते. त्यावेळी आपण ह्या जन्मात कसे व काय केले पाहिजे त्याचे नियोजन तो करू शकतो. कांहीं जन्मताच श्रीमंत असतात तर कोणी गरीब असतात. कोणी धष्टपुष्ट असतात तर कोणी अशक्त असतात. कोणी सुंदर असतात तर कोणी कुरूप असतात. कोणाला उत्तम आरोग्य लाभते तर कोणी जन्मतः रोगट असतो. ह्या वैविध्याचे कारण, त्या त्या व्यक्तीचे मागील कर्म असतात. जसे केले त्या जन्मी तसे ह्या जन्मी भोगत असतो. चांगल्या कर्माचे अथवा विचारांचे चांगले व वाईट कर्माचे अथवा विचारांचे वाईट प्रभाव दिसून येत असतात. त्या प्रमाणे जसे शरीराचे वैविध्य आपण माणसांत पहातो तसेंच त्याच्या विचार करण्याच्या स्वभावातसुद्धा वैविध्य आढळून येत असते. त्याला वेदांतसुद्धा माणसाचे प्राक्तन अथवा भाग्य म्हणून समजले आहे. माणसाचे भाग्य हे त्याची गतकर्माची पुंजी स्वरुप असते. चांगल्या कर्माचे चांगले व वाईट कर्माचे वाईट भोग अशी साधारणपणे व्यवस्था असते परंतु, गोष्टी तितक्यावर थांबत

नाहीत. त्यात आणखीन बर्याच गुंतागुंती दिसून येतात. भाग्य प्रत्येकांचे असते व ते प्रत्येकाचे त्याच्या गतकर्मानुसार रचलेले असते. कोणाला मुलं होतात, कोणाला होत नाहीत, कोणाला लोकांचे सहकर्य लाभते तर कोणाला समाजाकडून विरोध होत असतो. कोणाला यश मिळते तर कोणाला बरीच मेहनत करूनही यश मिळत नाही. कोणी मजेत रहातो तर कोणी सजेवर जातो. कोणाची मुलं त्याच्या इच्छा पूर्ण करतो तर कोणाची मुलं त्याला ताप देतात. कोणाच्या मुलींची लग्न चटकन होतात तर कोणाच्या मुलींची लग्न होता होत नाहीत. कोण एक लग्न करतो तर कोणी अविवाहीत असतो. तर कोणाची अनेक लग्न होत असतात. असे वैविध्य सर्व ठिकाणी आपण पहात असतो. माणसाचे स्वभाव सुद्धा त्याच्या गत जन्मातील कर्माचाच परिणाम स्वरुप असतात. कोणी रागीट तर कोणी प्रेमळ, कोणी संशयी तर कोणी चटकन भरवसा टाकणारे असें विविध स्वाभाव आढळतात. अशारितीने प्रत्येक व्यक्ती त्याची पुंजी घेऊन येत असतो. त्या पुंजीच्या जोरावर त्याला त्याचा जीवनाचा सरीपाट मांडावयाचा असतो. कोणाला गुणी मुलं होतात तर कोणाला दुर्गूणी होतात. कोणाची मुलं त्यांच्या कामात यशस्वी होतात तर कोणाची मुलं अयशस्वी होतात. कोणाच्या पोटी तेजस्वी साधू पुरूष जन्मतो तर कोणाच्या पोटी करंटा जन्मतो. म्हणजे आपल्या पोटी कोण जन्मणार तेसुद्धा आपल्या भाग्याचाच भाग असतो. कोणी त्यांच्या पूर्वजांच्या श्रीमंतीवर जगतात तर कोणाला त्यांची संपत्ती स्वतः कमवावी लागते. माणसाची शरीर प्रकृतीसुद्धा त्याच्या गतकर्माचा परिपाक असतो. कोणी सदृढ असतो जन्मताच तर कोणी रोगट असतो. ते जन्मणे त्या त्या प्रकारचे भोग असलेल्या मातापित्यांच्याच पोटी जन्म घेत असतात. कोणी जन्मतः मनोरुंग्ण असतात अथवा नंतरच्या काळात वेडे होतात तर कोणी अल्पायुषी असतात व लवकर मरतात. कोणी बलवान असतात तर कोणी साधारण प्रकृतीचे असतात. कोणी अध्यात्मिक प्रवृत्तीचे असतात तर कोणी अश्रद्ध असतात. कोणी क्षमाशिल असतात तर कोणी सुडबुद्धीने वागणारे असतात. कोणी दुष्ट असतात तर कोणी दयाळु असतात. अशारितीने प्रत्येक व्यक्ती कांही कमी व कांहीं जास्त घेऊन जन्म घेत असते. माणसाला त्याचे जीवन त्या पुंजीच्या मदतीने जगावे लागते. तो बरेच प्रयत्न करत असतो परंतु, त्याला त्यात यश येत नाही. त्यासाठी तो देवाला दोष देऊन मोकळा होतो वस्तुतः त्याच्या मागे त्याच्या गत

जन्मातील दुसर्यांना त्रास देण्याच्या कृत्याचा संबंध असतो ते तो लक्षात घेत नाही. जर तसे नाही मानले तर अशा अनुभवांचे स्पष्टीकरण देता येत नाही. जर तसे नसेल तर कोणीही मरणार नाही. कोणीही अयशस्वी होणार नाही. कोणीही त्याच्या प्रतिस्पर्ध्याला हरवू इच्छित असतो पण त्यात त्याला यश येतेच असें नाही. सगळे त्यांच्या आयुष्यात यशस्वी होण्याचाच प्रयत्न करत असतात. पण सगळ्यांना ते मिळत नाही. कांहीं चांगल्या नक्षत्रांवर जन्म घेतात तरी त्यांना यश मिळत नाही. असें काय बिघडते ते त्याला समजत नाही व तो त्यासाठी देवांना जबाबदार धरतो. वस्तुतः त्याचे कारण त्याच्याच गेल्या जन्मातील त्याची कृष्णकृत्ये असतात. ह्यावरून एक गोष्ट स्पष्ट होते कीं, कोणीही त्याच्या जीवनाचा खरा मालक नाही. त्याच्या जीवनावर त्याच्या गतकर्माचा ताबा असतो. त्या प्रमाणे त्याचे जीवन ठरत असते. गेल्या जन्मातील कर्माचे फळ त्याला ह्या ना त्या स्वरुपात भोगावे लागत असते. ते त्याचे गत क्रम त्याला नाचवत असते. येथे विधाता कोठेही हस्तक्षेप करत नाही. त्यात त्याच्या जीवनाच्या सगळ्या पैलूंचा समावेश होत असतो. म्हणजे त्याचे स्वताचे जीवन, त्याच्या जवळच्यांचे जीवन, त्याची अपत्ये, त्याची भावंड, त्याचे मित्र, शत्रू असे सगळेच त्यात अडकलेले असतात. त्याचे शरीर, त्याचा स्वभाव, त्याच्यातील इतर गुण असें सगळे घेऊन तो तयारीने ह्या जगात जणू फेकला जात असतो. म्हणजे आपले जीवन आपले असले तरी ते पूर्णतया आपले नसतेसुद्धा. ह्या खेळाचा नियोजक (विधाता) ते करत असतो व त्यासाठी आपलेच कर्म तो वापरत असतो. असें सांगतात त्यात जो खरा खेळाडू असतो, तो कोण ते प्रथम समजले पाहिजे. असें समजले आहे किं, त्यातला खेळाडू आपला आत्मा असतो व तो कधीच मरत नाही तो चिरंजीव असतो. तोंच पुनः पुन्हा जन्म घेत असतो. शरीर त्या खेळात एक साधनस्वरुप असते व ते नश्वर असते. ते त्याचा काळ संपला की नष्ट होणारच कारण कोणतीही वास्तविक गोष्ट चिरंजीव नसते. मृत्यू शरीराचा झाला कीं तो आत्मा त्याच्या बरोबर नवीन कर्मफलांची पुंजी घेऊन त्यातून बाहेर पडतो. त्या कर्मफलाच्या पुंजीला योगशस्त्रात लिंगदेह असें म्हणतात. त्यानंतर मृतात्मा म्हणून तो रहात असतो पुनः जन्म मिळे पर्यंत". त्यावर ब्राह्मण व्याधाला विचारतो, "आपण ज्ञानी अहात व विषय समजावण्यात आपला चांगला हातखंडा आहे म्हणून मला सांगा, हा आत्मा चिरंजीव कसा होतो"? ते ऐकल्यावर

मोठ्या समाधानाने तो व्याध सांगू लागतो, "आत्मा कधीच नष्ट होत नाही पण त्याच्या भोवतीच्या कांहीं व्यवस्थात बदल होत असतो. त्या न समजल्यामुळें अज्ञानी लोक समजतात कीं तो आत्मा मेला आहे. प्रत्यक्षात काय होते ते मी आता तुला समजावून सांगतो कारण, तू ते ऐकण्यासाठी आतूर आहेस. शरीराचा मृत्यू झाल्यानंतर त्यातून आत्मा त्याची कर्मफलाच्या पुंजी ज्याला लिंगदेह म्हणतात, घेऊन त्या कलेवरातून बाहेर पडतो. अशा परिस्थितीला, आत्म्याने आपले पहिले शरीर सोडण्याला, मृत्यू असे म्हणतात. साधारणपणे एका माणसाचे कर्मभोग दुसरा माणूस भोगू शकत नाही. एकदा एक कर्म झाले किं, त्याचे परिणाम त्याला भोगावेच लागतात, त्यापासून त्याची सुटका होत नाही. चांगल्या कर्माचे चांगले व वाईट कर्माचे त्या प्रमाणात वाईट भोग त्याला भोगावेच लागतात. अशारितीने बाहेर पडलेला आत्मा त्याच्या कर्मफलाच्या पुंजीसह अवकाशात तरंगत असतो. त्या अवस्थेला प्रथम प्रेतावस्था आणि तेरा दिवसानंतर पिशाच्च अवस्था असे समजले जाते. त्याच्या शेवटच्या मृत्यूवेळी ज्या वासनांत (व्यसनं वगैरे) तो गुंतलेला होता त्या वासना त्याला त्या पिशाच्च अवस्थेत त्रास देत असतात. कर्मफल योगानुसार यथावकाश तो पुन्हा जन्म घेतो. बहुधा त्याच कुळात किंवा त्याच्या आसपासच्या गोतावळ्यात तो होत असतो. माता चार आठवड्याची गर्भवती असतांना तो त्या गर्भात शिरतो व तेव्हां त्या गर्भाचे हृदय कार्यान्वीत होत असते. त्या सुमारास त्या मातेला तो आल्याचे स्वप्नाद्वारा सुचवत असतो. परंतु, त्याकडे सहसा कोणी लक्ष देत नाही". कौशिक व्याधाला विचारतो, "तो आत्मा कां पुन्हा जन्म घेतो व त्याचे कर्मफल (लिंगदेह) कसे त्याच्या बरोबर येते"? व्याध सांगतो, "त्याच्या कर्मफलानुसार तो जन्म होत असतो. तो त्या आत्म्याचा विधात्याने मान्य केलेला हक्क असतो त्यापेक्षा इतर कांहीं होऊ शकत नाही. कर्मफलाप्रमाणे त्याचे लिंग ठरत असते. ह्यात गर्भधारणेच्या गुंतागुतीचा विचार करावा लागेल व ते मी तुला सांगू शकणार नाही परंतु, थोडक्यात जे सांगता येण्यासारखे आहे ते सांगतो. गुणवंत कर्मफल असलेले त्याच प्रकारच्या घरात जन्म घेतात व गुणहीन कर्मफल असलेले त्याच प्रकारच्या घरात जन्म घेतात परंतु, त्याला कांही अपवाद असतात. कांहीं आत्म्यांच्या कर्मफलात मिश्र भाव असतो त्यावेळी असें अपवाद होतात. चांगल्या घरात एकादा वाईट प्रवृत्तीचा आत्मा जन्म घेतो कारण तो त्या घराचा वाईट भोग

असतो. असें साधारण समजतात कीं, पापकर्मा प्रमाणे, त्या आत्म्याला कधी खालच्या योनीत जन्म घ्यावा लागतो परंतु, त्या योनीतून तो आत्मशुद्धी करू शकत नाही व तो आत्मा त्यात अडकल्या सारखा पडून असतो. कृतयुगात अरे ब्राह्मणा, पशु योनीतसुद्धा आत्म्याचा उद्धार होत असे पण नंतरच्या युगांत ते कमी होत अखेरीस द्वापारयुगापासून ते सर्वस्वी बंद होणार आहे त्यानंतर फक्त मानव जन्मातच ते शक्य होत असते. कारण त्या युगांत इतर खालच्या योनीतील जन्मात तो आत्मा पूर्णतया बंदिस्त अवस्थेत रहाणार आहे. म्हणून आत्मशुद्धी होण्यासाठी कलीयुगात केवळ मानव जन्म असावा लागेल. कौशिक व्याधाला विचारतो, "मला सांगा अहो ज्ञानी माणसाचे लिंग कसे ठरते"? ज्ञानी व्याध सांगू लागतो, "संभोगाच्या नंतर जर गर्भ धारणा झाली तर त्यावेळी पुरूषाच्या प्रवृत्तीनुसार पहिले लिंग ठरते परंतु जेव्हां चौथ्या आठवड्यास त्यात आत्मा गर्भात प्रवेश करतो त्याच्या लिंगदेहासह तेव्हां त्या लिंगदेहाचे लिंग व सुरूवातीचे गर्भाचे लिंग ह्यात कांहीं समन्वय सिद्ध होऊन त्या गर्भाचे अंतिम लिंग निश्चित होत असते. उदाहरणार्थ, समजा दोनही स्त्री लिंग असतील तर पूर्ण स्त्री असा तो गर्भ वाढत रहातो. जर पहिला पुरूष व दुसरासुद्धा पुरूष असेल तर पूर्ण पुरूष असा तो गर्भ वाढतो. जर पहिला स्त्री व दुसरा पुरूष तर तो गर्भ अशा स्त्रीचा असतो ज्याच पुरूषीपणा असतो, तसेंच जर पहिला पुरूष व दुसरा स्त्री असेल तर तो पुरूष स्त्रैण स्वभावाचा (बायकी) निपजतो. तसेंच अशा समन्वयात कांहीवेळा किन्नर जन्मतात जर दोनही लिग समसमान असतील". कौशिक व्याधाला विचारतो, माणसाचे देवात रुपांतर केव्हां व कसे होते ते सांगा कारण, त्याबद्दल मला फार कुतूहल आहे". व्याध सांगतो, "आत्मा सातत्याने उत्तम गुणी असा एका मागोमाग एक असें सात्त्विक प्रवृत्तीचे जन्म घेत असेल तर त्याच्यातील तमोगुणाचा पूर्णतया र्हास झालेला असतो तशा स्थितीत त्या माणसाचे संत प्रवृत्तीच्या माणसात परिवर्तन होत असते. तसे अनेक जन्म संत प्रवृत्तीत गेल्यानंतर असा माणूस मेल्यावर स्वर्गात जातो व तेथे त्याला कांहीं विशेष कार्य जर सोपवले गेले तर तो देवत्वाला पोहोचतो. सृष्टीचे कार्य चालवण्यासाठी अशा आत्म्यांची नेमणूक विधाता करत असतो. त्यात त्यांना कांहीं सिद्धी प्राप्त होतात त्यामुळें तो आत्मा देवत्वाला जातो. त्याला नेमून दिलेले कार्य त्याने यशस्वीरित्या केले तर त्याची देवत्वात जास्त बढती मिळून तो

आणखीन मोठा देव होतो अशारितीने जसे चांगले कार्य करणार्याची प्रगती होत असते तशीच वाईट कार्य करणार्या पापात्म्यांचीसुद्धा बढती त्या दिशेने होत असते. त्यातून दानव, राक्षस उत्पन्न होत असतात. ही सृष्टीच्या कार्य पद्धतीची माहीती जी मला दृष्टांताने ज्ञात झाली, ती सांगितली. त्याच प्रमाणे एका विशिष्ट मर्यादेपेक्षा जास्त खालच्या पातळीला आत्म्याची अध्यात्मिक पातळी उतरली तर त्या प्रमाणे त्याला खालच्या श्रेणीच्या योनीत जन्म प्राप्त होत असतो. त्याचे गणित मला जास्त माहीत नाही, जेवढे माहित आहे तेवढे सांगितले. फारच खालच्या पातळीला त्याची अध्यात्मिक अवस्था असेल तर ते त्या प्रमाणे नरकात जीवजंतू म्हणून जन्म घेतात. अशा सगळ्या आत्म्याच्या अधःपाताला अथवा उत्कर्षाला त्याचेच कर्म कारणीभूत असते. हि सृष्टीची रचना नीट समजून जो आपले वळण ठेवेल त्याचा उत्कर्ष होतो तो देवत्वाला पोहोचू शकतो. एरवी तो आत्मा तसाच भरकटत भटकत रहातो. विशेष म्हणजे असा आत्मा मिळेल त्या योनीत सुख शोधत रहातो व त्याला त्या योनीच्या योग्यतेचे सुख मिळत असते. त्या योनीत राहून त्याचे भोग भोगून झाले किं त्याचा मृत्यू होतो व तो आत्मा पुनः नवीन जन्मासाठी सज्ज होतो. असें हे जीवन चक्र सतत अव्याहतपणे चालू असते. परंतु जर त्या वासनांच्या साखळ्या तो तोडून (तपस्या, औदासिन्याच्या मदतीने इंद्रियनिग्रह, मर्यादा, संयमन वगैरे आचरून) त्यांतून बाहेर आला तर त्याला पुन्हा त्या कर्मफलांच्या तावडीत न जाता आपला अध्यात्म साधता येतो. म्हणून ह्याला आपल्या ऋषींनी अध्यात्म विद्या असें सांगितले आहे. अशा ह्या सगळ्या योनींना कर्मभोग योनी असें समजले जाते. त्यात सुख आणि दुःख दोनही भोगावे लागतात. त्यापुढे देव योनी आहे, त्यात फक्त सुखानुभव प्राप्त होत असतो. ती योनी प्राप्त व्हावी असा सगळ्या द्रष्ट्यांचा प्रयत्न असतो. पापात रमणारे त्या अवस्थेत कधीच जात नाहीत. त्या पुण्यप्रभावी योनीत जाण्यासाठी सातत्याने चांगले कार्य करावे लागते. सगळीकडे आनंद वाढेल असें करावे लागते. परंतु, अरे ब्राह्मणा, हे कृत व त्रेता युगात सोपे आहे तसे पुढील युगात तितके सोपे नसेल. कारण द्वापार युगापासून पाप शक्तींची ताकद वाढत जाणार आहे व पुण्य शक्तींची क्रमशः क्षीण होत जाणार आहे व कलीयुगात ती खूप जास्त असेल. म्हणून स्वर्ग गाठणे आज जसे सोपे आहे तसें कलीयुगात नसेल. कलीयुग पाप शक्तींच्या साठी असेल. त्या काळात पुण्यवान लोकांच्या

सहवासात रहावे लागेल, त्यांच्याकडून पुण्य मार्ग सांगणारे नितीशास्त्र शिकावे लागेल. आपल्याला जन्माने जो व्यवसाय दिला आहे तो करत हे त्याला साध्य करावयाचे असते. तुम्ही कोणताही व्यवसाय करा, त्यात तुम्ही पुण्य कर्म करत राहू शकता. सुखापेक्षा समाधान जास्त महत्वाचे असते जो सुखापाठी धावतो तो सुख कधीच मिळवू शकत नाही पण समाधान मिळवणे तुलनेने जास्त सोपे असते. समाधान मिळाल्यावर मनाला जी शांतता मिळते ती सुख मिळवून मिळत नाही. तसे पाहिले तर, अरे ब्राह्मणा, दोनही आपल्या मनाच्याच कल्पना असतात. प्रत्यक्षात कांहींच नसते. मानले तर सुख न मानले तर दुःख, अशी वास्तविक परिस्थिती असते. मनुष्य त्याच्या कल्पनाविश्वात जास्त रमत असतो. म्हणून, मनुष्य त्यांच्या मागे धावत असतो. सगळा कल्पनांचा खेळ असतो. चांगुलपणातून जे समाधान मिळते त्यात चिरकाल टिकण्याचा गुण असतो. परंतु, तेथवर ज्ञानी थाबत नाही. त्याला त्याहीपेक्षा कांहीं जास्त करावयाचे असते. तो सुख, दुःख, समाधान ह्यापेक्षा वेगळे अनुभव अपेक्षित असतो ते त्याला मिळण्यासाठी तो त्या सगळ्यांचा अंती त्याग करतो. कारण त्यांनासुद्धा कधीतरी अंत असतो. त्याला औदासिन्य आवडू लागते कारण, त्यात चिरंतनता असते. एकदा तो सगळ्याच अनुभवांबद्दल उदास वृत्ती राखून जगू लागला कीं, त्याला कशाचीच गरज उरत नाही. परंतु तो पुण्याचा मार्ग मात्र सोडत नाही. अशा माणसाला स्थितप्रज्ञ असें समजतात. असा योगी मोक्षाकडे जात असतो. कारण अरे ब्राह्मणा, निरीच्छता हेंच मुख्य अंतिम ध्येय असले तरच मोक्ष मिळतो. सुखाची, समाघानाची असली तरी ती इच्छा असते व म्हणून ती त्याला वासनेच्याच एकाद्या स्वरुपात अडकवत असते. सर्वस्वाचा त्याग करण्यात ती सुद्धा इच्छाच असते, त्याग करण्याची इच्छा, म्हणून त्या अवस्थेत गेलेल्याला ती सुद्धा नको असते. त्याला योगात शून्य अवस्था असें म्हणतात. जो अशा अवस्थेत खरोखरच पोहोचतो त्याला ब्राह्माचा साक्षात्कार होतो. ब्राह्मण त्या व्याधाला विचारतो, "तू सदैव धार्मिक कार्यात, पुजा पाठ करण्यात तुझा समय व्यतीत करत असतोस. योगक्षेमासाठी हा तुझा व्यवसाय उरकून ते करत असतोस, मला सांग, तू तुझ्या इंद्रियांना कसा आवर घालतोस. ते मला समजून घ्यावयाचे आहे. इंद्रिय दमनाने काय साध्य होते ते सांग. इंद्रिय दमनाने औदासिन्य प्राप्त होते कां"? मला इंद्रिय दमनातील सत्य समजावून सांगा.

# व्याध गीता

## प्रकरण सहावे

मार्कंडेय त्याला सांगत असतात, अरे युधिष्ठीरा, असा प्रश्न कौशिक ब्राह्मणांने विचारल्यावर तो ज्ञानी व्याध त्याला सांगतो. अरे ब्राह्मणा, माणसाचे मन व बुद्धी त्याची ह्या जगाबद्दलची माहीती वाढवण्याच्या प्रयत्नात असते अगदी बालपणापासून. त्या मिळवलेल्या माहिती नुसार तो त्याची कामं करत असतो. त्यांच्या मदतीने तो त्याच्या विविध वासना आणि इच्छा वाढवत असतो. त्यासाठी जे आवश्यक आहे ती कामं करत असतो. त्याद्वारा तो अनेक सुखाच्या गोष्टी मिळवत असतो अथवा निदान त्यासाठी प्रयत्न करत असतो. त्याच्या पुढे दोन मार्ग असतात, एक पाप मार्ग व दुसरा पुण्य मार्ग.

आता मी प्रथम तुला सांगतो पाप मार्गाने जाणार्याचे कसे होते. त्यातून त्याला कांहीं सुखं विशेष आवडतात त्यांच्या पाठी तो मग लागत असतो. अशा आवडीच्या गोष्टींच्या लोभात तो जास्तीत जास्त अडकत रहातो. त्यात रमल्यामुळें त्याचे स्वतःच्या अध्यात्मिक परिस्थितीकडे संपूर्ण दुर्लक्ष होते. किंबहुना तो विसरतो कीं, त्याचा जन्म हे भोग घेण्यासाठी नसून, त्यातून मुक्त होण्यासाठी आहे. त्याचे अशा बाबतीतील यश इतरांच्या मानाने कमी अथवा जास्त असू शकते. तो त्याचे व इतरांचे यश ह्यांची तुलना करत असतो, त्यानुसार त्याच्या मनात मदभाव अथवा मत्सर भाव उत्पन्न होत असतो जेव्हां, तो स्वताची तुलना इतरांशी करतो. एकदा त्याच्या मनाची ह्या दोन दोषांनी पकड केली कां त्याचा चांगुलपणा व इतर चागले गुण र्हास पावतात. तो त्याच्यातील उरलासुरला पुण्यमार्ग सोडतो व पापमार्गाने जाऊ लागतो. तरी असा माणूस चांगुलपणाचे सोंग घेऊन बरीच कामं करत असतो त्यामुळें फायदा मात्र पाप कर्माला होत असतो. असा माणूस बहुधा रजोगुणी असतो. त्याच्यात मिथ्याचाराचे अवडंबर वाढत जाते. त्या तुलनेमुळें तो जास्त सरस होण्यासाठी कोठल्याही मार्गाचा अवलंब करण्यास तयार होतो. त्याची अध्यात्मिकता अगदी खालच्या पातळीला जात रहाते. त्यामुळें पुण्यशक्ती त्याच्या पासून दूर होऊ लागतात परंतु, त्याचवेळी पापशक्ती त्याला मदत करण्यासाठी पुढे सरसावत असतात. त्यांच्या कृपेने तो पाप मार्गाने कामयाब होत जातो व त्यामुळें त्याला असें वाटू

लागते कीं, हाच खरा मार्ग आहे. तो आणखीन खचत जातो पण त्याला त्याची कल्पना नसते. पापशक्ती जास्त तेजवान असतात व चटकन फळ देतात त्यामुळें तो फार खूष असतो परंतु, त्याला हे माहीत नसते कीं, ते फळ नंतर फार मोठ्या संकटात त्याला टाकणार असते. संकट असें कि, पाप प्रवृत्तीच्या स्वभावानुसार त्याला अध्यात्मिक र्हास आणि त्याबरोबर येणारे कटू अनुभव मिळणार असतात. परंतु, ते त्याला त्याच्या नंतरच्या जन्मात अनुभवावयाचे असते. ते होत असतांना त्याच्या बरोबर असलेले पुण्य मार्गी त्याला सावध करण्याचा प्रयत्न करत असतात पण तो त्याची पाप बुद्धीने त्या सगळ्यांना कावेबाज उत्तर देऊन आपली बाजू मारून नेत रहातो. तो कोणाचेच ऐकेनासा होतो कारण त्याच्या नजरेत ते पापाने मिळालेले यश व धनसंपत्ती असते. त्याचे पुण्यमार्गी स्नेही त्याला समजावण्यात अयशस्वी ठरतात व त्याची अध्यात्मातील घसरण चालूच असते जरी वास्तविक जगात तो यशस्वी ठरत असतो. ते करत असतांना जर त्याने कांही पापक्षालनाचे व्रत केले असेल, जे तो त्याच्या पूर्व जन्माच्या संस्कारामुळें अथवा त्याच्या कुटूंबियांच्या प्रभावाने करत असेल तर त्याचा त्याला निश्चतपणे फायदा होत असतो. त्या कारणाने त्याचा अध्यात्मिक र्हास कमी होऊ शकतो. असा माणूस आपल्या पापाला लपवण्यासाठी आणखीन तीन प्रकारची पाप करत असतो. तो वाईट विचार बाळगतो, खोटे बोलते, खोटे काम करतो अशा प्रकारे तो अधिकाधिक पापात बुडत जात असतो. आता तो तमोगुणी झालेला असतो. एकदा पाप करण्याचे व्यसन लागले कीं, त्याच्या चांगल्या सवई नष्ट होतात. किंवा किमान पातळीला येऊन ठेपतात. त्या त्याच्या जीवन पद्धतीमुळें तो तशाच प्रकारच्या लोकांशी दोस्ती करत असतो व त्यांच्या प्रभावाखाली आणखीन पाप कृत्ये सहजपणे करत असतो. आपण पापमय जीवन जगत आहोत व विचारांने, बोलण्याने व कृतीने अशा तिनही मार्गाने पाप करत आहोत त्याचे त्याला भान रहात नाही. तो त्या पापातून कांहीं सुख मिळवत असतो व त्याचे त्याला समाधान वाटत असते. आपण योग्य मार्गानेच जात आहोत असे त्याचे भ्रष्ट झालेले मन सांगत असते व त्यात तो संतुष्ट असतो. असा पापप्रवृत्तीच्या माणसाचा जीवन प्रवास असतो.

आता सांगतो, पुण्य प्रवृत्तीच्या माणसाचे कसे होत असते. पुण्य प्रवृत्तीचा माणूस सुरूवातीपासून त्याच्या अध्यात्मिक अवस्थेबाबत जागृत असतो. त्याला त्याचा

अध्यात्मिक उत्कर्ष सगळ्यात जास्त महत्वाचा असतो. कांहीं करावयाचे ते त्या पुण्य मार्गाच्या नियमांत असले पाहिजे ह्याबाबत तो विशेष सावध असतो. त्याला तशी दृष्टी प्राप्त झालेली असते. कोणत्या मार्गाने सुख मिळवावयाचे त्याबद्दलचे त्याचे विचार निश्चित असतात. तो सज्जनांच्या सहवासात रहाणे व त्यांचाच सल्ला घेणे असें मानून त्याची कामं करत असतो. त्याच्या मनात चांगुलपणा सर्वश्रेष्ठ असें ठरवलेले असल्यामुळें त्या व्यतिरीक्त दुसरा मार्ग तो आचरत नाही. त्यामुळें बर्याच वेळा तो त्याच्या कार्यात कमी ठरत असतो परंतु, त्याचे मन त्याला त्याबद्दल दोष देत नाही. कोणतेही काम करण्याची पुण्यप्रद यशस्वी पद्धत तो समजून घेतो व त्या मार्गाने पाप न करता त्याची कामं तो करत असतो. तो काहींही झाले तरी चांगुलपणाचा मार्ग सोडत नाही. यशापेक्षा चांगुलपणाचा मार्ग त्याला जास्त महत्वाचा वाटतो, त्यामुळें बर्याच वेळा तो पाप मार्गी लोकांच्या मागे रहातो वास्तविक यशाच्या बाबत, पण त्याचे त्याला कांही देणे घेणे नसते. तरी अखेरीस तो यशस्वी होत असतो. त्याच्या पुण्यवंत काम करण्यामुळें तो ज्या समाजात रहात असतो तो समाज त्याला फार मान देऊ लागतो. त्या त्याच्या वागण्यामुळें सगळे चांगले लोक त्याच्या भोवती रहातात व त्याची व एकंदर चांगुलपणाची क्षमता सुधारतात.

ते ऐकल्यावर कौशिक ब्राह्मण म्हणतो, फार सोप्या शब्दात आपण खर्या धर्माचे (चांगुलपणा) वर्णन केले आहे. आपले अध्यात्माबाबतचे ज्ञान विलक्षण आहे व आपण कोणाही महान ऋषी पेक्षा कमी नाहीत. धर्माची इतकी सोपी व्याख्या मी आधी कधी ऐकलेली नाही. आपण शिकवत रहावे व मी ऐकत राहावे असें वाटते.

त्यावर व्याध त्याला शांतपणे सांगत असतो, ते ऋषी आपण पुजत असतो कारण ते आपले पूर्वज आहेत. त्यांना त्यांच्या आवडीचा प्रसाद देऊन आपण त्याची पुजा करत असतो. सगळे शहाणे लोक तेंच करतात मनापासून जे त्या ऋषींनी योग्य म्हणून सांगितले आहे. मीसुद्धा तेंच सांगितले तुला जे त्या ऋषीने मला सांगितले. त्यांना स्मरून मी ते सांगितले आहे. ते ब्रह्माचे तत्त्वज्ञान आहे. त्याच्यापेक्षा उच्च ज्ञान कांहीं नाही.

कौशिक ब्राह्मण व्याधाला विचारतो, "ह्या विश्वाची रचना कशी आहे ते सागा. व्याध सांगू लागतो, हे विश्व जे कोणालाही सहजपणे समजणारे नाही त्यालाच आपण ब्रह्म असें बोलतो. त्यातील पृथ्वी तत्त्व, वायू तत्त्व, जल तत्त्व, अग्नी तत्त्व आणि आकाश तत्त्व ही पांच

महा तत्त्व आहेत. त्यांना समजण्यासाठी विधात्याने आकार, ध्वनी, वास, स्पर्श, रुची अशा चाचण्या दिल्या आहेत. ती तत्त्वे एकमेकांशी संबंधित असतात. त्यांना समजण्यासाठी आपल्याला मन दिले आहे. त्यानंतर येते बुद्धी. त्यानंतर येतो अहंकार. त्यानंतर आपली पांच ज्ञानेंद्रीये आणि आत्मा अशी रचना आहे ह्या विश्वाची. त्यानंतर नैतिक मुल्ये, सत्त्व, रजस आणि तमस समजून घ्यावयाची असतात. हे विश्व ह्या सतरा (पांच महाभूत, मन, बुद्धी, आत्मा, अहंकार, सत्त्व, रजोगुण, तमोगुण आणि पंचेंद्रीये) गोष्टीने प्रभावीत होत असते. एवढे सांगितले, आणखीन काय तुला माझ्या कडून ऐकवयाचे आहे ते विचार.

**- प्रकरण सहावे समाप्त -**

# व्याध गीता

## प्रकरण सातवे

मार्कंडेय पुढे सांगतात, अरे पंडुपुत्रा, अशारितीने त्यांच्यातील संवाद मोठ्या मजेत होत होता. पुढे काय झाले ते आता तुला सांगतो, ब्राह्मण कौशिक व्याधाला विचारतो, "अहो ब्रह्मज्ञानी, असें आम्ही जाणतो कीं, हे विश्व पांच मुल तत्त्वांनी बनले आहे. त्यांची अधिक माहीती मला तुमच्या कडून ऐकण्याची इच्छा आहे. त्यावर व्याध सांगू लागतो, तू म्हणतोस ती पांच मुल तत्त्वे आहेत पृथ्वी, पाणी, अग्नी, हवा आणि आकाश. त्यांच्या गुणाबद्दल बोलावयाचे तर असें समजावे लागेल कीं, आपल्या पंच ज्ञानेंद्रियांद्वारा आपण त्याना जाणून घेत असतो. ते कसे ते मी तुला सांगतो, प्रथम पृथ्वी पाहू, तिला पांच गुण आहेत. त्यानंतर पाणी त्याला चार गुण असतात, त्यानंतर अग्नी त्याला तीन गुण असतात, त्यानंतर हवा, त्याला दोन गुण असतात, त्यानंतर आकाश त्याला फक्त एकच गुण असतो जो आपली ज्ञानेंद्रिय (कान-ध्वनी, त्वचा-स्पर्श, गंध-नाक, तोंड-रुची, डोळे-आकार) आकलन करू शकतात. आता ते कोणते गुण त्या पंचतत्त्वांत आढळतात ते पहावे लागेल. पृथ्वी मध्ये सगळे पांच गुण आहेत, पाण्यात चार गुण आहेत ध्वनी, स्पर्श, रुची आणि आकार. अग्नी मध्ये तीन गुण आहेत ध्वनी, स्पर्श, आकार. हवेत दोन गुण आहेत ध्वनी आणि स्पर्श. अखेरच्या आकाशाला फक्त एकच गुण आहे तो असतो ध्वनी. ध्वनी हा विश्वाचा मुलभूत गुण आहे तो सगळ्यात असतो. हे एकंदर पंधरा गुण सर्वच पदार्थात तुला आढळतील जे ह्या पांचांपासून बनले आहेत. ते गुण एकमेकांना पुरक असतात. त्यामुळें ही सृष्टी बनली आहे. अशारितीने जोवर ते गुण काम करत असतात तोवर सगळे व्यवस्थित असते परंतु, जेव्हां त्यात गोंधळ होतो तेव्हां सगळे आपापली रुप बदलतात व ते नष्ट होतात. हे जग त्या पंच तत्त्वांनी बनली आहेत. सगळ्या चराचरात तेंच असतात. त्यापेक्षा इतर कांहींही नसते. त्यातील जे दिसतात त्यांना व्यक्त सृष्टी किंवा दृष्य सृष्टी असें म्हणतात व जे दिसत नाहीत त्यांना अव्यक्त सृष्टी अथवा अदृष्य सृष्टी असे म्हणतात. जेव्हां एकादा माणूस आत्मशुद्धीची साधना करण्याचे ठरवतो, तो त्याची ज्ञानेंद्रिये बंद करतो (ज्ञानेंद्रिये साधारणपणे सतत कार्यरत असतात पण ती बंद करावी लागतात जेव्हां

आपल्याला आपले आत्मज्ञान करावयाचे असते. ते एकाग्र चित्ताने साध्य होत असते), असें बरेच काळ तो करतो तेव्हां त्याला त्याच्या सत्य रुपाचे दर्शन होते. परंतु जो त्याच्या गतकर्मात अडकला आहे तो ते एकचित्त साध्य करू शकत नाही. कारण तो त्या गतकर्माच्या गराड्यात अडकलेला असतो. अशा माणसांने कितीही प्रयत्न केले तरी ते त्याला साध्य होत नाही. ज्याने त्याची त्या गतकर्मापासून सुटका केली आहे तोंच मात्र ते साध्य करू शकतो. तो ह्या असत्य जगाला समजून त्यात न रमण्याचा निर्धार करतो व त्यानुसार प्रयत्न करतो तो अंती त्यात यशस्वी होतो व त्याला आत्मज्ञान होते. जे एकमेव सत्य आहे. त्यात विधात्याची ती सगळी लक्षण आढतात जसें प्रज्ञा, सर्वज्ञ, स्वयंभू, अमर, विलक्षण, अतुलनीय, सर्वशक्तीमान, निर्विकल्प, निर्गूण, अनंत असा तो, त्याला जाणवू लागतो. अरे ब्राह्मणा, हे तुला मी सांगितले ती झाली तुला माहीती, पण त्या माहितीचे तुझ्या ज्ञानात परिवर्तन होण्यासाठी तुला तपश्चर्या करावी लागेल. बहुतेक ब्राह्मणांना ही माहीती असते कारण ते वेदांचे अभ्यास करतात पण माहिती निरुपयोगी असते, जेव्हां त्याची प्रत्यक्ष अनुभूती होते तेव्हां त्याला ज्ञान म्हणतात. त्यासाठी तुला ती तपश्चर्या करणे आवश्यक आहे. स्वर्ग, पृथ्वी आणि नरक सगळे आपल्यातच असतात त्याची अभिव्यक्ती त्या त्या कर्मानुसार त्याला होत असते. जर भोगांच्यात न रमता जो तपस्या करतो व तो पूर्ण सात्त्विक औदासिन्यांने त्याना हरवतो तो त्याच्यातच असलेल्या स्वर्गात जातो व चिरंतन आनंदात रहातो. जो त्याच्या भोगांच्यात रमतो तो त्याच्यातच असलेल्या नरकात चिरकाळ खितपत पडतो. आपल्या भोगेंद्रीयांना औदासिन्याने हरवणे ह्यालाच तपस्या असेसुद्धा म्हणतात. ह्यात एक गोष्ट लक्षात घे अरे ब्राह्मणा, शरीराच्या व्यवहारात म्हणजे योगक्षेमात तो साधक ढवळाढवळ करत नसतो. म्हणजे कोणते भोग शरीराला अत्यावश्यक आहेत त्यांना तोशीस न देता तो हि तपस्या करत असतो. असे मुष्कील कार्य जो साध्य करतो तो योगी समजला जातो. शरीराला जपावयाचे व त्याचवेळी आत्म्याला नियंत्रणात ठेवावयाचे अशी कसरत त्याला करावी लागत असते. म्हणून अरे ब्राह्मणा, तसे करण्यासाठी तो माणूस पूर्ण सात्त्विक अवस्थेत गेलेला असला पाहिजे. भोगेंद्रियांचे व्यवस्थापन ज्याला जमते तो जिंकतो व ज्याला जमत नाही तो बरबाद होतो. जो भोगेंद्रियांत जाणून बुजून स्वताला अडकवून ठेवतो त्या भोगांच्या लोभाने, तो भ्रष्ट होतो व

पृथ्वी आणि नरक ह्यात फेर्या मारत रहातो. ज्याला औदासिन्य हा मार्ग जोपासता आला तो अशा साधनेत हमखास यशस्वी होतो. त्याला कोणतीही वासना त्रास देऊ शकत नाही. ह्यामध्यें मनाच्या सवयप्रधान असण्याच्या गुणाचा उपयोग होत असतो. ज्या प्रकारच्या विचारांची सवय आपण आपल्या मनाला लावतो त्या प्रकारचे विचार आपल्या मनांत येत असतात. त्याच प्रमाणे विचारहीनता जोपासणेसुद्धा त्यामुळेंच शक्य होते. माणसाच्या शरीराला रथाची उपमा देऊन एक रुपक सांगितले आहे, वासनांना घोडे दाखवले आहे, ज्या रथाचा सारथी (मन, बुद्धी) हुशार आहे तो त्या घोड्यांना योग्य रितीने घेऊन जाऊ शकतो असें सांगितले आहे. विशेषकरून तारुण्याच्या काळात जेव्हां शरीराची भोगेंद्रियांची गरज तीव्र असते तेव्हां औदासिन्य पाळावे लागले तर ते अवघड असते तरी सततच्या प्रयासाने ते अंती साध्य होत असते. परंतु त्यासाठी माणसाला गृहस्थाश्रम सांगितला आहे ज्यामुळें त्याचा नाहक कोंडमारा न होता, त्याच्या आवश्यक वासनांना उचीत वळण देणे शक्य होते. तरीसुद्धा एकदा मनाला वासनां बद्दल उदास रहाण्याची सवय लागली तर ते सोपे होते आणि आवश्यक वासनांचे प्रमाणसुद्धा कमी होत जाते. परंतु, मनातल्या मनात तो त्या वासनांत रमत राहून कमी प्रतीचे पाप करत रहातो. अरे ब्राह्मणा, घरातील संस्कार, चांगला मित्र परिवार, गुरूवरील श्रद्धा, चांगल्या इतर सवई अशांच्या मदतीने ते शक्य होत असते. आपल्या निर्धाराचा पक्केपणा, साधना पद्धतीबद्दलची श्रद्धा त्याला त्यात मदत करत असतात. वाढत्या वयात शरीराची वासनिक गरज कमी होते. त्यामुळें त्या वयात वासनांचा क्षोभ आवरणे सोपे होते. घरातून जे संस्कार असतात त्याचा फार उपयोग होत असतो. बालपणापासून वैराग्याचे महत्व मनावर बिंबवल्यामुळें ते सोपे होते. परंतु, लग्न झाल्यानंतर योगक्षेमाच्या गरजेनुसार वासनांना वाट मिळत असते. त्यामुळें त्या वयोगटात संयमन सोपे होत असते. मितभोगाचे धोरण त्या काळांत मोठे उपयोगी ठरत असते. जर तसे संस्कार नसतील तर मात्र साधना अवघड होते. कारण मनाला नियंत्रण नसते. त्याचा विवेक काम करेनासा होतो व तो वादळात सापडलेल्या नांवेसारखा भरकटत जातो. योग्य संस्कार, योग्य विवेक व मनावरील ताबा बुद्धीच्या मदतीने घेऊन जो काम करतो त्याला यश मिळतेच. आपण ह्या खेळात आहोत व आपले एक खेळाडू म्हणून काम आहे किं, आपण स्वतामधील विधाता पहावयाचा आहे, असे संस्कार जर

सुरूवातीपासून असतील तर साधना सोपी होत असते. अरे ब्राह्मणा, माणसाला कांहींही अशक्य नसते व जर जिद्द असेल तर तो कांहींही करून दाखवू शकतो असा विश्वास ठेवला तर साधना सोपी ठरते. औदासिन्याचे दोन प्रकार आढळतात. एक सात्त्विक व दुसरा तामसी. तामसी औदासिन्यामुळें माणसात आळस, नकर्तेपणा, नैराश्य वाढते, जर माणूस तामसी असेल तर त्याच्यात असे सदोष औदासिन्य उत्पन्न होत असते. म्हणून साधक सुरूवातीपासून सात्त्विक गुणात असणे हि त्याच्या साधनेतील पहिली गरज असते. जोवर माणूस पूर्ण नाही तरी बहुतांशी सात्त्विक अवस्थेत गेला नाही तोवर त्याने ही साधना करणे त्याच्यासाठी घातक ठरू शकते.

**- प्रकरण सातवे समाप्त -**

# व्याध गीता

## प्रकरण आठवे

मार्कंडेय सांगत असतात, जसें व्याधाने ते साधनेबाबतचे सांगितले तसें कौशिक ब्राह्मणाला आणखीन विचारावेसे वाटले. तो विचारतो, "आता मला सांगा अहो ज्ञानी कीं, सत्त्व, रजो आणि तमो गुणांची अधिक माहीती. कारण हे विश्व त्या गुणांनी घेरले आहे असें मी शिकलो आहे परंतु, त्यांचे मुल तत्त्व कोणते ते मला माहित नाही तरी ते मला आपण सांगावे".

व्याध सांगू लागतो, "मी तुझ्या सगळ्या शंकांचे समाधान करणार आहे, तरी नीटपणे लक्ष देऊन पूर्ण श्रद्धेने ऐकत जा. त्यातील तमस गुण मायेच्या मोहात अडकल्याचे लक्षण समजले जाते. रजस मध्ये कर्मयोगाची लक्षणं आढळतात आणि सत्त्व गुणात अध्यात्मिक जागृतीचा अनुभव येत असतो. जो अध्यात्मिक जागृती पासून दूर असतो, ज्याच्या वर्तणूकीत अविवेकीपणा अथवा मूर्खपणा जास्त असतो, जो वाह्यात कल्पनाविश्वात रमलेला असतो, जो आळशी, व्यसनी असतो, ज्याचे क्रोध, लोभ, मोह त्याला त्रास देत असतात असा माणूस तामसी समजला जातो. अशी माणसे, जे वागणूकीने चांगले असतात, बोलण्याची त्यांना पद्धत असते, जे विवेकांने आपले निर्णय घेतात, जे उद्योगी आहेत, जे कोणाचा द्वेष करत नाहीत, जे महत्वाकांक्षी आहेत, जे थोडे अधीर आहेत, ज्यांचा स्वभाव चांगला आहे असे लोक राजस गुणाचे समजले जातात. सत्त्व गुणी माणसें शांत प्रवृत्तीचे असतात, त्यांच्यात धैर्य चांगले असते, आपले निर्णय उत्तम प्रकारे घेतात, कोणतेही व्यसन नसते, क्षमाशिल असतात, दुसर्याचे ऐकण्यास तयार असतात, त्यांच्यात समजूतदारपणा चांगला असतो जो राजस गुणीत कमी असतो व तमोगुणीत अजिबात नसतो. अशा लोकांना सत्त्वगुणी समजले जाते. त्याशिवाय ह्या तीन गुणांची आणखीन बरीच लक्षणं आहेत (परिशिष्ठ दोन पहा) परंतु, तूर्तास एवढेच सांगतो. जेव्हां सत्त्वगुणी माणूस जगाच्या व्यवहारी स्वभावात अडकतो तेव्हां त्याला त्यातून बाहेर येण्यात पुष्कळ त्रास होत असतो. कारण तो स्वभावानेच व्रतस्थ प्रवृत्तीचा असतो. तो जगाच्या त्या स्वभावाचा द्वेष करू लागतो. त्यातून दूर जाण्याच्या गोष्टी करू लागतो. त्यामुळें त्याच्या मनांत ह्या जगाच्या कोणत्याही गोष्टींबद्दल औदासिन्य वाटू लागते. त्याच्यातील अहंकार

कमी होतो व त्याच्यातील इतरांबद्दलचे वागणे जास्त चांगले व समजूतदारपणाचे असे होते. त्याच्यातील नैतिकतेला विशेष महत्व प्राप्त होते. स्वाभाविकपणे औदासिन्य त्याच्या स्वभावात आल्याने त्याला त्याच्या इच्छांवर नियंत्रण करणे सोपे होते. असा माणूस चांगली अध्यात्म साधना करू शकतो. असा माणूस कोणत्याही घरात (अगदी शुद्राच्या) जन्मलेला असला तरी त्याच्या गुणकर्मामुळें तो वैश्य व त्याही पेक्षा जास्त गुणवत्ता असेल तर क्षत्रिय व त्याही पेक्षा जास्त असेल तर ब्राह्मण होतो. त्याच्यातील स्वाभाविक व्रतस्थतेवरून हे ठरत असते. मी तुला ह्या त्रिगुणांची माहिती सांगितली आहे, आणखीन काय तुला माहीत करून घ्यावयाचे आहे माझ्याकडून ते बोल". कौशिक ब्राह्मणा व्याधाला विचारतो, "सगळे विश्व ह्या तीन गुणांनी व्यापले आहे, ते गुण कसे उत्पन्न होतात व त्यांचे कारण काय"? व्याध त्याला सांगू लागतो, "हे विश्व ज्या स्वयंभूच्या इच्छेमुळे निर्माण झाले तो स्वतः अध्यात्माचा गाभा आहे. त्यातून सगळे विचार, वस्तु, दिशा, रचना, व्यक्त आणि अव्यक्त गोष्टी उत्पन्न झाल्या आहेत. ते होत असतांना पूर्ण अध्यात्मिक शक्ती त्यात कमी जास्त स्वरुपात असावी लागते कारण, तेंच त्या गोष्टीचे कारक असते. पूर्ण अध्यात्मिकता असल्यास ते दैविक ठरते. त्यापेक्षा कमी असेल तर ते सात्त्विक समजले जाते, त्यापेक्षा कमी असेल तर ते रजस गुणाचे कारण असते आणि त्याही पेक्षा कमी असेल तर ते तमोगुणाचे कारण असे समजले जाते. हे सगळ्याच गोष्टीत त्याच्या अध्यात्मिकतेच्या कुवतीनुसार असते. त्याचे साधारणपणे तीन गुणात वर्गीकरण केलेले असले तरी प्रत्यक्षात ते वर्गीकरण अनेक टप्प्याने होत असलेले आढळते. दैविकतेच्या अध्यात्मिकतेत जर कमी झाली कांहीं कारणांने व ते कमी पवित्र ठरले तर त्यानुसार ते सात्त्विक गुणात जाते. त्याहूनही कमी पावित्र्य झाले तर ती रजोगुणात आहे असें समजले जाते आणि त्याही पेक्षा कमी पावित्र्य झाले कीं, त्याला तमोगुणात समजले जाते. कारण अध्यात्मिकता त्यातील पावित्र्याने मोजली जात असते. त्याहीपेक्षा कमी झाली पावित्र्यता तर ते आणखीन खालच्या पातळीला गेले असें समजले जाते. कृतयुगात अध्यात्मिकता दैविक पातळीची होती, त्रेतायुगात ती सात्त्विक पातळीला आली, त्यानंतर द्वापारयुगात रजोगुणाच्या पातळीला येईल व कलीयुगात ती तमोगुणाच्या व त्याही पेक्षा खालच्या पातळीला जाणार आहे. हे पावित्र्याचे कमी होणे अथवा जास्त होणे क्रमशः असते त्यातील भेद सावकाशपणे

प्रकट होतात. तेंच माणसाच्या त्रिगुणांबद्दल होत असते. अशारितीने ह्या विश्वाची पावित्र्यता पाहिली जात असते. त्रिगुण त्याचे प्रमाण ठरवण्याचे एक परिमाण आहे, अरे ब्राह्मणा. देवांची पावित्र्यता उच्च असते म्हणून ते देव असतात. त्यानंतर सात्त्विक असते त्यात संत, साधू येतात. त्यानंतर रजो व शेवटी तमो असें वर्गीकरण साधारणपणे असते. तमोपेक्षा कमी झाले कीं ते दानव, राक्षस अशा प्रकारचे समजले जात असते. त्यात दुर्जन गुणी समजले जाते. तरीसुद्धा दोन सात्त्विक माणसांच्या सात्त्विकतेत सुद्धा कमी जास्त असा फरक असू शकतो. त्याच प्रमाणे दोन रजोगुणी मध्ये त्यांच्या रजो अवस्थेत कमी जास्त असते त्यामुळे कोणी रजोसात्त्विक अशा पावित्र्याच्या अवस्थेत असू शकतात. तसेंच कोणी रजोतमो अशा मधल्या अवस्थेत असू शकतात. दोन तमोगुणी मध्येसुद्धा असाच पावित्र्याच्या पातळीत फरक असू शकतो. म्हणजे अरे ब्राह्मणा, प्रत्यक्षात पावित्र्याच्या असंख्य पातळ्या असू शकतात. परंतु, सोयीसाठी स्थुलमानाने पावित्र्य ठरवण्याचे, तीन वर्ग पाडले आहेत असे समज".

समर्थ रामदासांनी लिहीलेल्या दासबोधात लक्षणचिकीत्सा दिली आहे, त्यात त्रिगुणांची लक्षणं दिली आहेत, ती परिशिष्ठ दोन मध्ये दिली आहेत ती पहावीत. तेथे एक आलेख दिला आहे तो पहावा.

**- प्रकरण आठवे समाप्त -**

# व्याध गीता

## प्रकरण नववे

ब्राह्मण व्याधाला विचारतो, "मला समजत नाही, अग्नी व इतर वस्तुमात्र कसे एकत्र येऊन जीवनमात्र घडवतात. अग्नी बरोबर त्यांचा सहयोगातून फक्त त्या वस्तुमात्राची राखच होऊ शकते हे माहीत असून आपण असें कसे बोलता? त्याच प्रमाणे प्राणवायू त्याच्या स्वभावाप्रमाणे, स्नायू व नसा कशाप्रकारे उत्तेजित करतो ते समजावून सांगा". असा अवघड प्रश्न ऐकल्यावर तो ज्ञानी व्याध त्याला चटकन उत्तर देतो, "शरीरात असलेला जीव त्या सगळ्या गोष्टी घडवून आणण्यात समर्थ असतो. तो जीव त्या शरीराबरोबर जन्मलेला असतो व तो जीव त्या शरीरासह नष्टसुद्धा होणार असतो. रथाला जसा सारथी असतो तसेंच हा जीव, जो देहाबरोबर पैदा झाला तो रथाच्या सारथ्याप्रमाणे, शरीराला चालवत असतो. योगक्षेमाचे सगळे कार्य ही त्याची जबाबदारी असते. त्यात असलेला आत्मा मात्र त्यात भाग न घेता फक्त त्यांचे कार्य एकाद्या निरीक्षकाप्रमाणे न्याहाळत असतो, त्यांच्या कामात तो भाग घेणे अप्रस्तुत समजले जाते. परंतु, अरे ब्राह्मणा, येथेच जर त्या आत्म्याने त्यांच्या कारभारात लक्ष घालून हस्तक्षेप केला तर ते पाप कर्म ठरते व ते त्या आत्म्याला यथावकाश भोगावे लागते. खरा साधक तो असतो जो अशाप्रकारे हस्तक्षेप करत नाही. ज्ञानी माणसांचे आत्मे त्यांच्या शरीर व जीव ह्यांच्या कामात लक्ष घालत नाहीत, तो आत्मा चिरंतन स्वयंभूच्या ध्यानात रमलेला असतो. त्याला शरीराप्रमाणे काळाचे बंधन नसते. तो चिरंजीव असतो. त्या आत्म्याच्या शरीरात असण्यामुळें ते शरीर जीवंत असते कारण, त्या शरीराला त्या आत्म्याकडून जगण्याची प्रेरणा मिळते म्हणजे जीव जो त्या शरीराबरोबर जन्मला व त्या शरीराबरोबर नष्ट होतो, तो आत्म्याकडून प्रेरणा घेऊन काम करत असतो. शरीराला जगण्यासाठी खाणे, पिणे, श्वासोंश्वास, विश्रांती वगैरे आवश्यक असते तर जीवाला आत्म्याचे सानिध्य आवश्यक असते. शरीर वास्तविक व्यक्त असते परंतु, जीव आणि आत्मा अव्यक्त अवास्तविक असतात. शरीर कांहीं कारणाने मृत झाले तर त्यातील जीव सुद्धा मरतो व तसें झाले कीं, त्यात असलेला आत्मा त्याची कर्मफल पुंजी (लिंगदेह) घेऊन ते शरीर सोडून निघून जातो

अशी रचना आहे. आत्म्याच्या सानिध्यात असलेल्या जीवाला अहंकार प्राप्त होतो. त्याचे त्या अनुषंगाने जे कर्म होते ते त्या आत्म्याला लागत असते असा त्या जीव आणि आत्म्याचा अन्योन्य संबंध असतो. जीवाला पाप लागत नाही कारण तो स्वतंत्र नसतो. जीव हे शरीर आणि त्यातील आत्मा ह्यांना जोडणारा दुवा असतो. जीव हा त्या शरीराच्या योगक्षेमाचा कर्ता असतो व त्यामुळें ते शरीर जगत असते जसें रथाला सारथी असतो तसे शरीराचा तो सारथी असतो. आत्मा त्या शरीरातून जगणारा प्रवासी असतो जसे रथातून प्रवासी असावा अशी साधारण व्यवस्था असते. खरेतर ही व्यवस्था खूपच जटील आहे पण मी येथे तुला जमेल तितकी सोपी करून सांगण्याचा प्रयास करत आहे". "अरे ब्राह्मणा, सामान्य माणसाचा आत्मा जीवाच्या कारभारात ढवळाढवळ करतो कारण, अज्ञानामुळें तो ते त्याचे काम नाही हे समजत नाही व म्हणून पापाचरण सुरू होते. जसें रथ चालवणार्या सारथ्याच्या कामात त्यात बसलेल्या उतारूने ढवळाढवळ करावी".

आत्मा व जीव ह्यांना जोडणार्या वायूला प्राण म्हणतात. तो श्वासोंच्छ्वासातून व्यक्त होत असतो. जर श्वासोंच्छ्वास कांही कारणाने थांबला तर तो जोड तुटतो व आत्मा तो देह सोडून जात असतो. त्याशिवाय समान, अपान असें इतर प्रकारचे वायू त्यांत शरीराचे व जीवाचे संबंध टीकवण्यात कार्यरत असतात. अपान वायू शरीरातील मळ व मुत्र ह्यांचे व्यवस्थापन करण्यात कार्यरत असतात. त्याचा प्रभाव आपल्या मुत्रपिंड आणि आतड्यांशी असतो. त्याशिवाय उदान व व्यान असें आणखीव दोन वायू कार्यरतच असतात. अशारितीने प्राण, समान, अपान, उदान आणि व्यान असें पंचप्राण जीवाला त्याचे कार्य करण्यात मदत करत असतात. ते आयुर्वेदात सांगितले आहे हे तुला माहीत असेलच. त्या सगळ्या पंचप्राणामुळें आपल्याला जेवण खाणे, पचवणे, शौंचास व मुत्र बाहेर टाकणे अशा कामात एक जोर, अशाप्रकारे मदत करत असतात. त्यामुळे आपल्या शरीरात तो अग्नी चेतवलेला रहातो. प्राण, अपान, समान, उदान ह्या वायूंच्या कामामुळें शरीराची वाढ होत असते. खरा योगी ह्या पंचप्राणांचे नियमन करून सर्व भूतमात्रांबद्दल समान दृष्टी ठेवून त्याच्यातील आत्म्याला पाहू शकतात. प्राण व अपान सगळ्या प्राणिमात्रांत असतात. त्या शरीरात आत्मा विविध रुपात असतो. तरीसुद्धा तो त्या शरीरात असूनही त्यात नसतो असे विलक्षण नाते त्या दोघांत (शरीर व आत्मा) असते. तुला मी आधीच सांगितले आहे

कीं, सत्त्व, रजो आणि तमो हे त्रिगुण त्याला त्याच्या शुद्धतेनुसार बांधत असतात. जर त्या शरीरातील आत्मा चांगला शुद्ध असेल तर त्यातून सात्त्विक गुणाचा अनुभव येतो. तसेंच आत्मा अशुद्ध असेल तर त्या प्रमाणे त्यातून तमोगुणाचा अनुभव येत असतो. त्या शुद्धतेच्या विविध अवस्था त्या आत्म्याबरोबर असलेल्या लिंगदेहाला असतात कारण, आत्म्याला कांहींच स्पर्श करू शकत नाही. अशा परिस्थितीत त्या आत्म्याचा लिंगदेह त्याच्यावतीने शरीराशी व त्यातील जीवाशी संपर्क करून काम करत असतो. जसे एकादा श्रीमंत त्याची कामं त्याच्या नोकराकडून करून घेत असतो (श्रीमंत म्हणजे आत्मा व नोकर म्हणजे लिंगदेह) तसेंच काहीसे हे असते. असा आत्मा जरी कधीच कोणालाही प्रत्यक्ष दिसत नसला तरी ज्ञानी माणसे त्याला त्यांच्या अध्यात्मिक दृष्टीने दृष्टांता द्वारा पाहू शकतात. अज्ञानी त्या दृष्टीला समजत नाहीत. ते अशा गोष्टींचे हंसे उडवतात. अशा दृष्टीला दृष्टांत असें म्हणतात. विशेषकरून जे सात्त्विक असतात त्यांना असें दृष्टांत जाणवतात परंतु, रजो व तमोगुणी माणसांना ती दृष्टी नसते त्यांना दृष्टांत होत नाहीत. म्हणून असें अज्ञानी त्या दृष्टांतावर विश्वास ठेवत नाहीत. ते त्या ज्ञानी माणसाला, "तू खोटे बोलतोस", असें बोलतात. प्रसंगी तमोगुणी लोकांच्या समाजात अशा दृष्ट्यांचा छळसुद्धा होत असतो. आत्मशुद्धीमध्ये प्रयत्नशिल असलेला त्याच्या तपोश्चरणाने यथावकाश त्याची सगळी पाप (अशुद्ध प्रवृत्ती) नष्ट करत असतो. अशा चित्तशुद्धी झालेला माणूस शांतपणे निद्रा घेऊ शकतो. जस जसे त्याची अध्यात्मिक शुद्धी अधिकाधिक होत जाते त्याला सगळे विश्वाचे ज्ञान आपसूकपणे होऊ लागते. असा जर मिताहार करत असेल तर त्याला लवकर ते अनुभव आतल्या आत (अंतर्यामी) येऊ लागतात. सतत ध्यानात रहाण्याने त्याला त्याच्याच आत्म्याचे परमेश्वर स्वरुप अनुभवास येऊ लागते. जे अनुभव सांगता येत नाहीत, स्वतःला आल्यावरच ते समजतात. त्या अवस्थेला मोक्षावस्था समजतात, तरी तो त्या देहात असतो. लोभ आणि क्रोध त्याने टाळावयाचे असतात. त्या अवस्थेत रहाणारा सदैव इच्छा मुक्त होतो कारण इच्छा म्हणजे अपुरेपणा. ते ज्ञान झाल्यावर त्याच्यातील अपुरेपणा संपतो व त्यामुळें त्याला कशाचीच गरज वाटत नाही. असे झाले तरी त्याला अजून शरीर असते व त्या शरीराच्या नित्य गरजा त्याला पुरवाव्या लागतात. लोभ आणि इतर पांच दोष (काम, क्रोध, मोह, मद व मत्सर) त्या शरीराच्या गरजा पुरवण्यासाठी

तरीसुद्धा त्याला सांभाळावे लागत असतात. त्यालाच योगक्षेम असें म्हणतात. त्यांचा प्रभाव त्याला अनुभवावा लागत असतो. त्यासाठी क्रोध आणि लोभाच्या आहारी तो जाण्याची विशेष शक्यता असते व त्यामुळे पुन्हा त्याचा अध्यात्मिक र्हास होण्याचा संभव असतो. सात्त्विकतेच्या उच्च पदाला गेलेल्याला त्याचा अभिमान व त्यातून उत्पन्न होणारा गर्व बाधत असतो. अरे ब्राह्मणा, त्या पक्षीणीला तू मारलेस व त्याचा तुला गर्व झाला व म्हणूनच तुला त्या पतिव्रतेने माझ्याकडे पाठवले हे तू जाणतोस. जे तुझे झाले तसे बर्याच जणांचे होते म्हणून सावध राहून साधना करावयाची असते. ह्याकरतां जे साध्य झाले ते ब्रह्माला अर्पण करून स्वतः सदैव नम्रभावात रहाण्याचे धोरण आचरण्यात आले पाहिजे. सिद्धी हि ब्रह्मांने आपल्यावर टाकलेली जबाबदारी आहे असें समजून रहावयाचे असते. किंवा, आपल्याला ती सिद्धी मिळालेलीच नाही अशा प्रकारे रहावयाचे असते. साधनेच्या वरच्या अवस्थेत नुकसान होण्याचा संभव जास्त असतो. स्वताची अध्यात्मिक अवस्था (सत्त्व, रज, तम) ओळखून त्यात सुधारणा करण्याचे धोरण जो ठेवतो तो तरून जातो. त्याकरतां नम्रता, सावधपणा आवश्यक असतो. ते त्याचे धार्मिक कर्तव्य असते. देहाला त्याच्या गरजांसाठी तेवढीच मदत करणे व बाकी त्या वासनांपासून विरक्त रहाणे हे त्याचे धार्मिक कर्तव्य असते. असा माणूस खरा संन्यासी समजला जातो. अंतिम ज्ञान आपले आपल्यालाच कमवावे लागते ते तुझा गुरूसुद्धा तुला देऊ शकणार नसतो कारण, ते अनुभवसिद्ध ज्ञान असते. परमेश्वर कोणी दाखवू शकत नाही, तो आपला आपल्यालाच अनुभवावा लागतो. पुस्तक वाचून किंवा कोणाकडून ऐकून ती माहिती तुला जरूर मिळवता येईल पण त्याचे ज्ञानात परिवर्तन करण्यासाठी तुला तपस्या करावीच लागेल. एर्हवी ते प्राप्त करता येत नाही. गुरू आपल्याला मार्गदर्शन करू शकतो पण त्याची अनुभूती देऊ शकत नाही. अंतिम टप्प्याला आलो किं. सगळ्या ऐहिक गोष्टींचा वस्तुतः त्याग करावा लागतो. त्याला योग असे म्हणतात. त्या अवस्थेत गेलेल्याने, कोणाही जीवाला त्रास द्यावयाचा नसतो. भूतदया, निस्पृहता, शांत मन, निरिच्छता अशा वागण्याने अध्यात्मिक दर्जा वाढवणे सोपे जाते. सतत आपला अध्यात्मिक दर्जा कसा सुधारता येईल, अधिकाधिक सात्त्विक कसा करता येईल, त्यावर सदैव लक्ष असले पाहिजे. सात्त्विक वैराग्य आचरणे त्यासाठी औदासिन्याचे धोरण वागण्यात व विचार करण्यात

बाळगणे, सर्व भूतांबद्दल सहानुभूती असणे, त्यासाठी आपल्या विवेकाचा उपयोग करून सावध रहाणे असे सदैव असले पाहिजे. जर तो त्याचा स्वभाव झाला तरच तो मोक्षपदी जाऊ शकतो. ह्याना योगशास्त्रात गुण म्हणतात जे त्याच्यात असावे लागतात. ते गुणसुद्धा त्याच्यातून निघून जावे लागतात. तरच तो मोक्षास जातो. त्याला त्यानंतर सत्चिदानंद प्राप्त होतो जो गुणापलिकडला आहे. त्या अवस्थेत गेलेल्याला वासना, भावना, प्रतिक्रिया असें कांहीं नसते जणू मृत झाला आहे जरी तो पूर्णपणे जीवंत असतो. असा माणूस जीवंतपणी ब्रह्मीभूत झालेला असतो.

अरे ब्राह्मणा, मी तुला थोडक्यात जे मी अनुभवले व माझ्या दृष्टांताने पाहिले ते सांगितले आहे. एक महत्वाचे लक्षात असू दे, कीं, अशा निस्पृह माणसाच्या चांगुलपणाचा गैर फायदा घेणारे तमोगुणी अर्थात दुर्जन समाजात असतात त्यांपासून त्यांने म्हणजे सगळ्याच सात्त्विक माणसांनी सावध रहावयाचे असते. वरील विवेचनावरून कांहीं गोष्टी स्पष्ट होतात त्या साधकाने लक्षात ठेवल्या पाहिजेत. त्या अशा, माणूस चार मुलभूत गोष्टींपासून बनलेली आहे, त्या अशा, शरीर, जीव, आत्मा आणि त्याची गतकर्माची पुंजी म्हणजे लिंगदेह. ह्या चारांचे एकमेकांशी घनिष्ठ संबंध असतात. त्याचे व्यवस्थापन करणे ह्यालाच धर्म साधना असें म्हणतात. आणखीन काय तुला माहिती माझ्याकडून पाहिजे ते बोल.

*आधुनिक विज्ञानातील रुपक देऊन शरीर, जीव, लिंगदेह आणि आत्मा ह्यांचे संबंध सांगावयाचे तर असें सांगता येईल, शरीर हे हार्डवेअर आहे, जीव त्याचा ड्रायवर सॉफ्टवेअर आहे, आत्मा त्याला पुरवली जाणारी उर्जा देणारी बॅटरी आहे व लिंगदेह त्यातील वायरस आहे जो ह्या तिघांना सतावत असतो.*

**- प्रकरण नववे समाप्त -**

# व्याध गीता
## प्रकरण दहावे

मार्कंडेय सांगत असतात, मोक्षाबद्दलचे निवेदन कौशिक ब्राह्मणांस पूर्ण सांगितल्यावर ते ऐकून तो ब्राह्मण अतिशय प्रसन्न झाला व व्याधाला बोलला, "आपण मला जे निवेदन केले ते अगदी स्पष्ट असें होते. त्याबद्दल मला आता कांही शंका उरलेली नाही. ह्यावरून मला समजले कीं आपले ज्ञान ह्या विषयाबद्दलचे पूर्ण आहे". ते ऐकून व्याध त्याला बोलतो, "माझ्या ज्ञानाची प्रचीती तुम्हाला येत असेलच. ज्यामुळें मी आज ह्या निर्वाण अवस्थेत पोहोचलो आहे. आपण कृपया उठावे व आत माझ्या माता पित्यांना भेटावे"?. अशी विनंती तो व्याध ब्राह्मणाला करतो. त्याप्रमाणे, कौशिक उठतो व त्याच्या बरोबर त्याच्या घरात निघतो. व्याध बोलतो, "आपण आला अहात तेव्हां, माझ्या माता पित्यांना भेटावे असें मला वाटते". त्या प्रमाणे तो ब्राह्मण व्याधाबरोबर आत जातो व त्या वृद्ध मातापित्यांना भेटतो. त्या व्याधाचे घर आतूनसुद्धा फार चांगले ठेवलेले होते. मार्कंडेय ऋषी युधिष्ठीराला सांगत असतात, त्या घरात चार मोठ्या खोल्या होत्या. प्रत्येक खोली चांगल्या प्रकारे सजवलेली होती. ते एका ब्रह्मज्ञानी विरक्ताचे घर आहे असे जर कोणाला सांगितले तर ते चटकन पटले नसते. ते पाहून कौशिक ब्राह्मणाला त्याच्या स्वताच्या अव्यवस्थित घराची आठवण येते. घरात सुगंध जाणवत होता त्या फुलांचा जी पुजेत देवघरात वाहिलेली होती. त्याचे पवित्र जीवन जगणारे माता पिता पांढर्या शूभ्र वस्त्रात नुकतेच त्यांचे जेवण उरकून बसलेले होते. व्याध त्यांना पाहून त्याना साष्टांग नमस्कार घालतो. त्यावर ते वृद्ध पिता त्याला उठण्याची आज्ञा देतात. त्याला आशिर्वाद देतात, "तुझा चांगुलपण तुझे असेंच संरक्षण करो. तुझे पवित्र जीवन पाहून आम्हाला फार आनंद होत असतो. तुला दीर्घ आयुष्य लाभो. तुझ्या ज्ञानात, समृद्धीत भरभराटी येवो. तू आमचा एक कृतज्ञ पुत्र आहेस. कारण तू आमच्या दोघांची सतत फार काळजी घेत असतोस. स्वर्गीय देवतांच्या बरोबरीची तुझी योग्यता झाली आहे कारण तू तुझ्या जबाबदार्या सांभाळत सत्याचा शोध घेत आहेस. तुझे स्थान एकाद्या ऋषीसारखे झाले आहे. तपस्या, संयमन, व्रतस्थता, मर्यादा, सत्त्वशिलता (चांगुलपणा), भोगांबद्दलची उदासिनता आणि आमच्या बद्दलची

(तुझ्यावर विसंबून असणार्यां बद्दलची) कर्तव्यदक्षता अशा अनेक सवयींमुळें तू ब्रह्माला सुद्धा प्रिय झाला आहेस. आम्हाला आनंदात ठेवण्यासाठी तू काय करत असतोस त्याचे आम्ही काय वर्णन करणार? तो जमदाग्नीचा मुलगा त्याचे पिता माता सदैव सुखात असावे म्हणून कसा झटत होता, तसा तू आज वागत आहेस आम्हाला सुखात ठेवण्याकरतां".

त्या नंतर तो त्याची व कौशिक ब्राह्मणाची ओळख करून देतो. ते वृद्ध आई बाप त्याचे स्वागत करतात. कौशिक त्यांचे स्वागत स्वीकारतो. तो रिवाजा प्रमाणे त्यांचे ख्याली खुशाली विचारतो. त्यांच्या स्वास्थ्याची चौकशी करतो, रिवाजानुसार. ते वृद्ध दांपत्य सांगते, आम्ही आमच्या नोकरासह खूप खुशाल आहोत. नंतर ते ब्राह्मणाला विचारतात, त्याला मिथिलाकडे येण्यात कांहीं त्रास झाला कां? अशाप्रकारे त्यांच्या औपचारीक गप्पा झाल्या. त्या संपल्यावर तो नम्र व्याध ब्राह्मणाला सांगतो कीं, अहो विद्वान मुनी हे माझे देव आहेत असे बोलून तो त्याच्या पितरांकडे त्याचे बोट करतो. मी माझ्या माबापाचेच पुजन करतो, त्यातून मला ब्रह्माचे दर्शन झाले. माझ्याकडे इतर कोणी देव नाहीत. जसें तुम्ही ब्राह्मण त्या तेहतीस प्रकारच्या देवांची आराधना करता तशी मी ह्या माझ्या जन्मदात्या आईबाबांची आराधना करतो. त्यातून मला दृष्टांत झाले व मला ज्ञान प्राप्त झाले आहे. अशा प्रकारे सगळ्याच घरात ही जीवंत दैवत असतात पण आपण त्यांच्याकडे दुर्लक्ष करतो व कधीही न पाहिलेल्या देवांच्या पाठी जातो जे कधींच मिळत नाहीत. मी त्यांची सेवा करतो म्हणजे त्यांच्या माध्यमातून ब्रह्माची सेवा करत असतो. वृद्धत्वामुळें ते कधी माझ्यावर रागावतात पण मी त्यांच्यावर रागावत नाही. त्यांची सेवा ब्रह्माची सेवा समजून एकचित्ताने करत असतो. अडलेला नडलेला अशांमध्ये देव पहाणे हांच खरा आपला धर्म आहे, जेव्हां ते समजते तेव्हांच मोक्षाचा, सत्याचा खरा मार्ग साधकाला मिळत असतो. जेव्हां असें कोणी नसतात तेव्हां देवाची पुजा करावी. माझ्यासाठी हेंच ते पवित्र अग्नी आहेत ज्यांचा उल्लेख वारंवार वेदात होत असतो. आमच्या घरातील सगळे, माझी पत्नी, मुलं इत्यादी ह्याच प्रकारे ब्रह्माची आराधना करत असतात. त्यांना सतत संतुष्ट ठेवण्यासाठी मी व माझे कुटूंब प्रयत्न करत असतो. त्यांनासुद्धा त्याची जाणीव आहे हे तुम्ही आता पाहिले असेलच. त्यांना आनंदात ठेवण्यासाठी मी कधी खोटेसुद्धा बोलतो. खरे आणि खोटे ह्याला कांहीं महत्व नसते कारण ते सगळे असत्यात (मोह मायेत) असते.

म्हणून सत्याच्या दृष्टीने ते दोनही असत्यच असतात त्यामुळें पाप लागत नाही. त्यांच्या आनंदात सत्य मी पहातो. जे माझ्या पितरांबद्दल आहे ते सगळ्या पितरांबद्दल तितकेंच लागू असते. पवित्र अग्नी चेतवत ठेवणे, माता पिता व इतर जे माझ्यावर अवलंबून आहेत ते सगळे माझ्यासाठी देव आहेत त्यांची देखभाल करणे हे मी माझे कर्तव्य समजतो, तो माझ्या साधनेचाच एक भाग असतो. थोडक्यात मी माझा गृहस्थाश्रम प्रामाणिकपणे सांभाळत असतो. जो इसम त्याचा गृहस्थाश्रम प्रामाणिकपणे पार पाडतो तो स्वर्गात जात असतो, त्याच्यासाठी सर्वसंग परित्याग करणार्यापेक्षा जास्त मोठे स्थान असते कारण अरे ब्राह्मणा, गृहस्थाश्रम सर्व आश्रमात श्रेष्ठ असतो, असें साक्षात ब्रह्मानेच सांगितले आहे. माझ्या कुटूंबियांच्या सात्त्विक अपेक्षा पूर्ण करण्यात मला धन्यता वाटते. त्यांची सात्त्विक खुषी माझ्यासाठी देवांच्या खूषी सारखी आहे. घरात सात्त्विक वातावरण राखणे हे सुद्धा पुण्य मिळवण्या सारखे असते. तो आनंद मी माझ्या घरात जपत असतो. आमच्या घरात लहान मोठे असें कोणी कोणाचा अपमान करत नाहीत, कोणी आवाज चढवून बोलत नाही. कोणी कोणाला दुःख होईल असे वागत किंवा बोलत नाही. जो तो एकमेकांला त्यांच्या त्यांच्या कामात मदत करत असतो. सगळ्यांचा उत्कर्ष कसा होईल ते सगळ्यांनी पहावयाचे असते असा नियम आमच्या घरात आहे. क्रोध, गर्व आणि द्वेष आमच्या घरात तुम्हाला मिळणार नाहीत कारण ते सत्याचे वैरी असतात. अहो ब्राह्मणा, माझ्या घरातील सगळे माझ्या नियमांचे पालन स्वखुषीने करत असतात त्यामुळें ह्या घरात साक्षात कृतयुगाचा अनुभव आपल्याला येईल. अहो ब्राह्मण, माणसाने करावयाचे ठरवले तर तो सगळे करू शकतो. अरे ब्राह्मणा, मी तीर्थक्षेत्री जात नाही कारण गृहस्थासाठी त्याचे घर हेंच एक तीर्थक्षेत्र ब्रह्माने योजलेले आहे. जो त्याच्या सत्कर्माने त्याच्या घराचे तीर्थक्षेत्र करतो त्याला इतरत्र भटकत बसावे लागत नाही. सगळे देव त्याच्या घरात असतांना तो केवळ अज्ञानामुळें त्यांना शोधत तीर्थक्षेत्री भटकत असतो. तुझे देव तुझ्या घरात आहेत हे जो समजतो तो गृहस्थ ब्रह्माला प्रिय होतो.

**- प्रकरण दहावे समाप्त -**

# व्याध गीता

## प्रकरण अकरावे

मार्कंडेय पुढे युधिष्ठीराला सांगतात, ते पाहुणचाराचे झाल्यावर पुन्हा तो व्याध ब्राह्मणाला सांगू लागतो, "आपण माझ्या ह्या जीवन शैलीचा गांभिर्याने विचार करावा. माझ्या ह्या गृहस्थाश्रमी तपस्या पद्धतीमुळें मी किमान चुका करत माझी साधना पूर्ण करू शकलो आहे. ज्याप्रकारे गृहस्थाश्रम माणसाला अध्यात्मिक उच्चता मिळवण्यात सहाय्यक ठरतो तसा इतर कोणताही आश्रम मदत करू शकत नाही. ज्ञान मिळवण्यासाठी घरदार सोडून भटकण्याची अजिबात गरज नसते. माझ्या वरून हे तुम्हाला समजले असेलच. तुम्हाला त्या पतिव्रतेने माझ्याकडे पाठवले कारण तुम्हाला हे समजावे असा तिचा उद्देश होता कारण तू तिच्याशी व्यर्थ युक्तीवाद करत होतास. तुला गृहस्थांचा खरा धर्म काय ते समजावे असा त्यामागे तिचा उद्देश होता. तू स्वताला ब्राह्मण म्हणून सांगत होतास परंतु, तू ब्राह्मण राहिला नव्हतास. हे तुला सांगण्यासाठी तिने तुला माझ्याकडे धाडले". ते ऐकून कौशिक ब्राह्मण त्याला बोलतो, "मला आता समजले त्या पतिव्रतेने मला तुमच्याकडे कां पाठवले. कारण जर ती सांगू लागली असती तर मी माझ्या अहंकारामुळें तिच्याकडून कांहीं शिकू शकलो नसतो. तसेच ती गृहीणी माझ्याशी बोलण्यास सुद्धा राजी नव्हती. तरी आपल्याकडे मला पाठवून माझ्यावर तिने मोठे उपकार केले आहेत". व्याध बोलतो, "तिने जसे अपेक्षा केले होते तसे मी तुला सांगितले आहे. मी तुम्हाला जे सत्याला धरून आहे तेंच सांगत आहे. आता थोडे आणखीन सांगतो जे तुझ्या भल्यासाठी आहे. ते नीट ऐक, तू एक खूप चांगला ब्राह्मण आहेस, तुझे ज्ञानसुद्धा उत्तम आहे, परंतु, चुकीच्या निर्णयामुळें तू तुझ्या मातापितरांवर अन्याय करत आहेस किंबहुना, ते त्या पतिव्रता स्त्रीला उमगले व म्हणून तिने तुला माझ्याकडे खरा धर्म शिकण्यासाठी पाठवले होते. वेद शिकण्यासाठी तू त्यांना न सांगता घर सोडून निघून गेलास. हे तुझे वागणे अनुचित होते. तुझे तपस्वी माता पिता आज अंध झाले आहेत, त्यांना तुझ्या मदतीची आवश्यकता आहे. ते अतीव दुःखात जगत आहेत. तू जरी तपस्या केली असलीस तरी त्यामुळें तू कोठेच नाहीस कारण, जो आपल्या जबाबदार्या सोडून जातो त्याला ब्रह्मदेव क्षमा करत नाही. म्हणून तू आता तुझ्या

घरी जा व तुझ्या निजी जबाबदार्या समजून पुढील काम करावेस, त्यातच तुला खरी गती मिळेल. तू आताच तुझ्या स्वगृही जा". ब्राह्मण त्याला उत्तर देतो, "आपण जे सांगता ते खरे आहे". त्यानंतर तो ब्राह्मण त्याला आशिर्वाद देतो कीं, "त्याचे भले हो".

त्यानंतर पुन्हा तो व्याध त्याला सांगतो, "तू त्वरित जाऊन तुझ्या गृहस्थी जबाबदार्या सांभाळण्यास तयार हो. तुला तुझ्या साधनेत यश येईल कारण तुझा अहंकार आता निमाला आहे. प्रथम गेल्यावर त्यांची क्षमा माग त्यात कमीपणा समजू नकोस. तू त्यांचा अपराधी आहेस ह्याची जाणीव ठेवून त्यांच्याशी वर्तन ठेव. गृहस्थाश्रम हा मोठा गुणी मार्ग आहे. त्या सारखा सोपा मार्ग मोक्षासाठी दुसरा नाही". ब्राह्मण त्याला बोलतो, "माझे मोठे भाग्य म्हणून मला तुम्ही दोघे भेटलात. तुम्ही दोघे माझे खरे गुरू अहात. आपण मला धर्माचा खरा अर्थ इतक्या साध्या सोप्या पद्धतीने समजावला किं, त्याला तोड नाही. आपले ज्ञान पूर्ण असल्यामुळेंच तुम्ही अशारितीने ते मला सांगू शकलात. आपली मैत्री मला प्राप्त झाली तेसुद्धा माझे मोठे भाग्य आहे. मी अहंकाराने केवळ नष्ट होणार होतो व त्यावेळी ती पतिव्रता माऊली आणि त्यानंतर तुम्ही मला भेटला हे ब्राह्मानेच घडवून आणले असावे असे मला वाटते. हे सगळे अवचितपणे घडले, मला त्या बाईने सांगितले व मीसुद्धा ते मनावर घेऊन इतके लांब मिथिलेला आलो. सगळेच माझ्या भल्यासाठीच होत होते जसें ययातिच्या पणतूने (मुलीचा मुलगा) त्याला वाचवले होते. तसेंच कांहींसे हे झाले आहे". पुढे कौशिक त्या ज्ञानी व्याधाला सांगतो, "त्यातूनच आपण सांगितल्या प्रमाणे, तपस्या, संयमन, व्रतस्थता, मर्यादा, सत्त्वशिलता (चांगुलपणा), भोगांबद्दलची उदासिनता आणि मातापित्याबद्दलची (माझ्यावर विसंबून असणार्यां बद्दलची) कर्तव्यदक्षता हे **गृहस्थी व्रत** प्रामाणिकपणे आचरण्यास मी सुरूवात करतो. त्यातूनच माझा खरा उद्धार होईल. अहो ज्ञानी आपण वैश्य अथवा शुद्र असूच शकत नाही कारण जे ज्ञान आपण मला दिले ते एकाद्या सामान्य शुद्राला केवळ अशक्य आहे. अहो ज्ञानी, आपण जाणता कर्मविपाकाचा नियम सगळ्यांना सारखाच लागू होत असतो, मला असें म्हणावयाचे आहे कीं, आपण एवढे ज्ञानी असण्या मागे ह्या जन्माप्रमाणे आपल्या मागील जन्माचासुद्धा कांहीं संबंध असलाच पाहिजे. आपण सर्वज्ञ अहात तेव्हां ते काय ते मला सांगाल तर माझी उत्कंठा पूर्ण होईल. कृपा करून ते मला आपल्या पद्धतीने व मर्जीने सांगावे".

व्याध सांगतो, "अरे चांगल्या ब्राह्मणा, मी सगळ्या ब्राह्मणांचा आदर करतो. मी आता तुला माझ्या आधीच्या जन्माची कथा सांगतो. मी गेल्या जन्मी तुझ्या सारखाच ब्राह्मण होतो. माझा वेदाचा अभ्यास चांगला झाला होता. मी त्या जमान्यात एक उत्तम वेदांग जाणकार होतो. परंतु, माझ्या एका चुकीमुळें मला ह्या जन्मी हा हलक्या कुळातील जन्म प्राप्त झाला आहे. त्या काळी एक राजा जो धनुर्वेद चांगला जाणत होता, माझा मित्र होता. त्याच्या संगतीने मीसुद्धा चांगला तिरंदाज झालो होतो. एके दिवशी माझा मित्र व त्याचे कारभारी असे सगळे मृगया करण्यासाठी निघाले होते त्यांत मीसुद्धा होतो. त्या लोकांनी एका ऋषीच्या आश्रमा जवळच बरीच हरणं मारली. मीसुद्धा त्या शिकार्यात होतो. मी फेकलेल्या बाणांने मात्र एक ऋषी जो तेथून जात होता त्याला इजा होते. तो जोरांने ओरडून सांगत असतो किं, त्याने कधीही कोणालाही इजा केलेली नाही, मला बाण मारणारा हा कोण पापी माणूस असें बोलू लागतो. मला समजले नाही कारण तेथे घनदाट झाडीमुळें अंधार होता. मी त्या अंधारात त्याच्या हालचालीच्या आवाजाला हरणाची हालचाल समजून बाण मारला होता. मला वाटले मी हरणाला मारले आहे परंतु, जवळ गेल्यावर मला समजले कीं, ते माणूस आहे. तो ओरडत होता. मला शाप देत होता. मी मात्र निष्पाप मनाने त्याच्या जवळ जाऊन कबुली दिली कीं, मी तो बाण मारला होता पण तो चुकून त्याला लागला होता, मी त्याची क्षमा मागितली पण व्यर्थ, तो महाज्ञानी ऋषी मला शाप देतो कीं, मी पुढच्या जन्मी व्याध होऊन जनावरांचे मांस विकत बसेन.

**- प्रकरण अकरावे समाप्त -**

# व्याध गीता
## प्रकरण बारावे

व्याध सांगत होता, "अशारितीने त्या ऋषीचा शाप मला मिळाला, मी त्याला पुनः पुन्हा विनती करत होतो कीं, मी त्यांची क्षमा मागत आहे तरी त्याचा क्रोध कमी होत नव्हता. अखेरीस खर्या ब्राह्मणाप्रमाणे त्याला माझी दया आली, त्याला उमगले कीं, जे घडले ते अपघाताने झाले व अपघाताने घडलेले पाप क्षम्य असते तेव्हां, त्यांनी मला सांगितले कीं, त्याने दिलेला शाप उलटवणे शक्य नाही परंतु, तो उःशाप देतो कीं, त्या जन्मात जेव्हां मी एक मांस विकणारा व्याध होईन तेव्हां माझे त्या जन्मातील ज्ञान व पावित्र्य माझ्या जवळ शाबूत राहिल व मी माझी ज्ञानसाधना पुढे चालवू शकेन. त्या जन्मात मी माझ्या मातापित्यांची काळजी घेईन जशी एक ब्राह्मण त्याच्या मातापितरांची घेतो. त्याशिवाय मी माझा तो जन्म आठवू शकेन, आणि पुढे स्वर्गात जाईन असा मला त्याने आशिर्वाद दिला कारण त्याला माझ्यावर रागावण्याचा पश्चात्ताप झाला होता. त्याशिवाय ह्या शापाची मर्यादा संपली कां मी पुन्हा ब्राह्मण होईन. अशारितीने त्या महान ऋषीने दिलेल्या शापामुळे मी असा झालो आहे. ते माझे प्राक्तन आहे ते मला भोगावयाचेच आहे. त्यानंतर मी त्याच्या अंगात घुसलेला माझा बाण खेचून काढला व त्याला उचलून आश्रमात नेले. तेथे तो ऋषी त्या जखमेतून बरा झाला. अहो ब्राह्मणा, अशारितीने मी व्याध झालो, तुझा अंदाज चुकीचा नव्हता".

कौशिक ब्राह्मण त्याला बोलतो, "अहो ज्ञानी, प्रत्येक माणसाच्या भाग्यात जे सुख व दुःख लिहीले आहे ते त्याला भोगावेच लागते. म्हणून त्यावर काळजी करणे, त्रागा करणे हे व्यर्थ आहे. तू हा व्यवसाय करत आहेस तो करणारे सगळेच तुझ्याप्रमाणे शुद्ध बुद्धीने ती कामं करत नाहीत. म्हणून तुला जरी ते बाधत नसले तरी हा व्यवसाय बहुधा बाधकच आहे. तू ते काम त्या प्राण्यांबद्दलच्या सहानुभूतीने करत असलास तर ते काम तुला बाधत नाही. शुद्ध व निर्विकल्प बुद्धीने ते करत आहेस त्याचे कारण तू मुळात ब्राह्मण (ब्राह्मण हे सात्त्विक प्रवृत्तीचे द्योतक मानले आहे.) आहेस आणि नेहमी ब्राह्मणच रहाणार आहेस. तमोगुणी माणूस प्रायः शुद्र असतो, भले तो ब्राह्मण अथवा इतर द्विजांत जन्मला असेल.

सात्त्विक माणूस ब्राह्मण असतो त्याच्या गुणकर्माने, भले त्याचा जन्म शुद्रात झाला असेल. तसेंच रजोगुणी बहुधा क्षत्रिय अथवा वैश्य असतो जरी त्याचा जन्म ब्राह्मणात किंवा शुद्रात झाला असेल. तरीसुद्धा कोणताही इसम पूर्णतया सात्त्विक, रजोगुणी किंवा तमोगुणी नसतो. त्याची अध्यात्मिकता सुद्धा त्याच्या सगळ्या आयुष्यात सतत दोलायमान असते व त्या प्रमाणे त्याचे गुणसुद्धा बदलत असतात. ते स्थीर करण्यासाठी त्याला व्रतस्थता पाळावी लागते आणि ती त्याच्यात स्वभावतः असावी लागते. ती व्रतस्थता कोणी बळजबरीने आचरणात आणू शकत नाही. त्यासाठी पूर्व जन्माचे भाग्य असावे लागते. कारण सगळे जन्म एकाद्या श्रृंखले सारखे एकमेकांत अडकलेले असतात. अहो ज्ञानी, तुम्ही गुणकर्माने आतासुद्धा ब्राह्मण अहात. तुमची सगळी शेष पाप संपली आहेत असें मी समजतो".

व्याध बोलतो, "शरीराच्या आजारांना औषध द्यावयाचे असते. मनाच्या तक्रारींसाठी अध्यात्मिक शहाणपण वापरावे लागते. त्यालाच ज्ञानाची ताकद समजले जाते. अज्ञानी माणसें लहान मुलांप्रमाणे मना विरुद्ध कांहीं झाले तर दुःखी, कष्टी होतात व मनाप्रमाणे झाले कां एकदम खूष होतात. ज्ञानी माणसांवर अशा गोष्टींचा प्रभाव पडत नाही. त्यांची मति स्थीर असते. सगळ्याच जीवांना हे सुख दुःखाचे अनुभव घ्यावे लागतात. त्याची जाणीव असलेले त्याच्या बाबत जास्त चिंता करत नाहीत. ते आपली कर्तव्ये शांतचित्ताने करत रहातात. मनाप्रमाणे न झाल्यास अपेक्षा भंगाचे दुःख, असमाधान अथवा क्रोध त्याला अनुभवास येतात. अपेक्षे प्रमाणे झाले तर सुख व आणखीन अपेक्षा, असें ते भोगांचे चक्र सुरू होत असते. ते सुरू होणार नाही अशी मानसिकता असावी. असमाधानातून पुनः नवीन इच्छा सुरू होत असते. समाधानाचे सुख विलक्षण असते. शहाणे लोक त्यासाठी फार जास्त मोठ्या अपेक्षा वाढवत नाहीत व सावधपणे रहातात. औदासिन्य त्यात त्याला चांगली मदत करतात. तमोगुणी लोकांमध्ये, असमाधान एकाद्या ज्वालामुखी सारखे होते. त्याच्या उद्रेकामुळें कित्येक पापांची श्रृंखला सुरू होऊ शकते. विवेकाचा नाश होतो. त्यातून भय, चिंता, सुडबुद्धी, द्वेष, नैराश्य अशा भयंकर विकारांचे थैमान सुरू होत असते. त्यांतून उत्पन्न होणारे पाप कर्म त्या माणसाला बेभान करत असते. त्या प्रमाणे त्याच्या नंतरच्या हालचाली सुरू होतात त्या तो थांबवू शकत नाही. तमोगुणी औदासिन्य त्या

माणसाला आळशी, कार्यहीन, व्यर्थ बनवते. म्हणून औदासिन्य सात्त्विक असावे लागते. अशा परिस्थितीत जेव्हां विवेक संपलेला असतो त्याच्यात भावनिकता वाढू लागते. सगळ्या गोष्टी तो भावनाने पाहू लागतो. भावनेने तो निर्णय घेऊ लागतो जे प्रायः चुकीचे असतात. ज्याला ह्या वास्तविक जगाच्या मर्यादांचे भान आले आहे तो उगाचच जास्त अपेक्षा ठेवत नाही. तो कांहीं न अपेक्षा करता तसांच समाधानी असतो. कारण त्याला कांहींच अपेक्षाच नसतात. अशा माणसाला कांहीं मिळो अगर न मिळो तो शांत असतो".

ब्राह्मण व्याधाला सांगतो, "अहो ज्ञानी व्याधा, मी त्या शहाण्या माणसाच्या मनस्थितीत पोहोचलो आहे. मी आता गोंधळलेल्या मनस्थितीत नाही व पुढे कधी जाणार नाही. अपेक्षांच्या मर्यादांचे चांगले भान मला प्राप्त झाले आहे. माझ्या मनात कोणताही संशय उरलेला नाही. आपण ज्ञानी अहात आपले ज्ञान पूर्ण आहे, त्याकरतां, आपल्यात काहीं उणे पहाता येत नाही. अहो ज्ञानी आपण असेंच समृद्धीकडे जाणार अहात. आपले संरक्षण आपला चांगुलपणा (सत्त्वशिलता) करणार आहे. चोखंदळपणे आपण पुण्याच्या मार्गाने जाणार अहात".

मार्कंडेय त्यानंतर युधिष्ठीराला सांगतात कीं, ते ऐकल्यानंतर व्याध त्याला आशिर्वाद देतो. तो ब्राह्मण कौशिक नांवाचा, व्याधाला दोन प्रदक्षिणा घालतो जसें शिष्य गुरूला घालतात. त्यानंतर तो त्याचा निरोप घेऊन त्याच्या घरातून निघून जातो आपल्या घरी.

तो घरी जातो व पहातो कीं, त्याचे मातापिता अंध अवस्थेत मोठ्या हालाखीच्या परिस्थितीत रहात आहेत. तो त्यांची प्रथम क्षमा मागतो, ते त्याला क्षमा करतात. त्यानंतर तो ब्राह्मण आपल्या गृहस्थी कर्तव्यात प्रामाणिकपणे गुंतून जातो व त्याबरोबर व्याधाने सांगितल्या प्रमाणे तपस्या, संयमन, व्रतस्थता, मर्यादा, सत्त्वशिलता (चांगुलपणा), भोगांबद्दलची उदासिनता आणि मातापित्याबद्दलची (त्याच्यावर विसंबून असणार्यां बद्दलची) कर्तव्यदक्षता हे **गृहस्थी व्रत** प्रामाणिकपणे आचरण्यास सुरूवात करतो.

मार्कंडेय युधिष्ठीराला बोलतात, "अरे युधिष्ठीरा, मी तुला नैतिकतेच्या गोष्टी सांगितल्या आहेत सोदाहरण, त्यांतून तुला कांहीं बोध झाला असेल असें मी समजतो. त्यात बाईचे पतीबद्दलचे व कुटूंबाबद्दलचे कर्तव्य व पुत्राचे जन्मदात्यांबद्दलचे कर्तव्य काय असते ते

तुला सांगितले. त्याशिवाय पाप व पुण्यांचे अन्योन्य संबंध सुद्धा पाहिले, गृहस्थी व्रत काय असते ते सुद्धा पाहिले आहे".

युधिष्ठीर मार्कंडेय ऋषींना बोलतो, "अहो महापुण्यवंत ब्राह्मणा, जे सर्वात श्रेष्ठ मुनी अहात, आपण मला ते सगळे सविस्तरपणे सांगून माझ्या मनातील सर्व संशय दूर केले आहेत. ते ऐकून माझे ज्ञान वाढले आहे. तरीसुद्धा, आपल्या मधूर वाणीतून आणखीन पुष्कळ कांही ज्ञानामृताचे बोल ऐकण्याची माझी इच्छा आहे.

**- प्रकरण बारावे समाप्त -**

## - व्याध गीता समाप्त -

## - परिशिष्ठ   एक -

तपस्या, संयमन, व्रतस्थता, मर्यादा, सत्त्वशिलता (चांगुलपणा), भोगांबद्दलची उदासिनता आणि मातापित्याबद्दलची (त्याच्यावर विसंबून असणार्यां बद्दलची) कर्तव्यदक्षता हे **गृहस्थी व्रत** ह्यातील संज्ञांचे अर्थ येथे विशद केले आहेत. सर्वात प्रथम माणसांने सात्त्विक गुणात जाणे महत्वाचे असते, एरवी रजो व तमो गुणी माणूस ह्या गृहस्थी व्रताचे पालन विनाचूक करू शकत नाही.

- **तपस्या** – ह्यात ध्यान साधना प्रामुख्याने येते. त्यात विपाशना, सोहम् साधना, त्राटक करणे असें प्रकार असतात. ह्यात मुख्य उद्देश असतो विचार करणे पूर्णतया थांबवणे. सोहम् साधनेत साधक त्याच्या श्वासावर त्याचे लक्ष केंद्रीत करत असतो. जेव्हां आपण कशावरही आपले लक्ष केंद्रीत करतो तेव्हां आपण विचार करू शकत नाही. ह्या नैसर्गिक गुणाचा येथे उपयोग केला जातो. त्यात उपोषण येते परंतु, ते खाण्या बाबतचे नसते, त्यात विचारांचे उपोषण असते. वाईट विचार, बिनकामाचे विचार अशा विचारांचा त्याग करावयाचा असतो. फक्त योगक्षेमाचे विचार करावयाची परवानगी असते. योगक्षेमाचे विचार म्हणजे, शरीराच्या संवर्धनाचे विचार करणे. पोटापाण्याच्या संबंधित कामधंद्याचे विचार विचार करणे असें येतात. विपाशना अथवा सोहम् साधना रात्री झोपतांना करणे श्रेयस्कर समजले जाते. त्यात निद्रा आली तर ते उत्तम असते. त्राटक हा योगाचा प्रकार असून तो जर योग्य गुरू मिळाला तरच करावा, स्वतःहून करू नये.
- **संयमन** – ह्यात प्रामुख्याने भोग इंद्रियांचे नियमन आणि व्यवस्थापन येते. लैंगिक जीवनात पुरूषासाठी असे नियम आहेत कीं, जर पत्नीने इच्छा व्यक्त केली तरच संभोग अथवा तत्सम गोष्टी करावयाच्या, स्वतः अशा विचारांबाबत औदासिन्य आचरावयाचे असते. त्यात ब्रह्मचर्य येते. कोणत्याही स्त्रीबद्दल वासना उत्पन्न होणार नाही असें मन ठेवावयाचे असते. स्त्रियांबद्दल अत्यंत आदराची भावना बाळगल्याने जे ब्रह्मचर्य संपादन होते त्याला शुक्ल ब्रह्मचर्य म्हणतात. ते अध्यात्मिक साधनेसाठी उत्तम समजले जाते. स्त्रियांबद्दल तुच्छतेची, तिरस्काराची भावना

असेल तर त्यातून जे ब्राह्मचर्य संपादन होते ते कृष्ण ब्रह्मचर्य म्हणजे अयोग्य ब्रह्मचर्य समजले जाते. पत्नी बरोबरच्या संभोगा व्यतिरीक्त इतर प्रकारचे लैगिक चाळे पूर्णतया निषिद्ध असतात.

- **व्रतस्थता** – ह्यामध्ये मिताहार, मितनिद्रा, मितभोग, मित भाषा असें आपल्या भोग इंद्रियांचे व्यवस्थापन येते. मित म्हणजे जेवढ्यास तेवढेंच करणे. ते शरीराच्या संवर्धनासाठी आवश्यक असतात तेच करावयाचे. त्यापेक्षा जास्त करण्याची इच्छा झाली तर ते अयोग्य म्हणून करावयाचे नाही. मित्रपरिवार आपल्या विचारांचा आदर करणारा असावा. जे व्रतस्थतेची टिंगल टवाळी करतात अशा लोकांशी मैत्री न ठेवणे महत्वाचे असते.
- **मर्यादा** – ह्यात आपल्या भोगांच्या मर्यादांचा विचार असतो. कमाल व किमान मर्यादा येतात. फक्त शरीराच्या नित्य गरजांपुरते भोग घेणे त्या शरीराच्या संवर्धनासाठी त्यापेक्षा न जास्त न कमी असें ते राखावयाचे असतात ह्याचे भान राखावयाचे असतात. आपल्या सगळ्याच कामातील मर्यादांचे भान राखणे आवश्यक समजले आहे. व्रतस्थता मर्यादा तत्त्वात येते. ह्यासाठी विवेकाचा उपयोग करावा.
- **सत्त्वशिलता** – चांगुलपणा, ह्यात माणूसकी व भूतदया येतात. एक धोरण मनात ठेवून आपली सगळी कामं करावयाची असतात, ते असें, **ज्या वागण्याने मला त्रास होतो त्या वागण्याने दुसर्याला सुद्धा तितकाच त्रास होऊ शकतो व म्हणून तसे वागावयाचे नाही.** समाजात आनंद, सुख वाढवणे हींच परमेश्वराची खरी पुजा असें मानणे. त्याप्रमाणे आपले वागणे, आपले विचार असले पाहिजेत. त्याच प्रमाणे अपात्र माणसास मदत न करणे ज्यामुळे समाजात कलीच्या कारवाया वाढू शकतात. आवाज न चढवून बोलणे, लहान मुलांवर न ओरडणे, मन शांत ठेवून सगळ्या गोष्टी करणे, सत्पात्र मदत, सत्पात्र दान वगैरे करणे, चांगुलपणाचा गैर फायदा घेणारे भेटतात तेव्हां त्यांना उत्तेजन न देणे. स्वतःची तुलना कोणत्याही कारणांने इतरांशी न करणे हे सत्त्वशिलतेत येते कारण, त्यामुळें मद व मत्सर हे दोन दोष आपल्यामध्यें उत्पन्न होत नाहीत मात्र स्वताची तुलना स्वताच्या

आधीच्या कृत्यांशी करावी व आपल्यात कांहीं सुधारणा होत आहे कीं, नाही ते पहाणे आवश्यक समजले आहे.

- **औदासिन्य** – भोगांबद्दलचे हे धोरण आहे. भोग विषयक विचार मनात आला किं, त्याच्या बद्दल विशेष लक्ष न घालणे, भोगांच्या मर्यादा लक्षात घेऊन त्यांना जास्त उत्तेजन न देणे, औदासिन्य सात्त्विक असले पाहिजे, त्यात द्वेष, तिरस्कार अशा विकृत प्रतिक्रीया नसाव्यात. शरीराचे कांहीं आवश्यक भोग असतात त्यांना सोडून इतर जास्तचे भोग विचार आल्यास त्यांना उत्तेजन द्यावयाचे नसते.
- **कर्तव्यदक्षता** – आपल्या कुटूंबाबद्दलच्या, समाजाबद्दलच्या जबाबदार्या सांभाळण्याचे धोरण आहे.

**परिशिष्ठ दोन –**

समर्थ रामदासांनी त्यांच्या दासबोधात लक्षण चिकीत्सा दिली आहे. ती गद्य स्वरुपात येथे देत आहे त्याच्या मदतीने प्रामाणिक प्रयत्न करणार्यांना त्यांची अध्यात्मिक अवस्था सुधारण्याच्या कामात मोठी मदत होईल. सामान्यपणे माणूस तमोगुणी असतो तो सत्त्व गुणी होणे हे सर्वात प्रथम आवश्यक असते त्यासाठी समर्थांनी हि लक्षण चिकीत्सा दिली आहे. त्यातून आपले गुण कसे सुधारावयाचे ते साधकाला समजते. व्याध गीतेचा अभ्यास करणार्यांना हे परिशिष्ठ उपयोगाचे आहे म्हणून दिले आहे.

## लक्षण चिकित्सा

शाक्तपंथातील शिकवणी प्रमाणें साधकाला आपल्या विविध लक्षणांचा चांगला अभ्यास करावा लागतो. त्यातील मूर्खलक्षणे व शहाणी लाक्षणे फारच महत्वाची असतात. समाजातील शिष्टाचाराचें नियम ह्या दोन लक्षणावरून ठरतात. म्हणून शिष्टाचाराचे नियम समजण्यासाठी साधकाला ह्या दोन लक्षणांचा चांगला अभ्यास करणे आवश्यक असते. एकदा मूर्ख लक्षणे समजली किं, ती न करणे म्हणजें शहाणी लक्षणें ठरतात. त्यासाठी, ह्या ठिकाणी मूर्ख लक्षणांचा विचार प्रथम केलेला आहे. नंतर शहाणी लक्षणें दिली आहेत. तम, रज आणि सत्व ह्या प्रकरणात आपण पाहिले आहे किं, मूर्खपणातून तमोगुण निर्माण होत असतो. ह्या दोन लक्षणांत काय फरक आहे तो पाहू या. तमोगुणी लक्षणामुळें पाप घडण्याची शक्यता असते. मूर्ख लक्षणामुळें पाप होत नाही. अध्यात्मिक विकासात तमोगुणांमुळें बाधा होत असते तशी मूर्ख लक्षणामुळे होत नाही. असें जरी असले तरी मूर्ख लक्षणे माणसाची इतर प्रगति थांबविण्यास कारणीभूत होत असतात. तसेंच त्यांच्यामुळे सामाजिक जीवन अस्वस्थ होत असते. शिष्टाचाराची निर्मिती सामाजिक जीवन सुखरुप करण्यासाठी झालेली असते त्यासाठी, हि मूर्ख लक्षणे समजणे आवश्यक असते. जो साधक मूर्ख लक्षणे आवर्जून आपल्या जीवनात टाळतो तो समाजात प्रतिष्ठेने जगत असतो. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजें, मूर्ख लक्षणें टाळणे म्हणजेंच शिष्टाचारांचें पालन करणे असा होतो. मूर्ख लक्षणें प्रथम समर्थ रामदासांनी सांगितली.

१) जो भर रस्त्यावर प्रेमाचें चाळे करतो तो मूर्ख.

२) दुसऱ्यानी केलेल्या कामाचे श्रेय स्वताकडे घेणारा मूर्ख.

३) आई वडील ह्यांचा जो विनाकारण अपमान करतो तो मूर्ख.

४) आपले कर्तव्य करतांना आपण कोणावर तरी मेहरबानी करतो आहोत असें जो समजतो तो एक मूर्ख.

५) मैत्रीणीशी जो पत्नी प्रमाणे वागण्याचा प्रयत्न करतो तो एक मूर्ख. परंतु, पत्नीशी मैत्रीणी सारखे वागतो तो मूर्ख नाही.

६) आमंत्रण नसतांना जो जातो तो एक मूर्ख.

७) आपली कुवत न ओळखता जो आव्हाने, जबाबदाऱ्या घेतो तो एक मूर्ख.

८) स्वताची स्तुती स्वताच करतो व ती सुद्धा न विचारतां, तो एक मूर्ख.

९) अति आग्रह, हट्ट करतो तो एक मूर्ख.

१०) विनाकारण इतरांचे वैर करतो तो एक मूर्ख.

११) न विचारतां जो दुसऱ्याला सल्ला देतो तो एक मूर्ख.

१२) परक्या स्थळी जेवतांना खादाडपणा करतो तो एक मूर्ख.

१३) जेथें जी गोष्ट करु नये असें सांगितलें जाते, तेथें ती गोष्ट करणारा तो एक मूर्ख.

१४) अपात्र दान करणारा तो एक मूर्ख.

१५) घरात क्रूरपणे वागणारा, जो बाहेरील जगात मात्र मोठ्या प्रेमानें वागतो तो एक मूर्ख.

१६) आपल्या वरिष्ठांशी जो लोचटपणें सतत लगट करीत रहातो तो एक मूर्ख.

१७) इतरांना लक्षात येईल इतक्या प्रमाणात जो स्तुती करतो तो एक मूर्ख.

१८) आपल्या प्रकृतीची काळजी न घेता सतत कार्यरत रहातो तो एक मूर्ख.

१९) आपल्या वरिष्ठांचें दोष त्यांना, सर्वांच्या पुढे उघड करून सांगतो तो एक मूर्ख.

२०) भावना विवश होऊन जो वहावत जातो तो एक मूर्ख.

२१) जेथें मानांने वागवतात तेथें वारंवार जाणारा तो एक मूर्ख.

२२) जेथें मानानें वागवतात तेथे बिलकूल न जाणारा तो एक मूर्ख.

२२) नोकराशी बरोबरीने जो वागतो तो एक मूर्ख.

२३) एकेकाळचा सेवक, त्याच्या नशीबाने लक्ष्मीवंत झाला, त्याच्याकडे नोकरी धरणारा तो एक मूर्ख.

२४) जेथें जो खर्च करणें आवश्यक आहे तेथें तो खर्च न करणारा तो एक मूर्ख.

२५) शिवीगाळी करूनच जो बोलतो तो एक मूर्ख.

२६) चारचौघांच्या पुढे आपले उणे बोलून स्वताची फजिती करून घेतो तो एक मूर्ख.
२७) घरात आलेल्या पाहुण्याच्या पुढे घरातील माणसांचा जो अपमान करतो तो एक मूर्ख.
२८) आमंत्रितांकडे दुर्लक्ष करतो तो एक मूर्ख.
२९) केले उपकार जो विसरतो तो एक मूर्ख.
३०) जेवतांना तेथेंच बाजूला जो थुकतो तो एक मूर्ख.
३१) कोणतीही गुणवत्ता नसतांना फुकटचा अभिमान करून इतरांना सांगणारा तो एक मूर्ख.
३२) चारचौघांच्या पुढे आपल्या उघड्या देहांचे प्रदर्शन करतो तो एक मूर्ख. ह्याला स्त्रीयांचा अपवाद कांही प्रमाणात मानला आहे कारण, सुडौल स्त्रीला तिचे सौंदर्य दाखविण्याचा हक्क असतो. परंतु, बेढप स्त्रीला हा नियम लागू होतो.
३३) चारचौघांच्या समोर नाक कान डोळे साफ करतो, कुरतडतो तो एक मूर्ख.
३४) रस्त्यावरून चालतांना, जो इतरांना धक्के देत चालतो तो एक मूर्ख.
३५) आजारी माणसाला भेटतांना त्याच्या मृत्युच्या गोष्टी करतो तो एक मूर्ख.
३६) स्वकीयांचा (बायको, मुलं, आई, बाप, मित्र इत्यादि) सतत अपमान करतो व दोष देत रहातो व त्यात धन्यता मानतो अथवा तो आपला हक्क आहे असें समजतो तो एक मूर्ख.
३७) गुन्हेगार, वाईट कर्म करणारे ह्यांच्याशी संगती करण्यात धन्यता मानतो तो एक मूर्ख.
३८) आपल्या कर्माचे फळ आपल्यालाच भोगावें लागते हा निसर्ग नियम न मानता जगणारा तो एक मूर्ख
३९) दुसऱ्यांच्या गोष्टींचा वापर, त्यांना न विचारतां करणारा तो एक मूर्ख.
४०) स्त्रीवर प्रेमाची जबरदस्ती करणारा तो एक मूर्ख.
४१) ह्या जगात बेहिशोबी कांहीही नाही हे न समजणार तो एक मूर्ख.
४२) सद्गुण व दुर्गुण ह्यातील फरक लक्षात न घेता केवळ वरवर दिसणाऱ्या त्यांच्यातील साम्यावरून दुर्गुणाला सद्गुण समजतो व तो अंगिकारतो तो एक मूर्ख. हा मुद्दा समजण्यासाठी कांही विशेष विवेचन करावें लागेल. ते असें,

सद्गुण व दुर्गुण ह्यांच्या कांही जोड्या येथे दिलेल्या आहेत, त्यावरून हा मुद्दा स्पष्ट होईल. ह्यात प्रथम सद्गुण दिला आहे व नंतर दुर्गुण दिला आहे. १) नम्रपणा - ल ाचारी; २) लढवय्येगिरी, शूरत्व -मवालीगीरी, उनाडकी; ३) शहाणा - धूर्त, कावेबाज; ४) स्पष्टवक्तेपणा - उद्धटपणा; ५) सावध - भित्रा; ६) आतितथ्यशिलता - लोचटपणा; ७) सन्मान करण्याची इच्छा - जी जी करण्याची प्रवृत्ति; ८) पुढाकार - आगावूगिरी; ९) सज्जनपणा -बावळटपणा; १०) समाधानीपणा - आळस; ११) काटकसर - कंजुषी;

१२) योग्य खर्च - उधळपट्टी. १३) दिलदार - भावखावू ;

४३) दुसऱ्याच्या घरी जाऊन असें कांही करतो किं, त्यामुळें सर्वांची पंचाईत होते तो एक मूर्ख.

४४) संतापाच्या भरात स्वताचें व इतरांचें नुकसान करतो तो एक मूर्ख.

४५) निरनिराळी व्यसने करण्यात धन्यता मानतो तो एक मूर्ख.

४६) दु:खाचा प्रसंग असतांना तेथें विनोद करणारा तो एक मूर्ख.

४७) आनंदाच्या प्रसंगी दु:खद वार्ता सांगणारा तो एक मूर्ख.

४८) प्रसंग पाहून बोलावें हे ज्याला समजत नाही तो एक मूर्ख.

४९) बोलतांना, लिहीतांना ज्या शब्दांचा अर्थ माहीत नाही ते शब्द वापरतो तो एक मूर्ख.

५०) शत्रू, चोर ह्यांना जो सावध करतो तो एक मूर्ख.

५१) स्वत:च्या मित्रांबद्दल इतरेजनांत शंका व्यक्त करणारा तो एक मूर्ख.

५२) संसारातील दु:खांसाठी परमेश्वराला जो दोष देतो तो एक मूर्ख.

५३) लहान बालकांना जो शिक्षा करतो तो एक मूर्ख.

५४) लहान मुलांच्या, लहान सहान चुकांकडे जो दुर्लक्ष करीत नाही तो एक मूर्ख.

५५) नेहमी रागीटपणांचे सोंग घेऊन वावरतो तो एक मूर्ख.

५६) जो विश्वासघात करी, तो एक मूर्ख.

५७) लहान मुलं व स्त्रियांना मदत, न मागता करावयाची असते, तशी न करणारा तो एक मूर्ख.

५८) अनोळखी स्त्रीची चेष्टा मस्करी गंमत म्हणून करणारा तो एक मूर्ख.

५९) फार चेष्टा मस्करी करणारा तो एक मूर्ख.

६०) मित्राची चेष्टा मस्करी केल्यानंतर त्याची दिलगिरी न मागणारा तो एक मूर्ख.

६१) प्रामाणिक नोकरावर अनोळखी इसमाच्या सांगण्यावरून संशय घेणारा तो एक मूर्ख.

६२) सभेत मुद्दा सोडून बोलत रहातो तो एक मूर्ख.

६३) वाईट वस्तीत जाण्यात, वावरण्यात पुरषार्थ मानतो तो एक मूर्ख.

६४) चर्चा स्थळी एकजण आपला मुद्दा मांडत असतांना मध्येच बोलून अडथळा करणारा तो एक मूर्ख.

६५) रस्त्यातील पादत्राणांनी घरात वावरतो तो एक मूर्ख.

६६) बायकांत वावरणारा पुरुष तो एक मूर्ख. मात्र, पुरुषात वावरणारी स्त्री मूर्ख समजली जात नाही.

६७) चांगले कायदे नियम मोडण्यात धन्यता मानतो तो एक मूर्ख.

६८) मुक्या प्राण्याना त्रास देणारा व त्यात धन्यता मानणारा तो एक मूर्ख.

६९) उगाचच खोटे बोलणारा तो एक मूर्ख. स्त्रिया सुरक्षिततेसाठी उगाचच खोटे बोलत असतात म्हणून त्यांना मूर्ख समजले जात नाही.

७०) विनाकारण अन्याय सहन करणारा व तसें करा, म्हणून इतरांना सल्ला देणारा तो एक मूर्ख.

७१) अनोळखी ठिकाणी जाऊन लोकांच्या भानगडीत नांक खुपसणारा तो एक मूर्ख. नको तेथें लक्ष घालणारा तो एक मूर्ख.

७२) आपली परिस्थिती सुधारल्यावर जुने दिवस व त्याकाळात मदत करणारे लोक ह्यांना विसरणारा तो एक मूर्ख.

७३) अवसानघात जो करी तो एक मूर्ख.

७४) आपल्याला सर्वांनी सहाय्य करावे परंतु, आपण मात्र कोणालाही सहाय्य करण्याची गरज नाही असें समजून वागणारा तो एक मूर्ख.

७५) दुसऱ्यांच्या आणलेल्या वस्तुंची निगा नीटपणे जो करीत नाही तो एक मूर्ख.

७६) आधाशीपणें दुसऱ्याचा वाटा खाऊन फस्त करतो तो एक मूर्ख.

७७) लहान मुलांशी भांडण उकरून काढतो अथवा त्यांना जो घाबरवतो तो एक मूर्ख.

७८) मैत्री तपासण्यासाठी जो, मित्राचें नुकसान करून तो ते नुकसान सहन करतो किं नाही ह्यावरून मैत्री किती घट्ट आहे ते ठरवितो तो एक मूर्ख.

७९) मित्रांना त्रास देण्याचा आपला हक्क आहे असें जो मानतो तो एक मूर्ख.

८०) मैत्रीचा गैरफायदा घेण्यात धन्यता मानतो तो एक मूर्ख.

८१) दुसऱ्याच्या चांगुलपणाचा गैरफायदा घेण्यात धन्यता मानतो तो एक मूर्ख.

८२) एकादे पुस्तक न वाचतांच त्यावर मत प्रदर्शन करतो तो एक मूर्ख.

८३) माहीत नसलेल्या विषयावर अधिकार वाणीने बोलण्याचे धाडस करतो तो एक मूर्ख.

८४) पाहुण्याकडून घरची कामे करून घेतो तो एक मूर्ख.

८८) वृद्ध माता पित्याकडून जो स्वताची सेवा करून घेतो तो एक मूर्ख.

८९) नोकरा चाकरांचा सतत अपमान करतो व तो आपला हक्क आहे असें मानतो तो एक मूर्ख.

९०) आश्रित, पाहुणा ह्यांचा अपमान करतो तो एक मूर्ख.

९१) घरात पाहुणे असतांना त्यांना तसेंच ठेवून आपण स्वताच खात बसतो तो एक मूर्ख.

९२) दुसऱ्यांच्या मूर्खपणाचें समर्थन करतो तो एक मूर्ख.

९३) शेजाऱ्यांच्याकडे, मित्रांकडे नेहमी कांहीतरी मागत रहातो तो एक मूर्ख.

९४) पाहुण्यासाठी ठेवलेला पाहूणचार स्वताच खऊन फस्त करतो तो एक मूर्ख.

९५) असहाय्य, गरीब माणसाचे दु:ख पाहून ज्याला विनोद सुचतो तो एक मूर्ख.

९६) मर्यादांचें जो पालन करीत नाही तो एक मूर्ख.

९७) जो घरच्या जेवणाची तुलना बाहेरच्या (खानावळ वगैरे) जेवणाशी करतो तो एक मूर्ख.

९८) जो मातेच्या जेवणाची तुलना आपल्या पत्नीच्या जेवणाशी करतो तो एक मूर्ख.

९९) जो श्रीमंताच्या गोष्टींची तुलना गरीबांच्या गोष्टींशी करतो तो एक मूर्ख.

१००) तुलना करतांना जो सावधानता बाळगत नाही तो एक मूर्ख. ह्या ठिकाणी तुलनेतील सावधानता म्हणजे काय ते आता पहावें लागेल. तुलना कोणत्या दोन अथवा जास्त गोष्ठीची होऊ शकते ते समजले पाहिजे. तुलना दोन असमान गोष्टींची करावयाची नसते. उदाहरणार्थ, ताकदी मध्यें लहान मुलगा, अशक्त माणूस, स्त्री, वृद्ध माणूस ह्यांची तुलना शक्तिमान मोठ्या माणसाशी करावयाची नसतें कारण, ते ताकदी मध्ये असमान असतात. ह्यावरून आणखीन एक मूर्ख लक्षण सांगितले जाते ते असें,

१०१) ज्याला गोष्टींतील समानता व असमानता ह्यातील फरक समजत नाही तो एक मूर्ख. वाट्टेल त्या दोन गोष्टींची तुलना करावयाची नसते हे ज्याला समजत नाही तो मूर्ख समजला जातो. गोष्टींची 'तुलनायोग्यता' समजणें ह्याला शहाणपणा असें समजले जाते.

१०२) जो दोन देवांची तुलना करतो तो एक मूर्ख. माझा देव मोठा व इतरांचा देव छोटा अशारितीनें जो विचार करतो तो मूर्ख समजला जातो. हीच गोष्ट धर्मांबद्दल सुद्धा लागु होते.

१०३) यश, पैसा, अधिकार, सत्ता, सौंदर्य, बुद्धिमत्ता आणि बळ ह्या सात संपत्ति आहेत. जो माणूस ह्या संपत्ति प्राप्त झाल्यावर उन्मत्त होतो व त्यांच्या मदतीनें इतरांना त्रास देऊ लागतो तो एक मूर्ख. ह्या सात संपत्ति ज्याला सांभाळता येतात व जो त्यांच्यामुळें उन्मत्त होत नाही तो उत्तम लक्षणी शहाणा ठरतो.

१०४) जो स्वताला लाचार, नीच, दलित वगैरे समजतो व त्या प्रमाणें वागतो तो एक मूर्ख.

१०५) अनोळखी माणसाचा केवळ तो अनोळखी आहे म्हणून द्वेष करतो तो एक मूर्ख.

१०६) न वाचतां कागदपत्रांवर सही करतो तो एक मूर्ख.

१०७) जो स्त्रियांना उपभोग्य वस्तु समजतो तो एक मूर्ख.

१०८) जी स्त्री स्वताला एकाद्या उपभोग्य वस्तु प्रमाणें पुरुषांपुढे ठेवते ती एक मूर्ख.
१०९) जो इसम शस्त्रूच्या, प्रतिस्पर्ध्याच्या बोलण्यावर व आश्वासनावर विश्वास ठेवतो तो एक मूर्ख.
११०) विनाकारण प्रत्येक गोष्टीत स्वत:ला दोषी ठरवितो व त्यातच मोठेपणा मानतो तो एक मूर्ख.

मूर्ख स्वताला फार शहाणा समजतो व त्यामुळे तो जे वागतो त्याला 'कुविद्या लक्षणें' म्हणतात.

१११) मुद्दाम आमंत्रितांना ताटकळत ठेवतो तो एक मूर्ख.
११२) मृतात्म्यांचा अपमान करणें हे मूर्ख माणसाचें लक्षण मानले जाते.
११३) परमेश्वर, देवता व पिशाच्च ह्यांच्या अस्तित्वाबद्दल चर्चा करणें हे मूर्खपणाचें लक्षण मानले जाते. कारण, ह्या गोष्टी चर्चेच्या माध्यमातून समजण्यासारख्या नाहीत. फक्त प्रयोगसिद्ध गोष्टींची चर्चा करता येते, व त्याद्वारा त्यांचें समाधान करतां येतें. परंतु, ह्या तीन गोष्टी अनुभवसिद्ध आहेत व म्हणून त्यांच्यावर चर्चा करतां येत नाही. तरीसुद्धा ह्या विषयांवर चर्चा करण्याचा आग्रह करणें, हे मूर्खपणाचें लक्षण मानले जाते. एकंदरीत अनुभवसिद्ध अशा ज्या गोष्टी असतात त्यांच्यावर चर्चा करण्याचा आग्रह धरणेंच मुळी मूर्खपणाचे असते.
११४) अपात्र दान करणें, अपात्र शिक्षक ठेवणें, अपात्र नोकर ठेवणें, अपात्र मित्र करणें, खोट्या आशा करीत रहाणें हि सर्व मूर्ख लक्षणें आहेत.
११५) परिस्थिती पाहून, परिस्थिती आपल्याला सोयिस्कर आहे किं नाही ह्यांचा अंदाज घेऊन आपली कामे करावयाची असतात हे ज्याला समजत नाही, असा जो वागत नाही तो मुर्ख.
११६) पाहूणे, आमंत्रित मंडळी ह्यांना नको नको म्हणत असतांना, बळेच फार आग्रह करतो तो एक मूर्ख.
११७) विनाकारण, केवळ गंमत म्हणून दुसऱ्यांना टोमणें मारतों तो एक मूर्ख.
११८) खोटेनाटे आरोप व संशय करून समाजात कुभांड माजवतो तो एक मूर्ख.
११९) माझे पूर्वज असें मोठे होते तसें महान होते अशारितीनें जे लोक पुर्वजांची स्तुती करतात व स्वत: मात्र त्या योग्यतेचे होण्याचा प्रयत्न करीत नाहीत असें लोक रामदसांनी मूर्ख ठरविले आहेत. रामदास म्हणतात, 'जो गायी वडीलांची स्तुती तो एक मूर्ख'.
१२०) जो पुरुष बायकोचें ऐकून आईशी भांडतो किंवा आईचें ऐकून बायकोशी भाडतो तो मूर्ख. सासु सुनांतील भांडणात घरातील शहाण्या पुरुषांनी कधीही पडावयाचें नसते. त्यांची भांडणें त्यांनी सोडवावीत अशी पोक्त भूमिका घरातील पुरुषांनी घ्यावयाची असते. तरीसुद्धा

दोघीं पैकी कोणीही त्या भांडणाचा अतिरेक करता कामा नये अशी खंबीर ताकीद देण्यास शहाणे पुरुष विसरत नाहीत.

१२१) एकादी स्त्री चांगली वागली म्हणजे ती आपल्या प्रेमात पडली आहे असें समजतो एक मूर्ख.

अशी मूर्ख लक्षणे आहेत. अर्थात् हे सर्व जो करण्याचे कटाक्षांने टाळतो तो शहाणा ठरतो. तसेंच हे सर्व टाळल्यामुळें जे वागणे होते त्यालाच शिष्टाचार संपन्न वागणे असें म्हणतात. ह्यासाठी मूर्ख लक्षणांच्या अभ्यासातून शहाणी लक्षणें समजूं शकतात. म्हणून त्यांची पुनरावृत्ति येथें केलेली नाही.

साधकांनी प्रथम हि लक्षणें वाचून त्यातील कोणती लक्षणें आपल्याला लागू होतात ते प्रथम तपासून पहावे. तपासतांना स्वताच्या केवळ निरिक्षणावर अवलंबून न रहाता, आपल्या प्रिय व आपल्या हिताची काळजी घेणाऱ्या स्वकियांचे सुद्धा मत घेऊन हे निरिक्षण करावयाचें असते. त्यातून ह्यातील किती लक्षणे आपल्याला लागू होतात ते स्पष्ट होईल. बरीच लक्षणे आपल्याला लागू होत नाहीत, असें दिसले म्हणजें साधकाला समजेल किं, त्याला उरलेल्या लक्षणांचे निराकरण करावयाचे आहे. त्यासाठी हि लक्षणें, सतत वाचत रहावें लागते. त्यामुळें हि मुर्ख लक्षणें साधकाच्या तोंडपाठ होतात. आपल्या प्रमाणें आपल्या भोवतीची कोणती माणसें ह्या लक्षणात येतात हे तो समजून त्यातून त्याची बरीच करमणूक होत जाईल. सतत परिक्षण व प्रयत्न ह्यामुळे साधक सावकाशपणें सर्व मूर्ख लक्षणांतून पूर्णपणे मुक्त होतो. साधारणपणें ह्या साधनेसाठी सामान्य साधकाला दोन ते तीन वर्षे ल ागतात. मूर्ख लक्षणांचा संबंध सरळपणें तमोगुणांशी असल्यामुळें हि साधना करीत असतांना त्यांनी तमोगुण निराकरणाचा सुद्धा विचार केला तर तो साधक केवळ मूर्ख अवस्थेतून बाहेर पडेल असें नाही तर तो तमोगुणांतूनही बाहेर पडेल. असा साधक शहाणा व रजोगुणी होईल. मूर्ख लक्षणांच्या बरोबर त्यांनी शहाणी लक्षणेंसुद्धा सतत पहात रहावयाचें असते. त्यातून त्याला आपल्यात शहाणी लक्षणें किती आहेत ते समजेल. कधी आपण शहाण्यासारखे वागतो व कधी मूर्खासारखे वागतो ह्याचा त्याला अभ्यास करावा लागतो. कां व कधी असें होते, ह्याचा अभ्यास केल्यावर त्याला रजोगुण अवस्थेचा प्रभाव आपल्यावर कसा आहे ते समजणें शक्य होईल.

आता आपण विशेष शहाणी लक्षणें काय आहेत ते पहाणार आहोत. मूर्खपणात दोन प्रकार आढळून येतात. स्वाभाविक व धोरणात्कम असें हे दोन प्रकार आहेत. स्वाभाविक मूर्खपणा हा तामसी प्रवृत्तीचें कारणांने माणसांत येत असतो. धोरणात्मक मूर्खपणा हा शहाणा माणूस मुद्दाम एकाद्याला अद्दल घडविण्यासाठी करीत असतो. असें वागणारा माणूस शहाणा जरी असला तरी तो रजोगुणी असतो. सत्वगुणी माणूस कधीही धोरणात्कम मूर्खपणाच्या मदतीने दुसऱ्याला अद्दल घडविण्याचा प्रयत्न करीत नाही. त्यावरून एक गोष्ट स्पष्ट होतें किं, मूर्खपणा कसाही असला तरी तो समाजात चांगले वातावरण निर्माण होण्यात कधीच मदत करीत नाही.

विशेष शहाणे लक्षण सत्वगुणी प्रवृत्तीचें प्रतिक मानले जाते. रामदासांनी आपल्या दासबोध ह्या ग्रंथात ह्या लक्षणांना उत्तम लक्षणे असें सांगितले आहे. आता आपण त्यांची माहिती करून घेणार आहोत. त्यावरून साधकाला आपल्यात किती चांगली लक्षणे आहेत ते समजणे शक्य होईल. रामदासानी दिलेल्या लक्षणांत कालपरत्वे कांही बदल करणें अपरिहार्य झाले असल्यामुळे तो करूनच हि लक्षणे येथें दिली आहेत. जो हि उत्तम लक्षणें पाळत नाही तो षत्मूर्ख (महामूर्ख) ठरतो.

१) पूर्ण माहिती केल्या शिवाय कोणत्याही विषयात जो मत प्रदर्शन करीत नाही तो एक शहाणा.

२) निरर्थक वितंडवाद जो घालीत नाही तो एक शहाणा.

३) कमी बोलतो व जास्त ऐकतो तो एक शहाणा.

४) अनोळखी माणसाबद्दल काल्पनिक अंदाज करून गैरसमज करून घेत नाही तो एक शहाणा.

५) प्रत्येक गोष्ट नीटपणे तपासून मगच स्वीकारतो तो एक शहाणा.

६) ओळखीच्या माणसाची चांगली माहिती करून घेतल्यावरच त्याला स्नेह्याचा दर्जा देतो तो एक शहाणा. ओळखीच्या आठ अवस्था असतात त्याची, थोडी माहिती पाहू या म्हणजे, हे लक्षण समजणे सोपे होईल. ते असें; माहिती, तोंड ओळख, जास्त ओळख, परिचय, घसट, मैत्री, स्नेह, घरोबा अशा ह्या आठ अवस्था आहेत. प्रथम एकाद्याची माहिती होते. त्यानंतर तोंडओळख होते. तोंडओळखीचें थोड्या जास्त ओळखीत रुपांतर होते. त्यानंतर परिचय होतो. परिचय झाल्यामुळे आपण त्याला आपल्या जास्त जवळ येऊ देतो व त्याला घसट असें म्हणतात. 'समान व्यसनेषु सख्यम्' ह्या न्यायांनें पुढे घसट निर्माण होते. घसटीतून मैत्री निर्माण होत असते. येथवरचा ओळखीचा प्रवास तमो आणि रजोगुणातील असतो.

मैत्रीचे पुढे स्नेहात रुपांतर होत असते. स्नेह व त्यानंतरची ओळखीची अवस्था घरोबा ह्या दोन अवस्था मात्र सत्वगुणातील असू शकतात. मूर्खांमध्यें ओळखीच्या पहिल्या सहा अवस्था घडतात परंतु, शेवटच्या दोन अवस्था नसतात. स्नेह व घरोबा ह्या दोन अवस्थेत गेलेली ओळख कायम रहाते. मैत्री ह्या अवस्थेपर्यंत ओळख तुटून त्यांचें वैरात रुपांतर होणे शक्य असते. ओळखीच्या ह्या अवस्थांचा संबंध सहा-स शी असतो. त्यांची माहिती आपण प्रापंचिक साधना ह्या भागात घेतली आहे. हे सहा -स आहेत, संरक्षण, सन्मान, सहकर्य, सहवास, संगम आणि  सेवा. तसेंच षड्रिपु ह्या भागात आपण काम दोषाचा अभ्यास करतांना इच्छा निर्माण होण्या आधी ज्या अवस्थांतून मन जाते त्या सर्व अवस्थांत मूर्ख माणसाची वागणूक सदोष असते.

७) प्रेमात एक हिशोब असतो व जो त्या हिशोबाचे भान ठेवून जगतो तो शहाणा. स्त्रिया बहुधा  हिशोबांने प्रेम करतात हे जाणणारा तो शहाणा.

८) शहाणा माणूस सर्व गोष्टींच्या मर्यादा समजून त्याप्रमाणें आपली कामे करीत असतो. येथें मर्यादा तत्वाची माहिती करून घ्यावी लागेल.

## – मर्यादा तत्व –

माणसाच्या जीवनात तो ज्या सर्व गोष्टी करीत असतो त्या सर्वांवर ह्या मर्यादा तत्वाचा परिणाम होत असतो. मर्यादा म्हणजें किमान व कमाल मर्यादा असा अर्थ होतो. कांही उदाहरणें घेऊन आपण हा विषय समजून घेवू या. समजा, एकाद्याला श्रीखंड फार आवडते तर, त्यानी किती श्रीखंड खावे हा प्रश्न पडतो. आवडते म्हणून त्यानी कितीही श्रीखंड खावें कां? तर त्यावर आपण म्हणू किं, त्यानें मर्यादेने श्रीखंड खावे. म्हणजे कमीत कमी किती खावे व जास्तीत जास्ती किती खावे? हा प्रश्न येतो. ह्याचा अर्थ, त्या माणसांनी किमान व कमाल ह्या मर्यादे मध्ये राहून श्रीखंड खावे असा होतो. मर्यादा तत्व माणसाच्या सर्व इच्छांना लागू होत असते. कोणतीही इच्छा झाली किं, त्या इच्छेच्या कमाल व किमान मर्यादांचें भान त्याने ठेवणे आवश्यक असते. जर ते भान त्यांनी नाही ठेवले तर, त्या इच्छेचे व्यसनात रुपांतर होऊन तो साधक त्यात पूर्णपणे गुंतून जाण्याचा धोका उत्पन्न होतो. म्हणून इच्छा झाली किं, तिची मर्यादा लक्षात घेणें साधकाला त्याच्या अध्यात्मिक स्वास्थ्यासाठी आवश्यक असते. हा नियम सर्वप्रकारच्या लहान मोठ्या इच्छांसाठी लागू होतो. नेहमी इच्छा

किमान अवस्थेत सुरु होते व जर ती पूर्ण झाली तर तिचे कमाल अवस्थेत रुपांतर होण्यासारखी परिस्थिती तयार होते. त्यातूनच लोभ दोषाचा उगम होत असतो. ह्यासाठी मर्याद तत्व समजून घेणे साधकाला अतिशय आवश्यक असते. तर त्याची माहिती करून घेऊया.

माणसाच्या जीवनात ज्या कांही गोष्टी येतात त्यांच्या कमाल आणि किमान अशा मर्यादा असतात. दोनही मर्यादा ओलांडणे अयोग्य समजले जाते. उदाहरणार्थ, खाण्याचा विषय घेऊया. माणसांनी किती खावें ह्याला मर्यादा असते असें आपण म्हणतो, ह्याचा अर्थ कमीत कमी किती व जास्तीत जास्त किती? कमीत कमीला किमान मर्यादा व जास्तीत जास्त, ह्याला कमाल मर्यादा असें आपण म्हणतो. माणसांनी किमान किती व कमाल किती खावें ह्याच्या मर्यादांचें पालन जर केले नाही तर त्याची तब्येत बिघडते. ह्याचा अर्थ माणसांनी खाण्यात ह्या मर्यादांचें पालन करणे अतिआवश्यक असते. हे जसें खाण्याबद्दल तसेंच इतर बाबीत सुद्धा असते. किती बोलावें, किती मौन पाळावें, किती हसावें, किती रडावें, किती चालावें, किती काम करावें, किती सुख भोगावें, किती दु:ख भोगावें, किती सहन करावें, किती आक्रमक व्हावें, किती झोपावें, किती जागावें, किती काय करावें ह्या व अशा अनेक गोष्टींचा विचार करावा लागतो. व जो ह्या सर्व गोष्टी समजून काम करतो म्हणजें, जो ह्यांच्या कमाल व किमान मर्यादांचें भान ठेवून आपली इच्छा पूर्ण करतो तो शहाणा समजला जातो व जो ह्या मर्यादांचें भान न ठेवता आपली इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत रहातो त्याला मूर्ख म्हणतात. ह्या मर्यादा काय आहेत हे समजण्यासाठी शिष्टाचारांचा विचार केला जातो. सर्वानी लहान वयात ह्या मर्यादांचें ज्ञान करून घ्यावयाचें असते. व ते साधारणपणे मुलाला त्याचें पालक देतात अशी सुसंस्कृत समाजाची रित असते. जर दुर्दैवानें एकाद्याला लहानपणी हे शिक्षण नाही मिळाले तर त्याला ते मोठेपणी स्वताहून दुसऱ्यांचें निरीक्षण करून वा कोणातरी शहाण्या इसमाच्या सहवासात राहून शिकावें लागते. ते शक्य नसल्यास पुस्तकांतून वाचून हे शिक्षण घ्यावें ल ागते. त्यासाठीच प्रस्तूत पुस्तकाची व्यवस्था केली आहे.

मर्यादांचें दोन प्रकार असतात. त्यांची माहिती करून घेऊया. प्रमाणाची मर्यादा व गुणवत्तेची मर्यादा अशा ह्या दोन आहेत. माणसाच्या जीवनात होणाऱ्या सर्वच गोष्टींत हे दोन घटक असतात. प्रमाणची मर्यादा म्हणजें कमी किंवा जास्तची मर्यादा व त्याची माहिती

आपण आताच करून घेतली आहे. गुणवत्तेची मर्यादा म्हणजें, चांगल्या गुणवत्तेची व वाईट गुणवत्तेची  मर्यादा असें समजावें. ह्या दोनही प्रकारच्या मर्यादांचें भान ज्याला आहे तो शहाणा असें मानले जाते. ह्या दोन मर्यादांचें भान येण्यासाठी जीवनाचा अनुभव घ्यावा ल ागतो. त्यामुळे हे भान नसलेल्या माणसाला पोरकट माणूस असें मानले जाते. ह्या मर्यादांचें भान जितक्या लवकर येईल तितक्या लवकर माणूस पोक्त झाला असें मानले जाते. ज्याला ह्या मर्यादांचें भान नसते व जो त्यांचें भान असण्याची गरज नाही असें समजून वागतो त्याला मूर्ख माणूस असें समजले जातें. शिष्टाचाराचें नियम सुद्धा ह्या मर्यादांच्या जाणीवेतूनच तयार होत असतात. गुणवत्तेच्या मर्यादांची अधिक माहिती करून घेऊ या. गुणवत्तेच्या मर्यादांतून सौंदर्य दृष्टीचा विकास होत असतो. गुणवत्तेचा संबंध अभिरुचीच्या तम, रज व सत्वगुणांशी असतो. त्या बद्दलची माहिती आपण तम, रज आणि सत्व मध्ये घेतली आहे.

९) मद मत्सर ह्या दोन षड्रिपुंची बाधा स्वताला होऊ देत नाही तो एक शहाणा.

१०) जेथे अधिकार नाही तेथें अधिकार गाजविण्याचा प्रयत्न जो करीत नाही तो एक शहाणा.

११) समाजात रहाणाऱ्या माणसाला कांही कर्तव्ये असतात ती अशी, समाजातील कमजोर व्यक्तिंना मदत करणें, संसार करीत असल्यास कुटुंबातील मंडळीना पोसणे, त्यांचा सांभाळ करणें, कोणी दुर्जन आढळल्यास त्याला अद्दल घडविणें, मद व मत्सर ह्या षड्रिपुंच्या आहारी गेलेल्या इसमास त्याच्या कारवायांत विरोध करणे हि पांच कर्तव्ये आहेत. ती पाळतो तो शहाणा  ठरतो. व जो त्यांचे पालन करण्याची आवश्यकता समजत नाही तो महामूर्ख ठरतो.

१२) काटकसर करणें व आपल्या उत्पन्नाच्या मर्यादा समजून त्यात रहातो तो एक शहाणा. काटकसर हा सद्गुण आहे व कंजुषी हा दुर्गुण आहे. तसेंच योग्य खर्च करणे हा सद्गुण आहे व उधळपट्टी करणें हा दुर्गुण आहे.

१३) दिलेला शब्द पाळेल तो शहाणा, जो पाळत नाही तो दुर्जन (पापी) समजावा.

१४) शहाणा माणूस पुण्य मार्गी असतो व मूर्ख माणूस बहुधा पापमार्गी असतो. ज्या समाजात मूर्ख लोकांची संख्या जास्त असते तो समाज अध्यात्मिक दृष्ट्या बरबाद होतो. पूण्यमार्गी लोक जास्त असल्यास तो समाज अध्यात्मिक दृष्ट्या उत्कर्ष पावतो.

१५) दुर्गुण व सद्गुण ह्यांच्यातील लक्षण साम्यामुळें त्यांच्यात फरक ज्याला समजत नाही व त्यामुळें दुर्गुणाला सद्गुण समजून वागतो तो महामूर्ख ठरतो व जो हा फरक चांगल्या रितीने समजून वागतो तो शहाणा ठरतो. उदाहरणार्थ, बावळट माणसाला त्यांच्या शांतपणे वागण्यामुळें जो सज्जन समजतो तो महामूर्ख ठरतो. कांही दुर्गुण व सद्गुण ह्यांची यादी येथें दिली आहे ती पहावी. हि यादी मूर्ख लक्षणात सुद्धा दिली आहे. सद्गुण व दुर्गुण ह्यांच्या कांही जोड्या येथे दिलेल्या आहेत, ह्यात प्रथम सद्गुण दिला आहे व नंतर दुर्गुण दिला आहे.

| सद्गुण | दुर्गुण |
|---|---|
| १) नम्रपणा | लाचारी |
| २) लढवय्येगिरी, शूरत्व | मवालीगिरी, उनाडकी, व्रात्यक्रिडा |
| ३) शहाणा | धूर्त, कावेबाज |
| ४) स्पष्टवक्तेपणा | उद्धटपणा |
| ५) सावध | भित्रा |
| ६) आतित्थ्यशिलता | लोचटपणा |
| ७) सन्मान करण्याची इच्छा | जी जी करण्याची प्रवृत्ति |
| ८) पुढाकार | आगावूगिरी |
| ९) सज्जनपणा | बावळटपणा |
| १०) समाधानीपणा | आळस |
| ११) काटकसर | कंजुषी |
| १२) योग्य खर्च | उधळपट्टी |
| १३) दिलदार | भावखावू |

१६) अध्यात्म साधना करतांना शरीराला यातना देणाऱ्या प्रकारच्या क्रिया जो करतो तो साधक महामूर्ख ठरतो. अध्यात्म साधना, हा सर्वस्वी मन व बुद्धि ह्यांना शिस्त लावण्याचा व्यायाम आहे. व म्हणून हे समजून जो शरीराचे हाल न करतां फक्त मन व बुद्धि ह्यांना वळण लावण्यावर लक्ष केंद्रीत करतो तो शहाणा साधक ठरतो.

मनुष्याची मन व बुद्धि, अध्यात्म साधना करण्यास सुरुवात करण्यापूर्वी पांचांपैकी कोणत्याही एका अवस्थेत असते. त्या अशा, १) दूर्जन, २) तमोगुणी, ३) रजोगुणी, ४) सत्वगुणी, ५) संतगुणी. साधना सुरु केल्यावर त्या अवस्थांत सुधारणा होत जातात. आणि दूर्जन माणूस अखेरीस संत अवस्थेत जातो. त्या प्रमाणें त्यांचा स्वभाव सुद्धा बदलत जातो. ह्याचा अर्थ माणसाचा स्वभाव त्याच्या ह्या अवस्थांवर अवलंबून असतो. मूर्ख माणूस

सुद्धा लक्षण चिकित्सा साधनेचा उपयोग करून आपली अवस्था सुधारू शकतो. म्हणजें, लक्षण चिकित्सा मूर्खाला शहाणे करून सोडणारी साधना पद्धति आहे. साधारणपणें आपण म्हणतो किं, स्वभावाला औषध नाही परंतु, हि लक्षण चिकित्सेवर आधारित साधना, ह्याला अपवाद आहे.

१७) शहाणी माणसें रजो व सत्व गुणी असतात. तमोगुणी कधीच नसतात. परंतु, ती रजोगुणी असल्यामुळें त्यांच्यात कांही दोष त्या प्रमाणात आढळून येतात. त्यांची माहिती आपण 'तम, रज आणि सत्व' ह्या भागात घेतली आहे.

१८) चांगले कार्य करतांना विरोध झाला म्हणून घाबरून ते कार्य जो थाबवतो तो महामूर्ख ठरतो व जो नेटांने आपले कार्य तसेंच पुढे चालवून त्यातील चांगलेपणाची खात्री सर्वांना करून देतो तो शहाणा ठरतो. शहाणा धिरोदत्त असतो व महामूर्ख अधीर असतो.

१९) तीन दुर्गुण दिले आहेत व ज्याच्यात हे तीन अथवा त्यापैकी एक जरी दुर्गुण असला तर तो इसम महामूर्ख ठरतो व हे दुर्गुण नसतील तर तो शहाणा ठरतो. शिष्टचाराचें सर्व नियम अगदी थोडक्यात सांगावयाचें असतील तर ह्या तीन दुर्गुणांचा विचार करावा लागतो. ते तीन दुर्गुण असें, अर्वाच्यवाचा, अपेयपान आणि व्रात्यक्रिडा.

अर्वाच्यवाचा : शिव्या देत बोलणे, अशुद्ध (ग्राम्य) बोलणें, लहान थोर ह्याचा मुलाहिजा न राखतां बोलणें, काळ वेळ पाहून न बोलणे, ओरडून बोलणें, हसत हसत बोलणें, बोलतांना विचित्र आवाज काढून बोलणें हि अर्वाच्यवाचा ह्या दुर्गुणाची लक्षणें आहेत.

अपेयपान : नको ते खाणे वा पिणें, व्यसनात अडकणें, कसें खावें प्यावें ह्याची मर्यादा न पाळता ते व्यवहार करणें.

व्रात्यक्रिडा : उनाडकी करणें, मवालीगिरी करणें, आपल्या शक्तिचा गैर वापर करून इतर लोकांना त्रास देणे, स्त्रीशी संबंध घेतांना तीला त्रास होईल अशा प्रकारे संबंध घेणें.

ह्या तीन दुर्गुणांच्या विरोधात जे सद्गुण सांगितले आहेत तें असें, शुद्धवाचा, मितपान, शुरत्व.

साधकाला ह्या तीन दुर्गुणांपासून स्वत:ला दूर ठेवावयाचे असते.

हिंदू प्रणालीनुसार जो क्षत्रिय धर्म सांगितला आहे तो ह्या तीन दोषांच्या नियंत्रणावर अवलंबून असतो. कुलीन क्षत्रियांचे वर्णन करतांना ज्याच्यात हे तिन दुर्गुण नाहीत तो कुलीन क्षत्रिय असें समजले जाते. व ज्याच्यात हे तीन दुर्गुण आहेत तो भ्रष्ट क्षत्रिय समजला जातो. इतके ह्या तीन दोषांचें महत्व मानले गेले आहे. हिंदूतील क्षत्रिय धर्मानुसार सर्व लोक मूलतया क्षत्रिय असतात व चतुर्वर्ण गीतेच्या शिकवणीप्रमाणे, गुणकर्म विभागशः असतात.

म्हणजें, आता प्रत्येक माणसात हे चार गुण (क्षत्रिय, ब्राह्मण, वैश्य व शुद्र) कमीजास्त प्रमाणात नेहमीच हजर असतात. परंतु, तो माणूस त्यांपैकी ज्या गुणाला वाढवेल त्या गुणाचा त्याच्या व्यक्तिमत्वावर अधिक प्रभाव होतो. आणि म्हणून त्या माणसास त्या गुणाचा असें ओळखले जाते. ह्याचा अर्थ, कोणतीही एक व्यक्ति ह्या चारही गुणांनी व्यापलेली असतेच, कोणीही व्यक्ति केवळ क्षत्रिय अथवा केवळ ब्राह्मण अथवा केवळ वैश्य किंवा केवळ शूद्र अशी कधीच नसते. हिंदूंतील ब्राह्मण धर्मात मात्र तसें नाही. त्या धर्मानुसार चतुर्वर्ण जन्मानें प्राप्त होतात. म्हणजें ब्राह्मण धर्म गीतेची शिकवण ह्या बाबत मानीत नाही असें दिसून येते. त्यामुळें ब्राह्मणाचा मुलगा कितीही मूर्ख असला तरी तो ब्राह्मणच समजला जातो. हा ब्राह्मण धर्मातील सर्वा मोठा दोष आहे.

महाभारतात दिल्या प्रमाणें ब्राह्मण धर्माची स्थापना जनक राजानें केली. अध्यात्मविद्या समाजात वाढावी हा त्यामागील मुख्य उद्देल होता. जनकराजाच्या काळात अध्यात्मविद्येचा मोठ विकास झाला तो ह्याच कारणांने. पुढे बरीच वर्षे ह्या परंपरेनें मोठे ऋषीमुनी समाजात निर्माण झाले व हिंदू तत्वज्ञानाची भरभराट झाली. कालमानांनें ह्या ब्राह्मण समाजात निकृष्टता उत्पन्न झाली. आणि त्यानंतर भ्रष्ट ब्राह्मणांचा काळ सुरु झाला. आता आपण कुलीन ब्राह्मण व भ्रष्ट ब्राह्मण ह्यांच्यातील फरक समजून घेऊ या. कुलीन ब्राह्मण तो, जो संपूर्णतया सात्विक प्रवृत्तिचा आहे आणि आपली अध्यात्म साधना प्रामाणिकपणें करीत आहे आणि ज्याची वाटचाल संतगुणाकडे होत आहे.  भ्रष्ट ब्राह्मण तो, जो सात्विक नाही. कदाचित दुर्गुणी अथवा तमोगुणी अथवा रजोगुणी आहे. असा ब्राह्मण अध्यात्म साधना करीत नसतो. ब्राह्मण धर्माचा नाश ह्या भ्रष्ट ब्राह्मणांनी केला आहे. तरीसुद्धा हेंच भ्रष्ट ब्राह्मण आज ब्राह्मण धर्मांचे सर्वकडे प्रतिनिधित्व करीत असल्याचें दिसत आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल हि सर्व ह्या भ्रष्ट ब्राह्मणांचीच कामे आहेत.

२०) स्त्रियांनी काय व कसें वागावें ह्यावर मत प्रदर्शन करणें हा पुरुषाचा अधिकार नाही व म्हणून तसें मत प्रदर्शन करणें मूर्खपणाचें ठरते. शहाणी माणसें स्त्रियांच्या व्यवहारात मत प्रदर्शन करीत नाहीत. स्त्रियांचे निर्णय फक्त स्त्रियांनीच घ्यावयाचें असतात. हे शहाणी माणसें चांगलेच जाणून असतात.

तम, रज आणि सत्व गुणांचा परिचय ह्या पुस्तकात पुढील लेखात दिला आहे. माणसाला अध्यात्मिक साधना करतांना स्वताचा गुण कोणता हे समजणें आवश्यक असते. त्यासाठी हि माहिती त्या लेखात सविस्तरपणे दिली आहे ती पहावी. माणसाचें लैंगिक जीवनसुद्धा ह्या

तीन गुणांनुसार बदलत असते. त्याचा साधनेवर परिणाम होत असतो म्हणून हि माहिती आवश्यक असते. लैंगिक जीवनात किती रमावयाचें व किती नाही हे सुद्धा माणसाच्या ह्या तीन गुणांवर अवलंबून असते. तामसी माणसें लैंगिक जीवनात जास्त वेळ फुकट घालविणें मजेचें समजतात, रजोगुणी त्यापेक्षा कमी काळ लैंगिक जीवनास देतात व सात्विक माणसे लैंगिक जीवनात जास्त रमणें अयोग्य समजतात. जर सुरुवातील तामसी असलेल्या माणसांनी प्रापंचिक साधना करून आपला गुण सुधारला व तो रजोगुणी झाला तर त्याच्य ल ैंगिक गरजासुद्धा कमी होतात व जर तो त्याही पुढे जाऊन सात्विक झाला तर त्याच्या ल ैंगिक गरजा अतिशय कमी होतात व तो लैंगिक जीवनाच्या बंधनातून मुक्त सुद्धा होवू शकतो. हि प्रापंचिक साधना सामान्य माणसाला अनेक निरर्थक गोष्टींपासून मुक्त करु शकते. समाजात चांगल्या संस्कारांचा विकास करून हे सर्व साध्य करता येते. ह्यासाठी तम, रज आणि सत्व गुणांचा परिचय व लक्षण चिकित्सेची माहिती पुढील लेखात दिली आहे ती जरूर वाचावी.

आपल्या येथे हिंदू प्रमाणेंच बरेच मुसलमान धर्माचें पालन करणारे आहेत. त्यासाठी कांही माहिती येथें देत आहे ती कदाचित त्यांना उपयोगी होईल अशी अपेक्षा आहे. क्षत्रियधर्मानुसार शमन व शोधन प्रवृत्ति ह्यांचें संतुलन माणसाच्या विकासासाठी आवश्यक आहे असें मानले जाते तर, ब ्राम्हण धर्मात अतिशमन प्रवृत्ति वाढविण्यावर भर असतो. मुसलमान तत्व ज्ञानानुसार केवळ अतिशमन प्रवृत्ति आवश्यक आहे असें समजले जाते. त्यामुळें त्यांचें शरियतचे नियम अतिशय कठोर असतात. परिणामतया मुसलमान समाज अतिशमन प्रवृत्तिनें प्रभावित झालेला दिसतो. मुसलमान धर्म सद्धा पुरुष प्रधान आहे हे त्यांचें कारण असावे. मुसलमान स्त्रियांनी ह्या सर्व गोष्टींचा विचार करून आपल्याला काय योग्य ते ठरवावे.

## तमो गुणांचा परिचय

ह्या गुणांच्या प्रभावाखाली माणूस काय करतो ते ह्या भागात पहाणार आहोत. समर्थ रामदास स्वामीनी दासबोधात लक्षणें दिली आहेत त्याधर्तीवर हि माहिती येथें सांगितली आहे. तत्वतः प्रत्यक्षात, फक्त तम आणि सत्व असें दोनच गुण असतात. रजोगुण हा ह्या दोन मुलभूत गुणांच्या मिश्रणातून तयार होत असतो. म्हणून त्याच्या अनेक अवस्था असल्याचें दिसून येतें. तम म्हणजें ह्या संदर्भात ज्ञानाचा अंधार असा घ्यावयाचा आहे.

ज्याला मानव जन्म कशासाठी होतो ते माहीत नाही असा माणूस तमोगुणी समजला जातो. खाली जी लक्षणें दिली आहेत त्यातील कांही लक्षणें तुमच्यामध्यें आहेत असें जर तुम्हाला दिसून आलें तर त्याप्रमाणात तुमच्यात तमोगुण आहे आणि त्यांचें निराकरण करणें तुमच्या अध्यात्मिक प्रगतीसाठी आवश्यक आहे कारण, तमोगुणांमुळे आत्मशुद्धी साधकास अशक्य होते. तमोगुण पापकारक आहे. तमोगुणामुळें लैंगिक जीवन सुख देण्याऐवजी दु:ख देणारे होऊ शकते, म्हणून हि माहिती येथे दिली आहे. मूर्ख लक्षणांचा संबंध तमोगुणाशी असतो.

तमोगुणी माणसाची लक्षणें :

१) तुमच्या मनाविरुद्ध जरासें जरी झालें तर तुम्ही रागावतां कां? तसें जर नेहमी होत असेल तर तुम्ही तमोगुणी आहात.

२) एकदा राग आला किं, पुढचा मागचा कोणताही विचार न करतां जो वाट्टेल तसें वागतो मारतो, शिव्या देतो, स्वताचें तसेच दुसऱ्याचें नुकसान करतो, प्रसंगी खूनसुद्धा करतो असें जो वागतो तो तमोगुणी आहे हे समजावें.

३) राग ज्याला आवरत नाही व त्याचें त्याला कौतुक वाटते किं, मी मोठा रागीट आहे असें सर्वांना मोठ्या अभिमानानें सांगत रहातो, कोणालाही आवरत नाही तो इसम तमोगुणी समजावा.

४)रागाच्या भरात जो स्वताचें मोठे नुकसान करतो, अगदी आत्महत्या सुद्धा करतो तो तमोगुणी.

५) सतत कोणत्या ना कोणत्या चिंतेत रहाण्याची ज्याला सवय लागली आहे तो तमोगुणी समजावा.

६) सतत काळजी करत रहातो आणि दुसऱ्यांना सुद्धा घाबरवतो तो तमोगुणी समजावा. काळजी करण्याचें व्यसन हे तमोगुणांचे एक लक्षण आहे.

७) काळजी करण्याच्या व्यसनाप्रमाणें संशय घेण्याचें व्यसन सुद्धा तमोगुणांचे लक्षण आहे. अशी माणसें सतत विनाकारण सर्वांच्याकडे संशयानेच पहात रहातात.

८) केवळ संशयावरुन दुसऱ्यावर घातक कारवाई करण्याची इच्छा होणें हे तमोगुणांचें ल क्षण.

९) केवळ संशयावरुन कोणावरही वाट्टेल तसें आरोप करुन सर्वत्र गोंधळ माजविण्याची प्रवृत्ति, हे तमोगुणाचें लक्षण समजावें.

१०) संपूर्ण समाजात संशयाचे वातावरण निर्माण करण्यात धन्यता मानतो आणि त्याद्वारा सर्व समाजातील मंडळींचे स्वास्थ्य बिघडविण्यात आनंद मानतो तो तमोगुणी समजावा.

११) स्वताच्या छोट्या फायद्यासाठी इतरांचे नुकसान करण्यात धन्यता मानणारा तो तमोगुणी समजावा.

१२) कोणतीही जबाबदारी न घेण्याची प्रवृत्ति तमोगुणाचें लक्षण आहे.

१३) भ्रष्टाचार, लाचलुचपत, नियम न पाळणें अशा गोष्टीत विशेष रस घेणारा, अशा कामांचे समर्थन करणारा, तो तमोगुणी समजावा.

१४) विश्वासघात करण्यात मागेपुढे न पहाणारा तो तमोगुणी समजावा.

१५) इतरांची फसवणूक करून त्याचें बेगडी कारणें देऊन समर्थन करणारा.

१६) आपल्या अधिकाराचा गैरफायदा घेणारा.

१७) मालकाची चोरी करणारा॰

१८) जीवनसाथीला फसवणारा.

१९) प्रेमात फसण्याची तीव्र इच्छा असणारा.

२०) प्रेमात दुसऱ्याला फसविण्याची इच्छा असलेला.

२१) सतत आणि सहजपणें खोटे बोलून लोकांची फसवणूक व दिशाभूल करण्यात धन्यता मानणारा.

२२) खोटे आरोप दुसऱ्यावर करून आपली जबाबदारी जो टाळतो तो.

२३) लहान मुले, बाया बापडे, वृद्ध, असहाय, अडलेले अशा कमजोर व्यक्तिंना त्रास देणारा.

२४) अज्ञान लोकांची (बायका मुले अशिक्षित लोक) फसवणूक करण्यात धन्यता मानणारा.

२५) आयत्या वेळी अवसानघात करून निघून जाणारा.

२६) खोटी आश्वासनें देऊन काम करून घेणारा. उगाचच खोटे बोलणें तमोगुणाचें लक्षण.

२७) खरेपणाची सोंगे घेऊन इतरांना ठकविणारा.

२८) भांडणे उकरुन वादंग माजविण्यात धन्यता मानणारा. भांडखोरपणा हे तमोगुणाचे लक्षण आहे.

२९) इतरांत गैरसमज पसरवून भांडणे लावून स्वता मजा बघत बसणारा.

३०) इतरांत मतभेदाचें वातावरण निर्माण करून त्यातून स्वताचा फायदा करून घेणारा.

३१) अफवा पसरवून समाजात गोंधळ निर्माण करून त्यातून, स्वताची करमणूक करून घेणारा॰

३२) लोकांची मनस्थिति बिघडेल असें वागणारा, बोलणारा.

३३) क्रूरपणें वागणारा, प्रसंगी आपल्या तावडीत सापडलेल्या व्यक्तिस छळणारा किंवा मारून टाकणारा.

३४) दुसऱ्याचा हक्क खाणारा, तशा कामात इतरांना मदत करणारा.

३५) समाजातील नियम, कायदे वगैरे न पाळण्यात धन्यता मानणारा. कायदे इतर दुसऱ्या सर्वांनी पाळावेत मी मात्र सर्व कायदे नियम मोडायला हरकत नसावी अशी समजूत मनात बाळगणारा.

३६) देवधर्म, समाजाची नीतिमुल्यें ह्यांना न मानणारा, आणि त्यांचें हंसे उडविण्यात धन्यता मानणारा.

३७) स्वत: समाजाची नीतिमुल्यें झुगारणारा आणि दुसऱ्यांना सुद्धा तसें करण्यात उत्तेजन देणारा.

३८) समाजाच्या भितीपोटी अथवा फायदा होत असेल तर, आपण देवधर्म आणि समाजाची नीतिमुल्ये जपतो असें दाखविणारा परंतु, मनातल्या मनात मात्र ह्या सर्व गोष्टींची चेष्टा करणारा.

३९) समाजातील कायदे, नियम मुद्दाम मोडणारा व दुसऱ्यांना तसेंच करण्याची जबरदस्ती करणारा.

४०) धर्माचा धंदा करून त्याद्वारा लोकांना आपल्या नादी लावणारा आणि त्याद्वारा महत्व व पैसा मिळविणारा.

४१) स्त्रियांचा तिरस्कार करणारा, अशुद्ध ब्रह्मचर्य पाळणारा. स्त्रीला उपभोग्य वस्तु समजणारा

४२) श्रद्धावान भोळ्याभाबड्या लोकांची फसवणूक करणारा. त्यातून पैसे मिळविणारा.

४३) देवांशी धंदेवाईक रित्या बेहिशोबी नवस करणारा. उदा.: नवस करतांना, एक किलो पेढ्याच्या बदल्यात लाख रुपयाचा फायदा व्हावा अशाप्रकारचा नवस करणें.

४४) देवाच्या नांवानें खोटी शपथ घेणारा॰

४५) पुनर्जन्म न मानणारा.

४६) पापपुण्य कर्मविपाक हा सिद्धांत न मानणारा.

४७) चेटूक, जारणमारण अशा विद्येमध्यें आवड असणारा.

४८) भूतप्रेत पिशाच्च ह्यांच्या जागरण कर्मात रमणारा.

४९) मृतांबद्दल तूच्छता दाखविणारा॰ ५०) पितरांचा अपमान करणारा.

५१) परमेश्वर, देव, देवता न मानणारा उलट त्यांना आव्हान देणारा.

५२) खऱ्या संत साधूंची चेष्टामस्करी करण्यात धन्यता मानणारा.

५३) वृद्धांचा विनाकारण अपमान करणारा आणि त्यात कांहीही बिघडत नाही असें मानणारा.

५४) स्वताच्या आई, बाप आणि इतर वडील मंडळींना वाईट वागणूक देणारा.

५५) पत्नी, मुलांचा चारचौघांच्यापुढे अपमान करणे हा आपला हक्क आहे असें मानणारा.

५६) युद्धात हरलेल्या लोकांचा छळ करण्यात धन्यता मानणारा.

५७) चांगल्या कामात जसें, धर्मकार्य, सेवाकार्य वगैरे, ह्यांत मुद्दाम विघ्न आणणारा.

५८) देवाला नवस करून तो पावल्यानंतर सुद्धा ते काम देवाच्या कृपेमुळे झालेले नाही तर माझ्या हिंमतीने झाले, अशी समजूत बाळगून नवस न फेडणारा.

५९) दुसऱ्याचा विनाकारण अपमान करणारा.

६०) अंगात गळ(आकडा) खुपसणें, गालातून आरपार सुई घालणें, निखाऱ्यावरून चालणें, जिभेला खिळा मारणे अशा प्रकारची कामे करणें आणि ते सुद्धा देवाच्या नांवानें. हे, तमोगुणी माणसाचें लक्षण मानलें जाते.

६१) स्वताचा छळ करण्यात धन्यता मानणारा ह्याना दु:खभावी असें म्हणतात. ह्या गुणामुळे तो माणूस स्वताला छळण्यात धन्यता मानत असतो.

६२) तावडीत सापडलेल्या माणसाचा छळ करणें. प्रसंगी मारून टकणें, रॅगिंग (छळ) सारखे प्रकार करणे. आणि त्यात धन्यता मानणें.

६३) देवाच्या नांवानें बळी स्वत: देणारा तमोगुणी समजला जातो. देवाच्या नांवाने कधीही स्वताच्या हातांने बळी द्यावयाचा नसतो ते कर्म करण्याचा विशेष अधिकर कालीमातेचा सर्वकाळ पुजारी असणाऱ्या साधकालाच असतो. तो संतगुणी असावा लगतो. शाक्तपंथात बळी दिल्याने उपदेवता प्रसन्न होत असतात, बळी दिलेल्या प्राण्याचा उद्धार मुख्य देवता करीत असते असें दिले आहे. नवस पूर्ण करण्याचे काम उपदेवता करतात. अधिक माहिती साठी देवता विज्ञान हे पुस्तक वाचावें. नरबळी कोठल्याही परिस्थितीत चुकच असतो व तो देणारा दुर्जनगुणी समजला जातो.

६४) खून करणारा, मुक्या अथवा असहाय्य प्राण्यांचा केवळ गंमत म्हणून छळ किंवा नाश करणारा.

६५) मूर्ति फोडणारा. मंदिरे वगैरे इतरांची श्रद्धास्थानें भ्रष्ट किंवा नष्ट करणारा.

६६) जीवन पद्धतीत कोणताही बदल करण्यास हे तमोगुणी लोक तयार नसतात. नवीन विचार, कल्पना, सुधारणा आपल्या जीवनात तसेंच समाज जीवनात आणण्यास त्यांचा सक्त विरोध असतो. अशा गोष्टींबद्दल ते नेहमी साशंक असतात. जर अशा लोकांचा समाजात

मोठा प्रभाव असेल तर असा समाज कालांतरानें आदिवासी अवस्थेत जातो. रजोगुणी माणसें ह्यापेक्षा बरीच वेगळी असतात. रजोगुणी लोकांना सतत बदल घडवून आणणे फार आवडते. त्यामुळे रजोगुणी समाजात सतत कांही ना कांही तरी बदल होत असतो. हा बदल चांगला असेल किंवा वाईट असेल परंतु, तो होत असतो. बहूधा हा बदल नवीन कल्पना, विचार, सुधारणा समाजात आणण्यासाठी असतो. ह्या सततच्या बदल होण्याच्या गुणधर्मामुळे अशा समाजाला नववासी समाज असें म्हणता येईल. बदलत्या काळाच्या गरजांची हा नववसी समाज सतत योग्य दखल घेत असतो. आणि त्याप्रमाणें तो समाजात आवश्यक ते बदल घडवित असतो. त्यामुळे रजोगुणी लोकांचा समाज आधुनिक समाज रहातो. तर तमोगुणी लोकांचा समाज आदिवासी, मागासलेला, बुरसटलेल्या विचारसरणीचा असा होत जातो. नववासी म्हणजें नवनवीन गोष्टींची आवड असणारा. सात्विक माणसें समाजातील बदलाबद्दल फार चोखंदळ असतात. ते सुद्धा नववासी असतात.

६७) तामसी माणसें बहुधा विघ्नसंतोषी असतात, कोणाचेही बरे झालेले त्यांना पहावत नाही.

६८) मतभेद झाला तर त्यावरून लगेचच वैर निर्माण होते, अगदी लहानसहान कारणांवरून दुष्मनीची भाषा बोलणारा. आणि त्या कारणावरून न्यायालयीन खटल्यात आपला वेळ व पैसा खर्च करणारा.

६९) दोन देवांची, धर्मांची तुलना करणारा व त्यातून एक मोठा व दुसरा छोटा असें ठरविणारा.

७०) स्वताच्या मरणाला फार भिणारा.

७१) दुसऱ्याच्या चांगुलपणाचा गैरफायदा घेण्याची प्रवृत्ति फार असतें. तमोगुणी लोकांच्या ह्या अशा वागण्यामुळें समाजातील चांगल्या मंडळीना इतरांशी चांगुलपणानें वागण्याची सुद्धा भिती वाटत असतें. आपल्या चांगुलपणाचा गैरफायदा तर नाहींना घेतला जाणार? अशा शंकेमुळें समाजातील चांगुलपणा नष्ट होण्याची शक्यता निर्माण होते.

७२) अन्याय गुपचुपपणे सहन करणे हा तमोगुण ठरतो, त्यामुळें समाजातील वाईट प्रवृत्तीना उत्तेजन मिळते, व हे पापकारक आहे. असें तामसी लोक स्वताला सात्विक व शांतताप्रेमी असल्याचें दाखवितात परंतु, प्रत्यक्षात मात्र ते भितरे व कुचकामी असतात. अशा तामसी लोकांचा प्रभाव समाजात असेल तर त्या समाजात भ्रष्टाचार, व्यभिचार व अराजक माजविणाऱ्या दुर्जनांचे हात बळकट होतात व तो समाज नष्ट होतो.

समाजात असें भोंदू तामसी लोक भरपूर असतात. ते स्वताला अहिंसावादी, शांतताप्रेमी व सात्विक दाखवित असतात. परंतु, प्रत्यक्षात ते भितरे, नामर्द, कुचकामी व आळशी असतात. कोणतेही धाडसाचे काम त्यांना मुळीच करतां येत नसते. असें लोक आपल्या ह्या दोषाचें समर्थन करण्यासाठी तत्वज्ञान तयार करतात आणि त्या तत्वज्ञानाच्या माध्यमातून आपल्या ह्या कमजोरीचें समर्थन करण्याचा प्रयत्न करीत असतात. त्या द्वारा हे लोक इतर बेसावध लोकांनासुद्धा आपल्या प्रमाणें भितरे, नामर्द व आळशी होण्यास प्रवृत्त करतात. व आपल्या ह्या कमजोरीला एका तत्वज्ञानाचा दर्जा देऊन समाजात त्याला मान्यता मिळवून घेतात. आपल्याकडे जैन तत्वज्ञान आहे हे त्याचेच एक उदाहरण आहे. गीतेतील अर्जुन उवाच ह्याच प्रकारात येते.

७३) तामसी माणूस, मैत्री किती विश्वसनीय आहे हे तपासण्यासाठी मित्राचें नुकसान करून पहातो किं, तो मित्र ते किती पर्यंत सहन करतो. ते अजमावतो व जितके जास्त नुकसान तो मित्र सहन करील तितका तो चांगला व विश्वसनीय मित्र आहे असें मानतो. ह्या उलट रजोगुणी माणूस मित्र किती उपयोगाचा आहे ते वेळोवेळी तपासून पहातो व त्यावरून तो किती चांगला मित्र आहे ते ठरवितो. शात्विक माणूस मात्र 'समान व्यसनेषु सख्यम्' ह्या न्यायानेंच मित्र किती चांगला आहे ते ठरवितो. सात्विकाचे वेगळे असते, समान आवडी निवडी व गरजा असल्या किं, तेव्हढे कारण सात्विक माणसाला चांगली मैत्री राखण्यास पुरेसे असते.

अशा प्रकारची लक्षणें ज्यांच्यात असतात ते लोक तमोगुणी समजले जातात. ह्या लक्षणांनुसार आपण कामे प्रत्यक्षात न करतां फक्त त्याप्रकारचें जरी विचार तुमच्या मनांत येत असतील तरीही तुम्ही तमोगुणी आहात असें समजावें. सर्वच लक्षणें तुमच्यात नसणार परंतु, कोणती आहेत ते पाहून त्या प्रमाणात तुम्ही किती तमोगुणी आहात हे लक्षात घ्यावे. तसेंच वर दिलेल्या लक्षणांची तीव्रता किती आहे त्यावरून तुमची त्रिगुणातील नेमकी स्थिती काय आहे ते अंदाजानें ठरविता येते. त्याबद्दलचा ठोकताळ असा आहे, हि लक्षणें सौम्य स्वरूपात असतील तर त्याचा अर्थ तुम्ही रजोगुणी आहात. जर मध्यम स्वरूपाची असतील तर त्याचा अर्थ तुम्ही तमोगुणी आहात आणि जर हि लक्षणें तुमच्यात तीव्र स्वरूपात असतील तर त्याचा अर्थ तुम्ही दुर्जन आहात.

वासनिकता -तमोगुणी लोकांत वासनिकता विशेष आढळून येतें. त्याची कांही माहिती येथें आपण करून घेणार आहोत. इंद्रिय सुखाच्या तीव्र इच्छेस वासनिकता असें म्हणतात. त्याची

लक्षणें येथें दिली आहेत. जर, त्यातील कांही लक्षणें तुमच्यात असतील तर त्याचा अर्थ, आपण फार वासनिक आहात. अध्यात्मिक विकासाला हे हानिकारक आहे हे लक्षात घेतले पहिजे.

१) फार झोपणारा। २) फार खादाडपणा करणारा। ३) कडु चव आवडणारा.
४) फार गोड खाणारा.
५) फार तिखट खाणारा. ६) फार नशापाणी करणारा. ७) अति धुम्रपान करणारा.
८) स्त्री लंपटपणाची लाज न वाटणारा, उलट त्यात पुरुषार्थ मानणारा.
९) अनेक पुरुषांशी संभोगसुख घेण्याची इच्छा बाळगणारी स्त्री।
१०) अति उपवास करणारा.
११) आपले नग्न शरीर इतरांना दाखविण्याची तीव्र इच्छा असलेली स्त्री.
१२) दुर्गंधी आवडणारा।
१३) नैसर्गिक संभोगापेक्षा समलिंगी समागमात अधिक रमणारा.
१४) विनाकारण सर्वांचा द्वेष करणारा।
१५) जोरानी ओरडून बोलणारा.
१६) कर्णकर्कश गाणी, वाद्ये ह्यांचा गोंधळ आवडणारा.
१७) शिव्या देऊन बोलणारा। १८) कोणाचाही आदर न करणारा.
१९) सतत रडत रहाणारा.
२०) नेहमी दुसऱ्यांचा अनादर करण्यात धन्यता मानणारा।
२१) अति जुगार खेळणारा.
२२) नखें, केस वाढवून त्यांची नीटपणें निगा न घेतां रहाणारा.
२३) अस्वच्छ रहाणारा, बरेच दिवस स्नान न करता रहाणारा.
२४) दुसऱ्यांचें नेहमी वाईट चिंतिणारा।
२५) नेहमी दु:खी रहाणारा.
२६) आपले नेहमी वाईटच होणार आहे असें सतत मानणारा.
२७) स्वताला दलित (पददलित), नीच, फालतू असें मानणारा.
२८) स्त्रीसंग करतांना तिला त्रास होईल अशारितीनें ते काम करणारा. बलात्कार करण्यात धन्यता मानणारा.

२९) कोणतेही कार्य सहजा सहजी साध्य होता कामा नये असें मानणारा. त्यासाठी स्वताच्या व तसेंच दुसऱ्याच्या कामात विघ्ने निर्माण करणारा. कामात अडचणी आहेत हे पाहून खुष होणारा.

वरील प्रकारे वागण्याची इच्छा असल्यामुळें अशा माणसांची अध्यात्मिक प्रगति होणें अशक्य ठरते. त्यासाठी वरील लक्षणें आपल्यामध्ये नाहीत किंवा कसें, हे पहाणें साधकाला आवश्यक असतें. वरील लक्षणात कांही लक्षणे परस्पर विरोधी असतील तर त्यातील एकादे लक्षण असतें. वरील सर्वच लक्षणें माणसात नसतात. कांही असतात तर कांही नसतात, तसेंच त्यांच्या तीव्रतासुद्धा वेगवेगळ्या असतात. ह्या सर्वांचा साकल्याने विचार करून साधकाला आपली तमोगुणातील अवस्था ठरवावी लागते. हाच नियम रजोगुण आणि सत्वगुणाच्या परिक्षणात वापरावा लागतो. ह्या लक्षणांना तमोगुण म्हणण्याचे कारण, ह्या गुणांमुळे माणसाचा अध्यात्मिक विकास थांबतो. तमोगुणाच्या वरील लक्षणांचे तीन भाग मानले जातात. सौम्य, मध्यम व तीव्र असें हे तीन भाग आहेत. सौम्य प्रमाणात जर हि ल क्षणे असतील तर ती लक्षणे रजोगुणाची मानली जातात. मध्यम प्रमाणात असतील तर ती तमोगुणाची लक्षणें मानली जातात व जर हि लक्षणें तीव्र स्वरुपात असतील तर ती दुर्गुणात धरली जातात. सौम्य, मध्यम आणि तीव्र ह्यांच्या मर्यादा सांगता येत नाहीत. म्हणून त्यांचे निकस ठरविणे साधकाच्या सदसद्विवेक बुद्धिवर अवलंबून असते. जीवनाचा अनुभव असलेला कोणीही इसम योग्य अंदाज करू शकतो. तरीसुद्धा मोघम ठोकताळे असें आहेत किं, सौम्यदोष असल्यास त्यामुळें कोणाचेही नुकसान होत नाही, किंवा त्राससुद्धा होत नाही. मध्यम तीव्रता असल्यास नुकसान व त्रास होण्याची शक्यता असतें परंतु, ते सहन करता येण्यासारखे असतें. तीव्र असल्यास त्यामुळें नुकसान होणे आणि फार त्रास होणे शक्य असतें. अतितीव्र दोष असल्यास तो कोणालाही सहन करणें शक्य नसतें. तेव्हां ते लक्षण शिक्षेस पात्र ठरते.

ह्याठिकाणी आणखीन एक गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे ती हि कीं, सामान्य माणूस परिस्तितीनुसार कधी सत्वगुणी असल्या सारखे वागतो तर कधी रजोगुणी तर कधी तमोगुणी असा वागतो. ह्यात अनुभव असा आहे किं, जेव्हां, सर्व कांही मनाप्रमाणें होत असते तेव्हां तो सत्वगुण दाखवितो. एरव्ही रजोगुण अथवा तमोगुण म्हणजे, जो त्याचा खरा गुण असतो तो त्याच्या कडून दाखविला जातो. दुर्गुणी माणूस मात्र केव्हांही वाईटच वागतो. दुर्गुणी माणूस त्याच्या मनाप्रमाणें सर्व कांही असेल तर जास्त खराब वागतो. समाजात कांही

तमोगुणी माणसें स्वताला सत्वगुणी असल्याचें नेहमी दाखवत असतात. त्याप्रमाणें सत्वगुणी लोकांची नक्कल करीत असतात. त्यातून भक्तिचें दोन प्रकार आढळून येतात. एक सात्विक भक्ति व दुसरा तामसी भक्ति. हल्ली समाजात तामसी भक्तिचा फार मोठा प्रभाव दिसून येतो. तामसी भक्तित असा भक्त देवाची फक्त तोंडपुजा करतांना दिसून येतो. सात्विक भक्तिमध्यें तोंडपुजे बरोबर म्हणजें, जपा बरोबर तप करावें लागते. तसेंच देवाला प्रसाद द्यावा लागतो. प्रसादाला साधनेच्या भाषेत तर्पण असें म्हणतात. म्हणजें, जप -तप -तर्पण अशी साधना त्रयी असते. परंतु, तामसी भक्त फक्त जप करीत असतो व त्यालाच पूर्ण भक्ति असें समजत असतो. फक्त जप करून देव प्रसन्न होत नाहीत हे साधकांनी चागले लक्षात ठेवावे. देव प्रसन्न होणें म्हणजेच आत्मशुद्धि होणे. प्रापंचिक माणसासाठी तप करणें म्हणजें, षड्रिपूंतील प्रथम काम, क्रोध, लोभ, मोह ह्यांचें नियंत्रण करणें व त्याच वेळी मद व मत्सर ह्यांचे निर्मूलन करणे. ह्या तप साधनेलाच षड्रिपू विमोचन साधना म्हणतात. तामसी माणसाच्या भक्तित खरेपणा सुद्धा नसतो. सगळे ढोंग असते. तसेंच रजोगुणी लोकही अशा प्रकारची खोटी भक्ति केवळ समाजात प्रतिष्ठा वाढविण्यासाठी करीत असतांना आपल्याला नेहमी दिसून येतात. अशी दिखावू खोटी भक्ति अध्यात्मिक दृष्ट्या कांहीही उपयोगाची नसते. तामसी लोकांतील भक्तित लैंगिकता दाखविली जाते. जसें श्रीकृष्ण व गोपी ह्यांची जोडी. वस्तुत: देवतांना वासना नसते मग त्यांच्यात लैंगिक संबंध कोठून येणार? पण तामसी लोक ते समजत नाहीत त्यांच्या देवतांची ते लग्ने लावतात व ह्या देवाची ही बायको त्या देवाची ती बायको असें दाखवतात. हिंदूंची सर्व पुराणें अशाच तामसी प्रवृत्तिने बिघडलेल्या ब्राह्मणांनी लिहीली आहेत. त्यामुळें आपल्या पुराणांतून ह्या तामसी भक्तिची अनेक उदाहरणे दिसून येतात. त्रिगुणांचा अभ्यास करतांना प्रवृत्तिचे तीन गुण व अभिरुचीचे तीन गुण ह्याच्यातील फरक समजून घेणे आवश्यक होते. अभिरुचीचें सुद्धा त्रिगुण आहेत. म्हणजे अभिरुचीत सात्विक अभिरुची, राजसी अभिरुची आणि तामसी अभिरुची असें तीन प्रकार अभिरुचीनुसार होतात तर अध्यात्मिकमध्ये, सात्विक प्रवृत्ति, राजसी प्रवृत्ति आणि तामसी प्रवृत्ति अशा तीन प्रवृत्ति आढळून येतात. कोणताही मनुष्य ह्या सहा प्रकारात कोठेतरी असल्याचे नीट संशोधन केल्याने दिसून येतें. सात्विक प्रवृत्ति असलेला माणूस अभिरुची बद्दल सात्विकच असेल असें नाही, तर तो अभिरुचीबद्दल तामसी सुद्धा असू शकतो. तसेंच इतर प्रकारांबाबत असतें. भक्तिमार्गात असलेल्या लोकांच्या बाबत हा फरक विशेष लक्षात येतो. अध्यात्मिक दृष्ट्या सात्विक असलेला इसम जर अभिरुचीबद्दल तामसी असेल तर त्याची भक्ति करण्याची पद्धत किळसवाणी, हास्यास्पद अशी असतें. ती पाहून

कोणाला शंका येईल किं तो भक्ति करतो का देवांची मस्करी करतो? म्हणून, जर कोणी त्याला दोष देईल तर तें चुकीचे ठरते. परंतु जर तो सात्विक प्रवृत्तीचा माणूस अभिरुचीबाबत सुद्धा सात्विक किंवा रजोगुणी असेल तर त्याची भक्ति करण्याची पद्धति कौतुकास्पद ठरते. ज्ञानमार्गांनी साधना करणाऱ्यांच्या बाबत मात्र असा फरक सहजपणे समजून येत नाही. रजोगुणी साधकाची भक्ति विशेष देखणी असतें. देवतांची पुजा करण्याची जी पद्धत समाजात सर्वमान्य असतें ती साधारणपणें राजोगुणी अभिरुचीची असतें. प्रेमाच्या अभिव्यक्तिवर सुद्धा ह्या तीन प्रकारानुसार परिणाम होत असतो. तमोगुणी अभिव्यक्तित उनाडकी व गोंधळ असतो. रजोगुणी अभिव्यक्तित सौंदर्य असते तर सात्विक अभिव्यक्तित शांतता असते.

बहुधा माणसाची अभिरुची तो ज्या संस्कारात वाढतो त्यावर अवलंबून असते. ह्याचा अर्थ तो आपली अभिरुची भोवतालच्या परिस्थितीतून स्वीकारत असतो. तरीसुद्धा कांही अपवादात्मक उदाहरणे आढळून येतात किं, तामसी अभिरुचीच्या वातावरणात वाढूनही एकादा इसम सात्विक अभिरुचीचा निघतो. बऱ्याच वेळा दुसऱ्यांच्या कडून सुद्धा चांगल्या अथवा खराब पसंतींची निवड झालेली दिसून येते. चांगल्या अभिरुचीचा विकास होणें चांगला समाज घडण्यासाठी आवश्यक असते. समाजाची संस्कृति त्याच्या अभिरुचीवरून ठरत असते. प्रवृत्तिवरून समाजाची अध्यात्मिकता ठरत असते. त्यामुळें बऱ्याच वेळा गोंधळ होत असतो. राजसी अभिरुचीचा माणूस उच्च समजला जातो परंतु, तो जर प्रवृत्तिनें तामसी असेल तर त्याच्याशी केलेला प्रेम विवाह बिघडून जातो. अशा वेळी समजत नाही किं, इतका चांगला वागणारा हा माणूस विवाहात असा कां वाईट वागला? ह्यासाठी माणसाची केवळ अभिरुची छान आहे ह्यावर संतुष्ट होऊन प्रेम केल्यास ते अयशस्वी होण्याची मोठी शक्यता असते. तसेंच अभिरुची तामसी(खराब) परंतु, प्रवृत्तिनें राजसी अथवा सात्विक असलेल्या माणसाशी केलेले प्रेम अधिक यशस्वी होत असते. माणसाची अभिरुची सुधारणे सोपे असते त्यासाठी प्रेम करतांना मुलीनी पुरुषाच्या अभिरुची वर जास्त लक्ष न देता त्याच्या प्रवृत्तिवर लक्ष द्यावे.

## रजोगुणांची लक्षणें

ह्या लेखात आपण रजोगुणाची वैशिष्ट्यपूर्ण अशी जी लक्षणें आहेत त्यांची माहिती करून घेणार आहोत. जर ती लक्षणें आपणात आहेत असें आढळून आलें तर त्याचा अर्थ आपण रजोगुणी आहात. विशेष म्हणजे रजोगुणातील लक्षणांची सौम्य, मध्यम आणि तीव्र

अशी विभागणी होत नाही. ह्याचा अर्थ, तमोगुणातील लक्षणें सौम्य स्वरूपात असून त्याशिवाय हि लक्षणें असतील तर त्याचा अर्थ तुम्ही पूर्णतया तमोरजोगुणी आहात व जर तुमच्यात तमोगुणातील लक्षणें नसतील व फक्त येथें दिलेली कांही लक्षणें असतील तर तुम्ही रजोसत्वगुणी आहात. सर्व रजोगुणी माणसें अशा प्रकारे तमोरजो ते रजोसत्व अवस्थांतून सतत हलत असतात. म्हणूनच हि अवस्था तमोगुण व सत्वगुण ह्यांना जोडणारा दुवा समजला जातो. बहुतेक मानवी समाज तमोरजोगुणी असतात. रजोगुणी लोक संघटक असतात. हितसंबंधाच्या नात्यानी हे लोक मजबूत संघटना करतात. आणि त्याद्वारा इतर समाज घटकांवर प्रभावितपणे नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न ते करीत असतात. तमोगुणी ल ोकसुद्धा अशाप्रकारे संघटना करण्याचा प्रयत्न करतात परंतु त्यांच्या संघटना फार काळ टिकत नाहीत. त्यांच्या संघटनात सतत भांडण मारामाऱ्या होत रहातात आणि त्यामुळें त्या संघटना फुटून जातात. पुनः नवीन संघटना ते तमोगुणी लोक बनवतात आणि पुनः त्या तुटतात, असें तमोगुणी लोकांच्या बाबत होत रहाते. सत्वगुणी लोकांना आपली संघटना बनवून रहाण्याची आवश्यकता वाटत नाही. तरी बहुधा, सत्वगुणी लोक रजोगुणी लोकांच्या संघटना वापरून आपली कामे लिलया करून घेतात असें दिसून येतें. ह्याचें कारण, रजोगुणी लोकांना सत्वगुणी लोकांचे नेहमीच आकर्षण असतें. रजोगुणी लोक तमोगुणी ल ोकांना हाताशी घेऊन आपल्या कारवाया करणें पसंत करतात. अशा वागण्यामुळें रजोगुणी लोक समाजाला धरून ठेवण्यात यशस्वी ठरतात. साधारणपणें समाजाचें नेतृत्व रजोगुणी लोकांच्या हातात असतें. ह्याचें कारण सुद्धा हेच असते. राजकीय पुढारी, धर्ममार्तंड असें लोक रजोगुणी असतात. परंतु आपण सात्विक आहोत असा खोटा देखावा मात्र हे ल ोक आवर्जुन करीत असतात. रजोगुणी लोकांचें दाखवायचें दात आणि खावयाचें दात वेगळे असतात. तमोगुणी माणसांचे आणि सात्विक माणसांचें दाखवायचे आणि खावयाचें दात जे आहेत तेंच असतात. तमोगुणी आणि सत्वगुणी लोकांत हे एकच साम्य आढळून येतें. आता रजोगुणाची आणखीन लक्षणें काय आहेत ते पहाणार आहोत.

१) रजोगुणी माणूस प्रपंचात रहाणें पसंत करतो. प्रपंचातील अनेक अडीअडचणीना सावरून तरीसुद्धा, त्यातच रहाणें योग्य मानतो आणि त्यात सुख शोधण्याचा सतत प्रयत्न करीत असतो. संसार करतांना जे कांही आनंदाचें प्रसंग येतात त्यांना पुन्हा पुन्हा आठवून प्रपंचात राहूनच आपले सर्व जीवन व्यतीत करतो.

२) वैराग्य, संन्याशी प्रवृत्ति ह्या गोष्टींचा त्याला उबग वाटतो. किंबहूना अशा कल्पनासुद्धा त्याला घाबरवून सोडतात. ह्या प्रवुत्तीच्या लोकांबद्दल त्याच्या मनात नेहमी संशय व भिती असते.

३) इंद्रियांची सुखें मनसोक्तपणें भोगत रहावें आणि तेंच खरे जीवन आहे असें तो समजतो, नव्हें, अशी त्याची खात्री असतें. त्याला विरोध करणाऱ्यांवर तो रागावतो. पाश्चात्य संस्कृतित हि लक्षणें दिसून येतात. त्यांचे सर्व जीवनाचें तत्वज्ञान इंद्रियसुखाशी निगडीत असते.

४) इंद्रियांची सुखें न घेता वैराग्यपूर्ण जीवन जगणें म्हणजे निव्वळ मूर्खपणाच आहे, असा त्याचा ठाम विश्वास असतो.

५) आत्मशुद्धिच्या दृष्टीकोनातून पहाता, रजोगुण, माणसाची अध्यात्मिक प्रगति कुंठवून त्याला जेथल्या तेथें ठेवतो. तर सत्वगुण, माणसाच्या अध्यात्मिक विकासाला मदत करतो. त्या उलट तमोगुण, माणसाचा अध्यात्मिक ऱ्हास करणारा असतो. म्हणून साधकांनें आपले त्रिगुण तपासणें जरुरीचे असतें. सत्वगुणी होणे जर त्याला शक्य नसेल तर निदानपक्षी तमोगुणी न रहावें अशी दक्षता साधकांनी बाळगावी अशी किमान अपेक्षा असतें.

६) मी बरें किं माझे कुटूंब बरें, अशी संकुचित विचारसरणी राखून आपले सामाजिक जीवन तो जगणें पसंत करतो.

७) हे माझे, हे माझे घर, हा माझा बाप, हि माझी जात, हा माझा धर्म, हा माझा देश अशाप्रकारची ‘मी’पणाशी विशेष घनिष्टता ठेवून तो नेहमी विचार करतो, त्यामुळें जे त्याचें नाही ते सर्व निरर्थक, नालायक म्हणून व्यर्थ असें समजून तो त्या सर्व गोष्टींचा तिरस्कार करीत असतो. अशा सर्व गोष्टींबद्दल तो बेपर्वा होऊन त्याप्रमाणें, आपली कामे करणें योग्य मानतो.

८) त्याचें गेले तर मी कशाला त्याचा विचार करु? माझे सर्व ठीक आहे ना? मग झालें तर! अशी विचारसरणी रजोगुणी माणसात असतें.

९) चांगले खावे, चांगले दिसावें, चांगले वस्त्र परिधान करावें, चांगले रहावें, आपण सुंदर दिसावें अशाप्रकारची विचारसरणी रजोगुणी लोकांत असतें. वास्तविकत: हि रजोगुणी ल ोकांतील चांगली लक्षणें मानली जातात. अभिरुचीचा विकास करण्याचें काम समाजातील हे रजोगुणी लोक करीत असतात. रजोगुणी लोकांत चांगली आणि वाईट अशी सर्वच प्रकारची लक्षणें आढळून येतात. तमोगुणी लोकांत जी लक्षणें आढळून येतात ती साधारणपणें वाईटच असतात तर सत्वगुणी लोकांत आढळून येणारी लक्षणें बहुधा चांगलीच असतात.

१०) आपला मतलब साधण्यासाठी तो सर्व नीतिमुल्यांना धुर्तपणें बगल देतो व आपले काम साधून मोकळा होतो. त्यामुळें, समाजातील जे अनेक प्रकारचें भ्रष्टाचारांचे प्रकार आपण पहातो त्यांना हि रजोगुणी प्रवृत्ति जास्त करून कारणीभूत असते. सर्वात प्रथम रजोगुणी माणूस भ्रष्टाचाराला उत्तेजन देतात, त्यानंतर समाजातील तमोगुणी त्यात उतरून समाज व्यवस्था पोखरून टाकतात.

११) जोवर सोईस्कर आहे तोवर समाजाचें नीतिनियम पाळावयाचें आणि जेव्हां हे नियम त्रासदायक ठरतात तेव्हां त्यांना, कोणालाही लक्षात येणार नाही अशारितीने बगल देऊन आपले काम साधून घ्यावयाची प्रवृत्ति असते. रजोगुणी माणसांची कायदे नियम वगैर मोडण्याची पद्धत मोठी गुप्त असतें, अशी सर्व कामे हे लोक फारच सावधगीरीनें पार पाडतात. तमोगुणी माणसें मात्र हिच कामे उघडपणें करतात आणि त्यामुळे सहज सापडतात, रजोगुणी तिच कृत्ये करूनसुद्धा सहिसलामत निसटून जातो.

१२) धन संपत्ति ह्यांचा संचय करण्याची प्रवृत्ति फार असतें. कंजूषपणा हे रजोगुणींचें एक महत्वाचें लक्षण मानलें जाते. म्हातारपणासाठी पैसे साठविणे तसेंच पुढील जन्मी चांगला जन्म मिळावा ह्यासाठी देवांकडे साकड घालणें, रजोगुणी माणूस योग्य मानतो. आपल्या सुरक्षिततेसाठी तो फारच जागरूक असतो. त्यासाठी फार दूरचा विचार तो नेहमी करतो. ह्या स्वभावामुळें रजोगुणी नियोजन बद्ध काम यशस्वी रित्या करतात. तमोगुणी असें काम अव्यवस्थितपणे करतात व त्यात अपयशी ठरतात. ४) इंद्रियांची सुखें न घेता वैराग्यपूर्ण जीवन जगणें म्हणजे निव्वळ मूर्खपणाच आहे, असा त्याचा ठाम विश्वास असतो.

५) आत्मशुद्धिच्या दृष्टीकोनातून पहाता, रजोगुण, माणसाची अध्यात्मिक प्रगति कुंठवून त्याला जेथल्या तेथें ठेवतो. तर सत्वगुण, माणसाच्या अध्यात्मिक विकासाला मदत करतो. त्या उलट तमोगुण, माणसाचा अध्यात्मिक ऱ्हास करणारा असतो. म्हणून साधकांनें आपले त्रिगुण तपासणें जरुरीचे असतें. सत्वगुणी होणे जर त्याला शक्य नसेल तर निदानपक्षी तमोगुणी न रहावें अशी दक्षता साधकांनी बाळगावी अशी किमान अपेक्षा असतें.

६) मी बरें किं माझे कुटूंब बरें, अशी संकुचित विचारसरणी राखून आपले सामाजिक जीवन तो जगणें पसंत करतो.

७) हे माझे, हे माझे घर, हा माझा बाप, हि माझी जात, हा माझा धर्म, हा माझा देश अशाप्रकारची 'मी'पणाशी विशेष घनिष्टता ठेवून तो नेहमी विचार करतो, त्यामुळें जे त्याचें नाही ते सर्व निरर्थक, नालायक म्हणून व्यर्थ असें समजून तो त्या सर्व गोष्टींचा तिरस्कार

करीत असतो. अशा सर्व गोष्टींबद्दल तो बेपर्वा होऊन त्याप्रमाणें, आपली कामे करणें योग्य मानतो.

८) त्याचें गेले तर मी कशाला त्याचा विचार करु? माझे सर्व ठीक आहे ना? मग झालें तर! अशी विचारसरणी रजोगुणी माणसात असतें.

९) चांगले खावे, चांगले दिसावें, चांगले वस्त्र परिधान करावें, चांगले रहावें, आपण सुंदर दिसावें अशाप्रकारची विचारसरणी रजोगुणी लोकांत असतें. वास्तविकत: हि रजोगुणी ल ोकांतील चांगली लक्षणें मानली जातात. अभिरुचीचा विकास करण्याचें काम समाजातील हे रजोगुणी लोक करीत असतात. रजोगुणी लोकांत चांगली आणि वाईट अशी सर्वच प्रकारची लक्षणें आढळून येतात. तमोगुणी लोकांत जी लक्षणें आढळून येतात ती साधारणपणें वाईटच असतात तर सत्वगुणी लोकांत आढळून येणारी लक्षणें बहुधा चांगलीच असतात.

१०) आपला मतलब साधण्यासाठी तो सर्व नीतिमुल्यांना धुर्तपणें बगल देतो व आपले काम साधून मोकळा होतो. त्यामुळें, समाजातील जे अनेक प्रकारचें भ्रष्टाचारांचे प्रकार आपण पहातो त्यांना हि रजोगुणी प्रवृत्ति जास्त करून कारणीभूत असते. सर्वात प्रथम रजोगुणी माणूस भ्रष्टाचाराला उत्तेजन देतात, त्यानंतर समाजातील तमोगुणी त्यात उतरून समाज व्यवस्था पोखरून टाकतात.

११) जोवर सोईस्कर आहे तोवर समाजाचें नीतिनियम पाळावयाचें आणि जेव्हां हे नियम त्रासदायक ठरतात तेव्हां त्यांना, कोणालाही लक्षात येणार नाही अशारितीने बगल देऊन आपले काम साधून घ्यावयाची प्रवृत्ति असते. रजोगुणी माणसांची कायदे नियम वगैर मोडण्याची पद्धत मोठी गुप्त असतें, अशी सर्व कामे हे लोक फारच सावधगीरीनें पार पाडतात. तमोगुणी माणसें मात्र हिच कामे उघडपणें करतात आणि त्यामुळे सहज सापडतात, रजोगुणी तिच कृत्ये करूनसुद्धा सहिसलामत निसटून जातो.

१२) धन संपत्ति ह्यांचा संचय करण्याची प्रवृत्ति फार असतें. कंजूषपणा हे रजोगुणींचें एक महत्वाचें लक्षण मानलें जाते. म्हातारपणासाठी पैसे साठविणे तसेंच पुढील जन्मी चांगला जन्म मिळावा ह्यासाठी देवांकडे साकड घालणें, रजोगुणी माणूस योग्य मानतो. आपल्या सुरक्षिततेसाठी तो फारच जागरूक असतो. त्यासाठी फार दूरचा विचार तो नेहमी करतो. ह्या स्वभावामुळें रजोगुणी नियोजन बद्ध काम यशस्वी रित्या करतात. तमोगुणी असें काम अव्यवस्थितपणे करतात व त्यात अपयशी ठरतात.

१३) कायदेशीर रित्या पैशाचा अपहार करून इतरांना लुबाडणें, इतरांचें हक्क छिणणे, अशी कामें धुर्तपणें हे लोक करीत असतात. कायद्यातील पळवाटांचा उपयोग करून आपली

कामे साधण्याकडे त्यांचा कल असतो. अशा काम करण्याच्या त्यांच्या कार्यपद्धतीमुळें रजोगुणी लोक सर्व प्रकारचें गुन्हे करूनही समाजाच्या नजरेत प्रतिष्ठीत म्हणून रहातात. हे वाईट लक्षण आहे.

१४) दुसऱ्याच्या गोष्टी आपल्याला मिळाव्यात म्हणून चोरी शिवाय इतर संभावित मार्गानें तो प्रयत्न करीत असतो. साम, दाम, दंड, भेद अशा मार्गांचा वापर तो करीत असतो. दुसऱ्याला घाबरवून टाकून मग त्याद्वारा आपले काम साध्य करण्याचा प्रयत्न ते करतात. ह्यालाच अयोग्य साम व दाम असें म्हणतात. हे वाईट लक्षण आहे.

१५) आपण दुसऱ्यांच्यापेक्षा नेहमी वरचढ असलो पाहिजे अशी त्यांची सतत धडपड असतें.

१६) आपण इतरापेक्षा वरचढ आहोत किं नाही हे तपासण्यासाठी हे लोक सतत इतरांबरोबर आपली तुलना करून पहात असतात. आणि जर त्यात ते कमी आहेत असें दिसलें तर ते अत्यंत अस्वस्थ होतात. समाजातील चुरशीचें, चढाओढीचें खेळ, शर्यती असें प्रकार ह्या प्रवृत्तीतून निर्माण होतात. प्रसंगी युद्धे आणि मारामाऱ्या असें प्रकार सुद्धा घडतात. सततच्या तुलनेतून मद व मत्सर भाव उत्पन्न होतो व हे दोन षड्रिपु पापकारक असल्यामुळें अध्यात्मिक ऱ्हास होत जातो.

१७) मीच काय तो शहाणा, मला कोण विचारणार? अशी आत्मप्रौढी मनातल्या मनात बाळगतात.

१८) मी, मी आहे, माझी बातच निरळी, मी सर्व बाबतीत अपवाद आहे, त्यामुळें मला नियमांचे बंधन कशाला? असा विचार करून रजोगुणी लोक छोटेमोठे नियम धाब्यावर बसवून आपली कामे करण्याचा प्रयत्न करतात. ह्यात रांग मोडणें, नको तेव्हां रस्ता ओलांडून नियम मोडणें, विचारलेल्या प्रश्नाला नीटपणे उत्तर न देणें, दुरुत्तर करणें, कर बुडविणें असें प्रकार येतात.

१९) माझ्या गोष्टी रहाव्यात आणि त्यासाठी दुसऱ्यांच्या गोष्टी बरबाद झाल्या तरी चालेल अशी प्रवृत्ति असतें. माझे नुकसान झाले आहे तेव्हां इतरांचेसुद्धा तसेंच झाले पाहिजे, अशी प्रवृत्ति.

२०) मला नाही तुला नाही घाल कुत्र्याला म्हणजें, मला नाही मिळाले तर ते दुसऱ्या कोणालाही मिळता कामा नये अशी प्रवृत्ति असते. हे वाईट लक्षण आहे.

२१) रजोगुणी माणूस मनातल्या मनात मांडे खाण्यात पटाईत असतो. शेजाऱ्याची बायको अथवा इतर कोणतीही स्त्री सुंदर असेल तर तो रजोगुणी माणूस त्या बाईचा कल्पनेमध्यें अनेक वेळा संभोग घेऊन त्या काल्पनिक सुखात मजा करीत असतो. परंतु, प्रत्यक्षात मात्र

असा माणूस आपण फारच सज्जन असल्याचा बहाणा करीत त्या बाई बरोबर इतर व्यवहार करीत असतो. आणि समाजात आपण प्रतिष्ठीत आहोत असें दाखवित रहातो. थोडक्यात सांगावयाचे झाले तर असें म्हणावें लागेल कि, त्यांचे थेंब थेंब पाणी गळत असते, मग अशांची अध्यात्मिक प्रगति कशी काय होणार? उलट असें लोक लैंगिक प्रश्नात सतत अडकत जातात.

२२) रजोगुणी माणसे मनातल्या मनात पापमय विचार करून असतात, परंतु, प्रत्यक्षात मात्र ते त्या विचाराप्रमाणे कांही करीत नाहीत. अशारितीने जे पाप केले जाते त्या पापाला 'विडंबन' असें म्हणतात. आणि त्यामुळे जो भोग त्याना भोगावा लागतो त्याला 'विटंबना' असें म्हणतात. जर पाप विचारानुसार प्रत्यक्ष कृती केली तर त्या पापाला 'पाप' असेंच म्हणतात व त्याच्यामुळे जो भोग भोगावा लागतो त्याला 'पापभोग' असें म्हणतात.

२३) विटंबना ह्याप्रकारातील भोगाचा अनुभव बहूतेक प्रत्येकाला आपल्या जीवनात येत असतो. मनातील पापामुळे मनालाच शिक्षा होत असतें. मन अस्वस्थ रहाणें, मनात विनाकारण काळजी वाटत रहाणें, सतत संशयाने मन अस्वस्थ होणें, विनाकारण अथवा काल्पनिक कारणांने भिती वाटत रहाणें, दु:खावेग न आवरणें अशी अनेक उदाहरणे आपण विटंबनेच्या भोगाची अनुभवत असतो. त्याच प्रमाणें जीवनात विनाकारण इतरांकडून अपमान होणें, लोकांचे दुर्लक्ष होणें, इतरांचे सहकर्य न मिळणें, कामे वेळेवर न होणें, योगायोग न साधणे (गाडी चुकणें, वेळेवर न पोहोचणे, थोडक्यात चुकामूक होणें हि योगायोग सिद्धि नसण्याची उदाहरणें आहेत), गैरसमजामुळे मनस्ताप होणें, असें जीवनात बेजार करणारे अनुभव विटंबनेच्या रुपानी येत असतात. त्यामुळे कधी कधी जीवन नकोसे होऊन जाते. रजोगुणी लोकांना ह्यांचा अनुभव जास्त येत असतो.

२४) घरातील माणसांवर भरपूर प्रेम करतात आणि त्यांच्यासाठी इतरांना त्रास देण्यास सुद्धा ते मागेपुढे पहात नाहीत.

२५) प्रियजन मृत झाले तर तो अतिशय दु:खी होतो. रजोगुणी माणसे दु:खी फार लवकर होतात. त्यांना आपला दु:खावेग आवरता येत नाही. तमोगुणी माणसे अशा वेळी बेपर्वाईने वागतात तर सात्विक माणूस शांत बसणे पसंत करतो.

२६) खूप दु:खी होणें, खूप आनंदी होणें अशा तीव्र प्रतिक्रिया राजसी माणसें देतात आणि त्यामुळे हे लोक प्रसंगी आपला तोल घालवून नको त्या गोष्टी भावनेच्या भरात करून बसतात.

२७) भावनाविवशता हे रजोगुणी माणसाचें एक मोठे लक्षण आहे. माझा संसार, माझा प्रपंच कसा यशस्वी होईल ह्या विवंचनेत ते नेहमी हरवून गेलेले असतात.

२८) काळजी करीत रहाणें हे रजोगुणी माणसाचे एक मोठे लक्षण आहे.

२९) बिंधास्तपणा, बेपर्वाई हे तामसी माणसाचे गुण ह्यांच्यात कमी प्रमाणात आढळतात, त्या ऐवजी अतिसावधता हा गुण बऱ्यापैकी असतो.

३०) आपल्याला इतरांची सहानुभूति मिळावी ह्याकरतां अनेक गोष्टी हि माणसें करीत असतात. रडणें, घाबरलो आहे असें इतरांना दाखविणे, असहाय्य असल्याचे दाखवून हे ल ोक इतरांची सहानुभूति संपादन करून त्याना आपलेसे करतात.

३१) साम, दाम, दंड आणि भेद ह्या धोरणांनी व्यावहारिक जगात कामे करावी लागतात. त्यातील साम आणि दाम हे रजोगुणी मार्ग आहेत व दंड आणि भेद हे तमोगुणी मार्ग आहेत. ह्याचा अर्थ व्यावहारिक जगात निव्वळ सत्वगुणी माणूस यशस्वी होणार नाही हे स्पष्ट होते, ह्याचा दुसरा अर्थ असा

किं, व्यावहारिक जगात माणसाला केवळ सत्वगुणी असून चालत नाही तर रजोगुणी व कांही प्रमाणात तमोगुणी असणें आवश्यक असतें. अशा परिस्थितीत सात्विक, ‘धोरणात्मक’ रजोगुण व तमोगुण  धारण करून आपली कामे करून घेऊ शकतो. खोटे रागावणे, खोटे रुसणें, खोटा आनंद दाखविणें, खोटे दु:ख दाखविणे अशी अनेक नाटके त्याला आपल्या जीवनात कामे व्हावीत म्हणून, करावी लागतात ती सर्व धोरणात्मक ह्या प्रकारात येतात. रजोगुणीसुद्धा हि सर्व नाटके करीत असतो.

३२) दुसऱ्याला मदत करण्याची, सहानुभूति देण्याची इच्छा फार असतें. त्याद्वारा स्वत:चे समाजातील महत्व वाढविण्याचा प्रयत्न होतो. दुसऱ्यावर उपकार करणे रजोगुणी माणसाला आवडते व त्या कृत्याची खुबीने जाहिरात करून समाजात वहाव्वा मिळवितो. समाज घडण्यास त्यामुळें मदत होते.

३३) आपल्याला सर्वांची फार काळजी आहे आणि आपण मोठे उपकारकर्ते, दानशूर, दिलदार आहोत असें दाखवून हि माणसें समाजातील आपले स्थान पक्के करीत असतात. ह्या त्यांच्या गुणामुळे समाजाची बरीच कामे सुरळीतपणे होतात. समाज घडविण्यात हा रजोगुणी लोकांचा स्वभाव मोठी मदत करीत असतो. बऱ्याच वेळा हि माणसें सात्विक आहेत असा समज बहूतेक लोकांचा होतो. फरक एव्हढाच असतो किं, सात्विक माणसे आपल्या कामांचा दिंडोरा पिटत नाहीत तर हि माणसे आपल्या कामाचा दिंडोरा पिटतात.

३४) यश, पैसा, अधिकार, सत्ता, सौंदर्य, बुद्धिमत्ता आणि बळ ह्या सात संपत्ति आहेत. त्यांची प्राप्ति जर झाली तर रजोगुणी व तमोगुणी माणूस मातून जातो आणि त्याला गर्व होतो. ह्या सात संपत्ति पचवून शातपणे रहाणे त्याला जमत नाही. सात्विक माणसाला ते जमते.

३५) कामचुकारपणा, आपले काम दुसऱ्याला करण्यास सांगून त्याच्या चांगुलपणाचा गैरफायदा घेणे त्याला आवडते..

३६) रजोगुणी माणूस हास्यविनोद, साहित्यप्रेम, करमणुकीचे खेळ असें समाजकारक प्रसंग घडवितो आणि त्यामुळें समाजात नवचैतन्य निर्माण होते. हे चांगले लक्षण आहे.

३७) लेखक, पत्रकार, शास्त्रज्ञ, संशोधक (नवीन कल्पना विकसित करणारे), अन्वेषक (नवीन गोष्टी शोधून काढणारे), कवी, नाटककार, चित्रकार, धाडसाची कामे करणारे, इतरांना अशा कामात उत्तेजन देणारे, पुढाकार घेऊन सहाय्य करणारे, कारागीर, शिल्पकार अशी गुणी माणसें बहुधा रजोगुणी आसतात. हे चांगले लक्षण आहे.

३८) नवीन भानगडी शोधून काढणें, इतरांच्या लफड्यांचा शोध लावून त्यातून आपली आणि इतरांची करमणूक करणें अशी कामे रजोगुणी माणसे मोठ्या आनंदाने करीत असतात. ह्यातूनच आजची पत्रकारीता सुरू झाली असें म्हणतात. असले उद्योग रजोगुणी माणसें मोठ्या चवीनी करतात.

३९) आजुबाजूच्या लोकांच्या भानगडी सांगून त्यातून गप्पा, चेष्टामस्करी, हास्यविनोद वगैरे परंतु त्रासदायक होणार नाही इतपत करीत रहाणें हा रजोगुणी लोकांचा आवडता छंद असतो. हेच सर्व जर त्रासदायक झाले तर तो तमोगुण होतो.

४०) अनेक प्रकारचे छंद जोपासणें व त्याद्वारा आपला वेळ घालविणें. हे चांगले लक्षण आहे.

४१) करमणुकीचें अनेक खेळ, छंद, नाटके, सिनेमे अशा गोष्टींतून उद्योग निर्माण करून त्यातून  समाजाचें मनोरंजन करतो. ह्याच्या अतिरेकातूनच मात्र तमोगुणी उद्योग सुरु होतात. जसें जुगाराचे अड्डे, दारुचे गुत्ते, नायकिणींचे अड्डे, कुंटणखाने इत्यादि.

४२) फुकट कांही मिळाले तर फार खूष होतात. सर्वकांही फुकट मिळावे अशी फार इच्छा असते. ह्या नादामुळे, बऱ्याचवेळा इतरांचे पैसे बुडविण्या पर्यंत मजल जाते.

४३) खूप कष्ट करण्याची, मोठ्या जबाबदाऱ्या घेऊन काम करण्याची व त्याद्वारा मोठे होण्याची फार इच्छा असतें. आपल्याला जे जमत नाही ते आपल्या मुलांनी करून दाखवावे ह्यासाठी ते प्रयत्न करतात.

४४) आव्हाने देणे आणि घेणे हे रजोगुणी माणसाचें एक मोठे लक्षण आहे.

४५) जिंकल्यावर, रजोगुणी माणसे हरलेल्याला चांगली वागणूक देतात, तमोगणी माणसें त्याला छळतात. प्रसंगी मारून टाकतात हा, ह्या दोन गुणातील फरक असतो.

४६) शरण आलेल्याला रजोगुणी माणसे नुकसान भरपाई म्हणून कांही दंड करतात, तमोगुणी माणूस तरीसुद्धा शिक्षा करतो, तर सात्विक माणूस क्षमा करतो.

४७) देव धर्म मानणारे असतात, जरी मानणारे नसतील, तरी इतरांच्या भावनांचा मान ठेवून वागतात.

४८) चांगले अध्यात्मिक साधक रजोगुणी लोकांतून निर्माण होतात.

४९) देवांकडे नवस वगैरे करतांना धंदेवाईक दृष्टिने अपेक्षा करतात. आपण भक्ति केली तर, आपल्याला कांही मिळेल कां? लवकर मिळेल कां? नाही मिळाले तर काय? भक्ति करून दुसऱ्याला कांही आता पर्यंत मिळाले आहे कां? त्याचा तपास करावां कां? असें विचार ह्यांच्या मनात येत असतात.

५०) देवाची पुजा करतांना ह्या देवाची पुजा करु कां त्या देवाची पुजा करुं? कोणाची पुजा अधिक फायदेशीर आणि आता लवकर फळणारी आहे अशा चौकशा हे आवर्जुन करीत असतात.

५१) दान करतांना सुद्धा हि माणसें हिशोबानी दान करणे पसंत करतात. सर्वकांही हिशोबांनी करतात.

५२) रजोगुणी माणसें सकाम भक्ति करतात, त्यांना निष्काम भक्ति करणे जमत नाही.

५३) त्यांचा फायदा तोट्याचा हिशोब देवाशी सुद्धा व्यवस्थितपणे चालतो. आणि देवांशी, मी तुझी एव्हढी भक्ति केली मला काय मिळाले? अशा प्रकारे ते तक्रार करतांना दिसतात.

५४) चोरी करण्याची इच्छा असणारा परंतु ती न करतां फक्त मनातल्या मनात लोकांची फसवणूक करण्याची स्वप्न पहात जगणारा. अशा विचारसरणीला विडंबन म्हणतात. त्यामुळें जे दु:ख भोगावे लागतें ती विटंबना होय. ह्या प्रवृत्तीमुळें रजोगुणी लोक बहुधा मानसिक तणावाखाली असतात.

५५) जीवन पद्धतीत कोणताही बदल करण्यास तमोगुणी, तयार नसतात. नवीन विचार, कल्पना, सुधारणा आपल्या जीवनात तसेंच, समाज जीवनात आणण्यास त्यांचा सक्त विरोध असतो. जर अशा लोकांचा समाजात मोठा प्रभाव असेल तर असा समाज कालांतरानें आदिवासी अवस्थेत जातो. रजोगुणी माणसें ह्यांपेक्षा वेगळी असतात. त्यांना सतत बदल घडवून आणणे आवडते. त्यामुळे रजोगुणी समाजात सतत कांही ना कांही तरी बदल होत असतो. हा बदल चांगला असेल किंवा वाईट असेल परंतु, तो होत असतो. बहूधा हा

बदल नवीन कल्पना, विचार, सुधारणा समाजात आणण्यासाठी असतो. ह्या सततच्या बदल होण्याच्या गुणधर्मामुळे अशा समाजाला नववासी म्हणजें प्रगत समाज असें म्हणता येईल. बदलत्या काळाच्या गरजांची हा नववासी (आदिवासीच्या विरुद्ध) समाज सतत योग्य दखल घेत असतो. आणि त्याप्रमाणें तो समाजात आवश्यक ते बदल घडवित असतो. त्यामुळे रजोगुणी लोकांचा समाज नेहमीच आधुनिक रहातो. तर तमोगुणी लोकांचा समाज आदिवासी, मागासलेला, बुरसटलेल्या विचारसरणीचा असा होत जातो. चांगल्या अभिरुचींचा विकास हे लोक ह्या त्याच्या प्रवृत्तिमुळें करत असतात.

५६) रजोगुणी ज्या गोष्टींना आपला अभिमान जोडतात त्या सर्व त्याच्या दृष्टीनें श्रेष्ठ ठरतात. बाकी सर्व इतर पर्याय नीच ठरतात. आणि तो त्याप्रमाणे प्रचार करु लागतो. माझा देव खरा तुझा देव खोटा, माझा धर्म उच्च तुझा धर्म नीच, माझी जात उत्तम दुसऱ्याची कमी प्रतिची अशाप्रकारे तो तुलना करत असतो.

५७) स्वताच्या मरणाला फार भितात.

५८) दुसऱ्यांना फुकटचा सल्ला देण्याची भारी फौस असते.

५९) उपकार करणाऱ्याचे उपकार न मानता, 'कांही मोठे नाही केले, तो आमचा हक्कच होता' असें बोलून उपकार कर्त्याचे खच्चीकरण करतात. मिय्या गिरगया फिरभी टांग उपर किंवा भटजी पडला पण शेंडी वर अशा म्हणी प्रमाणे वागणे असते.

६०) कोणताही समाज पूर्णतया नीच अथवा उच्च नसतो. व्यक्ति मात्र आपल्या कर्मानें नीच अथवा उच्च ठरु शकतात. असें असले तरी रजोगुणी. आपल्या समाजाला उच्च व दुसऱ्यांच्या समाजाला नीच ठरविण्याचा प्रयत्न करत असतात.

रजोगुणी लोकांत दोन अवस्था असतात. एक अवस्था असतें तमोरजो व दुसरी अवस्था असते रजोसत्व. ह्याचा अर्थ रजोगुणी अवस्था तमो अवस्थेपासून सत्व अवस्थे पर्यंत अशी हलत असते. म्हणून रजोगुणी माणूस समाजात फार महत्वाचा असतो. त्यांतूनच पुढे निष्काम भक्ति आणि मोक्षमार्गी सात्विक लोक निर्माण होत असतात. म्हणून रजोगुणी माणसें हि समाजातील अध्यात्मिकतेची सुप्त मूस असतें. तिला योग्य मार्गदर्शन करून समाजात उच्च दर्जाची अध्यात्मिकता आणणें शक्य असतें. तमोगुणी माणसांचे रजोगुणी माणसांत बदल करणे आणि त्यापुढे रजोगुणी माणसांचे सत्वगुणी माणसांत बदल करणे व शेवटी सत्वगुणी माणसांचे संतगुणी माणसांत, ह्या पद्धतीने सर्व समाजाचा अध्यात्मिक विकास करता येतो.

पाश्चात्य देशात जे मानसशास्त्र विकसित झाले आहे ते ह्या तम, रज व सत्वगुणांच्या चिकित्सेवर आधारित नाही. त्यांचें मानसशास्त्र ख्रिस्ती धर्म तत्वज्ञानावर आधारित आहे. ख्रिस्ती तत्वज्ञानात पुर्नजन्म, आत्मा, संचीत, प्रारब्ध, पापपुण्य, कर्म विपाक ह्या हिंदू तत्व ज्ञानातील संकल्पना मानत नाहीत. त्यामुळें त्यांच्या संस्कारात व आपल्या संस्कारात बराच मोठा फरक आढळून येतो. मानसशास्त्र हे अशारितीनें निरनिराळ्या धर्माच्या लोकांसाठी वेगवेगळे ठरत असते. पाश्चात्य मानसशास्त्राला ख्रिस्ती मानसशास्त्र असें म्हणावें लागेल व आपल्या येथील मानसशास्त्राला हिंदू मानसशास्त्र असें म्हणावें लागेल. कारण, एकाच मनोरुंग्णाचे पाश्चात्य ख्रिस्ती मानसशास्त्रा प्रमाणें केलेले निदान व हिंदू मानसशास्त्रा प्रमाणें केलेले निदान ह्यात बराच मोठा फरक आढळून येतो. अनेक मनोरुंग्णावर हिंदू मानसशास्त्रानुसार लक्षण चिकीत्सा करून उपाय केल्यास लवकर परिणाम होतो असें सिद्ध झाले आहे. पाश्चात्यांना हि चिकीत्सा माहीत सुद्धा नाही. असें जरी असले तरी पाश्चात्य विद्वान त्यांचे मानसशास्त्र धर्म निरपेक्ष आहे असा खोटा दावा करीत असतात. आपल्या येथें मानसशास्त्र असें वेगळे शास्त्र मानण्याची प्रथा नाही. अध्यात्म शास्त्राचा एक उपभाग असेंच त्याचें स्वरुप समजले जाते.

५८) दुसऱ्यांना फुकटचा सल्ला देण्याची भारी फौस असते.

५९) उपकार करणाऱ्याचे उपकार न मानता, 'कांही मोठे नाही केले, तो आमचा हक्कच होता' असें बोलून उपकार कर्त्याचे खच्चीकरण करतात. मिय्या गिरगया फिरभी टांग उपर किंवा भटजी पडला पण शेंडी वर अशा म्हणी प्रमाणे वागणे असते.

६०) कोणताही समाज पूर्णतया नीच अथवा उच्च नसतो. व्यक्ति मात्र आपल्या कर्मानें नीच अथवा उच्च ठरु शकतात. असें असले तरी रजोगुणी. आपल्या समाजाला उच्च व दुसऱ्यांच्या समाजाला नीच ठरविण्याचा प्रयत्न करत असतात.

रजोगुणी लोकांत दोन अवस्था असतात. एक अवस्था असतें तमोरजो व दुसरी अवस्था असते रजोसत्व. ह्याचा अर्थ रजोगुणी अवस्था तमो अवस्थेपासून सत्व अवस्थे पर्यंत अशी हलत असते. म्हणून रजोगुणी माणूस समाजात फार महत्वाचा असतो. त्यांतूनच पुढे निष्काम भक्ति आणि मोक्षमार्गी सात्विक लोक निर्माण होत असतात. म्हणून रजोगुणी माणसें हि समाजातील अध्यात्मिकतेची सुप्त मूस असतें. तिला योग्य मार्गदर्शन करून समाजात उच्च दर्जाची अध्यात्मिकता आणणें शक्य असतें. तमोगुणी माणसांचे रजोगुणी माणसांत बदल करणे आणि त्यापुढे रजोगुणी माणसांचे सत्वगुणी माणसांत बदल करणे व शेवटी सत्वगुणी माणसांचे संतगुणी माणसांत, ह्या पद्धतीने सर्व समाजाचा अध्यात्मिक विकास करता येतो.

पाश्चात्य देशात जे मानसशास्त्र विकसित झाले आहे ते ह्या तम, रज व सत्वगुणांच्या चिकित्सेवर आधारित नाही. त्यांचें मानसशास्त्र ख्रिस्ती धर्म तत्वज्ञानावर आधारित आहे. ख्रिस्ती तत्वज्ञानात पुर्नजन्म, आत्मा, संचीत, प्रारब्ध, पापपुण्य कर्म विपाक ह्या हिंदू तत्व ज्ञानातील संकल्पना मानत नाहीत. त्यामुळें त्यांच्या संस्कारात व आपल्या संस्कारात बराच मोठा फरक आढळून येतो. मानसशास्त्र हे अशारितीनें निरनिराळ्या धर्माच्या लोकांसाठी वेगवेगळे ठरत असते. पाश्चात्य मानसशास्त्राला ख्रिस्ती मानसशास्त्र असें म्हणावें लागेल व आपल्या येथील मानसशास्त्राला हिंदू मानसशास्त्र असें म्हणावें लागेल. कारण, एकाच मनोरुंग्णाचे पाश्चात्य ख्रिस्ती मानसशास्त्रा प्रमाणें केलेले निदान व हिंदू मानसशास्त्रा प्रमाणें केलेले निदान ह्यात बराच मोठा फरक आढळून येतो. अनेक मनोरुंग्णावर हिंदू मानसशास्त्रानुसार लक्षण चिकीत्सा करून उपाय केल्यास लवकर परिणाम होतो असें सिद्ध झाले आहे. पाश्चात्यांना हि चिकीत्सा माहीत सुद्धा नाही. असें जरी असले तरी पाश्चात्य विद्वान त्यांचे मानसशास्त्र धर्म निरपेक्ष आहे असा खोटा दावा करीत असतात. आपल्या येथें मानसशास्त्र असें वेगळे शास्त्र मानण्याची प्रथा नाही. अध्यात्म शास्त्राचा एक उपभाग असेंच त्याचें स्वरुप समजले जाते.

## सत्वगुणांची लक्षणे

जसें तमोगुणाचे दुर्जनगुण व तमोगुण असें दोन भाग होतात तसेंच, रजोगुणाचें सुद्धा दोन प्रकार असतात ते असें, तमोरजोगुण व रजोसत्वगुण. सत्वगुणाचें सुद्धा दोन भाग आहेत. त्यातील एका भागास सत्वगुण म्हणतात व दुसऱ्या भागाला संतगुण म्हणतात. त्यामुळें गुणांचे एकंदर सहा प्रकार होतात. १) दुर्जनगुण, २) तमोगुण, ३) तमोरजोगुण, ४) रजोसत्वगुण, ५) सत्वगुण, ६) संतगुण असें हे सहा गुण प्रकार असतात. माणसाचा अध्यात्मिक विकास होण्यासाठी त्याला ह्या सहा गुणांपैकी कोणत्या गुणात तो आहे ते समजणे आवश्यक असतें. त्यालाच त्या साधकाचा 'अध्यात्मिक पत्ता' असें समजले जाते. संतगुणी माणूस मोक्ष साधना करण्यासाठी योग्य मानला जातो. ह्याचा अर्थ साधकाला एकदा त्याचा अध्यात्मिक पत्ता समजला कि, त्याला साधना त्यानी कशा प्रकारे करावयाची हे समजणे शक्य होते. निरनिराळ्या साधकांची साधना त्यामुळें निरनिराळी असण्याचे कारण हेंच आहे. समजा, साधकाला समजलें कि, तो दुर्जनगुणी आहे, तर त्याला तमो साधना करून प्रथम तमोगुणी अवस्थेत यावें लागेल. त्यानंतर रजो साधना करून रजोगुणी अवस्थेत

जावें लागेल, त्यानंतर सत्व साधना करून सत्वगुणी व्हावे लागेल. अशारितीने पायऱ्या पायऱ्यांनी तो आपली प्रगति करून स्वताचा अध्यात्मिक पत्ता सावकाशपणे सुधारत अखेरीस संत साधना करून संत अवस्थेत पोहोचू शकतो. आणि त्यानंतर मगच तो मोक्ष साधना करु लागला तर त्याला त्यात यश प्राप्त होते. दुर्जनगुण हा सर्वात खालचा गुण आहे व संतगुण हा सर्वात वरचा गुण आहे. जर समजा, एकाद्या साधकांनी घाई करून वरच्या पातळीची साधना करण्यास सुरुवात केली तर ते त्याला जमत नाही, आणि साधना करणे अशक्यप्राय झाल्यामुळें तो साधना सोडून देण्याची मोठी शक्यता असते. त्यामुळें त्याचा अशा साधनां वरील विश्वास उडतो. आणि त्या विरुद्ध तो बोलू लागतो. हे टाळण्यासाठी साधकांनी साधना सुरु करण्या आधी योग्य चाचणी करून आपला अध्यात्मिक पत्ता शोधून काढून त्यानुसार साधना करणे जरूरीचे असते. ह्या सर्व साधनेच्या पायऱ्यांना एकत्रित मिळून 'प्रापंचिक साधना' असें म्हणतात. प्रापंचिक साधना, लक्षण चिकित्सेवर अवलंबून असल्यामुळे आता आपण लक्षण चिकित्सा काय असतें ते समजून घेऊ या.

लक्षण चिकीत्सा- तीनशे वर्षापूर्वी स्वामी समर्थ रामदास ह्यांनी हि लक्षण चिकित्सा प्रथम वापरून आपल्या शिष्यांना प्रापंचिक साधना शिकविली. लक्षण चिकित्सा सामान्य माणसाला सहज वापरता येणारी साधना पद्धति आहे. त्यामुळे तीच आपण येथें पहाणार आहोत. लक्षण चिकीत्सा साधक कोणत्याही दुसऱ्या माणसाच्या मार्गदर्शना शिवाय करु शकतो. पुस्तक वाचून हि साधना करता येण्यासारखी आहे. विशेष म्हणजे साधक साधना करतोय हे सुद्धा कोणाला समजत नाही. त्यामुळे अशी साधना इतर लोकांच्या नजरेत न येतासुद्धा करतां येते. कांही साधकांना, ते साधना करीत आहेत हे कोणालाही समजू नये अशी इच्छा असतें, अशा लोकांना हि साधना पद्धति अतिशय चांगली वाटतें. शाक्तपंथात हि पद्धत प्रमाणित आहे.

लक्षण चिकित्सेमध्यें निरनिराळ्या गुणांची लक्षणें दिलेली असतात. साधकाला ती ल क्षणें वाचून त्यातील कोणती लक्षणें त्याला लागू होतात ते पहावें लागते. जर ते लक्षण हानिकारक असेल तर त्याप्रमाणें त्यानी वागू नये असा आदेश असतो. कांही लक्षणें सौम्य स्वरुपात उपयुक्त असतात तर तीच लक्षणें तीव्र स्वरुपात हानिकारक असतात. तर त्याप्रमाणे, आपण सौम्य आहोत कां तीव्र आहोत हे साधकांनी पाहून त्याप्रमाणें, आपले वागणे त्यांनी सुधारावयाचें असते. अशी ही साधी आणि सोपी साधना पद्धत आहे. निरनिराळी लक्षणें पाहून आपण त्याप्रमाणें आहोत कां नाही हे पहाणें आणि त्या प्रमाणें स्वताला मार्गदर्शन करणे हे काम जी बुद्धि करते त्या बुद्धीला 'शिपाई बुद्धि' असें म्हणतात.

मनात विचार येत असतांना त्या विचारांचें सतत परिक्षण करण्याच्या कमी  हि शिपाई बुद्धि मदत करीत असते. प्रापंचिक साधनेत शिपाई बुद्धीचे काम फारच महत्वाचें असते. जो साधक हि शिपाई बुद्धि विकसित करतो तो ह्या साधनेत यशस्वी होतो. इतके ह्या शिपाई बुद्धीचे माहात्म्य आहे.

आता, सत्वगुणांची लक्षणे काय असतात ते पाहू या. सत्वगुणी माणसांचे मोठे ल क्षण आहे, समाधानी असणें. आहे त्या परिस्थितीत हि माणसे समाधानानें रहातात. आणखीन कांही पाहिजे असें त्याना कधी वाटत नाही. तमोगुणी माणसे सुद्धा अशा प्रकारे वागतांना बऱ्याच वेळा आढळून येते, परंतु, ह्या दोघांच्या भूमिकेत जमीन अस्मानाचा फरक असतो. तमोगुणी माणूस तसा वागतो कारण त्याला आणखीन कांही मिळविणें शक्य नसतें जसें, कोल्ह्याला द्राक्ष आंबट, अशी स्थिती असते अथवा निव्वळ आळस असतो. सात्विक माणसें आणखीन कांही मिळविणे शक्य असलें तरी जर तसें करण्यांची आवश्यकता नसेल, तर ते त्यापाठी न लागतां आपला वेळ दुसऱ्या चांगल्या कामात खर्च करणे पसंत करतात. थोडक्यात, सात्विक माणसाला लोभ हा दोष कमी असतो. असें म्हणतात किं, सात्विक माणूस कोण असा जर कोणी प्रश्न विचारला तर त्याची व्याख्या करतात किं, ज्या माणसात काम, क्रोध, लोभ, मोह हे दोष अल्प स्वरुपात आहेत आणि मद व मत्सर अतिशय सुक्ष्म स्वरुपात आहेत असा माणूस. तमोगुणी माणसाची व्याख्या आहे, असा माणूस कि, ज्याच्यात मद आणि मत्सर हे दोष फारच तीव्र स्वरुपात आहेत. बाकीचे दोष अर्थातच त्यामुळे तीव्र स्वरुपातच असणार हे उघडच असतें. रजोगुणी माणसाची व्याख्या अशी करता येईल किं, असा माणूस जो, जर हवे तसें मिळाले तर थोडा काळ समाधानी जरुर रहातो परंतु, कांही वेळानंतर त्याला अधिक मिळविण्याची तीव्र इच्छा होते कारण, त्यानी लोभ ह्या दोषाचे योग्य नियंत्रण केलेले नसते. म्हणून रजोगुण हा लोभ ह्या षड्-रिपुचा परिणाम असतो असें मानतात. संतगुणी माणसाला मद व मत्सर हे दोष बिलकूल नसतात. आणि त्यामुळें त्याचे इतर षड्रिपु सुद्धा अतिशय कमजोर अवस्थेत असतात.

समाधान, आनंद व सुख हे शब्द बऱ्याच वेळा एकाच अर्थानी वापरले जातात. परंतु शास्त्रार्थ पहाता ह्या तीन अवस्था एकच नसतात. जेव्हां माणसाला इच्छा होते आणि ती पूर्ण होतें, तेव्हां त्याला आनंद होतो. जर इच्छा पूर्ण नाही झाली तर, त्याला क्रोध होतो किंवा जर तो कमजोर असेल तर तो दु:खी होतो. पुन्हा पुन्हा इच्छा होत गेली आणि तशीच पुन्हा पुन्हा ती पूर्ण होत गेली तर, तो माणूस सुखी होतो. पुन्हा पुन्हा इच्छा नाही पूर्ण झाली तर तो निराशावादी होतो. अशाप्रकारे, रजोगुणी आणि तमोगुणी लोकांची अवस्था होत रहाते.

सत्वगुणी माणसाच्या बाबतीत मात्र तसें होताना दिसत नाही. कारण, सात्विक माणूस इच्छा पूर्ण झाल्यावर समाधानी होतो. त्याला पुन्हा पुन्हा अधिक इच्छा होत नाहीत, समाधानी अवस्था अशी असतें किं, त्याच प्रकारची दुसरी तीव्र इच्छा त्याला होत नाही. त्यामुळे आनंदी व दु:खी अशा अवस्थांतून तो सहसा जात नाही. समाधानी अवस्था हि आनंदी व सुखी ह्या दोन अवस्थांपेक्षा अधिक श्रेष्ठ असते.

सत्वगुणी माणसाची वेगळी लक्षणें नसतात. रजोगुणी माणसाच्याच लक्षणांतून आपण सत्वगुणी माणूस तशा परिस्थितीत कसा वागेल ते जरी पाहिले तरी आपल्याला सत्वगुणी माणसाची लक्षणें काय असतात ते समजणे सोपे होईल. त्यासाठी आता आपण आधी पाहिलेल्या रजोगुण लक्षणांचाच पुन्हा विचार करणार आहोत. ह्या ठिकणी आपण प्रथम रजोगुणी लक्षणं पहाणार आहोत व त्या परिस्थितीत सत्वगुणी माणूस कसा वागतो ते पहाणार आहोत. कांही बाबतीत तमोगुणीचे वागणें सुद्धा दिले आहे.

१) सात्विक माणूस प्रपंचात रहाणें पसंत करतो परंतु, प्रपंचातील बऱ्या वाईट अनुभवांवरून तो सतत कांही तरी शिकत असतो. त्या अनुभवांवरून तो संसारातील निरर्थकता समजून घेण्याचा सतत प्रयत्न करीत असतो. संसारातील चांगल्या अनुभवांमुळे तो फारसा हुरळून जात नसतो व वाईट अनुभवांमुळे तो फारसा खच्ची सुद्धा होऊन जात नसतो. मुळातच सात्विक माणसांचे मद आणि मत्सर हे दोष फारच कमी तीव्र असतात. किंबहुना, त्यामुळेंच आपण त्याला सात्विक माणूस असें म्हणत असतो. थोडक्यात असें सांगता येईल किं, सात्विक माणूस संसार, एक आपली जबाबदारी आहे, असें समजून करीत असतो. आणि तो त्यात फारसा गुंतून घेणे योग्य मानत नाही. रजोगुणी माणूस मात्र त्यात पुरतां गुंतून जात असतो.

२) वैराग्य, संन्याशी प्रवृत्ति ह्या गोष्टींबद्दल सात्विक माणसाला आकर्षण असतें. त्यांच्या बद्दल अधिक माहिती मिळविण्याचा सतत प्रयत्न करीत असतो. अशा प्रवृत्तीच्या लोकांच्या बद्दल तो आदर बाळगून असतो. म्हणजे, ह्या लक्षणाच्या बाबत असें दिसून येतें किं, रजोगुणी आणि सत्वगुणी माणसांची एकंदर वागणूक परस्पर विरोधी असतें.

३) सात्विक माणसाची इंद्रिय सुखाची गरज रजोगुणी माणसा प्रमाणें तीव्र नसते. त्यामुळे तो इंद्रिय सुखांच्य बाबत नेमस्त असतो. त्याला इंद्रिय सुखांचा लवकर कंटाळा येतो. वस्तुत: इंद्रिय सुखांच्या नंतर माणसाला तातपुरती संतृप्तिची भावना येत असते, रजोगुणी माणसात अशी भावना आली किं, तो थोडा काळ त्या इंद्रिय सुखापासून दूर रहातो खरा, परंतु जशी

ती संतृप्ति संपते तसा तो पुन्हा त्या सुखाच्या पाठी जावू लागतो. सात्विक माणसाच्या बाबतीत मात्र तसें नेहमी होत नाही. तो संतृप्ति नंतर बराच काळ त्या सुखाच्या बाबत विचार करीत रहातो. त्याला जसें त्या सुखाच्या मर्यादांचे ज्ञान होतें, तसें तो सात्विक माणूस त्या सुखांच्या बाबत कमी उत्साही होत जातो. अखेरीस तो इंद्रिय सुखांपासून दूर रहाणेंच पसंत करु लागतो. इंद्रिय सुखांच्या विरुद्ध जर कोणी त्याची कानउघडणी केली तर त्याला त्या माणसाचा राग बिलकूल येत नाही. उलट पक्षी तो सात्विक माणूस त्या सल्ल्याचा काळजी पूर्वक विचार करतो. सात्विक, शाश्वत सुख पसंत करतो, इंद्रिय सुख अशाश्वत असते.

४) वैराग्याबद्दल सात्विक माणसाला नेहमीच कुतुहल वाटत असतें. इंद्रिय सुखांपेक्षा वैराग्यामुळें काय आत्मसंतुष्टता मिळते त्याची अधिक माहिती करून घेण्याचा तो नेहमीच प्रयत्न करीत असतो. इंद्रिय सुखांची त्याला विशेष उत्सुकता नसते. ह्याचा अर्थ असा मात्र नाही किं, हे लोक लैंगिक दृष्ट्या कमजोर असतात. सात्विक स्त्री लैंगिक सुखाबद्दल विशेष उत्सुक नसते.

५) आत्मशुद्धिच्या दृष्टीकोनातून गोष्टी पहिले तर रजोगुण, अध्यात्मिक प्रगति कुंठवून त्याला अध्यात्मिक दृष्टीने जेथल्या तेथें ठेवतो. सत्वगुण (लक्षणे पहा), अध्यात्मिक विकासाला मदत करतो. तमोगुण, अध्यात्मिक ऱ्हास करतो. म्हणून साधकांनें आपले त्रिगुण तपासणें जरुरीचे असतें. सत्वगुणी होणे जर त्याला शक्य नसेल तर निदानपक्षी तमोगुणी न रहावें अशी दक्षता
साधकांनी बाळगावी अशी किमान अपेक्षा असतें.

६) आपल्या व आपल्या कुटूंबाप्रमाणें इतर जणांचें सुद्धा कल्याण झाले पाहिजे अशी सात्विक माणसांची व्यापक विचारसरणी असतें. त्यामुळें त्यांच्या जीवनात, ‘सर्वे सुखीनासंतु सर्वे भद्राणि पश्यंतु’ म्हणजें, सर्व सुखी होवोत व सर्वांचे भले होवो अशी विचारसरणी, तिचा मोठा प्रभाव असल्याचें आढळून येते. आपल्या कुटूंबाचे कल्याण झाल्यावर तो इतरांचे सुद्धा कल्याण करण्याचा सतत प्रयत्न करीत असतो.

७) हे माझे, हे माझे घर, हा माझा बाप, हि माझी जात, हा माझा धर्म, हा माझा देश अशाप्रकारची ‘मी’पणाशी विशेष घनिष्टता ठेवून तोसुद्धा विचार करतो, परंतु, इतरांच्या बाबत रजोगुणी माणसा प्रमाणें तो बेपर्वा मात्र नसतो. इतर गोष्टींचा तो तिरस्कार करीत नाही, जसें रजोगुणी करतात.

८) त्याचें गेले तर मी कशाला त्याची पंचाईत करु? माझे सर्व ठीक आहे ना? मग झालें तर! अशी विचारसरणी सत्वगुणी माणसात नसतें. सत्वगुणी माणूस इतरांना मदत करणे, एक सामाजिक जबाबदारी म्हणून आवश्यक समजतो. ह्यालाच आपण चांगुलपणा असें म्हणतो.

९) चांगले खावे, चांगले दिसावें, चांगले वस्त्र परिधान करावें, चांगले रहावें, आपण सुंदर दिसावें अशाप्रकारची विचारसरणी रजोगुणी लोकांप्रमाणें सत्वगुणी लोकांत सुद्धा असतें. वास्तविकत: हि रजोगुणी लोकांतील चांगली लक्षणें मानली जातात. अभिरुचीमध्ये सात्विक, राजसी आणि तामसी अभिरुची अशा रितीने तीन असतात. गुणातील (प्रवृत्तितील) सत्व, रज व तम ह्यांचा अभिरुचीतील ह्या सत्व, रज व तम ह्यांच्याशी कांहीही संबंध नसतो. गुणांनी सात्विक असलेला इसम अभिरुचीने तामसी असू शकतो. तसेंच गुणांनी तामसी असलेला इसम अभिरुचीने सात्विक असू शकतो. ह्याचा अर्थ असा किं, अभिरुची वरून माणसाचा गुण कोणता ते ओळखणें शक्य नसते. गुण व अभिरुची एकच असेल तर ते अतिउत्तम समजले जाते.

१०) आपला मतलब साधण्यासाठी तो सर्व नीतिमुल्यांना धुर्तपणें बगल न देता, समाजाचें नियम पाळून आपले काम साधून मोकळा होतो. त्यामुळें, समाजामध्यें, जे अनेक तऱ्हेचें भ्रष्टाचारांचे प्रकार आपण पहातो त्यांना सत्वगुणी प्रवृत्ति जबाबदार नसतें. सत्वगुणी माणसें समाजात भ्रष्टाचार वाढू नये म्हणून नेहमीच प्रयत्नशील असतात असें दिसून येते.

११) सत्वगुणी माणसें साधारणपणें रजोगुणी माणसांप्रमाणें अतिमहत्वाकांक्षी नसतात. त्यामुळें समाजाचे नियम न मोडता सुद्धा ते आपली कामे करतांत. त्याना कांहीही त्रास होत नाही. थोडक्यात असें सांगता येईल किं, लोभीपणांमुळे रजोगुणी माणूस अति महत्वाकांक्षी होतो आणि त्यामुळें त्याला समाजाचें नियम जाचक वाटू लागतात. दुसरे असें किं, सात्विक माणूस इतरांना बरोबर घेऊन आपली कामे करीत असतो, आपल्या प्रमाणें इतरांचा सुद्धा तो सारखाच फायदा करून देत असतो, तसें रजोगुणी माणूस करीत नाही तो फक्त स्वताचाच फायदा व्हावा अशा प्रकारे आपली सर्व कामे करीत असतो. ह्या त्याच्या स्वार्थीपणामुळें त्याला वेळोवेळी नियम मोडावे लागतात. सत्वगुणी माणूस सर्वांचाच फायदा करीत असल्यामुळें तो नियम न मोडता सर्वांच्या सम्मतिनें आपली कामे करु शकतो. ह्या विवेचनावरून कोणाला वाटेल किं, सत्वगुणी मंडळी महत्वाकांक्षी नसतात तर ते सुद्धा चुकीचे ठरेल. सात्विक माणसांची महत्वाकांक्षा लोभातून न येता एकाद्या तत्वनिष्ठेतून येत असते असें साधारणपणे आढळून येते.

१२) धन संपत्ति ह्यांचा संचय करण्याची प्रवृत्ति असतें. कंजूषपणा हे रजोगुणीचें एक महत्वाचें लक्षण मानलें जाते. म्हातारपणासाठी पैसे साठविणे तसेंच पुढील जन्मी चांगला जन्म मिळावा ह्यासाठी देवांकडे साकड घालणें रजोगुणी माणूस योग्य मानतो. आपल्या सुरक्षिततेसाठी तो फारच जागरूक असतो. फार दूरचा विचार तो नेहमी करीत असतो. सत्वगुणी माणसात सुद्धा हि रजोगुणी माणसाची लक्षणें असतात. बऱ्याच वेळा सात्विक इसम दुसऱ्यासाठी सुद्धा ह्यासर्व गोष्टी करतांना दिसून येते.

१३) सत्वगुणी माणूस कायदे मोडण्याच्या विरोधातच असतो. कायद्यातील पळवाटांचा सुद्धा तो उपयोग करणें अयोग्य समजतो. लुबाडणें, हक्क छिणणें किंवा कोणताही गुन्हा तो करु इच्छित नाही. सात्विक माणसें खऱ्याखुऱ्या प्रतिष्ठेने समाजात रहातात. चुकीनें जरी एकादी अयोग्य गोष्ट त्यांच्या हातून घडली तर त्याचा त्यांना फार त्रास होत असतो.

१४) आपण दुसऱ्यांच्यापेक्षा नेहमी वरचढ असलो पाहिजे अशी त्यांची धडपड नसतें. परंतु, आपण सतत प्रगति करीत असले पाहिजे असें मात्र त्याला वाटत असतें. आपल्यापेक्षा कोणी पुढे गेला तर रजोगुणी माणसा प्रमाणे तो मत्सरी होत नाही उलट, त्यानी प्रगति कशी केली ते त्याच्या कडून शिकण्याचा अथवा स्वतः शोधण्याचा तो प्रयत्न करतो.

१५) आपण इतरापेक्षा वरचढ आहोत किं नाही हे तपासण्यासाठी सात्विक लोक कधी कधी इतरांबरोबर आपली तुलना करून पहात असतात. आणि जर त्यात ते कमी आहेत असें दिसलें तर ते अस्वस्थ होतात. आपण कमी कां? हे शोधण्याचा ते प्रयत्न करतात, आणि त्याप्रमाणे ते आपल्या काम करण्याच्या पद्धतीत सुधारणा करतात. रजोगुणी लोकांप्रमाणे फक्त इतरांचा मत्सर करीत बसत नाहीत. समाजातील चुरशीचें, चढाओढीचें खेळ, शर्यती असें प्रकार ह्या प्रवृत्तीतून निर्माण होतात. प्रसंगी युद्धे आणि मारामाऱ्या असें प्रकार सुद्धा घडतात. तसेंच शिकण्याच्या व आपल्यात सुधारणा करण्याच्या ह्या प्रवृत्तीमुळे असा समाज प्रगति करीत जातो. तमोगुणी, यशस्वी प्रतिस्पर्ध्यांचा नाश करण्याचा विचार करतो आणि त्याप्रमाणें कारवाया करीत असतो.

१६) सात्विक माणूस नम्र स्वभावाचा असतो. त्यामुळें तो रजोगुणी माणसांप्रमाणें आत्मप्रौढीने वागत नाही. दुसऱ्याचें विचार काय आहेत ते तो नीट समजून घेऊन मगच त्या प्रमाणें, म्हणजे इतरांच्या योग्य सल्ल्यानेच आपले निर्णय घेत असतो. दुसऱ्याला नीच ठरवून त्याद्वारा आपली उच्चता सिद्ध करण्याची उठाठेव हे लोक कधीही करीत नाहीत. आपले गुण सुधारुन त्याद्वारा आपली उच्चता ठरविणें ते योग्य समजतात.

१७) नम्रपणा हे सात्विक माणसाचे एक प्रमूख लक्षण आहे. त्यामुळें आपल्याच मस्तीत राहून वागण्याची पद्धत जी रजोगुणी माणसांत नेहमी आढळून येते, ती ह्यांच्यात दिसून येत नाही. मदभाव कमी असल्यामुळें, हे लोक समाजातील नियमांचे उल्लंघन सहसा करतांना दिसत नाहीत. अगदी नगण्य समजलेल्या मंडळींच्या प्रश्नांना सुद्धा ते आवर्जून उत्तरे देतात. तसें करतांना त्यात त्यांना कमीपणा बिलकूल वाटत नाही. रजोगुणी माणसांना मात्र तसें करतांना कधी कधी कमीपणा वाटतो म्हणूनच, ते तशा लोकांना एकतर उत्तरे देत नाहीत अथवा दुरुत्तरे करतात. कांही वेळा रजोगुणी माणसें सुद्धा कमी प्रतिच्या लोकांना उत्तरे देतात परंतु त्यात त्यांचा उद्देश असतो तो असें दाखविण्याचा किं, 'पहा मी किती दिलदार आहे ते,' तो केवळ नम्रपणाचा देखावा असतो. तमोगुणी इतरांशी नेहमीच उद्धटपणें वागतो.
१८) सात्विक माणसें आपल्या गोष्टींच्या बरोबर दुसऱ्यांच्या गोष्टींची सुद्धा काळजी घेतांना दिसून येतात. सर्वांचे भले व्हावे, असें त्यांचे नेहमी धोरण असतें. रजोगुणी माणूस जेव्हां दुसऱ्याच्या गोष्टींची काळजी घेतो तेव्हां त्यात त्याचा कांही तरी मतलब असतो. हा दोघांच्या दुसऱ्याला मदत करण्यात फरक असतो. मी तुझ्या गोष्टींची काळजी घेतो आहे तेव्हां, तू माझ्या गोष्टींची काळजी घ्यावयास पाहिजे, असा त्याचा रोखठोक व्यावहारिक उद्देश असतो.
१९) चोरी कोठेही झाली तर ती वाईटच आहे असा विचार सात्विक माणसें करतात. आणि चोराला हुडकून काढण्याच्या कामात मदत करतात. रजोगुणी माणसें अशी मदत वगैरे न करतां फक्त काय होते ती मजा बघत बसतात. तमोगुणी सुद्धा चोराला हुडकून काढतात आणि जबरी शिक्षा करतात.

२०) सात्विक माणूस नीतिमान असतो. त्यामुळे परस्त्री बद्दल त्याच्या मनांत वेडेवाकडे विचार येतच नाहीत. त्याची बाहेरची वागणूक आणि मनाची वागणूक ह्यात फरक नसतो. नैतिक मुल्ये कठोरपणे जपणें, ह्यात सात्विक माणसाचा अभिमान सामावलेला असतो. त्यामुळें तो 'थेंब थेंब पाणी गळे' अशा केविलवाण्या अवस्थेत कधीच नसतो. तमोगुणी, परस्त्रीला उघडपणें आवाहन करतो.

२१) सत्वगुणी माणसांकडून 'विडंबन' ह्या प्रकारातील पाप फार कमी होते. परंतु तसें झाल्यास त्याला सुद्धा रजोगुणी इसमांप्रमाणेच 'विटंबना' सहन करावी लागते. तमोगुणी सुद्धा विडंबन करतात. आणि विटंबना भोगतात.

२२) विटंबना ह्या प्रकारातील भोगाचा अनुभव बहूतेक प्रत्येकाला आपल्या जीवनात येत असतो, मग तो कोणत्याही गुणाचा असो. त्यासाठी, त्याचा विचार प्रत्येकांनी फार काळजी पूर्वक केला पाहिजे. मनातील पापामुळे मनालाच शिक्षा होत असतें. मन अस्वस्थ रहाणें,

मनात विनाकारण काळजी वाटत रहाणें, सतत संशयाने मन अस्वस्थ होणें, विनाकारण अथवा काल्पनिक कारणांने भिती वाटत रहाणें, दु:खावेग न आवरणें अशी अनेक उदाहरणे आपण विटंबनेच्या भोगाची अनुभवत असतो. त्याच प्रमाणें जीवनात विनाकारण इतरांकडून अपमान होणें, लोकांचे दुर्लक्ष होणें, इतरांचे सहकर्य न मिळणें, कामे वेळेवर न होणें, योगायोग न साधणे (गाडी चुकणें, वेळेवर न पोहोचणे, थोडक्यात चुकामूक होणें हि योगायोग सिद्धि नसण्याची उदाहरणें आहेत), गैरसमजामुळे मनस्ताप होणें, असें जीवनात बेजार करणारे अनुभव विटंबनेच्या रुपानी येत असतात. त्यामुळे कधी कधी जीवन नकोसे होऊन जाते.

२३) घरातील माणसांवर प्रेम करतात परंतु, त्यांच्यासाठी इतरांना त्रास देण्याची इच्छा मात्र त्यांच्यात मुळीच नसते. आपले आणि इतरांचे असें सर्वच लोक सात्विक माणसाला सारखेच प्रिय असतात. त्यामुळे कधी कधी जर पति सात्विक प्रवृत्तीचा असेल व पत्नी रजोगुणी असेल तर ह्या मुद्यावरून दोघात नेहमी वाद होतांना दिसून येतो. बहूधा बायका रजोगुणी असतात त्यामुळे, असें अनुभव सात्विक पुरुषांना नेहमी येतात.

२४) प्रियजन मृत झाले तर तो दु:खी होतो. परंतु, रजोगुणी माणसे दु:खी फार लवकर होतात आणि त्यांना आपला दु:खावेग आवरता येत नाही. तमोगुणी माणसे अशा वेळी बेपर्वाईने वागतात, तसें सात्विक माणसाचे होत नाही तो शांत बसणे पसंत करतो. आपल्या दु:खाचा तो देखावा करणें पसंत करीत नाही.

२५) खूप दु:खी होणें, खूप आनंदी होणें अशा तीव्र प्रतिक्रिया राजसी माणसें देतात आणि त्यामुळे हे लोक प्रसंगी आपला तोल घालवून नको त्या गोष्टी भावनेच्या भरात करून बसतात. तसें सात्विक माणसांच्या बाबत होत नाही. ते तटस्थभावांनी सर्व गोष्टींचा सामना करणे पसंत करतात. तटस्थभाव म्हणजें, मनाचा तोल न ढळू देता सर्व कामे करण्याचें धोरण.

२६) भावनाविवशता हे रजोगुणी माणसाचें एक मोठे लक्षण आहे. माझा संसार, माझा प्रपंच कसा यशस्वी होईल ह्या विवंचनेत ते नेहमी हरवून गेलेले असतात. सात्विक माणसांचे तसें नसते. ते फार भावनाविवश होत नाहीत. जीवनात येणाऱ्या सर्व अनुभवांकडे बघण्याचा त्यांचा दृष्टीकोन एकाद्या निरिक्षकासारखा शांतपणाचा असतो. त्यामुळे त्यांच्या मनाचा कधीही तोल जात नाही.

२७) सात्विक माणसें परिस्थितीनुसार थोडी फार काळजी जरूर करीत असतात, परंतु कळजी करीत रहाणे हे त्यांचे लक्षण आहे असें म्हणता येईल इतकी ते काळजी करीत नाहीत.

२८) बिंधास्तपणा, बेपर्वाई हे तामसी माणसाचे गुण ह्यांच्यात कमी प्रमाणात आढळतात, त्या ऐवजी सावधता हा गुण बऱ्यापैकी असतो. रजोगुणींत ह्या दोनही गुणांचे मिश्रण आढळून येते.

२९) सात्विक माणसे इतरांची सहानुभूति मिळावी म्हणून कांही खास मेहनत घेत नाहीत. त्यांचे वागणे रजोगुणी माणसांप्रमाणें दिखाऊ नसतें, ते स्वाभाविकपणें वागतात.

३०) साम, दाम, दंड आणि भेद ह्या धोरणांनी व्यावहारिक जगात कामे करावी लागतात. त्यातील साम आणि दाम हे रजोगुणी मार्ग आहेत व दंड आणि भेद हे तमोगुणी मार्ग आहेत. ह्याचा अर्थ व्यावहारिक जगात निव्वळ सत्वगुणी माणूस यशस्वी होणार नाही हे स्पष्ट होते, ह्याचा दुसरा अर्थ असा किं, व्यावहारिक जगात माणसाला केवळ सत्वगुणी असून चालत नाही तर रजोगुणी व कांही प्रमाणात तमोगुणी असणें आवश्यक असतें. अशा परिस्थितीत सात्विक माणूस 'धोरणात्मक' रजोगुण व तमोगुण धारण करून आपली कामे करून घेऊ शकतो. खोटे रागावणे, खोटे रुसणें, खोटा आनंद दाखविणें, खोटे दु:ख दाखविणे अशी अनेक प्रकारची नाटके माणसाला आपल्या जीवनात, आपली कामे व्हावीत म्हणून, आता करावी लागतात ती सर्व 'धोरणात्मक' ह्या तत्वात येतात. आणि सात्विक माणूस जर व्यवहार चतूर असेल तर तो ह्याप्रमाणे धोरणात्मक गुण धारण करून आपली कामे करून घेऊ शकतो.

३१) दुसऱ्याला मदत करणे व सहानुभूति दाखविणें हे सात्विक माणसाचे मूख्य गुण आहेत. परंतु, त्यापासून स्वताचा कांही खास फायदा झाला पाहिजे अशाप्रकरचे त्याचे धोरण नसते. शक्यतर तो अशा कामाची इतर लोकांत फारशी जाहिरात होणार नाही ह्याची दक्षता बाळगतो. केवळ चांगुलपणा एव्हढाच त्याचा उद्देश असतो.

३२) सात्विक माणसाला सर्वांची फार काळजी असते आणि तो दानशूर, दिलदार असतो. त्यामुळे ह्या माणसाचे समाजातील स्थान पक्के असते. ह्या त्यांच्या गुणामुळे समाजाची बरीच कामे सुरळीतपणे होतात. समाज घडविण्यात हा सत्वगुणी लोकांचा स्वभाव मोठी मदत करीत असतो. रजोगुणी माणसांप्रमाणें, सात्विक माणसे आपल्या कामांचा दिंडोरा पिटत नाहीत.

३३) पाहिजे ते मिळाले किं, सात्विक माणसें सहाजिकच खुष होतात परंतु, जर नाही मिळाले तर ते फार दु:खी होत नाहीत, त्यांच्या सर्वच प्रतिक्रिया तीव्र नसतात. संपूर्ण संयमाने व सावधतेने ते सदैव वागतात.

३४) स्वताचें काम शक्यतर स्वत:च करणे ते पसंत करतात. दुसऱ्याच्या चांगुलपणाचा ते कधीही गैर फायदा घेत नाहीत.

३५) सत्वगुणी माणूस रजोगुणी माणसा प्रमाणें हास्यविनोद, साहित्यप्रेम, करमणुकीचे खेळ असें समाजकारक प्रसंग घडवितो आणि त्यामुळें समाजात नवचैतन्य निर्माण होते. हे लोक नववासी प्रवृत्तीचें असतात.

३६) लेखक, पत्रकार, शास्त्रज्ञ, संशोधक (नवीन कल्पना विकसित करणारे), अन्वेषक (नवीन गोष्टी शोधून काढणारे), कवी, नाटककार, चित्रकार, धाडसाची कामे करणारे, इतरांना अशा कामात उत्तेजन देणारे, पुढाकार घेऊन सहाय्य करणारे, कारागीर, शिल्पकार अशी गुणी माणसें सत्वगुणी असतात. हा आणखीन एक गुण रजोगुणी आणि सत्वगुणी ह्यांच्यात सारखा असतो. समाजाच्या संस्कृतीचा आणि उत्तम अभिरुचीचा विकास सत्वगुणी व रजोगुणी लोक मिळून करतात.

३७) दुसऱ्याच्या भानगडीत सात्विक लोक सहसा लक्ष घालीत नाहीत. आपले काम बरें किं, आपण बरें अशी, त्यांची वागण्याची पद्धत असतें.

३८) नसत्या उचापति करणे हा रजोगुणी लोकांचा छंद असतो, तसें ह्यांच्यात नसतें.

३९) अनेक प्रकारचे छंद जोपासणें आणि त्याद्वारा आपला वेळ घालविणें. हा एक गुण रजोगुणी आणि सत्वगुणी ह्यांच्यात सारखाच असतो.

४०) रजोगुणी लोकांप्रमाणेंच सत्वगुणी लोक सुद्धा करमणुकीचें अनेक खेळ, छंद, नाटके, नृत्यकला, सिनेमे अशा गोष्टींतून उद्योग निर्माण करून त्यातून समाजाचें मनोरंजन करतात. ह्याच्या अतिरेकातूनच तमोगुणी उद्योग सुरु होतात. जसें जुगाराचे अड्डे, दारुचे गुत्ते, कुंटणखाने, अफिमखाने वगैरे.

४१) फुकट कांहीही सत्वगुणी माणसांना नको असते. प्रत्येक गोष्टीची योग्य किंमत देऊन ती घेणें त्यांना आवडते.

४२) खूप कष्ट करण्याची, मोठ्या जबाबदाऱ्या घेऊन काम करण्याची आणि त्याद्वारा मोठे होण्याची इच्छा असतें. अशाप्रकारे, काम करून यश मिळाल्यावर रजोगुणीं प्रमाणें सत्वगुणी लोक मातून जात नाहीत.

४३) सात्विक माणसें उगाचच आव्हाने देणे अथवा घेणें असें नसते उद्योग करीत नाहीत. परंतु, जर कोणी आव्हान दिले तर ते आव्हान ते स्वीकारतात आणि आपल्या कुवती प्रमाणे ते पार पाडण्याचा प्रयत्न करतात. जर कुवत नसेल तर मात्र ते तसले आव्हान स्वीकारतच नाहीत. आपल्या मर्यादा हे लोक चांगल्यापैकी जाणून वागत असतात. रजोगुणी माणूस कुवत नसली तरीसुद्धा आव्हान घेऊन त्यात मार खाल्ला तरी हुशारी करीत रहातात. तामसी माणसाला सुद्धा कुवती बाहेरील आव्हाने घेऊन स्वताची फटफजिती करून घेण्याची खुमखुमी असते.

४४) जिंकल्यावर, रजोगुणी माणसे हरलेल्याला चांगली वागणूक देतात, तमोगणी माणसें त्याला छळतात. प्रसंगी मारून टाकतात हा दोन गुणातील फरक असतो. सत्वगुणी माणूस जिंकल्यावर हरलेल्याला चांगली वागणूक देतातच परंतु, त्याही पुढे जाऊन ते हरलेल्याला सुधारण्याचा प्रयत्न करतात.

४५) शरण आलेल्याला रजोगुणी माणसे नुकसान भरपाई म्हणून कांही दंड करतात, तमोगुणी माणूस तरीसुद्धा शिक्षा करतो, तर सात्विक माणूस क्षमा करतो, मात्र त्यामुळे कधी कधी दुर्जनांचे फावते.

४६) देव, धर्म मानणारे असतात, जरी देव मानत नसला तरी इतरांच्या भावनांचा मान ठेवून वागतात.

४७) सात्विक माणसें साधना चांगली करु शकतात. रजोगुणी चांगली साधना करु शकत नाहीत. तमोगुणी साधना करण्याचें सोंग करतात अथवा त्या गोष्टीत पडत नाहीत.

४८) देवाकडे नवस वगैरे करतांना रजोगुणी आणि तमोगुणी लोकांप्रमाणे हे धंदेवाईक रित्या विचार करीत नाहीत. सत्वगुणी माणसें बहूधा भाविक स्वभावाची असतात. त्यामुळे त्यांची देवादिकांकडे बघण्याची दृष्टीसुद्धा तशीच निर्मळ असते. पूर्ण श्रद्धेने ते नवस करतात आणि त्यामुळे त्यांचे नवस लवकर आणि चांगल्या प्रकारे फिटतात. शाक्तपंथात नवस करण्याच्या तंत्राचा मोठा विचार केला आहे. त्या प्रमाणें, नवस करणारा इसम जर मद व मत्सर ह्या दोन दोषांपासून पूर्णपणे दूर असेल तर देव पावतो व म्हणून नवस खात्रीने फिटला जातो. माणसावर ह्या दोन दोषात जितका जास्त प्रभाव तितका देव पावण्याचा व नवस फिटण्याचा संभव कमी असें असते. ह्यासाठी नवस बोलणाऱ्या इसमांनी आपले मद व मत्सर हे दोष काबूत ठेवणे जरूरीचें असते. (देवाकडून नवस फिटला किं, मग भक्त नवस फेडतो)

४९) देवांची तुलना करणे हे सात्विक माणसाच्या स्वभावात नसते. त्यामुळे रजोगुणी माणसा प्रमाणे त्याचे मन चलबिचल होत नाही. देव मानत नसल्यास तो इतरांच्या भावनांवर वाईट

मत प्रदर्शन करीत नाही. देव, धर्म न मानणारा सात्विक माणूस प्रापंचिक साधना मात्र चांगल्या प्रकारे करु शकतो

५०) दान करतांना सात्विक माणसें हिशोबाने वागत नाहीत. त्यामुळे कधी कधी त्यांच्या कडून अयोग्य व्यक्तिस दान होण्याची शक्यता असते. अशा दानामुळें समाजात खोटे भिक्षेकरी निर्माण होऊन अनेक चुकीच्या गोष्टी घडण्याची शक्यता असते. अतिदानशूरपणा हा सात्विक माणसाचा एक महत्वाचा दोष आहे. अति दयाळूपणा हा आणखीन एक दोष सात्विक  लोकांत आढळून येतो. त्याचा सुद्धा गैरफायदा घेतला जात असतो.

५१) रजोगुणी माणसें सकाम भक्ति करतात, त्यांना निष्काम भक्ति करणे जमत नाही. सात्विक माणसें सकाम आणि निष्काम अशा दोनही प्रकारच्या भक्ति करु शकतात. तमोगुणी भक्ति करण्याचा बराच प्रयत्न करतात परंतु, त्यांना त्यांच्या वासनिकतेमुळें ते जमत नाही, मग सोंग ढोंग करतात आणि त्यालाच भक्ति असें समजतात.

५२) रजोगुणी माणसें फायद्या तोट्याचा हिशोब देवाशी सुद्धा व्यवस्थितपणे करतात. देवांशी, मी तुझी एव्हढी भक्ति केली मला काय मिळाले? त्याला दिलेस मग मला कां नाही? अशा प्रकारे ते तक्रार करतांना दिसतात. सात्विक माणसें जर सकाम भक्ति करीत असतील तर तेसुद्धा अशाप्रकारे देवाशी बोलतात हे जरी खरे असले तरी, शेवटी आपल्या भक्तित कांहीतरी कमी राहून गेले असेल असें मानून स्वतालाच दोषी ठरवतात. जर त्यांची भक्ति निष्काम असेल तर ते देवाशी अशाप्रकारे बोलतच नाहीत. संतगुणी माणसें मात्र देवाशी अशाप्रकारे कधीच बोलत नाहीत. कारण संतगुणी माणसें नेहमीच निष्काम भक्तिच करतात.

५३) सत्वगुणी माणसांना यश, पैसा, अधिकार, सत्ता, सौंदर्य, बळ. बुद्धि ह्या सात संपत्तींचा कधीही गर्व होत नाही. त्यामुळे हे लोक ह्या सर्व संपत्ति प्राप्त झाल्यावर सुद्धा मातून जात नाहीत.

५४) स्वतासाठी कष्टाची कामे करतांना सत्वगुणी लाजत नाही. कष्टाचें महत्व ते चांगलेच ओळखून असतात, त्यामुळे कष्ट करणाऱ्या लोकांबद्दल त्यांच्या मनांत नेहमीच आदरभाव असतो. कष्टकऱ्यांना कमी कष्टात तेंच काम करतां येईल कां? त्याबद्दल तो प्रयत्न करतो. रजोगुणी, कष्टाची कामे करण्यास कमीपणा समजतात. कष्टकऱ्यांबद्दल रजोगुणी लोकांत आदरभाव नसतो. त्यांचे कष्ट कमी करण्याची काय गरज? अशाप्रकारे ते विचार करतात. तमोगुणी, कष्टकऱ्याचें कष्ट कमी करण्या ऐवजी वाढले तर काय हरकत आहे? अशाप्रकारे विचार करतो.

५५) गरीब, दीनदुबळे ह्याच्या बाबत सत्वगुणी नेहमी सेवाभावी असतात. रजोगुणी सुद्धा तसें असतात परंतु, रजोगुणी लोकांची हि दीनदुबळ्यांची सेवा समाजात आपली पत सुधारण्यासाठी असतें. तमोगुणी, अशा लोकांचें हाल करण्यात आनंद मानतात. ‘मरु देत त्यांना’, अशा प्रकारे ते ह्या असहाय लोकांबद्दल बोलतात.

५६) सत्वगुणी माणसें इतरांना नेहमी त्यांच्या हिताचा सल्ला देतात. रजोगुणी स्वताचा फायदा होईल असा सल्ला देतात. तमोगुणी, इतरांना मुद्दाम चुकीचा सल्ला देऊन त्यांची मजा पहाणें पसंत करतात.

५७) आपल्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांचा ते कधीही अपमान करीत नाहीत.

५८) जर त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या माणसाकडून कांही चूक झाली तर ते त्याला ती चूक नीट समजावून सांगून त्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न करतात, त्याचा अपमान करून त्याला नामोहरम करण्याची चूक सात्विक माणूस कधीही करीत नाही.

५९) दुसऱ्यांची मते, अभिप्राय वगैरे सर्व नीटपणें ऐकून घेऊन मग त्यांचा पूर्ण विचार करून आपला निर्णय ठरवितात.

६०) प्रेमळपणा, दयाळुपणा सहानुभुतीने वागणे हि सत्वगुणी माणसांची लक्षणे आहेत. सत्वगुणी माणसांचा परकेपणा सुद्धा प्रेमळ असतो तर, रजोगुणी व तमोगुणी लोकांचा परकेपणा तिरसटपणांनी भरलेला असतो.

६१) दुसऱ्याला मदत केल्यावर त्याची वाच्यता सात्विक कोठेही करीत नाहीत. तर रजोगुणी, त्याची एकसारखी आठवण करून देतात. रजोगुणींत चांगली व वाईट अशी सर्वच प्रकारची लक्षणें आढळून येतात. तमोगुणी लोकांत जी लक्षणें आढळतात ती साधारणपणें वाईटच असतात तर सत्वगुणी लोकांत आढळणारी लक्षणें बहुधा चांगलीच असतात. चांगली म्हणजे, आत्मशुद्धिच्या दृष्टिने चांगली, असा अर्थ समजावा. रजोगुणी व सत्वगुणी माणसात फरक एव्हढांच असतो किं, रजोगुणी आपल्या चांगल्या कार्याचा देखावा करून समाजात मिरवत रहातो तर, सात्विक तसें करीत नाही.

६२) सात्विक माणसें धार्मिक प्रवृत्तीची असु शकतात, आणि दुसऱ्या लोकांतील चांगले गुण ओळखून त्यांचा सत्कार करणें योग्य समजतात. रजोगुणी, दुसऱ्यातील सद्गुणांपासून आपल्याला काय फायदा होईल का? ते पाहून मगच त्याचा सत्कार करतात. तमोगुणीला दुसऱ्यातील सद्गुण समजून घेण्याची कधीही गरज वाटत नाही.

६३) दुसऱ्याच्या दु:खात मनापासून सामील होतात. रजोगुणी, तसें नाटक करतात. तमोगुणी दुर्लक्ष करतात.

६४) प्रामाणिकपणा हा सात्विक लोकांचा मोठा गुण असतो. ते पूर्णतया विश्वसनीय असतात. रजोगुणी, आपण फारच विश्वसनीय आहोत असें एकसारखे सगळ्यांना सांगत रहातात. तमोगुणी आपण बेभरवशाचें आहोत असें, स्पष्टपणें सांगताना आढळून येते. त्यांना ते अप्रामाणिक आहेत ह्यांची बिलकूल लाज वाटत नाही.

६५) गुप्त गोष्टी सात्विक लोकांच्याकडे गुप्त रहातात. रजोगुणींकडे तसें रहाण्याची शक्यता असते. तमोगुणी, त्यांचा वापर करून एकाद्याची कोंडी करणें (ब्लॅक मेल) मोठ्या हुशारीचे समजतात. सत्वगुणी लोक तमोगुणी लोकांशी मैत्री करीत नाहीत. तसेंच तमोगुणी, सत्विकांना टाळतात. रजोगुणी मात्र सर्वांशी मैत्रीसंबंध ठेवून असतात. त्यामुळें समाज घडतो. सात्विक लोक सद्गुण ग्राही असतात तर, रजोगुणी सद्गुणाचे नुसते चाहते असतात तर तमोगुणी सद्गुणाचा तिटकारा करतात. असें जरी असलें तरी कोणताही एक माणूस पाहिला तर, तो ह्या सर्व गुणांचे मिश्रणातून बनलेला असतो असेंच दिसून येते. जेव्हां परिस्थिती अतिशय सोयीस्कर असतें तेव्हां तमोगुणी माणूस सुद्धा सात्विक असल्या सारखा वागत असतो. तसेंच परिस्थिती फारच बिघडली असेल तर सात्विक माणूस सुद्धा तमोगुणी असल्यासारखा वागण्याची शक्यता असते. साधक आणि साधारण माणूस ह्यांच्यातील फरक अशा वेळीच समजून येतो. सात्विक साधक कोणत्याही परिस्थितीत आपला गुण सोडत नाही. उलटपक्षी हीच आपल्या परीक्षेची खरी वेळ आहे, असे मानून तो साधक, वाईट परिस्थितीत सुद्धा सात्विक बनून रहाण्याचा सतत प्रयत्न करीत असतो.

६६) तमोगुणी स्त्री आपले सामर्थ्य सिद्ध करण्यासाठी दुसऱ्या स्त्रीचा संसार उद्ध्वस्त करण्यात धन्यता मानते, दुसऱ्या स्त्रीचा पुरुष तिच्या कडून ओढून घेणे, ह्यात ती मोठेपणा समजते तसें सात्विक स्त्री कधीच करीत नाही. रजोगुणी स्त्री बऱ्याच वेळा तशाप्रकारे थोडाबहूत प्रयत्न करण्याचा फक्त विचार करते प्रत्यक्ष करीत नाही असें दिसते.

## तम, रज व सत्वगुणी स्त्री पुरुषांचें लैंगिक व्यवहार कसे चालतात

संभोगसुखा बाबत सत्वगुणी माणूस बराचसा उदासिन असतो. परंतु, जेव्हां तो स्त्रीशी संभोग घेतो तेव्हां तो तिच्या अनुमतीनी घेतो. दोघानाही बरोबर समाधान मिळेल अशाप्रकारे तो संभोग घेतला जातो. परंतु, जर स्त्री सात्विक असेल तर ती पुरुषापेक्षा जास्त उदासिन असते. तरी संभोग घेणें आवश्यक असेल तर तिचें वागणें पुरुषाप्रमाणें सहकर्याचें असते. रजोगुणी माणूस संभोग घेतांना स्वताला सुख मिळाले किं झाले, अशाप्रकारच्या विचारसरणीने वागतो. स्त्रीस सुख मिळो अगर न मिळो, कांहीही होवो त्याची त्याला फारशी

पर्वा नसते. स्त्री जर रजोगुणी असेल तर संभोग क्रियेत पुरुषाला अडवून आपल्याला काय पाहिजे वगैरेचा हिशोब पूर्ण करून घेते. पुरुषाला संभोग क्रियेत हरवून त्याला खच्ची करणें, रजोगुणी स्त्रीस फार आवडते. जर पुरुष तमोगुणी असेल तर तो स्त्रीवर बलात्कार करून संभोग सुख मिळविणें जास्त पसंत करतो. अशा वागण्याला तो पुरुषार्थ मानतो. तो समजतो स्त्रीची परवानगी मी कशाला घेऊ? रजोगुणी माणूस संभोग करण्या आधी निदान स्त्रीच्या प्रकृति स्वास्थ्याचा तरी विचार करतो, परंतु, तमोगुणी, तेवढासुद्धा विचार करणे कमीपणाचें मानतो. संभोग घेतांना स्त्रीस जास्तीत जास्त त्रास कसा होईल त्याचा तो प्रयत्न करतो. त्यात त्याला अधिक सुख मिळते. संभोग घेतांना चावणें, नखांनी ओरबाडणें व संभोग झाल्यावर सुद्धा तो तिला विविध प्रकारे त्रास देण्याचा प्रयत्न करीत असतो. त्याशिवाय त्याला बरें वाटत नाही. तमोगुण जितका जास्त तितके हे वागणें अधिकाधिक भयंकर होत जाते. त्यात तापलेल्या सळींनी चटके देणें, सिगरेटच्या थोटकांनी भाजणें, कळ येईल अशाप्रकारे चिमटे काढणें, जखमा करणें असें भयंकर प्रकार तो स्त्रीशी वागतांना करणे पसंत करतो. त्यात त्याला स्वताचा अहंकार पोसल्याचा आनंद मिळतो. मुख्य म्हणजें तमोगुणी माणूस स्त्रियांचा नेहमीच तीव्र तिरस्कार करतात. प्रत्येक स्त्री वेश्याच असतें असा त्यांचा विश्वास असतो. अशा तामसी पुरुषाकडे जर त्याच्या पत्नीने संभोगाची इच्छा व्यक्त केली तर त्याला तिचा संशय येत असतो. आपली बायको दुसऱ्या पुरुषाकडे सुद्धा अशाप्रकारे संभोगाची इच्छा व्यक्त करीत तर नसेल ना? असा काल्पनिक संशय येऊन त्यामुळे त्रस्त झालेला तो तामसी पुरुष त्या स्त्रीस अतिशय त्रास देत असतो. स्त्रियांची नैसर्गिक प्रवृत्ति असते स्वताचें सौंदर्य खुलवून दाखविण्याची, आणि असें जर तामसी पुरुषाच्या बायकोने केले तर त्यामुळे तो अधिकच संशयी होवून आपल्या बायकोस त्रास देऊ लागतो. तमोगुणी असल्याचें ते एक मोठे लक्षण आहे. सत्वगुणी माणसें नेहमीच स्त्रियांचा आदर करतात. तर रजोगुणी माणसें त्यांच्या सोयीनुसार स्त्रियांशी वागत असतात. जर स्त्री तामसी असेल तर, पुरुषास ती छळतें. संभोगात ती पुरुषास नामोहरम करून त्याला खच्ची करतें. एरव्ही सुद्धा ती पुरुषावर सतत इतर बाबीत आपले वर्चस्व सिद्ध करून त्याचे जीणें लाचार करते. पुरुषास मारणें, त्याचा उत्साह भंग करणें, संभोगात त्याला तिष्ठत ठेवणें, लाथेंने त्याला उडविणें, अपमान करणें त्याच्या बारीकसारीक चुकांवर बोट ठेवून त्याला सतत अपमानीत करणें अशा अनेक प्रकारे ती त्याला छळून त्यातून आनंद मिळविते. तामसी स्त्रियां पुरुषांचा द्वेष करतात. सात्विक स्त्री पुरुषाशी समजून घेण्याच्या दृष्टीने वागते. रजोगुणी स्त्रियां पुरुषांकडे व्यावहारिक दृष्टीने पहाणें पसंत करतात.

जर पुरुष सात्विक असेल व स्त्रीसुद्धा सात्विक असेल तर, अशा दांपत्याच्या संभोगाला दैविक संभोग असें समजतात. त्यांना होणारी मुले गुणी असतात. मोठे ल ोकोत्तर लोक त्यांच्या पोटी जन्म घेतात. अशा घराण्यांमुळें समाजाचा उद्धार होत जातो. समाजात सात्विक लोकांची संख्या जास्त असेल तर तो समाज अध्यात्मिक दृष्ट्या प्रगत आणि श्रेष्ठ ठरतो. घराण्याचा उत्तरोत्तर उत्कर्ष होत जातो. ज्या घराण्यात सात्विक स्त्रियां व पुरुष असतात, त्या घराण्यात मोठे संत पुरुष जन्माला येतात. संत ज्ञानेश्वर व त्यांची भावंडे अशा दैविक संभोगातूनच जन्मली होती.

जर पुरुष सात्विक आणि स्त्री रजोगुणी असेल तर, त्यांची संतति सामान्य परंतु, गुणी आणि फार कार्यक्षम असतें. अशा दांपत्याच्या संभोगाला मानवी संभोग असें म्हणतात. ती स्त्री थोडा काळ (कांही वर्षे) पुरुषाची गंमत करतें, परंतु जेव्हां तिला खात्री पटते किं, हा पुरुष सात्विक आहे, तेव्हां ती स्वता मध्ये बदल करून घेतें आणि ती स्वतः सात्विक बनतें. असें विवाह सुखरुप होतात. असा मिश्रगुणी समाजसुद्धा मोठी प्रगति करतो आणि सर्व गुणांनी संमृद्ध असतो.

जर पुरुष सात्विक आणि स्त्री तामसी असेल तर, असा विवाह फार काळ टिकत नाही. त्यांची संतति अवगुणी, अतिसामान्य असते. अशा मिश्रगुणी सामाजात दुःख फार असते. संभोगसुद्धा दुःखमय असतो. असा समाज प्रगति कमी करतो. बहूधा तो अप्रगत रहातो. तरीसुद्धा, मोठे तपस्वी अशा समाजात निर्माण होत असतात.

जर पुरुष राजसी व स्त्री सात्विक असेल तर, पहिली कांही वर्षे ती स्त्री पुरुषाचा पोरकटपणा सहन करत रहाते आणि नंतर कांही काळांने ती पुरुषाचा कल पाहून स्वता रजोगुणी होते किंवा तो पुरुष आपल्या पत्नीचे उत्तम वळण पाहून प्रभावित होतो व मग तो स्वतः सात्विक होतो. कोणाचा गुण अधिक शक्तिमान आहे त्यावर हे अवलंबून असतें. अशा दांपत्याची संतति सामन्य ते अतिसामान्य अशी विविध गुणी असल्याचें दिसून येते. बऱ्याच वेळा असे दांपत्य वृद्धापकाळी पूर्णपणें सात्विक झाल्याचें दिसून येते. कारण रजोगुणी लोकांचा सत्वगुणाकडे कल असतो.

जर पुरुष राजसी आणि स्त्रीसुद्धा राजसी असेल तर, ते दोघेही त्यांच्या राजसी स्वभावानुसार एकमेकाशी लपंडाव खेळत रहातात. आणि हिच वैवाहिक जीवनाची मजा अशा समजूतीत संपूर्ण जीवन काढतात. त्यांचे संभोग मानवी संभोग असतात. अशा जोडप्याची संतति धूर्त, रजोगुणी व प्रसंगी तामसी सुद्धा असते. असा समाज धडसी कृत्ये करणारी माणसें निर्माण करतो. लढवय्ये, मोठे व्यापारी, उद्योगपति, मोठे कार्यकर्ते अशा

समाजात मोठ्या प्रमाणात निर्माण होत असतात. असें समाज साम्राज्य निर्माण करतात. परंतु त्यांची अध्यात्मिक अवस्था मात्र कमी प्रतीची असते.

जर पुरुष राजसी आणि स्त्री तामसी असेल तर, त्या पुरुषाला अनेक मनस्तापकारक अनुभवांचा सामना करावा लागतो. बऱ्याच वेळा असें जोडपे निःसंतान असते. बऱ्याच वेळा असा विवाह मोडीत निघतो. अशा दांपत्याची संतति तमोगुणी अथवा दुर्जनगुणी असतें.

जर, पुरुष तामसी आणि स्त्री सात्विक असेल तर, तो विवाह टिकत नाही. स्त्रीचा छळ होतो. प्रसंगी खून सुद्धा होतो. किंवा स्त्री आत्महत्या करते. अशा दांपत्याची संतति तमोगुणी, दुर्जनगुणी असण्याची जास्त शक्यता असते.

जर, पुरुष तामसी आणि स्त्री राजसी असेल तर, ती स्त्री त्या पुरुषास पुरून उरण्याचा प्रयत्न करते. आणि जर त्या स्त्रीत पुरेसे सामर्थ्य असेल तर ती स्त्री त्या पुरुषास वठणीवर आणते. पुरुषास राजसी करून घेते. त्यासाठी ती अनेक युक्त्या करतें, जसें, घरात धार्मिक वातावरण निर्माण करणें, जागृत देवतांची पुजा करणें, समाजातील इतर लोकांचे दडपण आणणे वगैरे. अशारितीने ती त्या तामसी पुरुषास बदलून रजोगुणी करून घेते. आणि विवाह यशस्वी करते. परंतु, जर पुरुष केवळ तमोगुणी नसून दुर्जनगुणी असेल तर मात्र असा विवाह मोडीत निघतो. संतति मिश्रगुणी असतें. असा पुरुष स्त्रीवर बलात्कार करणें पसंत करतो, किंवा ती झोपलेली असतांना संभोग घेणें मोठे मजेचें समजतो. त्यामुळे, अशा जोडप्यास अपंग, मंदबुद्धि, विकलांग, वेडसर अशी अवगुणी अथवा गुणहीन संतति होण्याची मोठी शक्यता असतें.

जर, पुरुष तामसी आणि स्त्री सुद्धा तामसी असेल तर, त्यांच्या सभोगाला राक्षसी संभोग म्हणतात. दोघेही एकमेकास पुरून उरतात. साधारणपणे जर स्त्री तामसी असेल तर ती पुरुषापेक्षा जास्त भयंकर असते. त्यामुळें, शेवटी तिचा विजय होतो. दोघेही एकमेकांचा छळ करीत असतात. आणि त्यालाच ते जीवन समजत रहातात. अशा जोडप्याच्या जीवनात गुन्हेगारीपणा भरपूर असतो.त्यांचे जीवन अनेक दुःखमय प्रसंगानी भरलेले असते. प्रसंगी एकाद्याचा मृत्यु होत असतो. आणि अशारितीने तो विवाह संपुष्टात येतो. समाजाला अशा दांपत्याच्या अनेक कृत्यांमुळे फारच त्रास होत असतो. पोलीस ठाण्यावर त्यांच्या सतत वाऱ्या होत असतात. त्यांची संतति तमोगुणी, दुर्गुणी, लिंगपिसाट, वेडी अशी सदोष होते. समाजात मोठे भयंकर गुन्हे करणारे गुन्हेगार ह्यांच्या पोटी जन्म घेतात. खुनांची मालिका करणारे वेडेखुनी, गुन्हेगार धर्ममार्तंड, जनतेचा छळ करणारे राजकर्ते, गुन्हेगारी धंदे करणारे अशांचा

जन्म अशा दांपत्याच्या पोटी होत असतो. तामसी स्त्रियां व्यभिचार करणे पसंत करतात. अनेक गुन्हेगारी उद्योग अशी जोडपी चालवित असतात.

सत्वगुणी माणसांतूनच संतगुणी माणसें तयार होत असतात. आता आपण संतगुणी माणसांची लक्षणें पहाणार आहोत. त्याआधी कांही गोष्टी आपण नीट लक्षात घेतल्या पाहिजेत आणि त्या अशा किं, साधकात हे जे तम, रज व सत्व गुणांचे आविष्कार असतात ते निरनिराळ्या तीव्रतेचे असतात. त्यामुळे तमोगुणी माणसात जी लक्षणे दिली आहेत ती, तो साधक आपल्या साधनेत यशस्वी रित्या प्रगति करीत असेल तर त्याप्रमाणें कमी तीव्र होत जातात. आणि साधकाचें तमोगुणातून रजोगुणात होणारे स्थित्यंतर सावकाशपणे होत असते. तसेंच रजोगुणातून सत्वगुणात होणारे  स्थित्यंतर सुद्धा सावकाशपणेच होत असते. प्रापंचिक साधना करणे म्हणजे स्वत:ला स्वताच वळण लावून सुधारणें असा हा प्रकार असतो. ह्या साधना पद्धतीत कोणतीही देवपुजा किंवा तशाप्रकारची कोणतीही गोष्ट करावयाची गरज नसते. त्यामुळे देव धर्म न मानणारा इसम सुद्धा हि साधना सहज करु शकतो. सात्विक स्त्री व पुरुषांच्या लैंगिक प्रेरणा किमान पातळीवर रहातात. एकतर लैंगिक क्रिया हि एक अतिशय गलिच्छ प्रकारची क्रिया असल्यामुळें त्या बद्दल ह्या लोकांत औदासिन्य निर्माण होत असते व त्याचा परिणाम स्वरुप त्यांची संभोगाची इच्छा नष्ट होत जाते. ‘नको ते काम’ असेंच त्यांचे विचार असतात. संभोग सुखातील अहंकार त्यांच्यात राहिलेला नसतो व त्यामुळें त्यामागील हि मुख्य प्रेरणा नष्टप्राय झालेली असते. स्पर्शसुखामध्ये मात्र अजूनही सात्विक ल ोकांत आकर्षण असते व तेव्हढ्या पुरते लैंगिक आकर्षण स्त्री - पुरुषात टिकून राहिलेले असते. संतगुणात गेल्यावर तेही रहात नाही व त्यानंतर साधक खऱ्या अर्थाने मोक्षमार्गाला ल ागतो.

संतगुणात गेलेल्या साधकाला त्याने मद आणि मत्सर हे दोष पूर्णपणे नष्ट केलेले असल्यामुळें दैविक अनुभव आता येऊ लागतात. आणि त्या अनुभवामुळे तो साधक न सांगताच देवांचें अस्तित्व मानू लागतो. आणि तो आस्तिक होतो. हे आस्तिक होणे स्वाभाविक असल्यामुळे, त्याबद्दल कोणीही वाद करत नाही. कांही बाबतीत असें असतें किं, साधक देव मानणारा असतो. तो देवांची पुजा वगैरे, नित्यनियमांने करीत असतो. असा साधक जर तमोगुणी असेल तर त्याला त्याच्या देवभक्तिचा त्या जन्मात कांहीही अनुभव येत नाही. त्यामुळें कदाचित त्याची श्रद्धा कमी होण्याची शक्यता असते. तसेंच जर साधक रजोगुणी असेल तर त्याला देवतांचा किंचित अनुभव येतो. आपण एव्हढी भक्ति करतो तरी

आपल्याला म्हणावें असें फळ मिळत नाही अशी त्याची नेहमी तक्रार असते. जर साधक सत्वगुणी असेल तर मात्र त्याला देवतांचे चांगले अनुभव येण्याची मोठी शक्यता असते. सर्वसाधारणपणे, ज्याला आपण प्रचीति असें म्हणतो ती सत्वगुणी साधकास त्या जन्मात मिळण्याची मोठी शक्यता असते. हे सर्व ह्या पुस्तकात देण्याचें कारण, गुण सुधारून माणूस मग तो पुरुष असो अथवा स्त्री असो, आपले सर्व लैंगिक प्रश्न सोपे करू शकतो. लक्षण चिकीत्सा, हि सर्व प्रकारच्या लैंगिक प्रश्नावर उपयोगी ठरत असते. म्हणून लक्षण चिकीत्सेचा आपण विशेष लक्ष देऊन अभ्यास केला पाहिजे.

## संतगुणाची लक्षणें

प्रापंचिक साधना करणारा माणूस यथावकाश सत्वगुणातून संतगुणात जातो. संतगुणी माणसाला संसारी जगातील कोठलीही महत्वाकांक्षा नसते. हे त्याचे पहिले मोठे लक्षण मानले जाते. आपण कोठून आलो? कां आलो? ह्यापुढे आपण कोठे जाणार? आपण कां जगत आहोत? मी कोण आहे? मरण म्हणजे काय? आपण हे सर्व भोग कां भोगत आहोत? मेल्यानंतर माझे काय होणार? देव आहे कां? माझा देवाचा काय संबंध? हे आणि असें अनेक प्रश्न त्याला सतत भेडसावत असतात. जीवना कडे पहाण्याचा त्याचा दृष्टिकोन इतरांपेक्षा खूपच वेगळा असतो. त्यांच्या ह्या चौकसपणामुळे हे लोक आपल्या जीवनात घडणाऱ्या घटनांकडे उदासीन वृत्तीने एकाद्या निरीक्षकाच्या दृष्टीने पहात रहातात. म्हणून त्यांना उदासीन समजतात. इतर समाजात ह्या लोकांच्या बद्दल अनेक गैरसमज निर्माण होत असतात. तमोगुणी लोक ह्यांना वेडे ठरवतात. त्यामुळे त्यांचा प्रसंगी छळ होण्याची शक्यता असते. रजोगुणी सुद्धा त्यांच्या कडे संशयाने पहात असतात. त्यामुळे सुद्धा ह्या संतगुणी ल ोकांना फार त्रास होण्याची शक्यता असते. सत्वगुणी माणसें मात्र ह्यांना कांही प्रमाणात समजून घेऊ शकतात. इतिहासामध्यें अशी अनेक उदाहरणें दिसतात. त्यातून संतगुणी ल ोकांच्या अडचणी आपण समजून घेऊ शकतो. संत मीराबाई, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर ह्यांना त्यांच्या जीवनात अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले होते हे आपण जाणून आहोत. संतगुणी माणसात मद आणि मत्सर हे दोन दोष पूर्णतया नष्ट झालेले असतात. काम, क्रोध, लोभ आणि मोह हे चार दोष अत्यल्प प्रमाणात असतात कारण, मद व मत्सर हे दोन दोष नष्ट झाल्यावर उरलेले चार दोष कमकुवत होतात. मद व मत्सर हे दोन दोष सर्व अहंकाराचा पाया असें असतात. व जेव्हां पायाच नष्ट होतो तेव्हां त्यावर उभी असलेली पापाची इमारत कमकुवत होणार ह्यात काय संशय? अहंकाराचा पाया स्वरुप मद व मत्सर

असतात व इतर चार दोष त्यावरील मजल्यांसारखे असतात. त्यामुळें हे चार दोष नष्ट करणें सोपे होते. परतुलना मदमत्सरांचे कारण आहे व म्हणून सर्व पापाचें कारण असते. संतगुणी कधीही परतुलना करीत नाहीत. परतुलना न करणें हा अध्यात्म साधनेचा एक हिस्सा आहे.

प्रापंचिक साधनेत संतगुणी होण्यापर्यंतचे मार्गदर्शन केलेले आहे. संतगुणी माणूस पुढे मोक्षमार्गानी जातो. त्याला प्रपंच उरत नाही. त्यामुळें समाजाचा त्याचा संबंध कमी होत जातो. तो समाजात असूनही नसल्यासारखाच असतो. संतगुणी माणूस जर जप साधना करीत असेल तर त्याला देवतांचें प्रत्यक्ष दर्शन होणे शक्य असते. त्यांची आराध्यदेवता त्यांच्याशी बोलते त्यांच्या बरोबर चालते असें प्रकार होत असतात. परंतु, इतरांना मात्र त्याचा अनुभव येत नसल्यामुळें संतगुणी माणसांचें ते सांगणें इतर मंडळी खरे मानीत नाहीत आणि त्याला वेडा ठरविण्यात येतें. अशा अनुभवांमुळें मग तो संतगुणी माणूस समाजाला सोडून दूर कोठेतरी अज्ञात ठिकाणी जाणे पसंत करतो. परंतु, जर त्या संतगुणी माणसा भोवती असलेला समाज सात्विक लोकांचा असेल तर मात्र त्याला अशाप्रकारच्या त्रासाला तोंड देण्याची वेळ येत नाही. संतगुणी, परमेश्वराची भक्ति करण्यात सहज रमतो. जपसाधने बद्दलचा अनुभव असा आहे किं, जप व भक्ति साधना ह्यांच्यात बरेच साम्य असल्यामुळे त्यांत नेहमी गल्लत होत असते. तमोगुणी माणसांनी केलेला जप व रजोगुणी माणसानी केलेला जप ह्यांच्या प्रभावात फरक असतो. रजोगुणी माणसांचे जप करणे आणि सत्वगुणी माणसांचे जप करणे ह्यात मोठा फरक त्यांच्या गुणांमुळें होत असतो. जपमंत्र तोच असला तरी त्याचा परिणाम निरनिराळ्या अवस्थेतील साधकांच्या बाबत कमी जास्त असा वेगवेगळा असतो. संतगुणी माणसाची साधना त्यामुळेंच सर्वात जास्त प्रभावी ठरत असते.

संतगुणी माणसाची लक्षणें अशी असतात, इतरांशी वागतांना तो बहुधा प्रेमळ परकेपणाचें धोरण सांभाळतो; आपले काम बरे कां आपण बरें अशा रितीने तो समाजात वावरत असतो; त्याच्या इच्छा मिळाले तर बरे, अशा स्वरुपाच्या असतात; तो बहुधा कोणत्याही बाबतीत फार आग्रही नसतो; वरकरणी, अशी माणसें बावळट असावीत असा एक गैरसमज व्हावा अशा प्रकारचे त्यांचे वागणे असते; यश, पैसा, अधिकार, सत्ता, सौंदर्य, बळ व बुद्धि ह्या सात संपत्तींचा संतगुणी माणसाला बिलकूल गर्व नसतो तरीसुद्धा, ह्या सर्व आपल्याकडे असल्या पाहिजेत असें मात्र त्याचें मन मानत असते. आपल्या इच्छांच्या बाबत तो फारसा आग्रही नसल्यामुळें, जर इच्छा पूर्ण नाही झाली तर तो फार क्रोधी अथवा दु:खी होत नाही व जर ती इच्छा मनाप्रमाणें पूर्ण झाली तरीही तो फार आनंदी सुद्धा होत नाही; अशा तटस्थभावात राहून अतिशय सावधगिरीने तो आपले जीवन व्यतीत

करीत असतो. इंद्रियसुखांच्या बाबतचें लोभ व मोह, ह्यांत त्याला फारसा आग्रह नसतो; त्याचा ओढा सर्वदा आत्मशुद्धीकडे असतो. संतगुणी साधकाला हे सर्व करतांना त्रास होत नाही कारण, त्याच्यातून मद व मत्सर भाव नष्ट झालेले असतात. परंतु, सत्वगुणी साधकाच्या बाबत, ज्याच्यात हे दोष किंचितसे जरी आहेत त्याला मात्र हे सर्व करण्यासाठी फार त्रास होतो व बऱ्याच वेळा तो साधक जर तमो वा रजोगुणी असेल तर केवळ अशक्य होते. ह्यासाठी प्रापंचिक साधना करून मगच पुढील साधना माणसांनी करावयाची असते, असा शाक्त पंथाच्या शिकवणूकीत आग्रह केलेला असतो.

देव न मानणारा साधक संतगुणात गेल्यावर त्याला निरनिराळ्या देवतांचें प्रत्यक्ष अनुभव येऊ लागतात. आणि ते अनुभव पुनः पुनः येत रहातात. त्यामुळें देव देवता असें कांही आहे ह्याबद्दल त्याची खात्री पटते. त्यानंतर तो देव देवता व परमेश्वर ह्या सर्व गोष्टी आहेत हे समजून वागू लगतो. अनुभव नसतांना केवळ संस्कारामुळे देव देवता व परमेश्वर मानणारे व अनुभवानंतर मानणारे ह्या दोघांच्या देव मानण्यात गुणात्मक फरक असतो. असें म्हणण्याचें कारण, अनुभव घेतल्यावर देव मानणारा संत प्रवृत्तीचा साधक कधीही देवांच्याबद्दल साशंक होत नाही परंतु, केवळ संस्कारामुळे मानणारा साधक कदाचित कांही वाईट अनुभव आले तर देव न मानण्याची व त्याप्रमाणें वागण्याची शक्यता असते.

## मूर्ख लक्षणे

शिष्टाचाराचें नियम समजण्यासाठी मूर्ख लक्षणें साधकाला माहीत असली पाहिजेत. तसें न वागणें म्हणजे शहाणी लक्षणें असें समजावे आणि शहाणी लक्षणें म्हणजेंच शिष्टाचार. मूर्ख लक्षणें तमोगुणात येतात परंतु, त्यांना पापकर्म समजत नाहीत. तमोगुण लक्षणांना पाप कर्म समजतात. अठराव्या वयापर्यंत हि लक्षणें असल्यास त्याला बालिश समजतात. त्यापेक्षा मोठा असल्यास मात्र त्याला मूर्ख समजतात.

आधी दिलेली लक्षणं रामदासांनी दासबोधात दिली आहेत व ही लक्षणं चंडीदासांनी सांगितलेली आहेत.

१) जो भर रस्त्यावर प्रेमाचें चाळे करतो तो मूर्ख.
२) दुसऱ्यानी केलेल्या कामाचे श्रेय स्वताकडे घेणारा मूर्ख.
३) आई, वडील ह्यांचा जो विनाकारण अपमान करतो तो मूर्ख.
४) आपले कर्तव्य करतांना आपण कोणावर तरी मेहरबानी करतो असें जो समजतो.

५) मैत्रीणीशी जो पत्नी प्रमाणे वागण्याचा प्रयत्न करतो तो एक मूर्ख. परंतु, पत्नीशी मैत्रीणी सारखे वागतो तो मूर्ख नाही

६) आमंत्रण नसतांना जो जातो तो एक मूर्ख.

७) आपली कुवत न ओळखता जो आव्हाने, जबाबदाऱ्या घेतो तो एक मूर्ख.

८) स्वताची स्तुती स्वताच करतो व ती सुद्धा न विचारतां, तो एक मूर्ख.

९) अति आग्रह, हट्ट करतो तो एक मूर्ख॰

१०) विनाकारण इतरांचे वैर करतो तो एक मूर्ख.

११) न विचारतां जो दुसऱ्याला सल्ला देतो तो एक मूर्ख.

१२) परक्या स्थळी जेवतांना खादाडपणा करतो तो एक मूर्ख.

१३) जेथें जी गोष्ट करु नये असें सांगितलें जाते, तेथें ती गोष्ट करणारा तो एक मूर्ख.

१४) स्त्रियांचा तिरस्कार करतो तो एक मूर्ख.

१५) घरात क्रूरपणे वागणारा, जो बाहेरील जगात मात्र मोठ्या प्रेमानें वागतो तो एक मूर्ख.

१६) आपल्या वरिष्ठांशी जो लोचटपणें सतत लगट करीत रहातो तो एक मूर्ख.

१७) इतरांना लक्षात येईल इतक्या प्रमाणात जो स्तुती करतो तो एक मूर्ख.

१८) आपल्या प्रकृतीची काळजी न घेता सतत कार्यरत रहातो तो एक मूर्ख.

१९) आपल्या वरिष्ठांचें दोष त्यांना, सर्वांच्या पुढे उघड करून सांगतो तो एक मूर्ख.

२०) भावना विवश होऊन जो वहावत जातो तो एक मूर्ख.

२१) जेथें मानांने वागवतात तेथें वारंवार जाणारा तो एक मूर्ख.

२२) जेथें मानानें वागवतात तेथे बिलकूल न जाणारा तो एक मूर्ख.

२३) नोकराशी बरोबरीने जो वागतो, गळ्यातगळा घालून वागतो तो एक मूर्ख.

२४) एकेकाळचा सेवक, त्याच्या नशीबाने श्रीमंत झाला, त्याच्याकडे नोकरी धरणारा तो एक मूर्ख.

२५) जेथें जो खर्च करणें आवश्यक आहे तेथें तो खर्च न करणारा तो एक मूर्ख.

२६) शिवीगाळी करूनच जो बोलतो तो एक मूर्ख.

२७) चारचौघांच्या पुढे आपले उणे बोलून स्वताची फजिती करून घेतो तो एक मूर्ख.

२८) घरात आलेल्या पाहुण्याच्या पुढे घरातील माणसांचा जो अपमान करतो तो एक मूर्ख.

२९) बोलताना उगाचच हसणारा तो एक मूर्ख परंतु, हसतमुखांने बोलणारा मात्र मूर्ख नाही.

३०) केले उपकार जो विसरतो तो एक मूर्ख.

३१) जेवतांना तेथेंच बाजूला जो थुकतो तो एक मूर्ख.

३२) कोणतीही गुणवत्ता नसतांना फुकटचा अभिमान करून इतरांना सांगणारा तो एक मूर्ख.

३३) चारचौघांच्या पुढे आपल्या उघड्या देहांचे प्रदर्शन करतो तो एक मूर्ख. ह्याला स्त्रियांचा अपवाद कांही प्रमाणात मानला आहे कारण, सुडौल स्त्रीला सुरक्षित स्थळी तिचे सौंदर्य दाखविण्याचा हक्क असतो. परंतु, बेढप स्त्रीला मात्र हा नियम लागू होतो.

३४) चारचौघांच्या समोर नाक, कान, डोळे साफ करतो, कुरतडतो तो एक मूर्ख.

३५) रस्त्यावरून चालतांना, जो इतरांना धक्के देत चालतो तो एक मूर्ख.

३६) आजारी माणसाला भेटतांना त्याच्या किंवा इतर मृत्युच्या गोष्टी करतो तो एक मूर्ख.

३७) स्वकीयांचा (बायको, मुलं, आई, बाप, मित्र इत्यादि) सतत अपमान करतो व दोष देत रहातो व त्यात धन्यता मानतो अथवा तो आपला हक्क आहे असें समजतो तो एक मूर्ख.

३८) गुन्हेगार, वाईट कर्म करणारे ह्यांच्याशी संगती करण्यात धन्यता मानतो तो एक मूर्ख.

३९) आपल्या कर्माचे फळ आपल्यालाच ह्या किंवा पुढील जन्मांत भोगावें लागते हा विधी नियम न मानणारा तो एक मूर्ख.

४०) दुसऱ्यांच्या गोष्टींचा वापर, त्यांना न विचारतां करणारा तो एक मूर्ख.

४१) स्त्रीवर प्रेमाची जबरदस्ती करणारा तो एक मूर्ख.

४२) ह्या जगात बेहिशोबी कांहीही नसते हे न समजणार तो एक मूर्ख.

४३) सद्गुण व दुर्गुण ह्यातील फरक लक्षात न घेता केवळ वरवर दिसणाऱ्या त्यांच्यातील साम्यावरून दुर्गुणाला सद्गुण समजतो व तो अंगिकारतो तो एक मूर्ख. हा मुद्दा समजण्यासाठी कांही विशेष विवेचन करावें लागेल. ते असें,

सद्गुण व दुर्गुण ह्यांच्या कांही जोड्या येथे दिलेल्या आहेत, त्यावरून हा मुद्दा स्पष्ट होईल. ह्यात प्रथम सद्गुण दिला आहे व नंतर दुर्गुण दिला आहे. १) नम्रपणा - लाचारी; २) लढवय्येगिरी, शूरत्व - मवालीगीरी, उनाडकी; ३) शहाणा - धूर्त, कावेबाज; ४) स्पष्टवक्तेपणा - उद्धटपणा; ५) सावध - भित्रा; ६) आतिथ्यशिलता - लोचटपणा; ७) सन्मान करण्याची इच्छा - जी जी करण्याची प्रवृत्ति; ८) पुढाकार - आगावूगिरी; ९) सज्जनपणा -बावळटपणा; १०) समाधानीपणा - आळस; ११) काटकसर - कंजुषी; १२) योग्य खर्च - उधळपट्टी. १३) दिलदार - भावखावू .

४४) दुसऱ्याच्या घरी जाऊन असें कांही करतो किं, त्यामुळें सर्वांची पंचाईत होते तो मूर्ख.

४५) संतापाच्या भरात स्वताचें व इतरांचें नुकसान करतो तो एक मूर्ख.

४६) निरनिराळी व्यसने करण्यात धन्यता मानतो तो एक मूर्ख.

४७) दु:खाचा प्रसंग असतांना तेथें विनोद करणारा तो एक मूर्ख.

४८) आनंदाच्या प्रसंगी दु:खद वार्ता सांगणारा तो एक मूर्ख.

४९) प्रसंग पाहून बोलावें हे ज्याला समजत नाही तो एक मूर्ख.

५०) बोलतांना, लिहीतांना ज्या शब्दांचा अर्थ माहीत नाही ते शब्द वापरतो तो एक मूर्ख.

५१) शत्रू, चोर, प्रतिस्पर्धी ह्यांना जो सावध करतो तो एक मूर्ख.

५२) स्वत:च्या मित्रांबद्दल इतरेजनांत शंका व्यक्त करणारा, टीका करणारा तो एक मूर्ख.

५३) संसारातील दु:खांसाठी परमेश्वराला जो दोष देतो तो एक मूर्ख.

५४) लहान बालकांना जो शिक्षा करतो तो एक मूर्ख.

५५) लहान मुलांच्या, लहान सहान चुकांकडे जो दुर्लक्ष करीत नाही तो एक मूर्ख.

५६) नेहमी रागीटपणांचे सोंग घेऊन वावरतो तो एक मूर्ख.

५७) जो विश्वासघात करतो, तो एक मूर्ख.

५८) लहान मुलं व स्त्रियांना मदत, न मांगता करावयाची असते, तशी न करणारा तो मूर्ख.

५९) अनोळखी स्त्रीची चेष्टा मस्करी गंमत म्हणून करणारा तो एक मूर्ख.

६०) फार चेष्टा मस्करी करणारा तो एक मूर्ख.

६१) मित्राची चेष्टा मस्करी केल्यानंतर त्याची दिलगिरी न मागणारा तो एक मूर्ख.

६२) प्रामाणिक नोकरावर अनोळखी इसमाच्या सांगण्यावरून संशय घेणारा तो एक मूर्ख.

६३) सभेत मुद्दा सोडून बोलत रहातो तो एक मूर्ख.

६४) वाईट वस्तीत जाण्यात, वावरण्यात पुरषार्थ मानतो तो एक मूर्ख.

६५) चर्चा स्थळी एकजण आपला मुद्दा मांडत असतांना मध्येच बोलून अडथळा करणारा तो

६६) रस्त्यातील पादत्राणांनी घरात वावरतो तो एक मूर्ख.

६७) बायकांत वावरणारा पुरुष तो एक मूर्ख. मात्र, पुरुषात वावरणारी स्त्री मूर्ख समजली जात नाही.

६८) चांगले कायदे नियमसुद्धा मोडण्यात धन्यता मानतो तो एक मूर्ख.

६९) मुक्या प्राण्याना त्रास देणारा व त्यात धन्यता मानणारा तो एक मूर्ख.

७०) उगाचच खोटे बोलणारा तो एक मूर्ख. स्त्रिया सुरक्षिततेसाठी उगाचच खोटे बोलत असतात तरीसुद्धा, त्यांना मात्र मूर्ख समजले जात नाही.

७१) विनाकारण अन्याय सहन करणारा व तसें करा, म्हणून इतरांना सल्ला देणारा तो एक मूर्ख.

७२) अनोळखी ठिकाणी जाऊन लोकांच्या भानगडीत नांक खुपसणारा तो एक मूर्ख. नको तेथें लक्ष घालणारा तो एक मूर्ख.

७३) आपली परिस्थिती सुधारल्यावर जुने दिवस व त्याकाळात मदत करणारे लोक ह्यांना विसरणारा तो एक मूर्ख॰

७४) अवसानघात जो करी तो एक मूर्ख.

७५) आपल्याला सर्वांनी सहाय्य करावे परंतु, आपण मात्र कोणालाही सहाय्य करण्याची गरज नाही असें समजून वागणारा तो एक मूर्ख.

७६) दुसऱ्यांच्या आणलेल्या वस्तुंची निगा नीटपणे जो करीत नाही तो एक मूर्ख.

७७) आधाशीपणें दुसऱ्याचा वाटा खाऊन फस्त करतो तो एक मूर्ख.

७८) लहान मुलांशी भांडण उकरून काढतो अथवा त्यांना जो घाबरवतो तो एक मूर्ख.

७९) मैत्री तपासण्यासाठी जो, मित्राचें नुकसान करून तो मित्र ते नुकसान सहन करतो किं नाही ह्यावरून मैत्री किती घट्ट आहे ते ठरवितो तो एक मूर्ख. जास्त नुकसान सहन करतो तो जास्त चांगला मित्र असें मूर्ख लोकांचें मैत्री तपासण्याचें तंत्र असते.

८०) मित्रांना त्रास देण्याचा आपला हक्क आहे असें जो मानतो तो एक मूर्ख.

८१) मैत्रीचा गैरफायदा घेण्यात धन्यता मानतो तो एक मूर्ख.

८२) दुसऱ्याच्या चांगुलपणाचा गैरफायदा घेण्यात धन्यता मानतो तो एक मूर्ख.

८३) एकादे पुस्तक न वाचतांच त्यावर मत प्रदर्शन करतो तो एक मूर्ख.

८४) माहीत नसलेल्या विषयावर अधिकार वाणीने बोलण्याचे धाडस करतो तो एक मूर्ख.

८५) पाहुण्याकडून घरची कामे करून घेतो तो एक मूर्ख.

८६) वृद्ध माता पित्याकडून जो स्वताची सेवा करून घेतो तो एक मूर्ख.

८७) नोकरा चाकरांचा सतत अपमान करतो व तो आपला हक्क आहे असें मानतो तो मूर्ख.

८८) आश्रित, पाहुणा ह्यांचा अपमान करतो, त्यांच्याकडे दुर्लक्ष करतो तो एक मूर्ख.

८९) घरात पाहुणे असतांना त्यांना तसेंच ठेवून आपण स्वताच खात बसतो तो एक मूर्ख.

९०) दुसऱ्यांच्या मूर्खपणाचें समर्थन करतो तो एक मूर्ख.

९१) शेजाऱ्यांच्याकडे, मित्रांकडे नेहमी कांहीतरी मागत रहातो तो एक मूर्ख.

९२) पाहुण्यासाठी ठेवलेला पाहूणचार स्वताच खाऊन फस्त करतो तो एक मूर्ख.

९३) असहाय्य, गरीब माणसाचे दु:ख पाहून ज्याला विनोद सुचतो तो एक मूर्ख.

९४) मर्यादांचें जो पालन करीत नाही तो एक मूर्ख. मर्यादा तत्व, लेख पहा.

९५) जो घरच्या जेवणाची तुलना बाहेरच्या (खानावळ वगैरे) जेवणाशी करतो तो एक मूर्ख.

९६) जो मातेच्या जेवणाची तुलना आपल्या पत्नीच्या जेवणाशी करतो तो एक मूर्ख.

९७) जो श्रीमंताच्या गोष्टींची तुलना गरीबांच्या गोष्टींशी करतो तो एक मूर्ख.

९८) तुलना करतांना जो सावधानता बाळगत नाही तो एक मूर्ख. ह्या ठिकाणी तुलनेतील सावधानता म्हणजे काय ते आता पहावें लागेल. तुलना कोणत्या दोन अथवा जास्त गोष्ठीची होऊ शकते ते समजले पाहिजे. तुलना दोन असमान गोष्टींची करावयाची नसते. उदाहरणार्थ, ताकदी मध्यें लहान मुलगा, अशक्त माणूस, स्त्री, वृद्ध माणूस ह्यांची तुलना शक्तिमान मोठ्या माणसाशी करावयाची नसतें कारण, ते ताकदीमध्ये नेहमीच असमान असतात. ह्यावरून आणखीन एक मूर्ख लक्षण सांगितले जाते ते असें,

९९) ज्याला गोष्टींतील समानता व असमानता ह्यातील फरक समजत नाही तो एक मूर्ख. वाट्टेल त्या दोन गोष्टींची तुलना करावयाची नसते हे ज्याला समजत नाही तो मूर्ख समजला जातो. गोष्टींची 'तुलनायोग्यता' समजणें ह्याला शहाणपणा समजतात.

१००) जो दोन देवांची तुलना करतो तो एक मूर्ख. माझा देव मोठा व इतरांचा देव छोटा अशारितीनें जो विचार करतो तो मूर्ख समजला जातो. हीच गोष्ट धर्मांबद्दल सुद्धा लागू होते.

१०१) यश, पैसा, अधिकार, सत्ता, सौंदर्य, बुद्धिमत्ता आणि बळ ह्या सात संपत्ति आहेत. जो माणूस ह्या संपत्ति प्राप्त झाल्यावर उन्मत्त होतो व त्यांच्या मदतीनें इतरांना त्रास देऊ लागतो तो एक मूर्ख. ह्या सात संपत्ति ज्याला सांभाळता येतात व जो त्यांच्यामुळें उन्मत्त होत नाही तो उत्तम लक्षणी शहाणा ठरतो.

१०२) जो स्वताला लाचार, नीच, दलित वगैरे समजतो व त्या प्रमाणें वागतो तो एक मूर्ख.

१०३) अनोळखी माणसाचा केवळ तो अनोळखी आहे म्हणून द्वेष करतो तो एक मूर्ख.

१०४) न वाचतां कागदपत्रांवर सही करतो तो एक मूर्ख.

१०५) जो स्त्रियांना उपभोग्य वस्तु समजतो तो एक मूर्ख.

१०६) जी स्त्री स्वताला एकाद्या उपभोग्य वस्तु प्रमाणें पुरुषां पुढे ठेवते ती एक मूर्ख.

१०७) जो इसम शत्रूच्या, प्रतिस्पर्ध्याच्या बोलण्यावर व आश्वासनावर विश्वास ठेवतो तो मूर्ख.

१०८) विनाकारण प्रत्येक गोष्टीत स्वत:ला दोषी ठरवितो व त्यातच मोठेपणा मानतो तो एक मूर्ख.

मूर्ख स्वताला फार शहाणा समजतो व त्यामुळे तो जे वागतो त्याला 'कुविद्या लक्षणें' असें दासबोधात म्हंटले आहे.

१०९) मुद्दाम आमंत्रितांना ताटकळत ठेवतो तो एक मूर्ख.

११०) मृतात्म्यांचा अपमान करणें हे मूर्ख माणसाचें लक्षण मानले जाते.

१११) परमेश्वर, देवता व पिशाच्च ह्यांच्या अस्तित्वाबद्दल चर्चा करणें हे मूर्खपणाचें लक्षण मानले जाते. कारण, ह्या गोष्टी चर्चेच्या माध्यमातून समजण्यासारख्या नाहीत. फक्त प्रयोगसिद्ध गोष्टींची चर्चा करता येते, व त्याद्वारा त्यांचें समाधान करतां येतें. परंतु, ह्या तीन गोष्टी अनुभवसिद्ध आहेत व म्हणून त्यांच्यावर चर्चा करतां येत नाही. तरीसुद्धा ह्या विषयांवर चर्चा करण्याचा आग्रह करणें, हे मूर्खपणाचें लक्षण मानले जाते. एकंदरीत अनुभवसिद्ध अशा ज्या गोष्टी असतात त्यांच्यावर चर्चा करण्याचा आग्रह धरणेंच मुळी मूर्खपणाचे असते. माणसाला अनुभव व प्रयोग अशा दोन मार्गानें ज्ञान मिळते.

११२) अपात्र दान करणें, अपात्र शिक्षक ठेवणें, अपात्र नोकर ठेवणें, अपात्र मित्र करणें, खोट्या आशा करीत रहाणें हि सर्व मूर्ख लक्षणें आहेत.

११३) परिस्थिती पाहून, परिस्थिती आपल्याला सोयिस्कर आहे किं नाही ह्यांचा अंदाज घेऊन आपली कामे करावयाची असतात हे ज्याला समजत नाही, असा जो वागत नाही तो मुर्ख.

११४) पाहूणे, आमंत्रित मंडळी ह्यांना नको नको म्हणत असतांना, बळेच फारच आग्रह करतो तो एक मूर्ख.

११५) विनाकारण, केवळ गंमत म्हणून दुसऱ्यांना टोमणें मारतों तो एक मूर्ख.

११६) खोटेनाटे आरोप व संशय करून समाजात कुभांड माजवतो तो एक मूर्ख.

११७) माझे पूर्वज असें मोठे होते तसें महान होते अशारितीनें जे लोक पुर्वजांची स्तुती करतात व स्वत: मात्र त्या योग्यतेचे होण्याचा प्रयत्न करीत नाहीत असें लोक रामदसांनी मूर्ख ठरविले आहेत. रामदास म्हणतात, 'जो गातो वडीलांची स्तुती तो एक मूर्ख'.

११८) जो पुरुष बायकोचें ऐकून आईशी भांडतो किंवा आईचें ऐकून बायकोशी भाडतो तो मूर्ख. सासु सुनांतील भांडणात घरातील शहाण्या पुरुषांनी कधीही पडावयाचें नसते. त्यांची भांडणें त्यांनी सोडवावीत अशी पोक्त भूमिका घरातील पुरुषांनी घ्यावयाची असते. तरीसुद्धा दोघीं पैकी कोणीही त्या भांडणाचा अतिरेक करता कामा नये अशी खंबीर ताकीद देण्यास शहाणे पुरुष विसरत नाहीत.


अशी मूर्ख लक्षणे आहेत. अर्थात् हे सर्व जो करण्याचे कटाक्षांने टाळतो तो शहाणा ठरतो. तसेंच हे सर्व टाळल्यामुळें जे वागणे होते त्यालाच शिष्टाचार संपन्न वागणे असें म्हणतात. ह्यासाठी मूर्ख लक्षणांच्या अभ्यासातून शहाणी लक्षणें समजूं शकतात. म्हणून त्यांची पुनरावृत्ति येथें केलेली नाही. शिष्टाचाराचें नियम सुद्धा त्यांतून स्पष्ट होतात.

साधकांनी प्रथम हि लक्षणें वाचून त्यातील कोणती लक्षणें आपल्याला लागू होतात ते तपासून पहावे. तपासतांना स्वताच्या केवळ निरिक्षणावर अवलंबून न रहाता, आपल्या प्रिय व आपल्या हिताची काळजी घेणाऱ्या स्वकीयांचे म्हणजें मित्र मंडळींचे मत, विशेष करून पत्नी अथवा पतिचा सल्ला घेऊन नीटपणे हे निरिक्षण करणे महत्वाचे असते. त्यातून ह्यातील किती लक्षणे आपल्याला लागू होतात ते स्पष्ट होईल. बरीच लक्षणे आपल्याला लागू होत नाहीत, असें दिसले म्हणजें साधकाला समजेल किं, त्याला उरलेल्या लक्षणांचे निराकरण करावयाचे आहे. त्यासाठी हि लक्षणें, सतत वाचत रहावें लागते. त्यामुळें हि मुर्ख लक्षणें साधकाच्या तोंडपाठ होतात. आपल्या भोवतीची कोणती माणसें ह्या लक्षणात येतात हे तो समजून घेत असल्यास त्यातून त्याची बरीच करमणूक होत जाईल. सतत परिक्षण व प्रयत्न ह्यामुळे साधक सावकाशपणें सर्व मूर्ख लक्षणांतून पूर्णपणे मुक्त होतो. साधारणपणें ह्या साधनेसाठी सामान्य साधकाला दोन ते तीन वर्षे लागतात. मूर्ख लक्षणांचा संबंध सरळपणें तमोगुणांशी असल्यामुळें हि साधना करीत असतांना त्यांनी तमोगुण निराकरणाचा सुद्धा विचार केला तर तो साधक केवळ मूर्ख अवस्थेतून बाहेर पडेल असें नाही तर तो तमोगुणांतूनही बाहेर पडेल. असा साधक शहाणा व रजोगुणी होईल. कधी आपण शहाण्यासारखे वागतो व कधी मूर्खासारखे वागतो ह्याचा त्याला अभ्यास करावा लागतो. कां व कधी असें होते, ह्याचा अभ्यास केल्यावर त्याला रजोगुण अवस्थेचा प्रभाव आपल्यावर कसा आहे ते समजणें शक्य होईल. रजोगुण अवस्थेतसुद्धा कांही प्रमाणात मूर्खपणा माणसाकडून होत असतो हे सुद्धा त्याच्या लक्षात येईल. पुढे रजोगुण लक्षणांचा अभ्यास करून त्यांतूनही बाहेर पडण्याचा प्रयत्न माणसांनी करावयाचा असतो. अशारितीने माणूस आपली लक्षणें सुधारून स्वत:च कोणाच्याही मदती शिवाय आपली अध्यात्मिक प्रगति करू शकतो. जो मनुष्य केवळ इंद्रिय सुखात रहाणें म्हणजेंच जीवन असें समजतो तो पशुमय महामूर्ख मानव असें समजले जाते. पाश्चात्य जीवन हे असें पशुमय झाले आहे. तसें आपले होवू नये ह्यासाठी प्रयत्न करीत रहाणें प्रत्येक हिंदूचें मुख्य कर्तव्य समजले जाते. केवळ उत्तमोत्तम यंत्र सामुग्री बनविली म्हणून मानव समाजाची प्रगति झाली असें आपण मानत नाही. अध्यात्मिक प्रगति शिवाय खरी प्रगति झाली असें, आपण मानत नाही. ह्या सर्व गोष्टींचे भान ठेवून जगणे ह्यालाच शहाणपण असें आपण समजतो. सर्व लैंगिक प्रश्नांचें मूळ ह्या गुण सुधारण्याशी निगडीत असते म्हणून ह्या पुस्तकात सर्व गुण लक्षणें सविस्तरपणे दिली आहेत.

पुरुषासाठी मार्गदर्शन १) स्त्रियांचा कधीही अपमान करू नका. २) स्त्रीला कधीही स्वताहून स्पर्श करू नका. ३) स्त्रीनें स्वताहून तुम्हाला स्पर्श केला तर तो स्वीकारा व जर

तो नको असेल तर नम्रपणे तिला दूर करा. ४) पत्नीच्या इच्छेविरुद्ध तिच्याशी संभोग घेण्याचा प्रयत्न करु नका. ५) वेश्येकडे जाण्यापेक्षा हस्तमैथुन करा. ६) स्त्रिया उघड्या शरीरांने वावरत असतील तर तेथे पाहू नका. ७) सुंदर स्त्रीचे कौतुक करा परंतु, कुरुप, बेढप स्त्रीची चेष्टा करू नका. ८) स्त्रीवरील मालकीहक्काच्या कल्पना मनातून तुम्ही काढून टाका. ९) स्त्रियांच्या लैंगिक उपशमनाच्या क्रिया दिल्या आहेत, त्याप्रमाणें जर तुमच्या घरातील बायका वागत असतील तर त्यांच्या बद्दल उगाचच गैरसमज करून घेऊ नका. १०) वरच्या जातीतील बाईच्या प्रेमात पडण्याचा मूर्खपणा करू नका,

स्त्रियांसाठी मार्गदर्शन १) प्रेम करण्या आधी त्याची व्यावहारिक बाजू नीट आहे कां ते पाहून मगच पुढील पावले टाका. २) विवाह योग्य वेळी नाही झाला तर लैंगिक उपशमनाच्या क्रिया आहेत त्या वापरून मनाची शांतता राखा. ३) शक्यतर जातीतच विवाह करा.
४) समवयस्क किंवा लहान पुरुषाशी विवाह करणें टाळा.



अध्यात्मिक दर्जा दाखवणारा आलेख
क्रमा क्रमाने अवस्था कशी बदलते ते दाखवले आहे.

दोघांसाठी मार्गदर्शन १) आपले गुण (तम रज सत्व) सुधारण्यासाठी लक्षण चिकित्सा करावी.२) समलिंगी सहवास कधीही करू नये. जर ह्या नियमांचें पालन सर्व स्त्री-पुरुष करतील तर त्या समाजात लैंगिक प्रश्न निर्माण होणार नाहीत. समलिंगी संबंध करण्याची इच्छा तमोगुणाचे लक्षण आहे. अध्यात्म साधना करण्यासाठी हे सर्व माहीत असणे आवश्यक आहे. साधकाची प्रगती कशी होते ते दाखवणारा आलेख येथे दिला आहे तो पहावा.

## परिशिष्ट तीन

व्याध गीतेत मांसाहार व शाकाहार ह्या बद्दल बरीच चर्चा झाली आहे. त्या अनुषांगाने आधुनिक विज्ञानात जी माहीती उपलब्ध आहे त्याचा थोडक्यात गोषवारा येथे दिला आहे. त्यामुळें वनस्पती जीवंत असते व तिला संवेदना असतात हे समजणे सोपे होईल. खाण्यासाठी प्राणी मारणे अथवा वनस्पती मारणे हे सारखेच पाप कारक असते परंतु, आधुनिक संशोधना नुसार शाकाहार जास्त पापकारक असतो हे सिद्ध झाले आहे हा विरोधाभास (Apperent paradox) मनाला अस्वस्थ करणारा असला तरी विज्ञानात असें अनेक विरोधाभास आपण पहात असतो. म्हणतात नां, "दिसते तसें नसते", त्याचा येथे अनुभव आपणाला येत असतो. ज्या वाचकांना ह्या विषयात रस आहे त्यांनी हे वाचावे.

वनस्पतीला भावना असतात हे प्रथम १८४८ साली डॉ. गुस्ताव थेओडोर ह्यांनी प्रयोगांच्या मदतीने सिद्ध केले. ते प्रयोगिक मानस शास्त्रज्ञ होते. त्यांने प्रयोगांनी दाखवून दिले कीं, जर वनस्पतीला चांगली वागणूक दिली गेली तर तिच्यात चांगली वाढ झाल्याचे अनुभवास येते. चांगली वागणूक कशी द्यावयाची त्याची पद्धतसुद्धा त्यांनी दाखवली होती.

भारतीय वैज्ञानिक श्री. जगदीश चंद्र बोस जे बंगाल प्रांतातून होते त्यांनी प्रयोग करून १९०० साली वनस्पतीला भावना असतात व संवेदन क्षमतासुद्धा असते हो सिद्ध केले आहे. त्यांनी दाखवून दिले प्रयोगांद्वारा किं, वनस्पतीच्या प्रत्येक पेशीमध्ये जो केंद्र असतो त्यात त्या पेशीचा मेंदू असतो व त्यात त्या पेशीच्या संवेदना व्यक्त होत असतात. प्राण्यांत जसे एक मेंदू असतो तसा वनस्पतींचा नसतो. त्यातील प्रत्येक पेशी एक स्वतंत्र व्यवस्था अशी काम करत असते. प्राण्यात आणि वनस्पतीत संवेदनेबद्दलच्या व्यवस्था भिन्न असतात. ज्याप्रमाणे प्राण्याच्या स्नायूमध्ये दुःख व्यक्त करणारी प्रतिक्रीया होत असते त्या प्रकारची प्रतिक्रीया वनस्पतीतील पेशींच्या बाह्य थरात होणाऱ्या आकुंचन व प्रसरणामुळें व्यक्त होत असते. त्यांचा अभ्यास करून त्यांनी दाखवून दिले किं, वनस्पतीला आनंद, दुःख, चिंता, भिती अशा भावना असतात व त्या ती दाखवत असते. ती आकुंचन व प्रसरणं मोजण्याचे साधन त्यांनी तयार करून त्या द्वारा वनस्पतीच्या संवेदनांचे मोजमाप करून दाखवले होते.

प्रसिद्ध इंग्रजी लेखक जॉर्ज बर्नार्ड शॉ एकदा जगदीश चंद्रांच्या प्रयोग शाळेत ते प्रयोग पहाण्यासाठी गेले होते तेव्हां त्यानी पाहिले किं, एक कोबी पाण्यात शिजण्यास ठेवला होता तो कसा विव्हळत होता. अशा स्थितीत वनस्पतीतून निघणार्या संवेदना त्या पेशींच्या आकारा प्रमाणे सुक्ष्म असल्याने त्या आपल्या ज्ञानेंद्रीयांना जाणवत नाहीत. त्यामुळें असा समज होतो कीं, त्या वनस्पतीला कांहीं संवेदना नाहीत. परंतु, त्या प्रयोगांनी शॉना समजले किं, प्राण्यांप्रमाणे वनस्पतींलासुद्धा भावना, वेदना होत असतात. जगदीश चंद्रांनी विविध प्रयोग करून दाखवून दिले किं, जेव्हां वनस्पतीला पाणी दिले जाते, सेंद्रीय खते दिली जातात अथवा एकाद्या विषाचा प्रयोग केला जातो तेव्हां त्या सर्वांची त्या प्रकारची प्रतिक्रीया त्या वनस्पतीतील पेशी देत होत्या. ते प्रयोग असंख्य वेळा निरनिराळ्या प्रकारच्या वनस्पतींवर केले गेले व त्यातून ते एकच सिद्ध झाले कीं, वनस्पतींना समजते केव्हां त्यांना खाणे दिले आहे व केव्हां वीष दिले होते. ते सगळे मोजण्याचे एक उपकरण बोसांनी तयार केले होते. त्यामध्ये सुक्ष्मातील सुक्ष्म संवेदना दाखवणार्या पेशींच्या बाह्य सालीतील हालचाली मोजता येत होत्या. त्यातून दिसून येत होते  कीं, प्राण्यांप्रमाणे वनस्पतींलासुद्धा संवेदना असतात फक्त फरक असा असतो कीं, प्राण्याच्या संवेदना संयुक्तपणे त्याच्या मेंदूतून व्यक्त होतात व वनस्पतीच्या अशा संवेदना प्रत्येक पेशी स्वतंत्रपणे व्यक्त करत असते. प्राण्याच्या संवेदनांची व्यवस्था अशी असते कीं, शरीराच्या ज्या भागाला इजा झाली त्या भागातून त्याबद्दलची सुचना प्रथम मेंदूकडे नेली जाते व मेंदूकडून त्याची योग्य प्रतिक्रीया (वेदनेची) परत त्या भागाकडे पाठवली जाते. त्यामुळें वेदना झाल्याचे त्या प्राण्याला जाणवते. त्याला शास्त्रीय भाषेत प्रतिक्षिप्त क्रिया असे समजले जाते. त्यानंतर तो शरीराचा भाग योग्य प्रतिक्रीया व्यक्त करत असतो. वनस्पतीत अशी केंद्रीत व्यवस्था नसते. तेथे प्रत्येक पेशी तिची प्रतिक्रीया स्वतंत्रपणे व्यक्त करते कारण त्या पेशीचा मेंदू तिच्यातच असतो. दुःख, वेदना, आनंद, भिती वगैरे प्रतिक्रीया वनस्पतीच्या पेशी त्यांच्या सभोवार विशिष्ट संवेदना दर्शक कंपने पाठवून सांगत असतात. प्राण्यांत एक मेंदू असतो व सगळे शरीराचे भाग त्याला ज्ञानतंतूनी जोडलेले असतात. त्या ज्ञानतंतूंच्या द्वारा त्या वेदना, आनंद, दुःख, सुख इत्यादी प्रेरणा मेंदू त्या शरीराकडे पाठवत असतो. अशारितीने ज्ञानतंतू शरीराच्या भागाकडून प्रथम मेंदूकडे

संवेदना पाठवतात व त्याची प्रतिक्रीया कोणती तो संदेश त्याच ज्ञानतंतूंकडून त्या भागाकडे येत असतात. अशी केंद्र शासित व्यवस्था असते. वनस्पतीत अशी केंद्रशासित व्यवस्था नसते तेथे प्रत्येक पेशी तिच्या सुख दुःखाच्या प्रतिक्रीया तेथल्या तेथेच व्यक्त करत असतात. जगदीशचंद्रानी जे प्रयोग केले त्याचे फलित ते असें सांगतात कीं, प्राणी, वनस्पती ह्यांच प्रमाणे वरवर निर्जीव वाटणार्या गोष्टीसुद्धा त्यांच्या संवेदना व्यक्त करत असतात पण माणसाच्या ज्ञानेंद्रीयांना त्या समजत नाहीत कारण, आपली ज्ञानेंद्रीये तितक्या सुक्ष्म तरल संवेदना पकडण्यासाठी विकसित झालेली नाहीत. परंतु, केवळ माणसाला त्या जाणवल्या नाहीत म्हणून त्या होतच नाहीत असें म्हणणे शास्त्रोक्त दृष्ट्या बरोबर होणार नाही. जगदीशचंद्रांच्या मतें सगळे विश्व सजीवतेच्या निरनिराळ्या पातळ्यात असते. शून्य सजीवता कोठेच नसते. फक्त त्या सजीवतेची तीव्रता इतकी कमी असते किं, ते सजीव नाही असें आपण समजून मोकळे होतो. परंतु, विज्ञान तसे मानू शकत नाही. माणसाच्या सजीवतेच्या अपेक्षा फार मोठ्या असतात, त्यापेक्षा कमी सजीवता असेल तर त्याला तो निर्जीव म्हणून सांगू लागतो, ती त्याच्या ज्ञानाची मर्यादा असते. मात्र विज्ञानाच्या अभ्यासात असें मोघम समजून चालत नाही. ज्या सुक्ष्म सजीवता असतात त्यांचे समर्थन आपण कांहीं वेगळी उपपत्ती सांगून करत असतो. सुरुवातीला बोसांना न समजणारे शास्त्रज्ञ सावकाशपणे त्यांचे सिद्धांत समजू लागले व आज सगळें शास्त्रज्ञ हे मान्य करतात की, वनस्पती केवळ सजीव आहेत असें नाही तर त्यांना संवेदना असतात व त्या त्यांच्या संवेदना त्यांच्या वेगळ्या पद्धतीने व्यक्त करत असतात. त्या संवेदना मोजण्यासाठी एक उपकरण जगदीशचंद्रानी तयार केले होते त्यांचे नांव **क्रेस्कोग्राफ** असें त्यांनी ठेवले आहे. कंपन स्वरुपातील अतिशय सुक्ष्म संवेदना ते उपकरण मोजू शकते. आपला सिद्धांत त्यानी ज्या दोन पुस्तकांतून समजावून सांगितला आहे ती पुस्तके १९०२ व १९२६ साली त्यांनी प्रसिद्ध केली होती. त्यांची नांवे अशी आहेत, "सजीव आणि निर्जीव वस्तुंच्या प्रतिक्रीयांचा अभ्यास" (१९०२), "वनस्पतीतील ज्ञानतुतूंची व्यवस्था" (१९२६). त्यांची इंग्रजी नांवे अशी आहेत अनुक्रमे, "Living and Non-Living" (1902) and "The Nervous Mechanism of Plants" (1926).

वनस्पतीच्या पेशी निहाय संवेदनांमुळें त्यातील प्रत्येक पेशी हे एक संपूर्ण स्वतंत्र वनस्पती केंद्र असते. तसें प्राण्यांच्या बाबत नसते. प्राण्याच्या शरीराच्या पेशी तशा स्वतंत्र नसतात. त्यांच्या सगळ्या क्रियांवर मेंदूचे नियंत्रण असते. जर प्राण्याच्या शरीराची पेशी त्या शरीरापासून वेगळा काढली तर ती स्वतंत्रपणे कांहींच करू शकत नाही व ती मृत समजली जाते. तसें वनस्पतीच्या पेशींचे नसते. ती पेशी जर योग्य परिस्थिती तिला मिळाली तर तिच्यातून एक संपूर्ण वनस्पती वाढत जाऊ शकते. त्यालाच आपण "ऊती संवर्धन", असें म्हणतो. इंग्रजीत त्याला "tissue culture", असें म्हणतो. त्या कारणामुळें प्राण्याच्या पेशींपासून ऊती संवर्धन करता येत नाही.

त्यामुळें प्राणी त्याच्या मेंदूला बेहोष करून त्याची संवेदना नष्ट करून, मग मारले तर त्याला वेदना होत नाहीत. जसें शस्त्रक्रिया करतांना रुंग्णाला बेहोष करून त्याच्यावर मोठी शस्त्रक्रिया केली तरी त्याला त्याच्यामुळें कांहींही वेदना होत नाहीत व शस्त्रक्रिया सुखरुपपणे होत असते. तसें वनस्पतीच्या बाबत शक्य नसते कारण तिला केंद्रीय संवेदना व्यवस्था जशी प्राण्यांत असते तशी नसते. जर वनस्पतीला बेहोष करण्याचे असेल तर तिच्या प्रत्येक पेशीला स्वतंत्रपणे बेहोष करावे लागेल जे केवळ अशक्य आहे. म्हणून वनस्पतीला शिजवतांना, कापतांना, उपटतांना असें सगळे दुःख दायक विधी करतांना हिंसा होत असते. त्यात त्या दुःखदायक गोष्टी प्रत्येक पेशीसाठी होत असते. एका वनस्पतीत असंख्य पेशी असतात. समजा एक बटाटे घेतले, त्यात असंख्य पेशी असतात. म्हणजे जेव्हां एक बटाटे उकडले जाते तेव्हां त्या सगळ्या असंख्य पेशींची हिंसा होत असते. समजा उदाहरणासांठी, एका बटाट्यात पन्नास हजार पेशी आहेत. जेव्हां ते बटाटे उकडले तेव्हां त्या सगळ्या पन्नास हजार पेशींची हिंसा झाली, म्हणजे पन्नास हजार पापं झाली. त्या विरुद्ध एक कोंबडी मारली तर एकच हिंसा झालेली असते, एक गाय मारली तर सुद्धा पाप एकच झालेले असते, आणि एक हत्ती मारला तरी पाप एकच होत असते म्हणजे जीवाचा आकार किती मोठा अथवा लहान ह्याचा पाप गणनेत फरक पडत नाही. असें पाहिले तर शाकाहार किती जास्त हिंसक आहे ते स्पष्ट होते.

वनस्पतीच्या पेशी विरुद्ध परिस्थिती उत्पन्न झाला कीं मरतात. म्हणजे जास्त उष्णता, कांहीं रसायनांचा विरोधी गुण त्याचा प्रभाव किंवा चिरडण्यासारख्या घटना झाल्यातर ती

मरते. तसेंच कांहीं वनस्पती अल्पकाळ जगणार्या असतात जशी आपली पिकं. त्यात फलोत्पादन झाले कीं. ती वनस्पती वाळून जाऊन मरते. वनस्पतीचे फळ जसे धान्य, बीया ह्यांचे आयुष्य असते. कांहीं काळानंतर त्यातील जीव नष्ट होते त्यामुळे त्यांची पेरणी केली तर ते नवीन रोपाच्या स्वरुपात मोठे होत नाही. साधारणपणे दोन ते तीन वर्षापेक्षा जास्त कोणाही पिकांच्या धान्याचे, कडधान्याचे, बियांचे आयुष्य नसते. परंतु कंदमुळं, हिरव्या पालेभाज्या ह्यात त्या हिरव्या आहेत तोवर जीव असतो व त्यांतून ऊती संवर्धन क्रियेने नवीन वनस्पती उत्पन्न होऊ शकते. असें दिसते कीं, वनस्पतीच्या कांही भागातील पेशीतून ऊती संवर्धन होत नाही म्हणजे त्यांत संवेदना नसतात. त्यामध्ये प्रामुख्याने फळं, फुलं हे भाग येतात. माणूस खाण्यासाठी वनस्पतीतील जे भाग घेत असतो त्या सगळ्यांतील पेशी संवेदनक्षम असतात. त्यामुळें शाकाहार केव्हांही जास्त हिंसक व म्हणून पाप कारक ठरतो.

प्राचीन जैन विचार अहिंसाच्या नांवाखाली मांसाहारा विरुद्ध असल्याचे दिसते. त्याचे कारण त्या काळातील ज्ञानी लोकांचे ज्ञान अपुरे होते. ते वरकरणी जे वाटते त्यालाच खरे मानून त्यांचे नियम करत असावेत. परंतु, आता जे विज्ञान आपल्याला उपलब्ध आहे त्यानुसार आपल्याला पूर्वीचे सगळे नियम तपासून पहावे लागणार आहेत. त्यात पूर्वग्रहाचे समर्थन करण्याचा आग्रह, प्रतिष्ठेचा प्रश्न करून, चालू ठेवणे कितपत योग्य आहे असें विचारावे लागते. जर पूर्वज अज्ञानी होते तर ते आपल्याला मान्य करण्यात कमीपणा वाटण्याचे कांहीं कारण नसले पाहिजे. त्यातसुद्धा हे अज्ञान फक्त जैन विचारात आढळते. कारण, वेदांत आणि इतर प्राचीन हिंदू साहित्यात म्हणजे महाभारतात विशेष करून व्याध गीतेत जे दिले आहे त्यावरून आपण असें खात्रीने सांगू शकतो किं, वैदिक ऋषींना ते सगळे माहीत होते जे आधुनिक विज्ञान सांगत आहे. कारण, वेदांत मांसाहाराचा आग्रह पुण्य मार्ग म्हणून सांगितला आहे व त्यासाठी जी स्पष्टीकरणें दिली आहेत ती सगळी आधुनिक विज्ञानाने मान्य केलेल्या शोधांनुसार आहेत.

मनुस्मृतीतील संदर्भ ह्यासाठी पहावे लागतील. त्या संदर्भात असें सांगितले आहे किं गृहस्थाच्या घरात पांच खाटीकखाने असतात. ते असें,

पहिला खाटीकखाना आहे, झाडू हा एक खाटीकखाना असें सांगितले आहे. झाडूमुळें साफसफाई करतांना असंख्य सुक्ष्मजीव मारले जातात म्हणून झाडूला खाटीकखान्याची उपमा दिली आहे.

दुसरा आहे खल बत्ता, त्यात खाण्याचे पदार्थ कुटले जातात.

तिसरा आहे दळणाचे जाते. त्यात धान्य दळून बारीक करतात म्हणजे त्यांचे जीवंतपणी चूर्ण केले जाते त्यामुळें ते धान्यातील जीव मारले जात असतात. त्यानंतर त्यापासून चपात्या, भाकर्या इत्यादी खाण्याचे पदार्थ बनवले जात असतात.

चौथा खाटीकखाना आहे, चूल. त्यात लाकडे जाळले जातात त्यामुळें त्यातूल जीव मारले जातात. त्याशिवाय इतर जीवसुद्धा मारले जातात त्या चुलीच्या उष्णतेमुळें.

पांचवा खाटीकखाना आहे भांडे अथवा पात्र ज्यात जेवण शिजवले जाते. त्यामुळें पुनः अनेक जीव मारले जात असतात. [मनुस्मृती भाग ३: ६८]

मनुस्मृती प्रमाणे अशाप्रकारे घरात सतत हत्या होत असते त्यामुळें हिंसासुद्धा बर्यापैकी होत असते. त्यावरून मनुस्मृतीत हे मान्य केले आहे असें दिसते कीं, शाकाहार करतांना सुद्धा जीवांची हिंसा होतच असते. त्यापासून मुक्त होण्यासाठी कांहीं व्रतं सांगितली आहेत.

शाकाहारामुळें कशी जास्त पापं होतात ते दाखवणारी कांहीं उदाहरणं पाहू. एक चपाती बनवण्यासाठी समजा ४०० दाणे लागतात. म्हणजे एक चपाती करण्यासाठी चांरशें पापं करावी लागतात. त्या बरोबर खाण्यासाठी वाटीभर डाळ लागेल, त्यासाठी समजा १६० दाणे लागतात. म्हणजे एक चपाती खाण्यासाठी एकंदर पांचशे साठ पापं करावी लागतात. तरी पोट भरेल असें नाही. त्या ऐवजी समजा एक कोंबडी मारली व तीसुद्धा विनावेदना पद्धतीने तर कांहीं पाप झालेले नाही व त्याने पोट भरते. जरी विनावेदना नाही मारता आले तरी एकच पाप झाले असते. ह्या उदाहरणांने शाकाहार कसा जास्त पापमय असतो हे स्पष्ट होते.

आपण जेव्हां पाप विरहीत जीवन जगण्याचा विचार करतो तेव्हां इतर संबंधित गोष्टीसुद्धा पहाव्या लागतात. त्यामध्यें हत्या, वेदना, दुःख, हिंसा अशा आणखीन कांहींचा विचार करावा लागतो. ह्या चार गोष्टींमुळें ते करणार्या इसमाला पाप लागत असते. त्यात वेदना

आणि दुःख ह्या दोन गोष्टी पापाचे कारण असतात. हत्या जर वेदना कारक असेल तर तशी हत्या दुःखास कारणीभूत होत असते. पण जर त्यात वेदना नसेल तर त्यामुळें पाप लागत नाही. वेदनांचा परिणाम असतो दुःख. वेदना जितकी जास्त तितके दुःख जास्त असते. जेव्हां हत्येत वेदना असते तेव्हां अशा हत्येलाच हिंसा असें म्हणतात. पापाचे गणिती परिमाण नाही, एरवी त्याचे गणिती प्रमाण दाखवता आले असते. परंतु, आपण एक जीव मेला की एक पाप असें परिमाण ठरवून पाप मोजावयाचे ठरवले तर किती हिंसा झाल्या त्यावरून पाप किती झाले ते ठरवता येईल. मागे घेतलेल्या उदाहरणात आपल्याला दिसते कीं, शाकाहार करतांना केव्हाही जास्त पाप होत असते.

वेदांत दिल्याप्रमाणे कांहीं पापं माणसाला करणे अपरिहार्य म्हणून अनिवार्य असतात. ती करावीच लागतात जसें गृहस्थाच्या घरातील पांच खाटीकखाने. त्यामुळें जे पाप होते त्याच्या निवारण्यासाठी कांहीं व्रत सांगितली आहेत व असें समजले जाते कीं, त्यामुळें ती पाप धुतली जातात. परंतु जी पाप करणें टाळता येण्यासरखी असतात ती करण्याने जे पाप लागते त्याचे परिणाम माणसाला भोगावेच लागतात.

कांहीं लोकांना शाकाहार आवडतो अशां लोकांनी कोणता शाकाहार करावा ज्यामुळें दुःख उत्पन्न होणार नाही ते पाहिले पाहिजे. त्यासाठी असे वानस्पतिक पदार्थ निवडावे लागतील जे खाण्यामुळें हिंसा होणार नाही. अशा वानस्पतिक पदार्थांच्या शोधात जे निष्पन्न झाले ते येथे दिले आहे.

प्रथम हिरव्या भाज्या घेतल्या. त्यात असलेल्या पेशी सदैव सजीव असल्यामुळे त्यांचा उपयोग करणे श्रेयस्कर ठरणार नाही. अशा भाज्यांतील सजीवता तीन दिवस त्या कोरड्या वातावरणात राहिल्या तर नष्ट होते म्हणजे अशा भाज्या ताज्या खाता येणार नाही. परंतु, शिळ्या झाल्यावर खाल्याने हिंसा होणार नाही. कंदमुळांची सजीवता कधीच जात नाही म्हणजे ती खाता येणार नाहीत. त्यांत रताळं, बटाटी, कांदा, आलं, लसूण, अशा भाज्या खाता येणार नाहीत. धान्यातील जीव त्याच्यात दोन ते तीन वर्ष रहातो व त्यानंतर त्यांची उपजकता संपते म्हणजे अशी धान्य, कडधान्य, बिया तीन वर्षे त्यांच्या कणसांसह साठवून ठेवली कां त्यांच्यातील सजीवता संपुष्टात येते त्यानंतर त्यातील दाणे काढून ते खाता येतील. म्हणजे असें धान्य, कडधान्य, बिया खाता येतील.

साठवण्यासाठी कोरडी परिस्थिती असावी लागते. असें निष्कर्ष निघाले. किडलेली धान्येसुद्धा खाता येतील. फळांत आणि फुलांत ऊती संवर्धना सारख्या पेशी नसतात त्यामुळें त्यांच्या सजीवता नसते. म्हणजे फळं खाता येतील. नारळ हे बिज आहे म्हणून तो खाता येणार नाही. त्याच प्रमाणे सुपारी वगैरे बिया खाता येणार नाहीत. असे जरी करू शकलो तरी शेतात शेतकर्यानी जी हिंसा केलेली असते शेती करतांना, त्या हिंसेचे पाप तो शाकाहार करणार्या माणसास लागणारच. अशा पापांना अपरोक्ष पापकर्म असें म्हणतात, अपरोक्ष पापकर्म अनिवार्य वर्गात येतात.

मांसाहारासाठी प्राण्यांना बेहोष करुन त्यानंतर त्यांची हत्या करावी लागते तरच ती हत्या अहिंसक ठरते. व्याध गीतेत त्यासाठी सिद्ध पद्धत दिली आहे ती अशी, ज्या प्राण्याचा वध करावयाचा असतो त्या प्राण्याला गुगी आणणार्या तसा खुराक दिला जातो. त्यामुळें तो प्राणी बेहोष होतो. त्याला एका चौथर्यावर झोपवले जाते. त्यानंतर त्या प्राण्याची मानेकडील नस कापली जाते व रक्ताचा मेंदूकडे होणारा प्रवाह थांबवला जातो. त्यामुळें त्या प्राण्याची संवेगनक्षमता नष्ट होते. तो विनावेदना मरतो. अशाप्रकारे मारलेला प्राणी खाल्याने हिंसा होत नाही. हा विधी करत असतांना त्या ठिकाणी दुसरा प्राणी ते पहात असेल तर त्यामुळें व्याधाला पाप लागते. म्हणून अशी क्रिया गुप्तपणे करावयाची असते. म्हणजे पाप लागत नाही. शाकाहारी व मांसाहारी असें दोघेही अंडे खाऊ शकतात. त्यासाठी निर्जीव अंडे खाण्याने पाप लागत नाही कारण, त्यात जीव नसल्याने हिंसा होत नाही. परंतु, जर ते अंडे सजीव असेल तर ती हिंसा होण्याची शक्यता असते. त्यासाठी ज्या खुराड्यात कोंबडी बरोबर कोंबडा ठेवलेला नाही अशा खुराड्यातील कोंबडीचे अंडे खावे. काहीं तज्ज्ञांच्या मते अंडे सजीव असले तरी त्यात संवेदना नसल्याने ते फोडल्याने कोणतीही वेदना त्या अड्याला होणे शक्य नसते म्हणजे जर ते मान्य झाले तर सजीव अंड खाण्यानेसुद्धा पाप लागत नाही. दूध हा आहार नेहमीच विवाद्य राहिला आहे. वरील विवेचनामधून एक गोष्ट स्पष्ट होते कीं, शाकाहार केव्हांही मांसाहारापेक्षा जास्त हिंसक असतो.

वनस्पतीच्या संवेदन क्षमतेवर जे संशोधन जगदीशचंद्र बोसांपासून अनेक वैज्ञानिकांनी केले आहे त्याची माहीती ह्या भागात आपण पहाणार आहोत त्यामुळें वनस्पतीला प्राणिमात्रांप्रमाणे भावना, वेदना, दुःख असें सगळे विकार असतात ते सिद्ध होते.
ज्ञानतंतू नसलेली परंतु, संवेदना असलेली अशी पेशी व्यवस्था वनस्पतींमध्ये असते हे सिद्ध करण्यासाठी जे प्रयोग केले गेले त्याची माहीती येथे पहाणार आहोत.

**बँकस्टर परिणाम** –

ज्याप्रमाणें प्राण्यांना मेंदू असतो व त्याच्या कडे त्या प्राण्याच्या शरीरातील सगळ्या संवेदना ओळखण्याची व्यवस्था असते व त्या संवेदना मेंदूकडून त्या प्राण्याच्या शरीरात जेथे ती संवेदना उत्पन्न झाली तेथे पाठवण्यासाठी एक सुव्यवस्थित असें ज्ञानतंतूंचे जाळे असते. त्या व्यवस्थेमुळें प्राणी त्याच्या वेदना व इतर जाणीवांना ओळखू शकतो. तशी व्यवस्था वनस्पतीत नसते म्हणून वनस्पतींना संवेदना नसणार असा समज बराच काळ वैज्ञानिकांमध्ये प्रचलित होता. तरीसुद्धा वनस्पतींच्या पेशींमध्ये जनुक संच ज्याला डीएने म्हणतात तो असतो व त्याचा विकास प्राण्यांच्या जनुक संचा सारखाच होत असतो हे मात्र मान्य झाले होते. त्याचप्रमाणे वनस्पती मध्ये प्रजनन होत असते. ह्या गोष्टी पहाता त्यांच्यात भावना असूच शकणार नाहीत कारण माणूस त्या सिद्ध करू शकत नाही, हे न मान्य करणारे शास्त्रज्ञ पुढे येत होते व त्यांची संख्या वाढत होती.
संवेदना समजण्यासाठी मेंदू सारखा अवयव असणे जरुरीचे असते व अगदी अतिसुक्ष्म जंतूंनासुद्धा तो असतो परंतु, कोणत्याही प्रकारच्या वनस्पतीत असा भाग आढळत नव्हता. मेंदू नाही म्हणजे त्यांना त्या संदर्भातील कोणतीही जाणीव असणे शक्य नाही असें गृहीत तत्त्व सर्वमान्य होते. प्राण्यांत असलेल्या ज्ञानेंद्रीयांकडून संवेदना मेंदूकडे नेणार्या नसा असतात व मेंदूकडून पुन्हा त्याबद्दलची मेंदूची प्रतिक्रीया त्या अवयवाकडे आणणार्या दुसर्या नसा असतात अशी कोणतीही व्यवस्था कोणत्याही वनस्पतीत वैज्ञानिकांना आढळत नव्हती. म्हणून प्राण्या प्रमाणे वनस्पतीला जाणीवा (ESP, Extra Sensory Perception) नसणार असा समज रुढ होता.

अशी एकंदर शास्त्रज्ञात धारणा असतांना त्याची अजिबात कल्पना नसलेल्या एका प्रयोगवीरांने जे संशोधन केले त्यामुळें वनस्पतींत अशी जाणीव असते हे अपघाताने सिद्ध झाले व नंतर त्याची दखल प्रस्थापित वैज्ञानिकांनी घेण्यास सुरूवात केली. मनुष्याच्या आणि वनस्पतीच्या शरीराचा अभ्यास नसलेल्या त्या माणसांने तो शोध लावला कारण त्याचे विचार इतर शास्त्राज्ञांप्रमाणे, पूर्वग्रहदुषित नव्हते. त्याच्या प्रयोगात तो दाखवू इच्छित होता किं, वनस्पती माणसाचे मन ओळखू शकतात. त्या प्रयोगवीराचे नांव होते क्लिव्ह बँकस्टर. त्यांने त्याचा शोध एका मानसशास्त्राच्या मासिकांत प्रसिद्ध केला. त्याच्या लेखाचे नांव होते, "वनस्पतीतील प्राथमिक संवेदनांची लक्षणे”, (अंक १०, १९६८, पान क्रमांक ३२९-३४८).

त्याने एका पॉलीग्राफ यंत्राच्या मदतीने ते दाखवून दिले होते. बँक्टर ह्यांनी, पर्यायी औषध चिकीत्सा, ह्या विषयात उच्च पदवी मिळवलेली होती. त्या संशेधन पत्रिकेत बँकस्टरने केलेले दावे कांहीं प्रस्थापित वैज्ञानिकांनी जसें हॉरॉविट्झ, ल्युविस आणि गेस्टीयर (१९७५) स्वीकारले नाहीत. तरीसुद्धा बँकस्टरच्या शोधाचे भरपूर चाहते निर्माण झाले. ते अतिंद्रिय मानसशस्त्र, आदिभौतिक विज्ञान अशा शाखांतील होते. त्या विज्ञान शाखांतील सभांमध्ये त्याला भाषण देण्यासाठी बोलावणी येऊ लागली होती. त्याच्या मते प्रमाणिकरणाचे निकष जे शास्त्रज्ञ सांगतात ते ह्या प्रकारच्या प्रयोगात लागू होत नाहीत. बँकस्टर त्याच्या अनुभवाची कथा सांगतो ती येथे देत आहे.

न्युयॉर्क शहरात, २ फेब्रुवारी १९६६ दिवशी त्याच्या प्रयोगशाळेत एक लहानसें रोपटे कुंडीत होते . त्याच्या जवळ मेजावर एक पॉलिग्राफ यंत्र होते. तेथे त्या प्रयोगशाळेत तो मुलांना पॉलिग्राफ कसा वापरावयाचा त्याचे शिक्षण देत असे. त्या दिवशी त्याच्या मनात आले कीं, शोध घ्यावा पॉलिग्राफ यंत्राच्या मदतीने कीं, त्या रोपट्याला त्याच्या मुळांना मातीतून पाणी रोपाच्या वरच्या टोकाला पोहोचवण्यास किती वेळ लागतो. त्याने एका पॉलिग्राफच्या आकड्याने त्या रोपाच्या एका वरच्या पानाला पकडले. त्याच्या मदतीने तो त्या पानाची विद्युत प्रवाहाला असलेला विरोध मोजणार होता. पॉलिग्राफ मधून तो एक अतिशय सुक्ष्म विद्युत प्रवाह पाठवतो. पॉलिग्राफ वापरणारे समजतात किं, त्या विरोधाच्या प्रमाणावरून त्या रोपात कांहीं भावना आहेत कां ते समजेल. कारण असा

विरोध त्या प्रकारच्या गोष्टी मोजण्यासाठी वापरतात. माणसासाठी जेव्हां तो वापरला जातो तेव्हां, त्यातून ज्या कंपनाच्या मोजण्या होतात त्यामुळें तो माणूस खरे बोलतो कां खोटे ते समजते. जेव्हां त्यांने त्या रोपट्याच्या कंपनांचे मोजमाप केले तेव्हां ते असें होते किं, जणू काय ते रोप आनंदात आहे. त्यांने त्याचा असा अर्थ काढला कीं त्या रोपाला पाणी मिळाल्यामुळें ते आनंदी झाले आहे. त्यानंतर त्यांने पाणी देणे थांबवले व त्या स्थितीत काय कंपने येतात ते पाहिले. त्याला अशी कंपने आढळली जसे ते रोप दुःखी झाले आहे. अशा बर्याच चाचण्या त्यांने केल्या व त्यावरून तो निष्कर्ष त्याने काढला कीं वनस्पतीला भावना असतात व त्या भावना ती रोपं अशा कंपनाद्वारा व्यक्त करतात.

बॅंकस्टरने जो निष्कर्ष काढला तो असा, तो सांगतो, कुंडीतून ते मळलेले पाणी रोपाच्या दांड्यातून वर पर्यंत चढले आणि पानापर्यंत गेले व पान पाण्याने संपृक्त झाले होते, त्यामुळें त्या पानाचा विद्युत प्रवाहास विरोध कमी झाला होता. त्यामुळें ते पाणी रोपात चढण्यास कितीवेळ लागला ते मला समजले. कारण जेव्हां पाणी पोहोचले नव्हते तेव्हा विरोध जास्त दाखवत होते पॉलिग्राफ. त्याचा प्रश्न असा कीं, पॉलिग्राफ ते का दाखवत होते? तो जात्याच्या प्रकारातील मंडल (Wheatstone bridge circuit) वापरत होता. त्याचा अंदाज आधी सांगितला होता तो होता परंतु, प्रत्यक्षात त्याच्या नेमके विरुद्ध दाखवले जात होते. त्यामुळें तो अचंबित झाला होता.

त्यानंतर त्याने विजेचे दांडे (इलेक्ट्रोड) हलवले, त्यावेळी पॉलिग्राफने माणसाच्या चाचणीच्या वेळी जसा आलेख दाखवावा तसा आलेख तयार झाला. जेव्हां तो चाचणीत असलेला माणूस काळजी करत असतो. जणू काय तो रोप काळजी करण्याच्या मनस्थितीत गेले होते. त्या अनुभवा नंतर त्याचे रोपातील पाण्याचे वागणे कसे आहे ते पहाण्याचे थांबवून तो त्या रोपाचे मानसिक वर्तन तपासण्यास सुरूवात करतो, असें गृहीत धरून कीं, त्या रोपाला मन आहे. त्याला असें वाटू लागले कीं, ते रोप त्याला कांहीं सांगत आहे त्या कंपनाद्वारा. त्या रोपाच्या कंपनाच्या तर्हा अशा होत्या जशा असतात एकाद्या माणसाच्या जेव्हां त्याची चाचणी पॉलिग्राफ यंत्रावर केली जाते. हा अनुभव त्याच्यासाठी नवीन होता व विचार करावयाला लावणारा होता. त्या रोपाला अशी भिती कां वाटली ते मात्र त्याच्या लक्षात आले नाही. माणसे खोटे बोलत तेव्हां जशी कंपन

पॉलिग्राफ नोंदत होते तशी कंपन ते रोप सोडत होते त्यामुळें ते माणसासारखे वागत आहे ह्याबद्दल त्याला खात्री वाटू लागली. त्याला प्रश्न पडला कीं, एकाद्याच्या जीवाला धोका होण्याची कंपनं व खोटं बोलण्याची कंपन सारखीच कां असतात. बँकस्टरच्या लक्षात कदाचित आले नसेल किं ते रोप त्याला चुकीच्या कंपनाने फसवत होते कीं काय?

बँकस्टरने आणखीन कांहीं चाचण्या केल्या त्यामध्ये तो त्या रोपाचे पान गरम कॉफी मध्ये बुडवत असें, त्याला अशा प्रयोगात कोणताही प्रतिसाद त्या रोपांने दिला नाही किं, त्याचा कांहीं अर्थ काढता येईल. परंतु, तरी बँकस्टरची जिज्ञासा कमी झाली नाही. त्याने असा कयास केला किं, कदाचित रोपाला त्याच्या प्रयोगात कांहीं धोका न वाटल्यामुळें ते रोप आता कोणतीही प्रतिक्रिया देत नाही. म्हणजे हे सुद्धा एका प्रकारे एकाद्या जीवंत बुद्धीमान प्राण्यासारखे वागणे होते. परंतु, हे सगळे त्याचे कयास (हायपोथेसीस) होते. त्यांना कोणताही सिद्ध पुरावा नव्हता. त्यामुळें तो एक फार धाडसी निर्णय घेतो, तो ठरवतो कीं, तो ते पान ज्याला पॉलिग्राफचा दांडा (इलेक्ट्रोड) लावला होता ते जाळावयाचे. तो तसें कां करणार होता, कारण त्यांमुळें त्या रोपाला कळावे कीं, तो गमंत करत नाही. त्याचा दुसरा उद्देश होता, त्या पानातील ओलावा काढून ते पान कोरडे करावे. म्हणजे पॉलिग्राफ मोजदाद करू शकणार नाही. ते करण्याचे त्याने ठरवले पण त्याच्या कडे कांडेपेटी नव्हती की तो आग निर्माण करू शकेल. त्याने तसे करण्याचा विचार फक्त केला होता, प्रत्यक्ष कांहींच केले नव्हते तरी त्याच्या विचारामुळें किं काय त्या रोपांने भितीच्या दर्शक कंपनं देण्यास सुरूवात केली. त्याला समजले कीं, ते रोप त्याचे विचार समजू शकत होते. मी त्या रोपापासून पांच फुटावर उभा होतो व त्या पॉलीग्राफने भयंकर गडबड सुरू केली. त्याचे नेमके काय कारण मला समजले नाही. त्या त्या रोपाच्या वागणूकीने बँकस्टरला खात्री पडली कीं, ते रोप त्याच्याशी कशा तरी प्रकारचे संधान साधण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न करत आहे. अथवा त्या पानाला आग लावण्याचे विचार त्या रोपाला समजले असावेत. बँकस्टरचे समर्थक दुसरा कोणताही विचार मानायला तयार नव्हते कीं, ती भयंकर कंपन कोठल्यातरी इतर कारणांनेसुद्धा होऊ शकत होती.

त्यानंतर तो त्याच्या मेजाच्या खणात एक कांडेपेटी मिळते ती घेतो व शिलगावतो. त्या रोपाजवळ तो ती पेटती काडी घेऊन जातो तेव्हां त्या कंपनात प्रचंड वाढ झालेली होती.

तो ती काडी त्या पानाला न लावता खोली सोडून निघून जातो. नंतर तो दुसर्या दिवशी येतो. त्यांने कांहीं महत्वपूर्ण निरीक्षण केले होते. त्या प्रयोगानंतर तो त्याचे मत मांडतो ते असें, माझ्या जाण्यानंतर माझा सहायक तेथे जातो व तेंच प्रयोग करतो कीं त्या पानाला आग लावणे पण प्रत्यक्षात तो त्या पानाला आग लावत नव्हता. त्याचा अनुभव असा आला कीं, ती कंपन थांबली होती. ह्यावरून असे समजते कीं, त्या रोपाला समजले कीं, त्याला कोणीही आग लावणार नाही व ते रोप स्वताला सुरक्षित समजू लागले व म्हणून त्यांनी तशी तीव्र कंपन देणे बंद केले होते. हासुद्धा असाच एक कयास होता. परंतु, जर ते खरे असेल तर वनस्पती माणसा सारखी विचार करू शकते असें मानावे लागेल. म्हणजे वनस्पतीला मन असावे व ती विचार करत असावी. त्याला बॅंकस्टरने रोप मानसशास्त्र असें नांव दिले. त्यांने त्या विज्ञान शाखेला जन्म दिला होता.

त्यानंतर त्या दोघांना वाटले कीं, पॉलिग्राफपेक्षा जास्त परिणामकारक साधन ते सिद्ध करण्यासाठी वापरले पाहिजे. तो प्रयोग अनेक चौकस लोकांनी त्यांच्या ठिकाणी केले, त्यात कांहीवेळा तसे परिणाम मिळाले व कांहीवेळा नाही मिळाले ह्याचा नेमका काय अर्थ काढावा असा तज्ज्ञाना प्रश्न पडत होता, तरी बॅंकस्टरच्या प्रयोगात तथ्य आहे असा विश्वास बहुतेक लोक असल्याचे सांगत आहेत.

पेरणी व पीक काढणी ह्यावेळी घेतलेले कंपनाचे अनुभव लक्षात घेण्यासारखे आहेत. त्या प्रयोगात पीटर टॉपकीन, गार्डनर क्रिस्टोफर, बर्ड हे विशेष होते. त्यातील बर्डने त्या अनुभवाचे वर्णन करणारे पुस्तक लिहीले त्याचे नांव "वनस्पतीचे गुप्त जीवन", ते १९७३ साली प्रसिद्ध झाले. त्यात दिलेल्या निरीक्षणातून हे दाखवले आहे कीं, वनस्पतीला भिती, प्रेम अशा मुलभूत भावना असतात. जरी त्यांची त्या व्यक्त करण्याच्या तर्हा वेगळ्या असतात. त्यांच्या पुस्तकांतून ते असेसुद्धा सांगतात कीं, मातीतील जीवसुद्धा त्यांच्या भावना दाखवत असतात परंतु, त्या समजण्याची कुवत माणसाला नसते. सर्व जग जीवंत असून त्यांना समजण्यासाठी माणसाला विशेष कांहीं करावयाला पाहिजे.

बॅंकस्टरच्या मताशी सहमत असलेले रॉबर्ट स्टोन ज्यानी "पेशींतील गुप्त जीवन" १९९४, अशा नावांचे पुस्तक लिहीले आहे. त्यानी प्रसिद्ध "सिल्वा पद्धती" ची माहीती देणारे

पुस्तक लिहीले आहे. पाश्चात्य विद्वानांना वनस्पतीच्या ह्या मन ओळखण्याच्या गुणाचा अर्थ सांगता आला नाही तरी आपल्या हिंदू मान्यतेनुसार त्याचे स्पष्टीकरण मिळवता येते. हिंदू मान्यता सांगते कीं, ह्या विश्वात चार वाणी आहेत. त्या अशा, वैखरी, मध्यमा, पश्वंती आणि परा. त्यातील वैखरी वाणी आपण ऐकू शकतो व ती यंत्रांनी उत्पन्न करता येते व ती यंत्राने नोंदतासुद्धा येते. म्हणजे आपला ध्वनी. त्याचे शरीरातील स्थान आहे जीभ. ती स्थुल वाणी समजली आहे. त्यापेक्षा सुक्ष्म आहे ती मध्यमा, तिचे स्थान आहे घसा व आपले स्वरयंत्र. तो आवाज आपल्याला ऐकू येतो परंतु, दूसर्यांना ऐकू येत नाही. मनात केलेले जप ह्या वाणीत येतात. ती वैखरीपेक्षा सुक्ष्म असते. त्यापेक्षा जास्त सुक्ष्म वाणी आहे पश्वंती. तिचे स्थान आहे हृदय. स्वतः शिवाय ती कोणालाही ऐकू येत नाही. तिला अंतर्मनाची वाणी असें समजले जाते. त्यापेक्षा अतिसुक्षम वाणी आहे तिला परा म्हणतात. तिचे स्थान आहे आपली नाभि. असें सांगतात कीं, परा हि वाणी सर्व विश्वाची वाणी आहे. ती सर्व जीवांना एकच आहे. वैखरी अनेक आहेत. मध्यमासुद्धा वैखरी प्रमाणे अनेक असतात. परंतु, परा व पश्वंती ह्या सगळ्या जीवांची एकच असते. पॉलिग्राफ मध्यें जी नोंद होते ती ह्या परा किंवा पश्वंती वाणीची असते. माणूस त्याचे विचार परा वाणीत करत असतो त्यानंतर ते मध्यमात व तेथून वैखरीमधून व्यक्त होत असतात. म्हणजे विचाराची वाणी परा आहे. ज्याला परा वाणी समजते तो अंतर्ज्ञानी होतो. तो दुसर्यांचे विचार ओळखू शकतो. कांहीं प्रकारच्या योगी साधनेने ते साध्य करता येते असें हिंदू मान्यतेत समजले जाते. म्हणून ते दुसर्याला समजू शकतात. अंतर्ज्ञानी माणसें हि परा वाणी समजत असतात. लहान मुलं (अर्भक) आपल्या आईशी परा वाणीत बोलतात. म्हणून आईला तिच्या मुलाची भाषा समजते जी इतर कोणाला समजत नाही. पाळीव प्राणीसुद्धा त्या परा वाणीत आपल्या मालकाचे विचार समजून त्याप्रमाणे वागतात. व्याध गीतेत पतिव्रता आणि व्याध, कौशिकाचे मनातील विचार ह्या परा वाणी मुळेंच ओळखतात. बॅकस्टरच्या मनातील विचार ते रोप ह्या परा वाणीच्या माध्यमातून ओळखत असावेत. कांहीं वेळा सामान्य माणूल सुद्धा परा वाणी समजतो व त्याला आपण आतला आवाज म्हणून समजतो. शेतकरी जो शेतीत हुशार आहे तो बर्याच वेळी पिकांचे विचार समजून काम करत असतो परंतु, ते तसे होत आहे ते त्याला लक्षात येत नाही कारण

त्याला हे विज्ञान अवगत नसते. ह्या परा वाणीलाच पाश्चात्य वैज्ञानिक बॅंकस्टर परिणाम असें म्हणतात. आधुनिक वैज्ञानिकांना हे हिंदू शास्त्र माहित नसल्यामुळें ते त्याची उपपत्ती कशी होते ते सांगू शकत नाही. कांहीं माणसें त्यांना माहित नसतांना स्वाभाविकपणे परा वाणीचा उपयोग करत असतात जे सगळ्यांना जमत नाही. असे लोक सांगतात कीं ते वनस्पतीशी बोलतात, पण ते इतर मान्य करत नाहीत कारण, त्यांना ह्या चार वाणींची माहिती नसते.

आधुनिक तंत्रानुसार पॉलिग्राफ व इइजी (Electroencephalography) यंत्रे परा व पश्चंती वाणी वाचत असतात पण त्याचे वैखरीत रुपांतर करणे आजवर जमलेले नाही. अशा प्रयोगातून हेंच सिद्ध होते कीं, वनस्पती संवेदनशिल असतात, त्यामुळें त्यांच्या हत्येत व प्राण्यांच्या हत्येत तत्वतः कांहींच फरक रहात नाही. वनस्पती मरतांना वेदना व्यक्त करते हे जगदीशचंद्रांने त्यांच्या क्रेस्कोग्राफ यंत्राने शंभर वर्षापूर्वी दाखवून दिले आहे. आता बॅंकस्टरच्या संशोधनाने वनस्पती परा वाणीच्या मदतीने माणसांना ओळखू शकते ते सिद्ध केले आहे. कारण प्रत्येक व्यक्ती त्याची स्पंदनं परा वाणीतून सतत सोडत असतो व ती स्पंदन हि त्याची ओळख असते. प्रत्येक माणसाची ती स्पंदनं त्याची विशिष्ट असल्याने ते शक्य होते. पॉलीग्राफ ती स्पंदन मोजू शकतो. ते काम पॉलिग्राफ पेक्षा इइजी यंत्र जास्त सुक्ष्मपणे करत असते.

माणूस व इतर प्राणी त्यांचे विचार परा वाणीतून सतत सोडत असतात. त्यांच्या वैशिष्ट्यामुळें ते विचार कोणाचे ते ओळकता येईल परंतु, अजून ते तंत्र विकसित झालेल नाही. नाहीतर माणूस वनस्पतीशी बोलू शकेल. तरी कांहीं शेतकरी विशेषकरून बायका, तशा पद्धतीने बोलू शकतात हे अनेक प्रयोगांनी दाखवून दिले आहे. बायकांची परा वाणी समजण्याची क्षमता पुरुषांपेक्षा जास्त चांगली असते हेसुद्धा सिद्ध झाले आहे. माणसाच्या भावना परा वाणीने प्रथम व्यक्त होत असतात. त्या कशा समजतात ते समजणार्यालासुद्धा लक्षात येत नाही. तो सांगू शकणार नाही किं, त्याला त्या कशा समजल्या पण परा वाणी बद्दल जे जाणतात ते ह्या परिणामांचे अर्थ समजू शकतात. वनस्पतीला त्या भावना समजत असाव्यात व त्या प्रमाणे ती तिची प्रतिक्रीया देत असावी असे धरले जाते.

थोडक्यात बॅंकस्टरचे सगळे अनुभव परा वाणीच्या मदतीने शाबीत करता येतात. परंतु, पाश्चात्याने ती चार वाणींची कल्पना नसल्यामुळें ते वैज्ञानिक अजून त्याचा सिद्धांत अधिकृत मानत नाहीत.

ह्या चार वाणींच्या पसरण्याच्या क्षमतेबद्दल सुद्धा मोठा फरक असतो. जसें वैखरी त्या आवाजाप्रमाणे आजूबाजूच्या परिसरात ऐकू येते. इतर दोन, मध्यमा व पश्यंती फक्त शरीरातच असतात त्या क्वचितच बाहेर ऐकू जातात. परंतु, परा वाणी अनेक मैल लांब पर्यंत ऐकू जाऊ शकते. म्हणून त्या वाणीने संदेश देणे हे हल्लीच्या इंटरनेट सारखे असते. फक्त तो संदेश समजण्याची क्षमता असली पाहिजे.

१९७१च्या सुमारास असें सिद्ध झाले कीं, वनस्पतीला केंद्रीय मेंदू नसला तरी त्याच्या असंख्य पेशी एकमेकांना ज्ञानवाहक तंतूनी जोडलेले असतात. त्यामुळें एका पेशीची भावना अथवा संवेदना ती पेशी इतर पेशींना कळवू शकते व त्या नंतर एक समाईक संवेदना त्या व्यक्त करत असतात. त्यामुळें एका पेशीला इजा झाली तर त्याची वार्ता ती पेशी रोपातील इतर पेशींना सांगत असते. त्यानंतर त्यांचा सामुहीक प्रतिसाद अनुभवास येत असतो. हि क्रिया प्राण्यांच्या प्रतिक्षिप्त क्रियेपेक्षा वेगळी असली तरी साधारणपणे त्यांचे अंतिम परिणाम तसेंच असल्याचे दिसून येत असते. ह्या व्यवस्थेमुळें वनस्पतीतील पेशी एकमेकांशी, दुःख, भिती (असुरक्षित असल्याची भावना) व आनंद अशा संवेदना, सहभाग करू शकतात.

एकादी क्रिया करण्या आधी ते विचार माणसाच्या मनांत निश्चित प्रथम होत असतात. ते अर्थातच् परा वाणीत होतात. ते ती वनस्पती समजू शकते तसेंच तसे न करण्याचे विचारसुद्धा तिला समजतात म्हणजे त्या माणसाच्या मनातील (मन परा वाणीत विचार करत असते) विचार समजत असल्यामुळे त्याला धरून ती वागत असते हे सिद्ध झाले. ते सगळे त्यातील आलेखामुळें पॉलिग्राफ मध्ये दिसत होते . अशारिताने परा वाणीचे कार्य वनस्पतीत होत असते हे स्पष्ट झाले.

आपल्या हिंदूंच्या अघोर शाखेतील माहितीनुसार प्रत्येक व्यक्ती एक प्रकारची स्पंदन प्रसारीत करत असते ती त्याची ओळख असते. ती स्पंदन समजण्याची क्षमता वनस्पतीत असते व त्यामुळे तिला समजते कोण तिच्या जवळ आले आहे. त्यानुसार ती तिची

प्रतिक्रिया देत असते. ह्या स्पंदनांची नोंद इइजी (Electroencephalography) यंत्राने करता येते कां ते माहित नाही. अजून आपले आधुनिक विज्ञान त्यात प्रगती करू शकलेले नाही. आधुनिक विज्ञानाची एक महत्वपूर्ण मर्यादा असते व ती अशी कीं, ती करण्यासाठी कोणत्यातरी वास्तविक साधनाची मदत त्यांना घ्यावी लागत असते. जे विज्ञान वास्तविकतेच्या पलिकडले आहे त्याचा मागोवा त्यामुळें आधुनिक विज्ञान पद्धती घेऊ शकत नाही. ही त्याची मर्यादा आहे. आत्मा, मन, जीव आणि बुद्धी (अवास्तविक) ह्या गोष्टी त्यात येतात. म्हणून आधुनिक विज्ञान त्यांचा मागोवा घेऊ शकणार नाहीत. त्यासाठी त्यांपेक्षा पूर्णतया भिन्न अशा कार्यपद्धतीचा वापर करावा लागणार आहे.

आधुनिक यंत्रांनी आत्मा, मन, जीव आणि बुद्धी (अवास्तविक) ह्या गोष्टींची सिद्धता दाखवता आली नाही म्हणून त्या अस्तित्वात नाहीत असें मानण्याचा अट्टाहास करणे, हेसुद्धा एक प्रकारचे आधुनिक मागासलेपण आहे असें समजावे लागेल.

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न

हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

ई साहित्यची पुस्तके www.esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद